# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/११/२०१२.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०३, दिनांक २०/११/२०१२.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. ०१/१२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३, दि. २०/११/२०१२ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा सुचना क्रमांक ०३, दि. २०/११/२०१२ सोबतची विषय पत्रिका
### सभा शनिवार दि. ०१/१२/२०१२

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ०६ | दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** - निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ०७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध वस्तुंचे, मालमत्तेचे संरक्षणार्थ "सुरक्षा रक्षक" पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| ०८ | भाईंदर (प.) नियोजित टेंभा हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास मंजुरी मिळणेकामी मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देणे. |
| ०९ | "मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियम २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत. |
| १० | पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यांत येणाऱ्या परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरात वाढ करणेबाबत. |
| ११ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत On line Booster पंप बसविण्याच्या कामास मान्यता मिळणेबाबत. |
| १२ | *कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.* |
| १३ | निविदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) कनकीया जलकुंभ पासून रामदेव पार्क ते आयडीयल पार्क ते इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहीनी अंथरणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| १५ | कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची (क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या अहवालानूसार दुरुस्ती करणेबाबत. |
| १६ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क नुसार रस्ता कर लागु करणेबाबत मंजुरी मिळणेबाबत. |
| १७ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. |
| १८ | मिरारोड (पूर्व), रामनगर व जांगीड इन्क्लेव्ह येथील ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेली इमारती मधील जागा वापराबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १९ | मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत. |
| २० | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय व नगरभवन या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| २१ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मार्केट इमारतीमधील गाळ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे |
| २२ | मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे T.D.R.<br>GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR साठी कलम ३७(१) नुसार |

| | |
|---|---|
| | विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्ताव मा. नगर विकास विभागास पाठविणेस मान्यता देणेबाबत. |
| २३ | इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी मंजूर करणेबाबत. |
| २४ | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करणेबाबत. |
| २५ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २४६ मैदान विकसित करुन मुलांना खेळण्यासाठी खुले करण्याकरीता खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. |
| २६ | बगीचा/उद्यान आरक्षण क्र. ११७ व आरक्षण क्र. २२१ येथे Theme Park (Public Park) व खेळाचे मैदान विकसित करणेबाबत. |
| --- | <u>शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे</u> – |
| --- | <u>समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल</u> – निरंक |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २० नोव्हेंबर २०१२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०१/१२/२०१२ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **०१ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. १९/११/२०१२ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महाराष्ट्र शासन नियमानुसार आस्थापनाचा खर्च ३५ % असावा. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आस्थापनेचा खर्च ४० % आहेत का? जर ४० % असेल तर मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत नविन भरत्या करुन आस्थापनेचा खर्च वाढविता येतो का? |
| अ) या पूर्वी मंजूर पदे ६ महिन्यांत भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे ती पदे व्यपगत झालेली आहेत का? जर हो तर शासनाची किंवा मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून सदर पद पुन्हा पुर्नजिवीत करण्यात आली आहे का? सदर पद पुन्हा पुर्नजिवीत केल्याशिवाय भरती करणे योग्य आहे का? |
| ब) मिरा भाईंदर महानगरपालिकेत यापूर्वी सन २०१०-२०११ मध्ये २००८ च्या सेवाशर्ती नियमानुसार भरती केलेल्या आहेत. तेव्हा आता नविन भरत्यांसाठी २००५ चा सेवाप्रवेश नियम लावण्यात आलेला आहे का? व असे २००८ च्या ऐवजी २००५ चा सेवाप्रवेश नियम लावता येतो का? |
| क) यापूर्वी ५३८ सफाई कामगार व शांतीस्टार यांचे पाणी प्रकल्प योजनाची ६९ कर्मचारी यांची नेमणूक मिरा भाईंदर महानगरपालिकेत केलेली आहे. सफाई काम ठेका पध्दतीने दिल्याने ५३८ व ६९ या कर्मचाऱ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेचा शिपाई, लिपीक, वॉलमन, बगीचा देखभाल व दुरुस्ती इतर पदावर काम करण्याकरीता घेऊ शकतो का? नाही तर का? सदर त्यामुळे ५३८ व ६९ यातील पात्र कर्मचारी यांना नविन मागविलेल्या भरतीतील पदांवर नेमणूक केल्यास महानगरपालिकेचा आस्थापनेवर खर्च वाढणार नाही. |
| ड) मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आयुक्तांना किती वेतना पर्यंत आस्थापनेवर नविन भरती नियुक्त करण्याचे अधिकार आहेत? |
| **०२ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. १९/११/२०१२ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिकाकडे एकूण किती ॲमिनीटी स्पेसच्या जागा उपलब्ध झाले आहे? |
| अ) सर्व विकासकाची नांव ॲमिनीटी ओपन स्पेसच्या एकूण क्षेत्र किती व काय आहे? |
| ब) ॲमिनीटी ओपन स्पेसची कुठली जागा विकसित केली आहे व किती विकासकांनी विकसित केली आहे? |
| क) एकूण किती विकासकांना ॲमिनीटी ओपन स्पेस विकसित करण्यासाठी काय काय मोबदला दिला आहे? |
| ड) सर्व ॲमिनीटी ओपन स्पेस महानगरपालिकेच्या नावावर ७/१२ व फेरफार झाले आहे का? व ते महानगरपालिकेच्या ताब्यात आहे का? |

# मा. महासभा

# दि. ३०/१२/२०११

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह
## महासभा दि. ३०/१२/२०११

आज शुक्रवार दि. ३०/१२/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०९ दि. १९/१२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | म्हात्रे कल्पना महेश | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २२) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | फेरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३५) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३६) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३७) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सदस्य |
| ३८) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३९) | शर्मा भगवती | गटनेता |
| ४०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ४१) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४२) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४३) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४४) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ४५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४६) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४७) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४९) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ५०) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ५१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५२) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५३) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५४) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५५) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५६) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५७) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५८) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५९) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ६०) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ६१) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६२) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६३) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६४) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६५) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६६) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६८) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६९) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ७०) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ७१) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७२) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७३) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ७५) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | हंसुकुमार पांडे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| २) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ५) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| १) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |

**नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रीय गीतासाठी जागेवर उभे रहावे (राष्ट्रीय गीत "वंदे मातरम" ने सभेला सुरुवात करण्यात आली)

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार, दि. ३०/१२/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०९, दि. १९/१२/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक अभिनंदनाचा ठराव मांडतो.

**अनिल सावंत :-**

प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला नाहीतर तुम्हाला वेळ वाढवावा लागेल

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती जेव्हा निवडुन आले, त्यांचे अभिनंदन करण्याचे काम सचिवांचे होते. सभागृहाचे हे कर्तव्य आहे की, मा. सभापतींना मान द्यायचा. प्रत्येक वेळी सचिव बुके आणतात आणि अभिनंदन करुन घेतात. तरी आम्ही ठराव मांडतो. आम्ही बुकेची अपेक्षा करत नाही. शासनाने पण आदेश दिलेला आहे की, बुके आणायचा नाही म्हणून आम्ही फक्त अभिनंदनाचा ठराव मांडतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदी मा. सौ. कल्पनाताई महेश म्हात्रे यांची निवड झाल्याबद्दल ही महासभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. तसेच सौ. कल्पनाताई म्हात्रे यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**आसिफ शेख :-**

आमचे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ८४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदी मा. सौ. कल्पनाताई महेश म्हात्रे यांची निवड झाल्याबद्दल ही महासभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. तसेच सौ. कल्पनाताई म्हात्रे यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराचा तास सुरु होत आहे. ११ वाजून १५ मिनिटे झालेली आहेत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, मी एक अभिनंदनाचा ठराव करतो. आपले नगरसेवक श्री. आसिफ शेख यांना पी.एच.डी. करुन डॉक्टरेट मिळालेली आहे. त्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा मी एक ठराव वाचतो महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जेष्ठ नगरसेवक मा. विरोधी पक्ष नेते डॉ. आसिफ गुलाब शेख यांना <u>इंग्लंडच्या (यु.के.) ट्रिनीटी वर्ल्ड युर्निवसिटीने पॉलिटिकल सायन्स</u> या क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याबद्दल **"डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी "** (Ph.D) ही पदवी व गोल्ड मेडल देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

डॉ. आसिफ गुलाब शेख हे मिरा भाईंदरचे सुपुत्र असून भाईंदर सेकंडरी स्कुल व वसई वर्तक कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी मुंबई विद्यापिठातून सन १९९३-९४ साली एम.कॉम. ची डिग्री प्राप्त केली असून ते तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले असून त्यांनी यापूर्वी २० वर्षे मुंबईतील दै. नवाकाळ, दै. सांज लोकसत्ता, दै. सांज जनसत्ता (एक्सप्रेस ग्रुप) आदी नामांकित व लोकप्रिय दैनिकांमध्ये यशस्वीरित्या पत्रकारीता करुन सामाजिक कार्य केलेले आहे. तसेच त्यांनी स्थानिक आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा यांच्या नेतृत्वाखाली मिरा भाईंदर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष पद व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रभाग समिती सभापती पदाची जबाबदारीही यशस्वीरित्या सांभाळलेली आहे. समाजिक, सांस्कृतिक, कला, क्रिडा व आध्यात्मिक क्षेत्रात देखील त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग व सहकार्य असते, तसेच जनहिताच्या कामात देखील अग्रेसर असतात. डॉ. आसिफ शेख हे अजातशत्रु व मितभाषी असून त्यांचा समाजातील सर्व जात, पात, धर्म, संप्रदाय व घटकांबरोबर सदैव प्रेम, आपुलकी, माणूसकीचे संबंध असून त्यांचा जनसंपर्क देखील दांडगा असल्याने ते समाजातील सर्व घटकांत लोकप्रिय आहेत.

डॉ. आसिफ शेख यांना डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल ही महासभा त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांच्या भावी कार्यास मनःपूर्वक,हार्दिक शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ८५ :-**

मा. महापौर साहेब, मी एक अभिनंदनाचा ठराव करतो. आपले नगरसेवक श्री. आसिफ शेख यांना पी.एच.डी. करुन डॉक्टरेट मिळालेली आहे. त्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा मी एक ठराव वाचतो महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जेष्ठ नगरसेवक मा. विरोधी पक्ष नेते डॉ. आसिफ गुलाब शेख यांना <u>इंग्लंडच्या (यु.के.) ट्रिनीटी वर्ल्ड युर्निवसिटीने पॉलिटिकल सायन्स</u> या क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याबद्दल **"डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी "** (Ph.D) ही पदवी व गोल्ड मेडल देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

डॉ. आसिफ गुलाब शेख हे मिरा भाईंदरचे सुपुत्र असून भाईंदर सेकंडरी स्कुल व वसई वर्तक कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी मुंबई विद्यापिठातून सन १९९३-९४ साली एम.कॉम. ची डिग्री प्राप्त केली असून ते तीन वेळा

नगरसेवक म्हणून निवडून आलेले असून त्यांनी यापूर्वी २० वर्षे मुंबईतील दै. नवाकाळ, दै. सांज लोकसत्ता, दै. सांज जनसत्ता (एक्सप्रेस ग्रुप) आदी नामांकित व लोकप्रिय दैनिकांमध्ये यशस्वीरित्या पत्रकारीता करुन सामाजिक कार्य केलेले आहे. तसेच त्यांनी स्थानिक आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा यांच्या नेतृत्वाखाली मिरा भाईंदर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष पद व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रभाग समिती सभापती पदाची जबाबदारीही यशस्वीरित्या सांभाळलेली आहे. समाजिक, सांस्कृतिक, कला, क्रिडा व आध्यात्मिक क्षेत्रात देखील त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग व सहकार्य असते. तसेच जनहिताच्या कामात देखील अग्रेसर असतात. डॉ. आसिफ शेख हे अजातशत्रु व मितभाषी असून त्यांचा समाजातील सर्व जात, पात, धर्म, संप्रदाय व घटकांबरोबर सदैव प्रेम, आपुलकी, माणूसकीचे संबंध असून त्यांचा जनसंपर्क देखील दांडगा असल्याने ते समाजातील सर्व घटकांत लोकप्रिय आहेत.

डॉ. आसिफ शेख यांना डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल ही महासभा त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांच्या भावी कार्यास मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

११ वाजून १५ मिनिटे झालेली आहेत. प्रश्न क्र.५२ नगरसेवक श्री. हंसुकुमार पांडे यांचा प्रश्न आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, मेरा प्रश्न ऐसा है की, सन २०११-१२ के आर्थिक वर्ष मे इंडस्ट्रीअल इस्टेट के विकासकाम के लिएं कितने रुपये की तरतुद रखी गयी है इसका खुलासा किजिए। मुझे जवाब मिला है की, पचास लाख की तरतुद है। इतने बडे इंडस्ट्रीअल इस्टेट जिसमे ११० करोड एलबीटी आता है। करोडो रुपये के हिसाब से टॅक्स आते है और उसमे इंडस्ट्रीअल इस्टेट के लिए सिर्फ पचास लाख रुपये की तरतुद रखी गयी उसमे कुछ काम किया हुआ मुझे कही दिखाई नही देता है।

**दिपक खांबित :-**

साहेब, लेखी उत्तर दिलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

लेखी उत्तर आहे की, तुम्ही इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये पन्नास लाख रुपये खर्च करता एवढी मोठी इंडस्ट्री आहे. मिरा भाईंदरमध्ये ईस्टमध्ये इंडस्ट्रीअल इस्टेटच आहे. वेस्ट मध्येपण आहे. त्याच्यासाठी फक्त पन्नास लाख रुपये? हमारे इंडस्ट्री के माध्यम से आपको ११० करोड रुपया एलबीटी आता है। तो हमारे इंडस्ट्री के लिए सुविधा सिर्फ पचास लाख?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा प्रशासनाचा विषय नाही. याच्यावर आम्ही बजेटच्या वेळेला चर्चा करत होतो. त्यावेळी आपण चर्चा करु दिली नाही. आणि हे सभागृहाने ठरवलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मग इंडस्ट्रीमध्ये सुविधा द्यायची नाही का?

**शरद पाटील :-**

इंडस्ट्रीमध्ये सुविधा द्यायची तर तुम्ही मा. महापौरांना विचारा प्रशासनाला विचारुन काय करणार? तुम्ही या विषयावर चर्चाच करु दिली नव्हती आम्ही याच्यावर चर्चा करत होतो.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही कधी केले होते?

**शरद पाटील :-**

बजेटच्या वेळी

**हंसुकुमार पांडे :-**

मला प्रशासनाला उत्तर देऊ द्या तुम्हाला प्रश्न विचारल नाही प्रशासनाला विचारला आहे ते उत्तर देतील.

**शरद पाटील :-**

आम्हाला त्यावेळेला चर्चा करु दिली नाही मग तुम्ही आज हा प्रश्न का आणता? याच्यामध्ये तुम्ही सभागृहाचा वेळ कशाला घालवला.

**(सभागृहात गोंधळ)**

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यावेळेला तुम्ही आम्हाला चर्चा करु दिली नाही एका मिनिटात बजेट आटपले मग आज हा विषय का?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, प्रश्नोत्तराचा तास श्री. हंसुकुमार पांडे यांचा आहे त्यांचा प्रश्न आहे श्री. शरद पाटील यांना मध्येच प्रशासनाची बाजू घेण्याचा अधिकार नाही. अर्ध्या तासानंतर त्यांना जे बोलायचे असेल ते त्यांनी बोलावे. इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये सोयी सुविधा नाहीत हा प्रश्न आहे श्री. शरद पाटील यांना इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये सोयी सुविधा नको आहेत का?

**शरद पाटील :-**

साहेब, आम्हाला इंडस्ट्रीमध्ये सोयी सुविधा हव्या आहेत, त्यामुळे आम्ही आमचे मा. महापौर असताना पाच करोड रुपये ठेवले होते.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो सन २०११-१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात औद्योगिक वसाहतीतील विकासकामांकरीता पन्नास लाखांची तरतुद केली होती. त्याप्रमाणे चालू वर्षात मा. स्थायी समितीच्या मंजूरीने कामे प्रस्तावित करुन कामे झालेली आहेत. त्यापैकी फक्त एक काम बाकी आहे. इतर तीन कामे पूर्ण झालेली आहेत. दरवर्षी मा. महासभा ज्याप्रमाणे बजेट करते, त्याप्रमाणे प्रशासनामार्फत अंदाजपत्रके करुन एस्टीमेट करुन कामे करण्यात येतात.

**हंसुकुमार पांडे :-**

लेकीन साहब, पचास लाख रुपये मे क्या काम होगा यह हमे बताइए। पुरे मिरा भाईंदर मे कम से कम ६०-६५ इंडस्ट्रीअल इस्टेट होगा। उसके अंदर आप लोग पचास लाख रुपया तरतुद रखते हो। उसमे क्या काम होगा? एक छोटा गटर बनाने के लिए आपका दस लाख का बजेट बनता है। जो गटर बनते है उनका ठिकाणा नही है। कॉन्ट्रॅक्टर को जो काम दिया जाता है, उस कॉन्ट्रॅक्टर को खडे रहकर बोलते है की, अगर तु गटर बरोबर नही बनाएगा तो तुम्हारा बिल पास नही करेंगे। तेरे गटर का स्लोप बरोबर नही है। तु स्लोप बरोबर दे। उतनेही पैसे मे काम होनेवाला है। वहा स्लोप नही देने की वजह से गटर का सत्यानाश होता है। आप पचास लाख रुपये डालकर भी फायदा क्या? आप इंडस्ट्री मे घुमे हो क्या? एक बार इंडस्ट्री मे घुमकर देखो। कल मैने हितेंद्र इंडस्ट्री के पास आपके एस.आय.श्री सोनावणे साहब को बुलाया उनको बुलाकर दिखाया कितना कचरा पडा था। इतना लेटर देने की बावजूद भी कचरा उठता नही है। इंडस्ट्री मे इतनी गंदगी रहेगी तो कैसे चलेगा? कितनी बिमारी उत्पन्न होती है, वह भी आप देखिए।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, याच्या अगोदर इंडस्ट्रीच्या बाबतीमध्ये श्रीम. प्रभात ताई पाटील यांचाही विषय होता. श्री. हंसुकुमार पांडे यांनी दोन वेळेस विषय घेतले. इंडस्ट्रीवर अन्याय होतो आहे हे संपूर्ण सभागृहाच्या सर्व सन्मा. सदस्यांना माहिती आहे. पण आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. आज खऱ्या अर्थाने बघायला गेले तर तुम्ही सगळ्या इंडस्ट्रीमध्ये जाऊन बघा. मा. आयुक्त साहेब, तुम्हाला त्यांची हालत माहिती पडेल. एका झोपडपट्टीपेक्षाही त्यांची हालत खराब आहे प्रत्येक इंडस्ट्रीमध्ये प्रत्येक गाळ्याजवळ बाहेर कचरा असतो. आपण साफसफाईचे जे टेंडर काढतो ते ठेकेदार इंडस्ट्रीमधील कचरा हटवत नाहीत दुर्गंधी पसरलेली आहे. तिथले कित्येक कामगार आजारी पडतात हा प्रश्न खरोखर आहे. याच्यावर आपल्याला लक्ष द्यावे लागेल.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर मे बफिंग का इंडस्ट्री बहोत ज्यादा है। ५० टक्का इंडस्ट्री बफींग की है। क्योंकी बर्तन बनता है, तो पॉलिश होना जरुरी है और वो बफींग का कचरा उठाने के लिए कोई तैयार नही होता है। बोलते है की, बफींग का कचरा नही लेकर जाएंगे। तो कचरा कहाँपर डालने का? उसके लिए आप लोगो ने क्या तरतुद की है। और आपके जो एसआय और सब ऑफिसर घुमते है, वो बोलते है की, बफींग का कचरा नही उठायेंगे। तो बफींग का कचरा कहाँ डाला जाएगा? फिर उठाते नही इसिलिए हम लोग इसे आग लगाते है और उसे भुसा बनाते है। तब भी वहाँ साफसफाई नही होता है।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, २०११-१२ ला पन्नास लाखांचे प्रोव्हीजन केले होते. १०-११ ला पाच करोड होत मग २०११-१२ ला पन्नास लाख का केले? २०१०-११ ला मा. सभापती आमचे होते, त्यावेळी आम्ही इंडस्ट्रीअल इस्टेटसाठी पाच करोड ठेवले होते. २०११-१२ ला वेगळे मा. सभापती आले, नंतर बजेट कमी केले. पाच करोड कुठे खर्च केले? मघाशी श्री. शरद पाटील साहेबांनी आरोप केला की, तुम्ही पाच करोडचे पन्नास लाख केले. हे पन्नास लाख आम्ही केलेले नाहीत. त्यांनीच केलेले आहेत.

**शरद पाटील :-**

माझे मित्र श्री. अनिल सावंत यांची माहिती बहुतेक अपूरी असेल, त्यावेळेला सत्तेत आपणच होतो.

**(सभागृहात गोंधळ)**

**जुबेर इनामदार :-**

श्री. हंसुकुमार पांडे यांनी ह्या प्रश्न मांडला म्हणून फक्त या वर्षाचीच पन्नास लाख रुपये तरतुद तुम्ही दाखवली. गेल्यावर्षामध्ये पाच कोटी रुपये होते. इंडस्ट्रीअल इस्टेट किंवा इंडस्ट्रीज या शहरामध्ये गेल्यावर्षी किंवा चालु वर्षामध्ये स्थापित झालेले नाही.

**शरद पाटील :-**

पण तुम्ही त्यावेळेला तरतुद ठेवलीच नाही. तुम्ही त्याच्यावर चर्चा करु दिली नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**शरद पाटील :-**

तुम्ही पन्नास लाख ठेवले आणि आत्ता तुम्हीच सांगता की, अजून वाढवा. मग वाढवायला सांगा. मा. आयुक्त वाढवू शकतात का?

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही सांगता की, तरतुद ठेवली नाही. मग २०१०-११ चे पाच कोटी कुठे गेले?

**जुबेर ईनामदार :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या वॉर्डमध्ये इंडस्ट्रीअल इस्टेट आहेत. श्री. खांबित साहेब, मला इकडे माहिती देतात की, इंडस्ट्रीमध्ये रस्ते बांधण्याची गरज नाही किंवा रस्ते करायची गरज नाही, नाले करायची गरज नाही. ही सत्य परिस्थीती आहे का? इथे कितीतरी नगरसेवक असे आहेत ज्यांचे वॉर्ड इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये आहेत.

**दिपक खांबित :-**

साहेब, इंडस्ट्रीमध्ये जी जी कामे आहेत, ती ती वेळोवेळी प्रशासनाकडून पाहणी करुन, अंदाजपत्रके करुन कामे करण्यात येतात. याबाबत आम्ही मा. आयुक्त साहेब आणि महाराष्ट्र पॉल्युशन कंट्रोल बोर्डाचे अधिकारी, सगळे उपायुक्त आणि आम्ही पंधरा दिवसांपासून फिरलो आणि आम्ही प्रत्येक इंडस्ट्रीमध्ये गेलो. तिकडे पाहणी केली आणि सगळ्यांना नोटीसा काढलेल्या आहेत संबंधीत एसआय ना कचरा उचलण्याचे आदेश दिले आहेत. काही लोकांनी बफींगचा कचरा डायरेक्ट नाल्यामध्ये डम्प केला आहे. इंडस्ट्रीचा जो मोठा नाला आहे, त्याच्यामध्ये घूर्ण बफींगचा कचरा टाकला जातो. तो ही साफ करायला घेतला आहे आणि त्या नाल्यावर स्लॅब टाकायचे कामसुद्धा आपण यावर्षी प्रपोझ करतो, ते होईल आणि इंडस्ट्रीमध्ये कुठे-कुठे कामे करायची बाकी आहेत ते तुम्ही सांगा. त्याचे एस्टीमेट आम्ही तुम्हाला सादर करतो.

**जुबेर इनामदार :-**

श्री. खांबित साहेब, मिरा भाईंदरच्या दर्शनी भागामध्ये भाईंदर ईस्टमध्ये फाटकजवळ चर्चच्या समोर जे इंडस्ट्रीअल इस्टेट आहे, त्याला गटार नाही. तिकडे टाकलेला कचरा उचलायला कोणी येत नाहीत. ही सत्य परिस्थीती आहे. त्या पूर्ण इस्टेटला नाला नाही. माझ्याकडे फोटोग्राफ्स आहेत. तुम्ही माहिती देताना फक्त या चालू वर्षाची माहिती दिलेली आहे. या चालू वर्षामध्ये इस्टेट चालू झालेल्या आहेत का किंवा इंडस्ट्री चालु आहेत का?

**दिपक खांबित :-**

चालू वर्षामध्ये जी काही कामे करायची आहेत ती आम्ही सगळ्यांना विचारतो आणि आम्ही काही एस्टीमेट केले आहे त्याप्रमाणे यावर्षी बजेटचे प्रोव्हीजन................

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी चांगला प्रश्न आणलेला आहे. विषय या शहराच्या उद्योगाचा आहे. त्यांना आपण सोयी सुविधा पुरविल्या तर येणाऱ्या काळामध्ये इथे उद्योग वाढेल. नाहीतर ते या शहरामध्ये कशाला थांबतील? त्यांनी फक्त एलबीटी भरायची का?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या मागच्या २००९-१० च्या सभेत, ज्यावेळेला आपले बजेट मांडले गेले. त्यावेळेला मी मा. स्थायी समिती मध्ये सदस्य असताना ऑक्ट्रॉयचे जमलेले त्यावेळेला आपल्याकडे ऑक्ट्रॉय होता आत्ता एलबीटी आहे याची १० टक्के रक्कम इंडस्ट्रीअलच्या विकास करण्याकरीता ठेवावी अशी सुचना झाल्यानंतर बजेटच्या जमा बाजूमध्ये एक विशेष लेखाशिर्ष तयार केले गेले. ज्यावेळेला मी स्टँडींग कमिटीवर मेंबर होतो, तिथपर्यंत ते लेखाशिर्ष होते, त्यानंतर ते लेखाशिर्ष गायब केले गेले. आप तो सिर्फ पचास और पाच की बात कर रहे है। उस वक्त तो १० टक्का की बात हुई थी और लेखाशिर्ष भी रेडी किया था। और उसके मुताबीक सन्मा. महापौर श्री. तुळशीदास म्हात्रे इनके वॉर्ड मे काम किया गया। उसी पैसे से मगर वो लेखाशिर्ष गायब हो गया। अब जो यह हुआ या नही हुआ इसको दोनो जगह के भागीदार है। मा. आयुक्त साहेब, तुम्ही नव्हते साडे आठशे करोडच्या बजेटची मिटींग क्रिकेट आहे म्हणून दोन मिनिटांत समाप्त करुन हे सगळे सदस्य घरी गेले होते. आत्ता भानगडी कशाला करता? क्रिकेटचा सुमार काय ते आम्हाला माहिती नाही. आम्ही खेळलो नाही, खेळणार नाही आणि खेळतपण नाही पण त्या क्रिकेटकरीता हे सभागृह बंद पाडुन बाहेर गेलात. त्याचे परिणाम आम्ही कशाला भोगायचे? मिटींग चालू द्या.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, यह इंडस्ट्री से अपने को इतना पैसा आता है। उस इंडस्ट्री के लिए एक नल का कनेक्शन लेने के लिए भी आप लोग रोते हो। कम से कम दस गाले के पिछे पाच गाले के पिछे एक कनेक्शन आप लोगो ने देना चाहीए। आप लोग आज तक इंडस्ट्री के लिए पानी की भी सुविधा नही कर सके। क्या इंडस्ट्री से पैसा नही आता है? इंडस्ट्रीअल इस्टेट को कोई सुविधा नही मिलती है। इसका कारण क्या है?

**मा. महापौर :-**

इंडस्ट्री के बारे मे जो बात चली है, जो किस्सा हो गया, वो वापस आनेवाला नही है। अब आगे जो करना है उसका बजेट तयार करने बोलिए। आगे के बजेट मे लेते है।

**हंसुकुमार पांडे :-**

अब श्री. मिलन म्हात्रे साहब ने बोला की, जो एलबीटी आता है, उसका१० टक्का इंडस्ट्री के लिए रखिए। तो १० टक्का का तरतुद रखिए।

**मिलन म्हात्रे :-**

तरतुद ऑलरेडी था। मैने लेखाशिर्ष बनाया था। श्री. खांबित साहब बैठे है उनको पुछो। लेखा परिक्षक है उनको पुछो, लेखाशिर्ष कॅन्सल करने के लिए तरतुद होती है।

**हंसुकुमार पांडे :-**

इंडस्ट्री के अंदर भी सुविधा चाहीए। रोड चाहीए, गटर चाहिए, पानी की सुविधा चाहिए, कचरा उठना चाहिए, डंम्पर आता नहीं है। डंम्पर में वर्कर्स नहीं है। इंडस्ट्री के लिए एक्स्ट्रा वर्कर रखिए। इंडस्ट्री से आपको इतना पैसा आता है, तो उसमें सुविधा दो।

**मा. महापौर :-**

जो सुविधा कम है, उसे इस साल शुरु करेंगे। जो काम का एस्टीमेट तैयार करेंगे, एस्टीमेट के हिसाब से बजेट तैयार करेंगे।

**हंसुकुमार पांडे :-**

मा. आयुक्त साहब को आप सुचना दिजिए।

**मा. महापौर :-**

जो बात हो गयी है वो वापस आनेवाली नहीं है।

**हंसुकुमार पांडे :-**

बराबर है। लेकिन इतने साल से इंडस्ट्री के उपर ध्यान नहीं दिया गया। इंडस्ट्रीयल इस्टेट के एक भी गटर का स्लोप आप चेक करवाइए। आपके इंजिनिअर को भेजिए। अगर स्लोप बरोबर होगा तो मैं मा. महासभा अटेंड नहीं करुंगा।

**मा. महापौर :-**

आप बोलते है कि, इतने साल से सुविधा दिया नहीं।

**हंसुकुमार पांडे :-**

इंडस्ट्रीअल इस्टेट के एक भी गटर का स्लोप बराबर नहीं है। सब पानी रिव्हर्स आता है। और वहीं पानी रोडपर आता है। रोड पर पानी आने के वजह से इतने मच्छर होते है की, बिमारी फैलती है। एक तो लेबर प्रॉब्लेम इतना हो गया है। उसके बावजुद यह बिमारी फैलती है। ना कभी दवा का छिडकाव होता है। पहले धुआवाला आता था। अब धुआवाला भी बंद हो गया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, मैं एक बात को यहाँ पर स्पष्ट करना चाहूँगा की, अपने महानगरपालिका का साफसफाई रुटीन साफसफाई में आता है। यह जो बफींग है यह को हाय प्रोडक्ट है। जैसे कि, नर्सिंग होम और हॉस्पीटल में हमारा अलग से डिस्पोजल सिस्टम है। उसके लिए अलग से एजन्सी है। जो हम अपने खर्च से मेंटेन करते है। By product of the industry which could not be consider into the routine nala safai or safai. इसके लिए अलग से प्रोव्हीजन कॅल्युलेट करना है। बफींग इज अ बाय प्रोडक्ट इंडस्ट्री और उसको बाय प्रोडक्ट के हिसाब से देखना चाहिए।

**वर्षा भानुशाली :-**

मा. महापौर साहेब, अभी श्री, खांबित साहब ने बोला की, इंडस्ट्री का बजेट अभी बाकी है। तो इंडस्ट्री का बजेट अभी बाकी है। तो इंडस्ट्री का बजेट अभी बाकी है क्या ? अभी आपने बोला कि, बजेट बाकी है। कुछ काम है तो मैं कर देता हूँ।

**मा. महापौर :-**

उनका कहना है कि, अगले साल का बजेट करेंगे उसमें तरतुद करेंगे।

**वर्षा भानुशाली :-**

अभी पाच मिनिट पहले बोला की, बजेट बाकी है। आप बोलो, मैं कर देता हूँ। मैने एक लेटर दिया, उसमें उन्होंने बजेट नहीं है ऐसा दिखाया। यहाँ पर कुछ और बोल रहे है और लेटर में कुछ और बोला।

**दिपक खांबित :-**

मैंने अब ऐसे बोला कि, इस साल का बजेट पचास लाख का था। वो सब काम प्रपोझ हो गये है। अगले साल के बजेट के लिए जो भी काम है, वो लेते है। अब दो महिने मे अपना बजेट हो रहा है।

**वर्षा भानुशाली :-**

वो काम आप ले रहे हो कि, डायरेक्ट जवाब ना लिखकर दे रहे हो।

**दिपक खांबित :-**

आपका काम है, जो पिछे का नाला है, उसके उपर स्लॅब डालना है।

**वर्षा भानुशाली :-**

तो आपने वो लिया है की, ऐसे ही मना कर दिया।

**दिपक खांबित :-**

अगले बजेट के लिए लिया है। जो भी काम होगा वो आप दिखाइए।

**हंसुकुमार पांडे :-**

मेरा आप लोगो से एक रिक्वेस्ट है, जो भी गटर बनाते है, उस गटर का स्लोप बडे नाले के लिए बराबर दिजिए। ताकी जो पानी शेड पर आता है, वो रोडपर ना आए। श्री. खांबित साहब, इस बात को लाइटली मत लेना। नहीं तो अगले टाईम मैं चुप नहीं बैठुंगा। लेकिन धमाल करुंगा यह बात आप लोग याद रखना। क्योंकी यह बहोत गंभीर विषय है। शेडपर जो पानी आता है, उससे बहोत तकलीफ होती है। बिमारी फैलती है, और दवा का छिडकाव होता नहीं है, वो भी चालू करवाइए। श्री. कांबले साहब को फोन करते है, तो वो फोन नहीं उठाते है। श्री. कांबले साहब को पुछिए की, वो फोन क्यों नहीं उठाते है ?

**दिपक खांबित :-**

एअरटेल का कुछ प्रॉब्लेम चल रहा है।

**हंसुकुमार पांडे :-**

कुछ प्रॉब्लेम नहीं है। आज प्रॉब्लेम है। दस दिन पहले थोडे ही प्रॉब्लेम था।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी प्रश्न मांडला आहे. मी फक्त तुम्हाला आणि सचिवांना आठवण करुन देते. मागच्या वेळेला या विषयावर मी लक्षवेधी मांडली होती. त्यावेळेला आपण आश्वासन दिले होते की, त्या निमित्ताने आपण काहीतरी करु. कारण इंडस्ट्री हा सगळयांनी त्यावेळेला उचललेला विषय आहे. आजही इथे पोटतिडकीने बोलतात. आपल्याला सर्वांना माहिती आहे की, या शहराचा अर्धा अधिक सोर्स आपल्याला इंडस्ट्रीकडून मिळतो. या शहराची ओळखच इंडस्ट्री आहे. असे असताना त्यावेळेला लक्षवेधीवर ठराव झाला नव्हता. पण सचिवांना एक विनंती केली होती की, या विषयावर तुम्ही एक बैठक बोलवावी. आणि आपल्याला सुध्दा सांगितले होते. पण तसे काही झाले नाही. तसे झाले असते तर कदाचित हा प्रश्न आला नसता. आपण त्याच्यावर विचार करा.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, श्री. हंसुकुमार पांडे यांनी विषय काढला त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले की, पन्नास लाखाचेच बजेट होते, आम्ही काम केले. पण जो साफसफाईचा विषय आहे, औषध फवारणीचा विषय आहे त्याच्यासाठी तर फुल बजेट दिले होते. तिथला कॉन्ट्रॅक्टर कोण आहे? तो साफसफाई का करत नाही? एस.आय. कोण आहे ? त्यांच्याजवळ हिशोब मागा. साफसफाई का होत नाही ?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांनी इंडस्ट्री संदर्भात जो विषय उपस्थित केला त्या अनुषंगाने आता सभागृहात चर्चा झालेली आहे. मला आश्चर्य वाटते की, सत्ताधारी पक्ष आपला, सर्व सन्मा. सदस्य आपले, आणि या सदनामध्ये मा. महापौरांनी दिलेले निर्देश आणि आदेश प्रशासन पाळत नाही. पेपरमध्ये आपल्या बातम्या येतात की, मा. महापौर प्रशासनापुढे हतबल आहेत. अशा बातम्या, आज पण महाराष्ट्र टाईम्समध्ये बातमी आहे. प्रशासन काही कार्यवाहीच करत नाही. आपला काय उपयोग ते सांगा या सभागृहात एवढी चर्चा करायची. पोटतिडकीने बोलायचे. नागरीकांच्या समस्यांसाठी आपण सगळे या ठिकाणी येतो. आणि इकडे सत्ताधारी पक्षच बोलतात हे दुर्देव आहे. तुम्ही शहराचे प्रथम नागरीक आहात. तुमचे जर प्रशासन ऐकत नसेल, कायद्यामध्ये तरतुद आहे. तुम्ही कायद्याचा अभ्यासच करत नाहीत.

**मा. महापौर :-**

तो तुमचा प्रश्न आहे. प्रश्न तुम्ही उपस्थित केलेला आहे, म्हणून तुम्हीच शहानिशा करा. कोण अधिकारी काम करत नाहीत त्यांचे नाव द्या. आपण सर्वमताने ठराव करु.

**आसिफ शेख :-**

माझा मुद्दा असा आहे की, मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चा कायदा आपल्याकडे आहे. त्या कायद्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, सन्मा. महापौरांच्या निर्देशाखाली प्रशासनाने काम करायला पाहिजे. प्रशासन जर तुमचे ऐकत नसेल तर यापेक्षा या शहराचे कोणते दुर्देव नाही. मा. महापौरांचे ऐकत नाही म्हणजे काय ?

**नयना म्हात्रे :-**

तुमचे म्हणणे काय आहे ? मा. महापौरांनी राजीनामा द्यावा का ?

**आसिफ शेख :-**

आम्ही असे बोलत नाही. ते तुम्ही बोलता.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, मेरा विषय बाजू में रह गया।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, नगरसेवक म्हणजे मुकादम आहेत का ? कारण त्या दिवशी स्टँडींगला मी आरोग्याचा विषय काढला. मा. सभापती मॅडमनी मला बोलायला दोन मिनिटे दिली. त्याच्यानंतर सांगितले की, शहरामध्ये इतके मच्छर आहेत की, माणूस विना पंख्याचा बसू शकत नाही. लोक खरोखर हॉस्पीटलला आहेत. कितीतरी लोक दगावले. एखादा माणूस हॉस्पीटलला गेल्यानंतर त्याला वीस-पंचवीस हजार रुपये खर्च असतोच. मग माणसांकडे पैसे असो, नसो माणूस सोने विकून कर्ज काढून त्या माणसाला बरे करतो. तो विषय मी त्या स्टँडींग कमिटीमध्ये काढला. तर मी श्री. पानपट्टे साहेबांना सांगितले की, तुम्ही काय करता? श्री. पानपट्टे साहेबांनी सांगितले की, माझे सगळे एस.आय. बघतात. मला बघायची गरज नाही. मी मुकादम नाही. म्हणजे नगरसेवक वॉर्डमध्ये लक्ष देतात, ते मुकादम आहेत का ? आपण मा. आयुक्तांना सांगितले की, साहेब आमच्या वॉर्डमध्ये हे काम आहेत. मा. आयुक्त साहेब स्वतः बोलतात की, मी जागेवर येऊन बघतो. मग मा. आयुक्त साहेब मुकादम आहेत का ? मग अधिकारी जर असे उलटसुलट बोलतील तर त्यांना आरोग्याचे चार्ज कशाला देता ? श्री. पानपट्टे साहेब आतापर्यंत कोणत्या वॉर्डमध्ये गेले आहेत याचा त्यांनी खुलासा करावा की, माझ्याकडे आरोग्याचा चार्ज आल्यापासून मी या वॉर्डमध्ये जाऊन आलो, मी त्या वॉर्डमध्ये जाऊन आलो. श्री. पानपट्टे साहेबांनी मला सरळ असे उत्तर दिले की, मी मुकादम नाही. मी जागेवर येणार नाही. अशी उत्तरे देणार का ? जर अधिकारी जागेवर जाणार नाही, बघणार नाही मग काम कसे होणार ? आता माझ्या सारखी बाई रोज फिरते म्हणून मला ते कळते. एखाद्या ठिकाणी खरोखर किती घाण असेल, तर आपल्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन बघू नये का ? मा. आयुक्त साहेब, त्यांना जर आरोग्याचे काम जमत नसेल तर त्यांच्याकडून ते डिपार्टमेंट काढून टाका.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, मेरा जवाब मुझे मिला नहीं।

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मला त्यांनी त्यादिवशी उत्तर दिले की, मी मुकादम नाही. मी जागेवर येणार नाही. सगळया सदस्यांना विचारा, वाटल्यास आपल्या मा. उपायुक्तांना देखील विचारा की त्यांनी मला काय उत्तर दिले. हे उत्तर बरोबर नाही. म्हणजे मुकादम असतात त्यांनीच जागेवर जावे का ? एस.आय. बघतो म्हणून यांनी जागेवर जाऊ नये का ? मग एस.आय. बघतो तर तुम्हाला इथे चार्ज कशाला दिला आहे ? तुम्ही त्यांचे बॉस आहात. तुम्ही वॉर्डमध्ये फिरले पाहिजे. तुम्हाला महापालिकेने गाडया दिल्या आहेत. तुम्हाला सायकलवरून फिरायचे नाही. साहेब, माझी तुम्हाला एक विनंती आहे की, असा एक सक्षम अधिकारी बघा. जेणेकरून तो आरोग्यासाठी पूर्ण मिरा भाईदर पिंजून काढेल.

**वंदना पाटील:-**

मा. महापौर साहेब, मी त्याच विषयाला धरून बोलते. माझ्याही वॉर्डमध्ये डेंग्यू झाला असे श्री. पानपट्टे साहेबांना सांगितले. पण त्यांनी साधी विचारपूसही केलेली नाही. आणि कोणाला पाठवले सुध्दा नाही की, कशामुळे झाले किंवा काय. याचा अर्थ काय ?

**विजया वैती:-**

मा. महापौर साहेब, मी एक पत्र दिले आहे, त्याचे साधे उत्तरही दिलेले नाही. या गोष्टीला महिना झालेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. त्यादिवशी स्टँडींगमध्ये चर्चा झालेली. मी म्हटले की, ज्या ठिकाणी मोठी तक्रार असते, त्या ठिकाणी मी पर्सनली जातो. रोजच्या रोज सफाईला मुकादम आहेत, सफाई कामगार आहे, एस. आय. आहेत सार्वजनिक आरोग्य अधिकारी आहेत. जर तक्रार मोठी असेल तर..........

**नयना म्हात्रे:-**

साहेब, तुम्ही आत्ता मा. आयुक्तांसमोर हे सगळे खोटे बोलता. सन्मा. सदस्यांना विचारा की, तुम्ही काय बोललात श्री. पानपट्टे साहेब, तुमच्याकडे आरोग्याचा चार्ज काल किंवा आज दिलेला नाही. मला वाटते खुप वर्षे झाली. तुम्ही आरोग्यामध्ये काही प्रगती केलेली नाही.

**प्रेमनाथ पाटील:-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो, मा. उपायुक्त श्री. पानपट्टे साहेब, मी आपल्याला इंडस्ट्रीमधील आणि साफसफाई बद्दल एक सी.डी. दाखवलेली. त्याच्याबद्दल आपण काय कार्यवाही केली ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब साफसफाई केली.

**प्रेमनाथ पाटील:-**

कोणी केली ? तुम्ही बघायला आलेले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मी आलो होतो.

**प्रेमनाथ पाटील:-**

कधी आले होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तुमच्या समोर आलो होतो. एकदा मी बघून गेलो.

**प्रेमनाथ पाटील:-**

आत्ता माझ्याबरोबर येता का ? प्रभाग समिती क्र. ०२ ची परिस्थिती एवढी खराब आहे..........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मान्य करतो.

**प्रेमनाथ पाटील:-**

मान्य करत असतानासुध्दा तुम्ही त्या एस.आय च्या सहया घेऊन कॉन्ट्रक्टरची बिले काढता. तुम्हाला बघून यायला नको की ही साफसफाई झाली आहे की नाही ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साफसफाई झाल्याबद्दल आमच्याकडे प्रत्येक रजिस्टरवर सह्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणाच्या सह्या आहेत ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

स्थानिक लोकांच्या सह्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता दाखवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दाखवतो.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, जो गटर का कचरा निकालते है, वो महिना भर वही पडा रहता है। उससे और भी ज्यादा बिमारी फैलती है। उसे उठाते क्यों नही ? दो दिन में सुक जाएगा तो उठाते है ऐसा बोलते है। और फिर यह लोग आते ही नहीं है। आप लोग सिर्फ पेपर पर दिखाते हो की, काम हो गया। फिजिकली कुछ काम होता ही नहीं है।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जागेवर काही काम केलेले नसते. यांचे एस.आय.चे कॉन्ट्रॅक्टरचे सर्व साटेलोटे आहेत. हे लोक प्रत्येक महिन्याला सहि घेऊन त्यांची बिले पास करतात.

**मा. महापौर :-**

आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आमचे काम झाले पाहिजे एवढी आमची विनंती आहे.

**मा. महापौर :-**

यापुढे जास्त लक्ष देऊन काम करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा आरोग्याचा विषय पुढे चालू राहणार आहे का? आरोग्य विषयी आपण चर्चा करायची नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

आरोग्याचा प्रश्न तुम्ही तास संपला असे सांगता. इकडे डेंग्युचे पेशंट सापडत आहेत. नशीब आपल्या सभागृहात कोणाला झालेला नाही. परंतु, आपल्या आरोग्य विभागाचे गोडाऊन वगैरे, मा. आयुक्त साहेब, आमची आपल्याला नम्र विनंती आहे. एखादे मोठे संकट येऊ नये म्हणून मी सांगतो. जरा सर्व विभागीय गोडाऊनला आपण स्वतः भेट द्या. त्याच्यामध्ये भंगार, नवीन आलेले औषध, असलेली जंतुनाशके, रजिस्टरचा ठिकाणा नाही, कसलाच काही ताळमेळ नाही. आपल्या गोडाऊनमध्ये कसलीही सुविधा नाही.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, यह इंडस्ट्रीयल का विषय अभी जो उठाया गया है, साफसफाई और बफींग के कचरे को उठाया नहीं जा रहा है। उसके लिए प्रशासक के तरफ से एक मिटींग लेकर निर्णय लिया जाए। उनको जो भी चार्ज लेना है, आप ले सकते है। लेकिन इंडस्ट्रीअल की हालत बहोत बत्तर होती जा रहीं है। हम लोग फोन करते है तो एक बार कचरा उठाया जाता है। उसपर कोई ठोस निर्णय लिया जाए। उनको जो भी चार्ज लेना है, आप ले सकते है। लेकिन इंडस्ट्रीअल की हालत बहोत बत्तर होती जा रही है। हम लोग फोन करते है तो एक बार कचरा उठाया जाता है। उसपर कोई ठोस निर्णय लिया जाए। इस तरह की चर्चा और फ्रेश निकाल आधे घंटे मे समाप्त हो गया और वो विषय छोड दिया, ऐसे काम नहीं चलेगा।

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याला अशी विनंती आहे की, वैद्यकिय आरोग्य आणि साफसफाईचे स्वच्छता आरोग्य, कोण कुठे जाते-येते, आम्हाला काही देणे-घेणे नाही. ज्या दिवशी संकट येते तेव्हा आपल्याला सगळयांना जवाब द्यायला लागतो. आपण स्वतः बऱ्याच ठिकाणी सरप्राइज व्हिजीट देता. आम्हाला कळते, आम्ही काही बोलत नाही. चांगली गोष्ट आहे. आपण एक नवीन प्रघात घातला. आतापर्यंतच्या मा. आयुक्तांनी ते केले नाही. परंतु आपल्याला हाताखालचे जे डी.एम.सी. आहेत, मागे श्री. सुधीर राऊत बसले आहेत. तीन-चार मोठया प्रमाणावर त्यांचे शेरे आणि उत्तरे मला आलेली आहेत. आम्ही हेवॉक होतो. अधिकाऱ्यांनी कमीत कमी फाईल वाचली पाहिजे. एका नगरसेवकाला आपण उत्तर देतो. कुठल्यातरी एका संस्थेला देतो. आपण प्रॅक्टीकली कधीही ऑन ड्युटी सरप्राइज व्हिजीट या गोडाऊनला करा. ते चेक अप करा. अजुनपर्यंत फॉगींग मशीनचा ठिकाणा नाही. आपण चार टेंम्पो विकत घेतले, ते तसेच पडले आहेत. मशिनरी घेतली आहे, खर्च झाला आहे. पण काम काहीच नाही. याच्यावर कधीतरी निर्णय घेऊन चालू करा. मच्छरचे प्रमाण वाढलेले आहे याच्यात काही दुमत नाही.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. महापौर साहब, एकही परिवार मे ०६ जण को डेंग्यु हुआ है।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. सर्व नगरसेवक पोटतिडकीने आरोग्याच्या विषयावर बोलतात. आपण करोडो रुपयांचा ठेका स्वच्छतेसाठी देतो. आणि मला श्री. पानपट्टे साहेबांबद्दल वाईट वाटते की, त्यांचे एवढे सुध्दा लक्ष नाही. नगरसेविकेला तुम्ही अशा तऱ्हेचे उत्तर देता की, मी मुकादम आहे का ? तुम्ही त्या डिपार्टमेंटचे हेड आहात. तुम्ही मुकादमचे मुकादम आहात. प्रत्येक ठिकाणी घडणाऱ्या घटना, मग ते इंडस्ट्रीमध्ये असेल किंवा लोकवस्तीमध्ये असेल, साफसफाईची जबाबदारी आपली आहे. नगरसेवक तक्रारी करतात कारण नगरसेवकांचे लोक सांगायला येतात की, घाण आहे. आणि ते जनतेचे प्रश्न इकडे उपस्थित करतात. आपण या बाबतीत गंभीर राहा. नाहीतर सभागृहाला वेगळा निर्णय घ्यावा लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर श्री. जयंत पाटील साहेब, एक रिक्वेस्ट करतो, आपण मेन रोडला थांबा. काशिमिरा रोड, आझाद नगर, सगळी गटारे बदबदून भरली आहेत. मेन प्रमुख रोड, आपल्या शहराचे एक चित्र, रेल्वेतून किंवा बसने जे बाहेरचे नागरिक जातात, आपल्याकडे ज्युडिशिअल लॉ ॲकेडमी आहे, सुप्रीम कोर्टापासूनचे वरिष्ठ लोक आपल्याकडे येतात.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठेकेदाराच्या बाबतीत आपल्याला नरमाईची भुमिका घेण्याचे कारण नाही.

**मिलन म्हात्रे :-**

रस्त्यावरती गटारे जेव्हा तुंबून बाहेर पडतात तेव्हा आमच्यासारख्या नगरसेवकांचा हात पकडून थांबवून लोक आम्हाला विचारतात.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी एक लक्षवेधी आलेली आहे. श्री. नरेंद्र मेहता यांची लक्षवेधी आहे. मा. महापौरांच्य परवानगीने लक्षवेधीचे वाचन करतो.

**प्रति,**

**मा. सचिव सो.,**

मिरा भाईंदर महानगरपालिका,

मुख्यालय, भाईंदर (प.)

**विषय :- दि. ३०/१२/२०११ रोजीच्या मा. महासभेत लक्षवेधी स्विकारण्यात यावी.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मा. न्यायालयाची स्थगिती (Stay Order) घेऊन मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम झाले आहे यावर मी लक्षवेधत आहे.

अनधिकृत बांधकामाचे मा. न्यायालयाचा स्थगितीचा (Stay Order) आदेश काही दाव्यात रद्द झाले आहे. तरी महानगरपालिकेने आतापर्यंत त्या बांधकामावर कारवाई केलेली नाही.

मा. आयुक्तांनी व तत्कालीन आयुक्तांनी सन २०१०-११ मध्ये मा. उपायुक्त अतिक्रमण (H.O.D.) व अतिक्रमण अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात बांधकाम तोडण्याचे आदेश दिले आहे. तरी बांधकाम तोडले गेले नाही.

मा. न्यायालयाच्या अनधिकृत बांधकामाचे स्थगिती आदेश विरुध्द का मा. उच्च न्यायालयात न्याय मागितला नाही. महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामाला संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत दिले जाते आणि भविष्यात राहणाऱ्या व्यक्तींना ३ पट शास्ती किंवा बेघर होण्याची वेळ येते. संबंधीत अधिकाऱ्यांवर व बांधकामांवर का कारवाई होत नाही याबाबत मा. महासभेत माझी लक्षवेधी स्विकारण्यात यावी.

आपला विश्वासू,

सही/-

(नरेंद्र मेहता)

लक्षवेधी मा. महापौरांकडे सुपुर्द करीत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, स्विकारल्या बद्दल आपले मनःपूर्वक आभार. मी प्रथमतः सभागृहाला क्लीअर करतो की, माझा जो विषय आहे, हा कुठल्या अनधिकृत बांधकामा बाबतचा विषय नाही. विषय आहे की, मिरा भाईंदर शहरात मागच्या काळात मोठया प्रमाणात इलिगल कामे झाली आणि त्यामध्ये सर्वांनी कोर्टाचा आधार घेतला. कोर्टातून स्थगिती घेतात आणि त्यांची कामे चालू राहतात. त्यानंतर काही स्टे व्हॅकेंट होतात, काही कंटीन्यु होतात. काहीमध्ये आपण कोर्टात अपील करतो, काहीमध्ये करत नाही. तर मी यासाठी या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, मागच्या काळात मी जी माहिती घेतली की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात स्टे व्हॅकेंट झालेले आहेत. स्टे व्हॅकेंट होऊन काहीमध्ये मा. आयुक्तांनी किंवा तत्कालीन आयुक्तांनी बांधकाम तोडण्यासाठी आदेश केलेले आहेत. त्याची कार्यवाही व अंमलबजावणी होत नाही. या मधल्या काळात परत काही स्टे घेतले आहेत. त्या स्टेला आपण एकही स्टे व्हॅकेंट करण्यासाठी अपीलात जात नाही. आता उदाहरण सांगतो की, वसई-विरारला तीनशे अनधिकृत बांधकामावर त्या लोकांनी स्टे घेतला. ते हायकोर्टात गेले, त्यांनी व्हॅकेंट करुन आणला. म्हणजे ते आपण का करु शकत नाही? शेवटी कोर्टात आपण लाखो रुपये खर्च करायचे. आपण विधी विभाग चालवायचे. त्याचा फायदा होत नसेल आणि जे संबंधित अधिकारी आहेत, अतिक्रमण विभागाचे हेड ऑफ द डिपार्टमेंट आहेत, ते या अंमलबजावणी का करत नाही? विधी मॅडमनी पण जे-जे स्टे व्हॅकेंट झाले, त्याची माहिती संबंधित विभागाला दिलेली का? पुढील कार्यवाही करायचे काम मा. आयुक्तांचे किंवा एच.ओ.डी. चे आहे. कोणी करत नाही. मला आपल्याकडून तीन खुलासे पाहिजे की, एकूण किती स्थगितीचे आदेश प्रलंबित आहेत? मागच्या दोन-तीन वर्षात किती स्टे व्हॅकेंट झाले आणि त्याच्यावर कारवाई का झाली नाही? त्याचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा आणि आता मी पूर्ण इतिहास काढत नाही. कमीत कमी मागच्या दोन वर्षात ज्यांनी स्थगिती घेऊन अनधिकृत बांधकाम केले. त्यांच्या विरोधात आपण किती प्रकरणांवर मा. हायकोर्टामध्ये स्टे व्हॅकेंट करण्यासाठी अपील केले आहे ? ही माहिती मा. आयुक्तांनी मला द्यावी.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगी बोलते. ज्यामध्ये महापालिकेच्या विरुध्द निर्णय लागलेले आहेत. त्यामध्ये आपण वेळोवेळी रिपोर्टींग करुन मा. उच्च न्यायालयामध्ये किंवा जे डिस्ट्रीक्ट अपीलेट कोर्ट आहेत, त्याच्यामध्ये आपण अपील फाईल केलेले आहेत. मी त्याची माहिती तुम्हाला देते.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचे असे म्हणणे आहे की, जे-जे दावे महापालिकेच्या विरोधात निकाली लागले आहेत. त्या सगळयांमध्ये तुम्ही मा. उच्च न्यायालयामध्ये दाद मागितली आहे ?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

उच्च न्यायालय किंवा डिस्ट्रीक्ट अपिलिएट कोर्ट.

**नरेंद्र मेहता :-**

सगळेच मागितले आहेत की, काहीमध्ये आहे आणि काहीमध्ये नाही ?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ज्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात डू प्रोसेस ऑफ लॉ झाले नसेल आणि कोर्टाने डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करा असे निर्णय दिले असतील, त्या निर्णया विरुध्द आपण अपील करत नाही. आपण डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करुन घेतो आणि डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करुन सुध्दा जर न्यायालयाने आपल्या विरुध्द निर्णय दिला असेल तर आपण अपील दाखल करतो.

**नरेंद्र मेहता :-**

डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करुन आपण जी काही कार्यवाही केली, आपण अशी किती प्रकरणे कोर्टात सबमिट केली ते मला सांगा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

केली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे तुमचे असे म्हणणे आहे की, महापालिकेच्या विरोधात जेवढया दाव्यांचा निकाल लागला आहे, त्या सर्वांची तुम्ही उच्च न्यायालयात दाद मागितली. आणि ज्यामध्ये डू प्रोसेस ऑफ लॉ केलेले आहे, त्यामध्ये तुम्ही प्रोसेस फॉलो करुन कोर्टाला कळवलेले आहे ? म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणे असे एकही प्रकरण प्रलंबित नाही, ज्याच्यामध्ये डू प्रोसेस ऑफ लॉ पेन्डींग आहे किंवा अपील झाले नाही ?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, माझा दुसरा प्रश्न होता की, अशी किती प्रकरणे आहेत, ज्यामध्ये स्टे व्हॅकेंट होऊन मा. आयुक्तांनी किंवा तत्कालीन आयुक्तांनी हेड ऑफ द डिपार्टमेंटला आदेश दिलेले आहेत की, कार्यवाही करावी आणि ते प्रलंबित आहेत, कार्यवाही झाली नाही ? म्हणजे ज्याचा निकालच लागला. डू प्रोसेस झाले, स्टे व्हॅकेंट झाला आणि सगळे संपलेले आहे. त्याच्या अशा किती प्रकरणांची अतिक्रमण विभागाने कार्यवाही केलेली नाही,

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

आम्ही २००५ पासूनची यादी आता तुमची लक्षवेधी आली म्हणून काढलेली आहे. त्याच्यामध्ये २००५ पासून ते आतापर्यंत २२८ अनिधिकृत बांधकामे, ज्याचे स्टे व्हॅकेंट झाले आहेत, सूट डिस्प्युट झाले आहेत किंवा आपल्या बाजूने सूट झाले आहेत. आम्ही सगळे प्रभाग अधिकाऱ्यांना कळवलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, परत तोच विषय आला की, आपण लाखो रुपये खर्च करुन स्टे व्हॅकेंट करतो. पण नंतर कार्यवाही केली जात नाही. हा माझा मुळ मुद्दा होता. आणि आपल्याला जे वाटेल तेच अपील आपण करतो. सर्वांना आपण अपीलात जात नाही. मॅडम आपल्याला जे बोलतात, मी आपल्याला दाव्यासकट देणार की, काहीमध्ये आपण अपील केले नाही. काहीमध्ये डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करुन कोर्टात सबमिट सुध्दा केलेले नाही. मी पुढच्या मा. महासभेमध्ये ही माहिती सादर करणार आहे. मला आज तुमचे काय म्हणणे आहे ते ऐकायचे होते. आता मॅडमनी एका मिनीटात सांगितले की, आम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना ही माहिती पुरवलेली आहे की, ज्या २२८ केसेस आहेत त्या निकाली लागलेल्या आहेत. मग साहेब, २२८ चे जर पर थ्री डेचे एवरेज काढले तर एका बांधकामावर कारवाई झाली पाहिजे. मग प्रभाग अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली किंवा नाही केली हे बघायचे काम हेड ऑफ दि डिपार्टमेंटचे आहे. मॅडम तुम्ही डायरेक्ट प्रभाग अधिकाऱ्यांना पाठवता की, हेड ऑफ दि डिपार्टमेंटना देता ?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ज्या प्रोसेस फॉलो करायचे असेल ते रिपोर्टिंग आम्ही मा. उपायुक्त (मु.) साहेबांकडे रिपोर्टिंग करतो.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे हेड ऑफ दि डिपार्टमेट तेच झाले का? मग मला मा. उपायुक्त (मु.) यांनाच विचारायचे आहे की, आतापर्यंत का कार्यवाही झाली नाही? आणि आपल्याला सांगायचे आहे की, कार्यवाही झाली, तर आपण सांगा. कुठली झाली नाही ते मी सांगतो.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. इथे आता जी लक्षवेधी सुचना आयोजित केलेली आहे. त्याच्यामध्ये आपण हा जो प्रश्न विचारलेला आहे की, किती प्रकरणे ही कोर्टाने स्थगिती आदेश उठवून सुध्दा आपल्याकडे प्रलंबित आहेत. त्याबाबतीत वेळोवेळी डू प्रोसेस ऑफ लॉ च्या संदर्भात न्यायालयाच्या ऑर्डर होतात की, डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करावा. त्यावेळेला एकतर प्रभाग अधिकाऱ्यांच्या स्तरावर किंवा माझ्या स्तरावर सुनावणी घेतली जाते. नियमित सुनावणी घेऊन त्याच दिवशी किंवा इमिजिएट दुसऱ्या दिवशी आदेश पारित केले जातात. आणि ते आदेश पारित केल्यानंतर इमिजिएट लॉ ऑफिसरना कळवले जाते की, या बाबतीत आपण डू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो केल्या संदर्भात आपण संबंधित न्यायालयाला कळवावे, त्याचप्रमाणे ज्या काही बाबतीत स्टे व्हॅकेंट होत नाहीत किंवा काही विविक्षित कारणाकरीता स्टे दिला जातो. त्यावेळेला आम्ही इमिजिएटली उच्च न्यायालयाकडे अपिलासाठी आपल्या संबंधित वकिलांना सांगतो. आणि त्याचप्रमाणे ज्या-ज्या ठिकाणी स्टे दिलेला आहे तो व्हॅकेंट करण्यासाठी सुध्दा आमच्या स्तरावर नियमित फॉलो अप केला जातो. आणि त्या पध्दतीने मा. उच्च न्यायालयामध्ये सुध्दा अलिकडच्या काळात काही अपिल दाखल केले आहेत. २८ तारखेला आपण लक्षवेधी दिलेली असल्यामुळे इमिजिएटली आजच्या तारखेला आपण लक्षवेधी दिलेली असल्यामुळे इमिजिएटली आजच्या तारखेला माहिती नाही. पण आपण मला संधी दिल्यास पुढच्या मिटींगमध्ये आम्ही आणू शकतो. आपल्याला अंजून दाव्यांचे नंबर, सध्या मॅडमनी २२८ दाव्यांची माहिती तयार केलेली आहे. या व्यतिरिक्त माझ्याकडे आणि प्रभाग अधिकाऱ्याकडे किती सुनावणी घेतल्या गेल्या, त्याचप्रमाणे त्या सुनावधींमध्ये काय निर्णय झाले, ते निर्णय झाल्यानंतर ते मा. हायकोर्टाला किंवा संबंधित कोर्टाला कसे कम्युनिकेट करण्यात आले, याबाबतची सर्व माहिती आम्ही आपल्याला सादर करु.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्या लक्षवेधीमध्ये दोन विषय आहेत. साहेबांनी आता सांगितले की, लॉ विभागाकडून प्रभाग अधिकाऱ्यांना ते पुढचे आदेश पारित करतात. माझे असे मत आहे की, ते केल्यानंतर कोणाची जबाबदारी आहे? त्याच्यावर नक्की कार्यवाही झाली किंवा नाही? डू प्रोसेस ऑफ लॉ चे डेफिनेशन काय आहे? आपण जसे पाहिजे तसे डेफिनेशन लावतो. म्हणजे एखादे तुम्हाला वाटले की, श्री. ओमप्रकाश गाडोदिया यांना बोलवा. त्याच्या विरोधात डू प्रोसेस ऑफ लॉ आहे. त्यांचे ऐकून घेतले आणि आपल्याला वाटले की, यांना सहकार्य करायचे आहे. तर त्या परिने कोर्टात जायचे आणि आपल्याला वाटले की, बांधकाम तोडायचे तर म्हणजे डू प्रोसेस ऑफ लॉ मध्ये सर्व बांधकामे तोडली जात नाहीत. डू प्रोसेस ऑफ लॉचा मिनिंग काय आहे. की, त्याला संधी द्या, त्याचे म्हणणे ऐकून घ्या, ही सगळी प्रोसेस करा. नंतर तुमची कार्यवाही करा. पण काहीमध्ये आपण फक्त ऐकून घेतो यांचे असे नाही, तसे म्हणणे आहे. त्याप्रमाणे परत ही प्रथा परत चालू असते. श्री. राऊत साहेब, आपले ठामपणे म्हणणे आहे की, तुम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे जे-जे आदेश काढले. ती सगळी कारवाई झालेली आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

या संदर्भात मी माहिती मागवतो. आता मी ठामपणे आपल्याला विशिष्ट प्रकरणा संदर्भात माहिती देऊ शकत नाही. मात्र आम्ही वेळोवेळी प्रभाग अधिकाऱ्यांना या संदर्भामध्ये इन डिटेल ऑर्डर्स दिलेल्या आहेत. आता लेटेस्ट ज्या ऑर्डर्स आहेत यामध्ये मा. आयुक्त महोदयांनी सर्वात पहिली ती ऑर्डर दिलेली आहे, ते १ एप्रिल २००८ चे आदेश आहेत. आणि त्याच्यानंतर २९/०४/२००९ चे आदेश आहेत आणि तदनंतर......

**नरेंद्र मेहता :-**

आदेश रोज निघतात पण आदेशाचे पालन होत नाही. श्री. राऊत साहेब, आपण पुढच्या वेळी आणा. काही हरकत नाही. पण साहेब मला असे म्हणायचे आहे की, ड्यू प्रोसेस ऑफ लॉ पूर्ण फॉलो केले जात नाही. पूर्ण अपिल होत नाही. फक्त एकमेकांना आदेश देत असतो. आपण उपायुक्त (मु.) यांना आदेश काढले, त्यांनी प्रभाग अधिकाऱ्यांना आदेश काढले. प्रभाग अधिकाऱ्यांनी जे.ई. ला आदेश काढले आणि या पूर्ण सभागृहाला माहिती आहे की, २२८ बांधकामे या मिरा भाईंदर शहरामध्ये मागच्या तीन-चार वर्षात नक्कीच तोडली गेली नाहीत, हे सत्य आहे. याच्यामध्ये काय होते की, बांधणारे बांधून निघून जातात. आपण कोर्टातून निकाल घेऊन येतो. आणि नंतर जो व्यक्ती राहतो, त्याला बेघर व्हायची पाळी निर्माण होते. शेवटी तुम्ही आता आदेश काढले. तो व्यक्ती बेघर होणार, बिल्डर मदत करायला येणार नाही. प्लस तीन पट शक्ती. म्हणजे एखाद्या व्यक्तीने व्हायोलेशन करायचे आणि पूर्ण रहिवाश्यांनी भोगायचे. ही जी तीनपट शास्ती लागले, कुठेतरी आपले त्याच्यावर नियंत्रण नाही, किंवा प्रभाग अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही. आपण प्लींथ पर्यंत सी.सी. देतो, त्याच्या मागचा उद्देश हा आहे की, व्हायोलेशन होऊ नये. पण त्यानंतर कोणाचे काहीच नाही. कारण ओ.सी.ला येत नाहीत. आणि प्रभाग अधिकारी पुढची काही कार्यवाही करत नाहीत. आदेश निघतात. म्हणून मी तुम्हाला ठामपणे सांगितले की, तत्कालीन आयुक्तांनी आणि मा. आयुक्तांनी आदेश काढले. पण कारवाई झाली नाही. आता का झाली नाही याचा सभागृहाने गंभीरपणे विचार करावा. आणि साहेब, आपण जी तीनपट शास्ती लावतो, मी आजही माहिती घेतली, ज्याला ऑक्युपेशन नाही त्याला, तीनपट शास्ती लावली जाते. हे पूर्ण सभागृहाचे मत होते की, ज्यांनी ऑक्युपेशन घेतले नाही आणि बिल्डींग ॲज पर प्लान आहे, लिगल बिल्डींग आहे, त्यांना तरी तीन पट शास्ती लावू नये. त्यांचा काय दोष आहे ? साहेब, ऑक्युपेशनला अनेक गोष्टी असतात. प्रॅक्टीकली यु.एल.सी. चा फ्लॅट असू द्या. मधल्या काळात आपण सी.सी. चालू केली. ज्यांच्याकडे एन.ए. नाहीत. काही स्टे मॅटर आहेत. पण त्या राहणाऱ्या लोकांचा काय दोष आहे ?

**दिपक सावंत (कर निर्धारक व संकलक) :-**

मा. महापौरांच्या परवानगी बोलतो. बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ चे कलम २६७ (अे) नुसार इमारतीचा जो भाग अनधिकृत आहे, त्याच्यावर शाक्ती लावण्याचा नियम आहे. तत्कालीन आयुक्त साहेबांनी ३१/०५/२०११ रोजी याबाबतचे आदेश पारित केलेले आहेत. सद्यस्थितीत जर बिल्डींग ॲज पर प्लान असेल, आणि ओ.सी. घेतली नसेल, तर त्यांला शास्ती लावली जात नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग तो निर्णय आपण घेता की, नगररचना विभाग बिल्डींग चेक करुन आपल्याला माहिती देते का ?

**दिपक सावंत (कर निर्धारक व संकलक) :-**

याबाबत आम्ही आर्किटेक्टकडून सर्टिफिकेट मागवतो की, ही बिल्डींग ॲज पर प्लान आहे की नाही ? जी सी.सी. दिली त्याप्रमाणे आहे की नाही ?

**नरेंद्र मेहता :-**

जे आर्किटेक्ट सर्टिफिकेट देत नाहीत त्यांचे ?

**दिपक सावंत (कर निर्धारक व संकलक) :-**

जे माहिती असेल ते नगररचनाला कम्युनिकेट केली जाते. आणि त्याप्रमाणे त्यांचा अहवाल घेतला जातो.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, काही सोसायटीमध्ये वाद झाल्यामुळे आर्किटेक्ट पण नसतात आणि बिल्डरपण नसतात. तर आपल्या नगररचना विभागाने तपासून त्यांना दिले तरी हरकत नाही. आता साहेब जी माहिती विधी विभागाकडे आणि आपले मुख्यालय राऊत साहेबांकडेही नाही, तर पुढच्या वेळी आपण पूर्ण माहिती द्यावी. आणि विधी विभाग मॅडमना विनंती आहे की, आपण जे जे दावे सांगितले त्यांची यादी मला द्यावी. म्हणजे मी आपल्याला परत सांगतो की, आपण कुठल्यामध्ये केलेले नाही. धन्यवाद.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, विषय के हिसाब से बोलना है। मिरा भाईंदर में इलिगल बिल्डींग बनती कैसे है ?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जब मैं नगरसेवक बना था। तब एक केस लिया था। उस केस को मैंने उस समय उठाया। चार महिने से स्टे केस व्हॅकेट हुआ था।

**हंसुकुमार पांडे :-**

महापालिका के मिली भगत के बगैर बनती है क्या? नहीं बनती, तो उनके अधिकारी के उपर कार्यवाही क्यों नहीं किया जाता है? अधिकारी के उपर कार्यवाही करना चाहिए ना आकिटेक्ट के उपर कोई कारवाई होता है। आज तक कोई भी इलिगल बिल्डींग के आर्किटेक्ट पर कोई कार्यवाही हुआ नहीं है। आर्किटेक्ट पर कार्यवाही क्यों नही होती है ? आर्किटेक्ट प्लान पुट अप करता है। प्लान पास भी आर्किटेक्ट करता है।

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, काही शास्ती पूर्ण बिल्डींगला लावलेल्या आहेत. ज्याचा चौथा माळा अनधिकृत असेल, त्या सर्व बिल्डींगला शास्ती लावली, त्याचा तुम्ही तपास करा. ज्याचे अनधिकृत असेल, तेवढीच शास्ती त्यांना लावा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, यह जो डू प्रोसेस ऑफ लॉ है, इसको आप लॉ कन्सल्टन्सी से व्हेरीफाय करवाइए। क्योंकी अखबार में ऐसी खबरे आयी है की, आज स्टे हटा और कल तोड दिया गया। तो अपने यहा पर डू प्रोसेस ऑफ लॉ के नाम पर टाईम देकर उसे वापस स्टे लगाने का मौका कैसे दिया जाता है ? यह कबसे हो रहा है ? इसकी आप जरा जाँच किजिए।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८२, दि. २०/०८/२०११, दि. २०/०९/२०११ (दि. २०/०८/२०११ ची तहकुब सभा) व २९/०९/२०११ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रभात पाटील :-**

दि. २०/०८/२०११, दि. २०/०९/२०११ (दि. २०/०८/२०११ ची तहकुब सभा) व २९/०९/२०११ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ८२ :-**

दि. २०/०८/२०११, दि. २०/०९/२०११ (दि. २०/०८/२०११ ची तहकुब सभा) व २९/०९/२०११ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८६ :-**

दि. २०/०८/२०११, दि. २०/०९/२०११ (दि. २०/०८/२०११ ची तहकुब सभा) व २९/०९/२०११ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्व निवडणुका-निरंक, सर्व नियुक्त्या-निरंक, आयुक्तांकडील पत्रे व कामकाज. प्रकरण क्र. ८३, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालमत्ता (समाज मंदिरे, हॉल, मैदाने, मंगल कार्यालय) भाड्याने देणेबाबत सुधारीत दरांना मान्यता देणे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. १०१, कुत्र्यांविषयक उपविधी बाबत. त्यात आपण चुकीचा गोषवारा आणला आहे. म्हणून सदर विषय पुढच्या सभेत आणण्यात यावा.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची खालीलप्रमाणे मालमत्ता आहे.

| अ.क्र. | मालमत्ता | सध्याचे दर | मंजूर दर (प्रति दिन) |
|---|---|---|---|
| १ | समाजमंदिर - १६ | रु. २५०/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल – ०१ | रु. २५०/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| ३ | भाईंदर (पश्चिम) विनायक नगर हॉल – ०१ | रु. २५०/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | ७५००/- प्रति दिन |
| | ओपन टेरेस | रु. १५००/- प्रति दिन | ५०००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. ८/- प्रति युनिट | १०/- प्रति युनिट |
| | व्हिडिओ शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनिट | ३००/- प्रति युनिट |
| | खुर्ची भाडे | रु. २.५०/- प्रति नग | ५/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | ५००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | ५००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा / स्नेह संमेलन) | रु. १००/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर | रु. १०/- प्रति युनिट | १०/- प्रति युनिट |

| | | | |
|---|---|---|---|
| | मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | ३००/- प्रति दिन<br>५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (नवघर शाळा / आरक्षण क्र. १७०) | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा<br>ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात)<br>क) पूजा / लग्न कार्यक्रम<br>ड) मालवणी जत्रोत्सव | रु. १००/- प्रति दिन<br>(२०० मी. x २०० मी.)<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन<br>रु. १००/- प्रति दिन<br>स्टॉल (संपूर्ण कार्यक्रम) | ५००/- प्रति दिन<br><br>५०००/- प्रति दिन<br>७५००/- प्रति दिन<br>५००/- प्रति दिन<br>स्टॉल (संपूर्ण कार्यक्रम) |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग /जागा (सुट्टीच्या दिवसात) | रु. २५०/- प्रति दिन | ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता)<br>ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)<br>क) गेट / कमानी / बॅनर (धार्मिक / शैक्षणिक संस्था)<br>ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | रु. १.००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>रु. ०.५०/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>रु. २५०/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | ३.००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>१.५०/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>५००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>८००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन |

नवघर शाळेसमोरील मैदानांत फक्त कला-क्रिडांनाच परवानगी देण्यांत यावी . स्नेहसंमेलन किंवा जत्रोत्सव, लग्न कार्यासाठी ही मैदाने देऊ नयेत.

मिरारोड शितल नगर, गणेश मंदिर समोरील मैदान आरक्षण क्र. १७० (खेळाचे मैदान) हे कला-क्रिडांसाठीच आरक्षित ठेवावे.

मॅक्सस मॉल समोरील मैदान व कस्तुरी गार्डन हयांचा उल्लेख केला गेला नाही, त्याचे काय?

वरीलप्रमाणे दर आकारण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**एस.ए.खान :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची खालील प्रमाणे मालमत्ता आहे.

| अ. क्र. | मालमत्ता | सध्याचे दर | प्रस्तावित दर (प्रति दिन) | मा.महासभा दि.३०/१२/२०११ अन्वये मंजुर केलेले नवीन दर |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर - १६ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| २ | भाईदर (पुर्व) खारीगाव हॉल - ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ३ | भाईदर (प.) विनायक नगर हॉल - ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १००००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. ८/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट |
| | व्हीडीयो शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनीट | रु. ३००/- प्रति युनीट | रु. १००/- प्रति युनीट |
| | खुर्ची भाडे | रु. २.५०/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५.००/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. १५०/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. ५००/- | रु. ३००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. १०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय/महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/ स्नेह संमेलन | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. १,०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति दिन | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मैदाने (नवघर शाळा/आरक्षण क्र. १७०) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. X २०० मी. | रु. ५००/- प्रति दिन | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. X २०० मी. |
| | ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन |
| | क) पूजा / लग्न कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात) | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १००००/-प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. २५०/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात. | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ३.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव) | रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. १.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | क) गेट /कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ८००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फुट/प्रति दिन |

वरील प्रमाणे मा.महासभेने नवीन मंजुर केलेल्या दरास ही मा.महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हे दोन्ही ठराव ठेवले जात आहेत. त्यामध्ये माझी अशी सुचना आहे की, बजेटमध्ये जी प्रोव्हीजन केली आहे, आपले २०१२ चे जे बजेट तुम्ही प्रस्तावित केले. आता या अमाऊंन्ट वरखाली होत आहेत. तो फरक बजेटच्या लेखाशिर्षाला पडणार नाही का ? जरा लेखापरिक्षकांनी याचा खुलासा करावा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

श्री. मिलन म्हात्रे साहेब, आजचे दर जे आहेत ते १ एप्रिलपासून चालू होतील.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हा जो ८३ नंबरचा विषय आला आहे, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देणे बाबत सुधारीत दरांना मान्यता देणे. मा. आयुक्तांनी प्रस्ताव दिलेला आहे. मा. आयुक्त संपूर्ण शहर फिरलेले अहेत. ही समाजमंदिरे किंवा गार्डन, तिथले चालणारे कार्यक्रम, तिथली व्यवस्था, याचा सर्व अभ्यास त्यांनी केलेला आहे. माझी विनंती आहे की, मा. आयुक्तांनी या विषयावर थोडेसे निवेदन करावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, माझी अशी सुचना आहे की, हे जे दोन्ही ठराव, तुम्ही जे प्रस्तावित केलेले आहात, आता ह्यांनी जो ठराव ठेवला आहे, तो ॲज इट इज तेच आहे. परंतु, महागाई वाढते आहे, सर्व काही आहे, आपण आता प्रत्येक याच्यामध्ये बघतो की, शेअर वगैरे सगळे वाढतात, काही कमी नाही. पेट्रोलचे भाव एक रुपया दर दोन-चार दिवसाने वाढतो आहे. मला एक सांगा, या दोन ठरावांचा अर्थ काय? सभागृहामध्ये हा विषय रिशफल करण्याकरीता आला की, आहे तेच शफल करण्याकरीता आला ते सांगा. मला ते कळत नाही. साहेब, आम्ही चार वर्षे बजेट बनवलेले आहे. मा. महापौर साहेब, आपण स्वतः मिटींगमध्ये होते. प्रत्येक वर्षी आपण एक रुपयाचा सव्वा रुपया करतो. आपले पाण्याचे बील सात रुपयाचे साडेसात, आठ, साडेआठ, निदान पन्नास पैसे तरी किमान पक्षी वाढते. ह्या नवीन ठरावामध्ये, बहुतेक सगळे नवीन समीकरण बदलले आहे. जास्तीत जास्त मेजोरिटीमध्ये असलेला ठराव आता पास होईल. तो आर्थिक दृष्टीकोनातून, ज्याचा २५० रुपये भाव आहे, ते २५५ तरी म्हणताल का? सगळयांमध्ये भाववाढ चालली आहे. गाडयांच्या किंमती वाढल्या, भाडे वाढले. जागेचे भाडे वाढले. रिअल इस्टेटचे मार्केट आता काय चालले आहे. तुम्ही जो भाडयाने देणार, समोरचे बेंकेट हॉल बनवले आहेत. त्याचे भाडे तुम्ही जाऊन बघा. लोक २०-२५ हजार रुपये पर डे देतात. आणि आपल्या नगरभवनचे भाडे बघा. वरचे जे छोटे-छोटे पार्टी हॉल आहेत, नवरंग हॉटेलमधील पार्टी हॉल बघा. त्याचे भाडे जाऊन बघा. दिवसाला साडे पाच ते दहा हजार भाडे आहे, कमीत कमी कम्पॅरीजन तरी करा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, नक्कीच आम्ही आता जी दरवाढ दिली, कुठेही कमी केले नाही. काही प्रमाणात वाढवले आहे, काही प्रमाणात तसेच ठेवलेले आहे. या ठरावामुळे बजेटमध्ये उत्पन्न वाढणार आहे, कमी होणार नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, महापालिकेची जी वास्तू आहे त्याचा वापर सामान्य नागरीक करत असतो. श्रीमंत नागरिक

कोणीही वापर करायला जात नाही. सामान्य नागरिकाला या महागाईमध्ये स्वस्तात कुठेतरी एक सुविधा मिळावी म्हणून आम्ही ठरावात हे तसेच ठेवलेले आहे. काही ठिकाणी, आपण नगरभवन घ्या. त्या नगरभवनाला आजपर्यंत कधीही काही महत्वाचे रिन्युएशन झालेले नाही. गेल्या नऊ वर्षापासून मी बघत आहे. त्याच्यामध्ये कुठलीही नवीन सुधारणा झालेली नाही. त्याच्यामध्ये सुधारणा करावी. जेणेकरुन जे नागरिक कार्यक्रम करतात त्यांना तरी ते उपलब्ध होईल. सुभाषचंद्र मैदान शंभर रुपये होते, आम्ही आता हजार रुपये प्रस्तावित केले अहेत. पण त्या मैदानात आपण गेलो तर संपूर्ण कचरा भरलेला आहे. मधल्या काळात ज्यावेळी डंम्पींग बंद होते, तेव्हा मैदानातून गाडया गेलेल्या आहेत. पूर्ण मैदान अनइव्हन झालेले आहे. आपण लाखो रुपये खर्च करुन, जे हजार रुपये आपण प्रस्तावित करता, त्याचे आपण जे क्रिकेट पीच बनवले होते, ते बघायला कोणीही नाही. त्याच्यावर मुले संडासला बसतात, लघवी करायला बसतात. असेच पडलेले आहे. आणि काही पीच बनवले होत. गार्डनपेक्षा सहा इंच वर. त्या पीचचा उपयोग होत नाही. आपण त्याच्यावर साधारण दहा लाख रुपये खर्च केला आहे. म्हणजे एका बाजूला हजार रुपये देऊन पूर्ण वर्षभरात तुम्ही दहा हजार रुपये उत्पन्न वाढवणार आहे. आणि दुसऱ्या बाजूला दहा लाख रुपये नुकसान करु लागले. आणि हे पन्नास, शंभर रुपये वाढवून किती होणार आहेत ? साहेब, सुभाषचंद्र मैदान किंवा इतर जे जे आपण प्रस्तावित केलेले आहेत, त्यामध्ये पूर्ण सुविधा द्यावी अशी आपल्याला खास विनंती आहे.

**मिलन पाटील :-**

सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये अर्धे मैदान तर त्या कॉन्ट्रॅक्टरने अडवलेले आहे. मुले कुठे खेळणार? आपला त्या कॉन्ट्रॅक्टरशी काय संबंध आहे ? तुम्ही स्वतः प्रत्यक्ष जाऊन बघितले तर कल्पना येईल.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, मी मा. आयुक्तांना निवेदन करतो की, त्यांनी खुलासा करावा. त्यांनी सगळे बघितलेले आहे. पूर्ण शहर आपण फिरतात त्यामुळे प्रशासनाने गोषवारा आणलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये दरवाढीचा जो मुळ उद्देश आहे, त्याचे एकच कारण आहे की, महानगरपालिकेची जी मालमत्ता आहे, समाजमंदीर असो किंवा मैदान असो, त्याचे जे आजचे भाडे आहे, जे आम्ही आज घेतो. आणि जे मार्केट रेट आहेत त्याच्यामध्ये खूप मोठे अंतर आहे. आम्ही एखादे खाजगी हॉल घेतले किंवा एखादे खाजगी कॉम्प्लेक्स घेतले, त्याचे भाडे आणि महानगरपालिका याच्यामध्ये खूप मोठे अंतर आहे. अंतर असले पण पाहिजे. कारण जसे कोणीतरी म्हटले की, हे आम नागरिकांसाठी आहे. पण मार्केट रेटची काहीतरी म्हटले की, हे आम नागरिकांसाठी आहे. पण मार्केट रेटची काहीतरी प्रमाणिकता असली पाहिजे, म्हणून असा प्रस्ताव दिला होता. आणि आपण जर हे रेटस् वाढवून दिले. तर या सर्व मालमत्तांचे मेन्टनेन्स व्यवस्थित होऊ शकेल. म्हणून असा प्रस्ताव दिला होता.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए.खान. दुसरा ठराव सुचक श्री. आसिफ शेख, अनुमोदन श्री. शरद पाटील. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतास टाकतो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेची खालील प्रमाणे मालमत्ता आहे.

| अ. क्र. | मालमत्ता | सध्याचे दर | प्रस्तावित दर (प्रति दिन) | मा.महासभा दि.३०/१२/२०११ अन्वये मंजुर केलेले नवीन दर |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर - १६ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| २ | भाईंदर (पुर्व) खारीगाव हॉल - ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल - ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १००००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. ८/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट |
| | व्हीडीयो शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनीट | रु. ३००/- प्रति युनीट | रु. १००/- प्रति युनीट |
| | खुर्ची भांडे | रु. २.५०/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५.००/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. १५०/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. ५००/- | रु. ३००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. १०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय/महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/ स्नेह संमेलन | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. १,०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर | रु. १०/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट |
| | मैदान साफसफाई शुल्क (शाळा) | रु. १००/- प्रति दिन | रु. ३००/- प्रति दिन | रु. १००/- प्रति दिन |
| | मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. ३००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (नवघर शाळा/आरक्षण क्र. १७०) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा<br>ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात)<br>क) पूजा / लग्न कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात) | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. X २०० मी.<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन<br>रु. ५०००/- प्रति दिन<br>रु. १००००/-प्रति दिन | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. X २०० मी.<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. २५०/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात. | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता)<br>ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)<br>क) गेट /कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था)<br>ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ३.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. १.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ८००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट/प्रति दिन |

वरील प्रमाणे मा.महासभेने नवीन मंजुर केलेल्या दरास ही मा.महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे. सुचक आसिफ शेख, अनुमोदन श्री. शरद पाटील. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए.खान. मिरा भाईंदर महानगरपालिकेची खालीलप्रमाणे मालमत्ता आहे.

| अ.क्र. | मालमत्ता. | सध्याचे दर | मंजूर दर (प्रति दिन) |
|---|---|---|---|
| १ | समाजमंदिर - १६ | रु. २५०/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल – ०१ | रु. २५०/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| ३ | भाईंदर (पश्चिम) विनायक नगर हॉल – ०१ | रु. २५०/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | ७५००/- प्रति दिन |
| | ओपन टेरेस | रु. १५००/- प्रति दिन | ५०००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. ८/- प्रति युनिट | १०/- प्रति युनिट |
| | व्हिडिओ शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनिट | ३००/- प्रति युनिट |
| | खुर्ची भाडे | रु. २.५०/- प्रति नग | ५/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | ५००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | ५००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा / स्नेह संमेलन) | रु. १००/- प्रति दिन | १०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. १०/- प्रति युनिट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | १०/- प्रति युनिट<br>३००/- प्रति दिन<br>५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (नवघर शाळा / आरक्षण क्र. १७०) | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा<br>ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात)<br>क) पूजा / लग्न कार्यक्रम<br>ड) मालवणी जत्रोत्सव | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. x २०० मी.)<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन<br>रु. १००/- प्रति दिन स्टॉल (संपूर्ण कार्यक्रम) | ५००/- प्रति दिन<br>५०००/- प्रति दिन<br>७५००/- प्रति दिन<br>५००/- प्रति दिन स्टॉल (संपूर्ण कार्यक्रम) |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग /जागा | रु. २५०/- प्रति दिन | ५००/- प्रति दिन |

| | | | |
|---|---|---|---|
| | (सुट्टीच्या दिवसात) | | |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | ३.००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव) | रु. ०.५०/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | १.५०/- प्रति चौ.फुट / प्रति दिन |
| | क) गेट / कमानी / बॅनर (धार्मिक / शैक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | ५००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन |
| | ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | ८००/- प्रति चौ.फुट / प्रति दिन |

नवघर शाळेसमोरील मैदानांत फक्त कला-क्रिडांनाच परवानगी देण्यांत यावी . स्नेहसंमेलन किंवा जत्रोत्सव, लग्न कार्यांसाठी ही मैदाने देऊ नयेत.

मिरारोड शितल नगर, गणेश मंदिर समोरील मैदान आरक्षण क्र. १७० (खेळाचे मैदान) हे कला-क्रिडांसाठीच आरक्षित ठेवावे.

मॅक्सस मॉल समोरील मैदान व कस्तुरी गार्डन हयांचा उल्लेख केला गेला नाही, त्याचे काय?

वरीलप्रमाणे दर आकारण्यास ही सभा मान्यता देत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. आसिफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१ मते व विरोधात ३१ मते आहेत, त्यामुळे श्री. आसिफ शेख यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे असे मी जाहिर करतो.

**प्रकरण क्र. ८३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालमत्ता (समाज मंदिरे, हॉल, मैदाने, मंगल कार्यालय) भाड्याने देणेबाबत सुधारीत दरांना मान्यता देणे.

**ठराव क्र. ८७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची खालील प्रमाणे मालमत्ता आहे.

| अ. क्र. | मालमत्ता | सध्याचे दर | प्रस्तावित दर (प्रति दिन) | मा.महासभा दि.३०/१२/२०११ अन्वये मंजुर केलेले नवीन दर |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर - १६ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| २ | भाईंदर (पुर्व) खारीगाव हॉल - ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल - ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १००००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. ८/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट |
| | व्हीडीयो शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनीट | रु. ३००/- प्रति युनीट | रु. १००/- प्रति युनीट |
| | खुर्ची भाडे | रु. २.५०/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५.००/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. १५०/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. ५००/- | रु. ३००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. १०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय/महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/ स्नेह संमेलन | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. १,०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति दिन | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (नवघर शाळा/आरक्षण क्र. १७०) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा<br>ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात)<br>क) पूजा / लग्न कार्यक्रम (सुट्टीच्या | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. X २०० मी.<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन<br>रु. ५०००/- प्रति दिन<br>रु. १००००/-प्रति दिन | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. X २०० मी.<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दिवसात) | | | |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. २५०/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात. | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ३.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव) | रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. १.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | क) गेट /कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ८००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |

वरील प्रमाणे मा.महासभेने नवीन मंजुर केलेल्या दरास ही मा.महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे.

सुचक :- डॉ. आसिफ शेख — अनुमोदन :- श्री. शरद पाटील

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | पाटील उमाताई शाम | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | नलावडे दिनेश दगडू | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | सुनिता कैलास पाटील | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सावळे निर्मला बाबुराव | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | सुनिता शशिकांत भोईर | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ११ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १२ | प्रकाश पांडुरंग ठाकुर | १२ | सपार उमा विश्वनाथ | |
| १३ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन. | १३ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १४ | राजेंद्र भंवरलाल जैन | १४ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १५ | शर्मा भगवती तुंगनचंद | १५ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | शेख नूर मोहम्मद अहमद | |
| १७ | चक्रे वंदना रामदास | १७ | शफीक अहमद सादत खान | |
| १८ | माळी हेमा रविंद्र | १८ | प्रमोद जयराम सामंत | |
| १९ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १९ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २० | अनिता जयवंत पाटील | २० | विजया हेमचंद्र वैती | |
| २१ | टेरी पॉल परेरा | २१ | ठाकुर कल्पना हरीहर | |
| २२ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | वर्षा गिरधर भानुशाली | २३ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २४ | राजु यशवंत भोईर | २४ | भट दिप्ती शेखर | |
| २५ | जाधव मोहन महादेव | २५ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २६ | सिंह मदन उदितनारायण | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | म्हात्रे कल्पना महेश | २७ | शेख सलिम दाऊद | |
| २८ | पाटील शरद केशव | २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २९ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ३० | बाविघर सिसिलीया विजय | ३० | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३१ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | ३१ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३२ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३३ | दुबे रामनारायण सदानंद | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | यादव मिरादेवी रामलाल | | |
| ३५ | पाटील प्रविण मोरेश्वर | | |
| ३६ | पाटील अनंत रामचंद्र | | |
| ३७ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | |
| ३८ | पाटील संध्या प्रफुल्ल | | |
| ३९ | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ४० | व्यास सुधा वासुदेव | | |
| ४१ | धनेश परशुराम पाटील | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८४, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर जरीमरी तलाव ते ग्रीन व्हीलेज पर्यंत (गांवदेवी मंदिर मार्ग) रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर जरीमरी तलाव ते ग्रीन व्हीलेज पर्यंतचा (गांवदेवी मंदीर मार्ग) रस्ता मंजूर विकास आराखडयात १८.०० मीटर रूंदीचा असून सदर रस्ता हा विदयुत केबल टाकणे, भुयारी गटार योजने अंतर्गत मलवाहीनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेला आहे. विदयुत केबलसाठी खोदलेला रस्ता पुर्ववत करण्याकरीता महानगरपालिकेकडे रकमा जमा झालेला असून मजबुतीकरणासह डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. सदर रस्त्यावरून मोठयाप्रमाणावर रहदारी तसेच वाहतूक होत असते. रस्ता खराब असल्याने नागरीकांची, शाळेच्या विदयार्थ्यांची गैरसोय होत आहे. सदर कामाच्या रू. ६५,५७,०००/- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, माझी विनंती आहे की, आज आपण आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहोत. कारण मध्यंतरी काही निविदा काढलेल्या होत्या. पासपण झालेल्या. त्याप्रमाणे भाईंदर पूर्वेची जी पाण्याची टाकी आहे तिथपासून ते कल्वर्टपर्यंत नाला बनवायचा होता. त्याची निविदा मंजुर झाली, पण काम सुरु झाले नव्हते, आणि आता काम चालू झाले तरी अर्धवट काम होणार आहे. पुढचा नाला तसाच राहणार. हे कल्वर्टचे काम होणे गरजेचे आहे. मग ही जर आज आपण आर्थिक व प्रशासकीय मंजुरी घेतो, नंतर हे काम रद्द होणार नाही याची पहिली शाश्वती घ्या. कारण हे अर्धेच काम करणार आहे. आणि अर्धा कच्चा राहणार आहे अशी माझी माहिती आहे. काम सुरु झाले नाही आणि भाईंदर पूर्वेचे पाणी त्या कल्वर्टमधून जास्तीत जास्त जाते. दर पावसाळयात त्या कल्वर्टच्या मार्गाने पाण्याचा निचरा होतो. यावर्षी कमीत कमी पाणी भरले. त्याचप्रमाणे जो छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आहे. त्याच्यावर डिव्हायडरला लोखंडी रेलींग बांधलेली. परंतु, डिव्हायडरच्या जाळ्या चोरल्यामुळे तिकडे तीन फुटाच्या डिवायडरच्या निविदा काढल्या गेल्या. आपण आर्थिक मंजुरी द्यायची आणि ते झाले नाही तर काय होईल. ती कामे अत्यावश्यक आहेत. ती झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

ती कामे पुढे होणार आहेत.

**श्रीप्रकाश ज़िलेदार सिंह :-**

मा. महापौर साहब, गटर होगा की नहीं होगा उसकी जानकारी क्यों नहीं देते है ?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण जेव्हा कल्वर्टला एवढा खर्च केलेला आहे. आणि ते गटार जर तिथपर्यंत नेले नाही तर त्या कल्वर्टचा काहीच फायदा होणार नाही.

**दिपक खांबित :-**

पाईपलाइन शिफ्टींगचे आपला टँकर पॉईन्ट आहे त्यामुळे तेवढा भाग आपण थांबवला आहे. रेल्वे क्रॉसींगचे आपले काम सुरु आहे.

**शशिकांत भोईर :-**

टँकर पॉईन्ट आपण हलवू शकतो. तो पहिला हलवून घ्या. पण ते गटार पूर्ण झाले पाहिजे. ते गटार कल्वर्ट पर्यंत गेले नाही, तर पावसाळयात पाण्याचा निचरा होणार नाही.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

श्री. खांबित साहब, वो काम पुरा होगा क्या ? वो नाला पुरा बनेगा ?

**मा. आयुक्त :-**

पुरा नहीं होगा तो आपको पत्र मिल जाएगा। अभी पत्र नहीं मिला। वहाँ पर काम चल रहा है।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला दोन तीन वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. तलाव रोडसाठी दोन-तीन वेळा आपल्याला भेटलो. आपण प्रत्यक्ष येऊन पण गेले. आपण मला आश्वासन दिले होते की, डिसेंबर पर्यंत काम चालू करतो.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला त्याचे लेखी उत्तर देऊ.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. उपमहापौर साहेब आणि सभागृह, सभेच्या सुरुवातीला आपण नवनिर्वाचित मा. सभापती, स्थायी समिती यांचे स्वागत केले नाही किंवा त्यांचे अभिनंदन केले नाही याच्याबद्दल श्री. ओमप्रकाश गाडोदिया यांनी आपल्याला जाणीव करुन दिली. आणि त्यांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठरावही मांडला. आम्हाला आनंद आहे की, एक महिला मा. स्थायी समिती सभापती पदावर बसली. आम्हीसुध्दा त्यांच्या अभिनंदनाच्या ठरावामध्ये सहभागी आहोत. पण हे विसरले की, त्यांना सन्मानाने पुढे आणून बसवावे. त्या या सभागृहाच्या सन्माननिय पदसिध्द अधिकारी आहेत. त्यांना सन्मानाने पुढे बसवावे.

**प्रकरण क्र. ८४ :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर जरीमरी तलाव ते ग्रीन व्हीलेज पर्यंत (गांवदेवी मंदिर मार्ग) रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर जरीमरी तलाव ते ग्रीन व्हीलेज पर्यंतचा (गांवदेवी मंदीर मार्ग) रस्ता मंजूर विकास आराखडयात १८.०० मीटर रूंदीचा असून सदर रस्ता हा विदयुत केबल टाकणे, भुयारी गटार योजने अंतर्गत मलवाहीनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेला आहे. विदयुत केबलसाठी खोदलेला रस्ता पुर्ववत करण्याकरीता महानगरपालिकेकडे रकमा जमा झालेला असून मजबुतीकरणासह डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. सदर रस्त्यावरून मोठयाप्रमाणावर रहदारी तसेच वाहतूक होत असते. रस्ता खराब असल्याने नागरीकांची, शाळेच्या विदयार्थ्यांची गैरसोय होत आहे. सदर कामाच्या रू. ६५,५७,०००/- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

***ठराव वाचून कायम करण्यात आला***

**सही/-**

**महापौर**

***मिरा भाईंदर महानगरपालिका***

**नगरसचिव :-**

*प्रकरण क्र. ८५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील इमारतीच्या जिन्याच्या विना गणना क्षेत्रासाठी तसेच बाल्कनी बंदिस्त करण्यासाठी अधिमूल्य आकारणेबाबत.*

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदरच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ३४ (२) (b) & (C) नुसार रहिवास वापराच्या इमारतीसाठी १५ टक्के व वाणिज्य वापराच्या किंवा सार्वजनिक वापराच्या इमारतीसाठी २५ % जिन्याचे क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र अनुज्ञेय करता येते.

यास्तव महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील इमारतीच्या नकाशांना मंजूरी देताना इमारतीच्या जीन्याच्या विना गणना क्षेत्रासाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या दराप्रमाणे ५० % प्रमाणे अधिमुल्य आकारणे उचित वाटते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीच्या बाल्कनीचे १० % क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र देणेबाबत वेकास नियंत्रण नियमावलीमधील विनीयम क्र. ३७(२२) मध्ये तरतूद केलेली आहे. विकासक जागेवर सदरच्या बाल्कनी ादिस्त करुन त्याचा वापर करतात. यास्तव बंदिस्त बाल्कनीसाठी ५ चौ.मी. पर्यंत रु.२०००/- व त्यावरील प्रती २.५० ौ.मी. साठी अतिरिक्त रु. १०००/- प्रमाणे दंडनिय शुल्क आकारणेस यापूर्वी मा. महासभेने ठराव क्र. ५२ दि. ०/०९/२००६ अन्वये मंजूरी दिलेली असून, त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. तथापि, मिरा भाईंदर महानगरपालिका ोत्रामध्ये इमारतीच्या दरांची झालेली वाढ लक्षात घेता सदरची बाल्कनी बंदिस्त दंडनिय शुल्क कमी आहे. यास्तव हानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून बाल्कनी बंदीस्तसाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या राच्या २५ टक्के प्रमाणे अधिमुल्याची आकारणी करणे योग्य होईल.

ास्तव मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकास प्रस्तावांना मंजूरी देताना जिन्याच्या विना गणना क्षेत्रासाठी शेघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या दराच्या ५० % प्रमाणे व बाल्कनी बंदिस्त क्षेत्रासाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या राच्या २५ टक्के प्रमाणे अधिमुल्याची आकारणी करणेकरिता ही सभा मंजूरी देत आहे.

**ुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**रेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, आपण या विषयामध्ये दोन विषय आणलेले आहेत. बंदिस्त बाल्कनीला सध्या आपण २००० रुपये आकारत आहोत. आपण जे प्रस्तावित केले ते २५ % रेडी रेकनरचे आहे. पण मुंबईमध्ये आणि ठाण्यामध्ये किती ाहे याची आपण जरा सभागृहाला माहिती द्यावी.

**ानिल सावंत :-**

श्री. धनेगावे साहेब, जरा कल्याण डोंबीवली महानगरपालिकेचे पण सांगा.

**ात्यवान धनेगावे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगी बोलतो, सदरच्या विषयासंदर्भात मी माहिती देत आहे. मुंबई महापालिकेमध्ये पाच चौरस मीटरसाठी दोन हजार रुपये आकारले जातात. सात चौरस मीटरसाठी सात हजार रुपये..........

**नरेंद्र मेहता :-**

बाल्कनीला किती आहेत ?

**सत्यवान धनेगावे :-**

पाच चौरस मीटरची बाल्कनी असेल तर दोन हजार रुपये. सात चौरस मीटरपर्यंत सात हजार रुपये. सात चौरस मीटरपेक्षा जास्त असेल तर दहा हजार रुपये. हा मुंबई मधील रेट आहे. कल्याणमध्ये कोणतीही बाल्कनी सरसकट दहा हजार रुपये रेट आहे. आणि ठाण्यामध्ये पाच चौरस मीटरसाठी अकरा हजार रेट आहे आणि त्याच्यापुढील प्रत्येक अडीज चौरस मीटरसाठी ७१०० याप्रमाणे ठाण्यात आकारणी केली जाते.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, मुंबईला पण दोन हजार रुपये आणि मुंबईला फ्लॅटचे भाव वीस-पंचवीस हजार आणि मिरा भाईंदरला चार हजार आणि आपण दोन हजाराचे साधारण.........

**मा. महापौर :-**

साडेतीन हजार रुपये भाव आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मुंबईने आपल्याला दोन हजार रुपये दिले आहे आणि २५ % प्रमाणे किती होईल ?

**सत्यवान धनेगावे :-**

२५ % प्रमाणे आपल्याकडे सतरा हजार रुपये होईल.

**नरेंद्र मेहता :-**

आता साहेब सांगा, मुंबईला दोन हजार आणि मिरा भाईंदरला सतरा हजार.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो, मुंबईला आता रिवाइज पॉलीसी येते आहे. त्यामध्ये १०० %प्रिमीयम घेणार आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

होईल त्यावेळी ठिक आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आता पॉलीसी अंतिम टप्प्यात आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तुम्ही सांगू शकता का की, मुंबई महापालिकेचा निर्णय कोण घेणार आहेत?

**सत्यवान धनेगावे :-**

सांगू शकत नाही. पण मी चर्चा करु शकतो.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, कल्याण डोंबिवलीला त्यांनी १०० % केले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

कल्याण डोंबिवलीला प्रती बाल्कनी दहा हजार रुपये आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठाण्याला आपण जो दुसरा विषय आणला आहे. जीना आणि याच्यासाठी आपण ५०% प्रस्तावित केले आहे. ठाण्याला किती आहे ?

**सत्यवान धनेगावे :-**

ठाणे महापालिकेला ३३ % आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आणि ते किती टक्के फ्री आहे ?

**सत्यवान धनेगावे :-**

ठाणे कॉर्पोरेशनच्या डी.सी. रुलमध्ये पर्संटेज प्रिस्क्राइब केलेले नाही. मुंबईमध्ये प्रिस्क्राइब केलेले नाही. व्हेअर ॲज मिरा भाईंदरमध्ये ते १७% पर्यंत स्पेसिफीक केलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही ३३ बोलता, आम्ही ५०% ला त्याला मान्यता देतो हे एक उदाहरण. मा. आयुक्त महोदय, मा. महापौर महोदय, श्री. सावंत साहेब, आपण जरा लक्ष द्यावे. मिरा भाईंदरमध्ये आपण फक्त १५ % पर्यंत फ्री देतो. आणि ठाण्यामध्ये पाहिजे तेवढे घ्या. इट शुल्ड बी ओनली प्रपोस्टेड. म्हणजे असे बोलत नाही की, बिल्डींग दहा हजार फुट आणि पॅसेज वीस हजार फुट. पण लागेल ते बाकीच्या एफ.एस.आय. मध्ये डिडक्ट होत नाही. आपल्याकडे आपण १५ % च्या वर गेले की, एफ.एस.आय. मध्ये डिडक्ट करतो.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, नियमात तशी प्रोव्हीजनच आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तिकडे तसे नाही. मग त्या गोष्टीपण सांगा की, तिकडे फ्री आहे. इकडे तुम्ही तसे केले नाही की, १५ % जागेवर पूर्ण फ्री द्या, पूर्ण फ्री देणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

डी.सी. रुलमध्ये बदल केल्याशिवाय देता येणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ते प्रस्तावितच केले नाही की, यापुढे अनलिमिटेड फ्री राहील.

**सत्यवान धनेगावे :-**

असे कसे, आपल्या ठरावाच्या माध्यमातून........

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही अर्धे तिकडचे आणता. अर्धे इकडचे.

**जुबेर इनामदार :-**

प्रस्तावित आहे, म्हणजे नवीन बांधकाम येणार आहेत, त्याच्याकरीता.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हा जो प्रस्ताव आणलेला आहे. एरवी शहरामध्ये ज्यावेळी लोक फ्लॅट घ्यायला जातात. ४० ते ४५ % सुपर बिल्ट अपवर त्यांना पैसे भरावे लागतात. स्टेअर केस असू द्या, बाल्कनी असू द्या, इतर पॅसेज असू द्या, आणि हे प्रिमीयम जर आपण बिल्डरकडून घेणार असू तर पालिकेचेच इन्कम वाढणार आहे. श्री. नरेंद्र मेहता साहेब, बिल्डर आहेत, त्यांनी बिल्डरची बाजू घेणे सहाजिकच आहे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

सुपर बिल्टअपचे पैसे ऑलरेडी घेतात. ते सोडत नाही. ४० ते ४५ % त्याच्यावर घेतच आहेत. मग हे जे प्रिमीअम पालिकेला मिळत असेल तर फायदा होईल.

**मिलन पाटील :-**

श्री. सावंत साहेब, तुम्ही अजून बिल्डर झालेले नाहीत. बिल्डर आपल्या खिशातून काही देणार नाही. तो कस्टमरवर टाकणार. कस्टमर सर्वसाधारण लोक आहेत. साहेब, याची तुम्ही जाण ठेवा.

**अनिल सावंत :-**

आपण हे चार्ज केले नाही तर बिल्डर कमी करणार आहे का ? जो रेट आहे, मार्केट रेटनेच पैसे घेणार आहेत. उलट याच्यामध्ये बिल्टअप, सुपर बिल्टअप वाढवणार आहेत.

**मिलन पाटील :-**

श्री. सावंत साहेब, कळत – नकळत हा भुर्दंड कस्टमरवर पडेल. जे मुंबईला सदनिका खरेदी करु शकत नाहीत. ठाण्याला सदनिका खरेदी करु शकत नाहीत. ते आपल्या भाईंदरमध्ये, जे काही गरिब असतील. ती गरिब वस्ती आपल्या भाईंदरमध्ये आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजुर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजुर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अमलात झालेली आहे. मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस १२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि/१२/ दि. २९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजुर झाले आहेत.

सदरच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ३४(२) (B) & (C) नुसार रहिवास वापराच्या इमारतीसाठी १५ टक्के व वाणिज्य वापराच्या किंवा सार्वजनिक वापराच्या इमारतीसाठी २५ टक्के जिन्याचे क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र अनुज्ञेय करता येते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीच्या बाल्कनीचे १० टक्के क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र देणेबाबत विकास नियंत्रण नियमावलीमधील विनीयम क्र.३७ (२२) मध्ये तरतुद केलेली आहे. विकासक जागेवर सदरच्या बाल्कनी बंदिस्त करुन त्याच्या वापर करतात. यास्तव बंदिस्त बाल्कनीसाठी ५ चौ.मी. पर्यंत रु.२०००/- व त्यावरील प्रती २.५० चौ.मी. साठी अतिरिक्त रु.१०००/- प्रमाणे दंडनिय शुल्क आकारणेस यापूर्वी मा. महासभेने ठराव क्र. ५२ दि.२०/९/२००६ अन्वये मंजुरी दिलेली असून, त्याचप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. तथापि, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये इमारतीच्या दरांची झालेली वाढ लक्षात घेता सदरची बाल्कनी बंदिस्तसाठी ५ चौ.मी. पर्यंत रु.२५००/- व त्यावरील प्रती २.५० चौ.मी.साठी अतिरिक्त रु.१२००/- प्रमाणे दंडनिय शुल्क १ एप्रिल २०१२ पासुन आकारणेस मान्यता देत आहे व सदरच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ३४(२) (B) & (C) नुसार रहिवास वापराच्या इमारतीसाठी १५ टक्के व वाणिज्य वापराच्या किंवा सार्वजनिक वापराच्या इमारतीसाठी २५ टक्के जिन्याचे क्षेत्र विना गणना चटईक्षेत्र अनुज्ञेय व्यतिरिक्त अतिरिक्त क्षेत्र जिना किंवा बाल्कनीसाठी वापर होत असलील तर मुळ अनुज्ञेय चटाई क्षेत्रात कमी ना करता दि.०१/०४/२०१२ पासुन त्याच्या जमिनीचे दराप्रमाणे ५० टक्के प्रमाणे अधिमुल्य आकारण्यास ही सभा मान्यता देत आहे व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत चटई क्षेत्र अनुज्ञेयता १५ टक्के रहिवास २५ टक्के वाणिज्य क्षेत्रात बदल करुन जिना व बाल्कनी अतिरिक्त क्षेत्र अर्जदाराच्या प्रस्तावप्रमाणे विना गणना चटई क्षेत्र देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची पुढील कारवाई करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिका बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून D.C. Rule मध्ये तरतुद नसताना बेकायदेशिर मालमत्ता कराचा नावाखाली किंवा इतर अनामत रक्कम घेण्यात येते. अनामत रक्कम यापुढे घेण्यात येऊ नये.

वरील सर्व बाबींवर कारवाई करण्यास ही सभा मा. आयुक्तांना अधिकार देत आहे असे मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

अतिशय चांगला ठराव मांडला. विकासकर्ते म्हणजे बिल्डरची बाजू मांडण्याचा हा ठराव आहे. ज्या शहराने, इथे जे रहिवासी राहतात, ज्यांनी आजपर्यंत विकासाकरीता शहराला पैसे दिलेले आहेत. ज्याच्यामुळे शहर घडले त्यांचा काहीच विचार करत नाही. येणारे नवीन लोकांना काही देणे घेणे नसते. ते फक्त फ्लॅट विकत घेण्याकरीता येतात. इन्वेस्टर आहेत. त्यांना थोडाफार जास्त या शहराच्या वाट्यामध्ये हात टाकावा लागला तर त्याला बाजूला ठेवण्यात आले. त्यांचा विचार इथे केला जातो.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावाप्रमाणे उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे यांना शहराचा विकास नको आहे. त्यांना या शहरामध्ये पालिकेचे उत्पन्न व्हायला पाहिजे ते नको आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, २००६ साली जो ठराव झाला आपण जर त्याची प्रोसिडींग काढली की, बिल्डर लोक पैसे भरत नाही त्यांना जास्त लागते म्हणून हाच ठराव या लोकांनी आणला होता. आणि बंदिस्त बाल्कनीचे भाव कमी करुन घेतले. त्यावेळी आम्ही बोललो...........

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी आम्ही विरोध केला आणि पाच हजाराचे अडीज हजार करणारे हेच सत्ताधारी पक्ष आहे. आणि आज तुम्हाला भूतकाळाची आठवण येत नाही ? आजचा ठराव मांडताना मागच्या ठरावाची आठवण करा.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावावर माझी एक छोटीशी सुचना आहे. आपल्यामध्ये बाल्कनी बंदिस्तीसाठी शिघ्रसिध्द गणकातील जमिनीच्या दरात २५ % शिघ्रसिध्द म्हणजे मला वाटते रेडी रेकनर असेल. त्याचे इअरली पाहिजे. त्या वर्षाच्या शिघ्रसिध्द पध्दती, म्हणजे आता २०१२ चे रेडी रेकनर काय आहे ? आता २०१२ चा रेडी रेकनर एकदा लागला की, मग पुढे पाच वर्षानंतर परत आम्ही त्या शब्दाचा अर्थ पकडून त्या वर्षाचे नवीन रेडी रेकनर होईल.

**नरेंद्र मेहता :-**

रेडी रेकनर बदलला की, रेट बदलेल.

**मिलन म्हात्रे :-**

तो बदलला नाही पाहिजे. १९८७ ला जो टॅक्स लागला त्याचा रेट बदलला आहे का ? आपला १९८७ ला पन्नास पैसे रेट आहे. आता तुम्ही स्ट्रक्चर लावले तर त्याला साडेचार, पाच, दहा रुपये रेट लागला. म्हणजे तुमचा रेडी रेकनर त्या वर्षाचा पाहिजे. तो शब्द पाहिजे. प्लीझ माझी तेवढी सुचना आहे, त्याची नोंद करुन घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५ करीता दोन ठराव आलेले आहेत. सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए.खान आणि दुसरा सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. आसिफ शेख आहेत. अनुक्रमे दुसरा ठराव मी मताला टाकतो.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, जरा ठराव वाचा.

**नगरसचिव :-**

सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. आसिफ शेख यांच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजुर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजुर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अमलात झालेली आहे. मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस १२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि/१२/ दि. २९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजुर झाले आहेत.

सदरच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ३४(२) (B) & (C) नुसार रहिवास वापराच्या इमारतीसाठी १५ टक्के व वाणिज्य वापराच्या किंवा सार्वजनिक वापराच्या इमारतीसाठी २५ टक्के जिन्याचे क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र अनुज्ञेय करता येते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीच्या बाल्कनीचे १० टक्के क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र देणेबाबत विकास नियंत्रण नियमावलीमधील विनीयम क्र.३७ (२२) मध्ये तरतुद केलेली आहे. विकासक जागेवर सदरच्या बाल्कनी बंदिस्त करुन त्याच्या वापर करतात. यास्तव बंदिस्त बाल्कनीसाठी ५ चौ.मी. पर्यंत रु.२०००/- व त्यावरील प्रती २.५० चौ.मी. साठी अतिरिक्त रु.१०००/- प्रमाणे दंडनिय शुल्क आकारणेस यापूर्वी मा. महासभेने ठराव क्र. ५२ दि.२०/९/२००६ अन्वये मंजुरी दिलेली असून, त्याचप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. तथापि, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये इमारतीच्या दरांची झालेली वाढ लक्षात घेता सदरची बाल्कनी बंदिस्तसाठी ५ चौ.मी. पर्यंत रु.२५००/- व त्यावरील प्रती २.५० चौ.मी.साठी अतिरिक्त रु.१२००/- प्रमाणे दंडनिय शुल्क १ एप्रिल २०१२ पासुन आकारणेस मान्यता देत आहे व सदरच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ३४(२) (B) & (C) नुसार रहिवास वापराच्या इमारतीसाठी १५ टक्के व वाणिज्य वापराच्या किंवा सार्वजनिक वापराच्या इमारतीसाठी २५ टक्के जिन्याचे क्षेत्र विना गणना चटईक्षेत्र अनुज्ञेय व्यतिरिक्त अतिरिक्त क्षेत्र जिना किंवा बाल्कनीसाठी वापर होत असतील तर मुळ अनुज्ञेय चटाई क्षेत्रात कमी ना करता दि.०१/०४/२०१२ पासुन त्याच्या जमिनीचे दराप्रमाणे ५० टक्के प्रमाणे अधिमुल्य आकारण्यास ही सभा मान्यता देत आहे व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत चटई क्षेत्र अनुज्ञेयता १५ टक्के रहिवास २५ टक्के वाणिज्य क्षेत्रात बदल करुन जिना व बाल्कनी अतिरिक्त क्षेत्र अर्जदाराच्या प्रस्तावप्रमाणे विना गणना चटई क्षेत्र देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची पुढील कारवाई करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिका बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून D.C. Rule मध्ये तरतुद नसताना बेकायदेशिर मालमत्ता कराचा नावाखाली किंवा इतर अनामत रक्कम घेण्यात येते. अनामत रक्कम यापुढे घेण्यात येऊ नये.

वरील सर्व बाबींवर कारवाई करण्यास ही सभा मा. आयुक्तांना अधिकार देत आहे असे मी ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए.खान यांच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदरच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ३४ (२) (b) & (C) नुसार रहिवास वापराच्या इमारतीसाठी १५ टक्के व वाणिज्य वापराच्या किंवा सार्वजनिक वापराच्या इमारतीसाठी २५ % जिन्याचे क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र अनुज्ञेय करता येते.

यास्तव महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील इमारतीच्या नकाशांना मंजूरी देताना इमारतीच्या जीन्याच्या विना गणना क्षेत्रासाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या दराप्रमाणे ५० % प्रमाणे अधिमुल्य आकारणे उचित वाटते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीच्या बाल्कनीचे १० % क्षेत्र विना गणना चटई क्षेत्र देणेबाबत विकास नियंत्रण नियमावलीमधील विनीयम क्र. ३७(२२) मध्ये तरतूद केलेली आहे. विकासक जागेवर सदरच्या बाल्कनी बंदिस्त करुन त्याचा वापर करतात. यास्तव बंदिस्त बाल्कनीसाठी ५ चौ.मी. पर्यंत रु.२०००/- व त्यावरील प्रती २.५० चौ.मी. साठी अतिरिक्त रु. १०००/- प्रमाणे दंडनिय शुल्क आकारणेस यापूर्वी मा. महासभेने ठराव क्र. ५२ दि. २०/०९/२००६ अन्वये मंजूरी दिलेली असून, त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. तथापि, मिरा भाईंदर महानगरपालिका

क्षेत्रामध्ये इमारतीच्या दरांची झालेली वाढ लक्षात घेता सदरची बाल्कनी बंदिस्त दंडनिय शुल्क कमी आहे. यास्तव महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून बाल्कनी बंदीस्तसाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या दराच्या २५ टक्के प्रमाणे अधिमुल्याची आकारणी करणे योग्य होईल.

यास्तव मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकास प्रस्तावांना मंजूरी देताना जिन्याच्या विना गणना क्षेत्रासाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या दराच्या ५० % प्रमाणे व बाल्कनी बंदिस्त क्षेत्रासाठी शिघ्रसिद्ध गणकातील जमिनीच्या दराच्या २५ टक्के प्रमाणे अधिमुल्याची आकारणी करणेकरिता ही सभा मंजूरी देत आहे. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, निर्णय डिक्लेअर करण्यापूर्वी मी फक्त एक मिनिट घेणार आहे. श्री. नरेंद्र मेहता यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये ३७(१) खाली मायनर मॉडिफिकेशनचा विषय त्यांनी टाकलेला आहे. तो काय आहे? सभागृहाला कळले पाहिजे की, तो काय विषय आहे? प्रशासनांनी जो गोषवारा दिलेला आहे त्याच्यामध्ये नाही आहे. पण त्यांनी ठरावामध्ये ३७(१) मध्ये मायनर मॉडीफिकेशनसाठी टाकलेला आहे. तो विषय काय आहे. टाऊन प्लानवाल्याना विचारा.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना वेळ लागेल मी तुम्हाला एका मिनिटात सांगतो. मतदान झालेल आहे निर्णय द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. सावंतसाहेब त्यांनी प्रशासनाचा ठराव मॉडिफाय केला आहे.

**अनिल सावंत :-**

मायनर मॉडिफिकेशनसाठी प्रशासनाने विषय दिलेला आहे का ?

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाला सांगा उत्तर द्या.

**अनिल सावंत :-**

सभागृहाला कळू द्या.

**आसिफ शेख :-**

सभागृहामध्ये दोन ठराव आले. दोन्ही ठराव पटलावर आले आहेत. मतदान झालेल आहे.

**प्रभात पाटील :-**

शंकाचे निरसन झाले पाहिजे.

**आसिफ शेख :-**

तुम्ही पहिला निर्णय द्या. नियमाप्रमाणे चाला निकाल जाहिर करा.

**अनिल सावंत :-**

शहराच्या हिताच्या विरोधात ह्यांनी ठराव मांडला आहे. तो मेजोरेटीने पास होणार आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०४/२००७ ठराव क्र. १२ अन्वये रू. १००/- प्रतिदिन भाडे आकारण्यात येत होते. तथापी महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारा खर्च व कार्यक्रमांचे स्वरूप पाहता सदर भाडे रू. ५०००/- प्रतिदिन करण्याबाबत मा. स्थायी समिती सभेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा. स्थायी समिती सभा दि. २८/०५/२०१० ठराव क्र. १२ अन्वये रू. ५०००/- प्रतिदिन भाडे व रू. १०,०००/- अनामत रक्कम घेउुन भाडयाने देण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. तत्पूर्वी सदर मैदानाचे रू. १०००/- प्रति दिन भाडे आकारण्यात येत होते. सदर चौपाटीवरील मैदानाचे भाडे जास्त असल्याने सदर भाडे कमी करण्याबाबत आलेल्या मागणीवरून सदर भाडयाबाबत फेर विचार करण्याकरीता सदर प्रस्ताव पुन्हा मा. स्थायी समितीपुढे पाठविण्यात आला. तथापी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२०११ ठराव क्र. ०९ अन्वये "भाईंदर (पूर्व) चौपाटी नागरीकांना फिरण्याकरीता व मुलांना खेळण्याकरीता असल्याने यापुढे कोणासही धार्मिक अथवा इतर कार्यक्रमासाठी भाडयाने देण्यात येउु नये. तसेच सदर ठिकाणी खाजगी असलेला मीटर बंद करण्यात यावा" असा निर्णय घेतला आहे.

सदर चौपाटी नागरीकांना फिरण्यासाठीच राखून ठेवणे आवश्यक असल्याने सदर चौपाटीवरील मैदाने यापुढे कोणत्याही कार्यक्रमाकरीता (महानगरपालिकेचे कार्यक्रम वगळता) भाडयाने देण्यात येऊ नये.

परंतु धार्मिक कार्यक्रमांसाठी शहरात जागा नसल्यामुळे या ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांना जागा देणे गरजेचे आहे. तरी कार्यक्रमांसाठी दशक्रिया रोडच्या बाजूचे मैदान देण्यात यावे. सदर जागा देण्यासाठी यापूर्वी झालेले स्थायी समिती व महासभेचे ठराव लक्षात घेऊन मा. आयुक्तांनी अटीशर्ती ठरवून मैदान देण्यात यावे, असा मी ठराव मांडत आहे. या ठरावांच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. मदन सिंह, अनुमोदन श्रीम. नर्मदा वैती यांच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्व धर्माचे लोक रहात असून सर्व धर्माचे सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम सार्वजनिक किंवा महानगरपालिकेच्या जागेवर शांततापूर्वक होत असतात. भाईंदर पूर्व व पश्चिमेमध्ये मोठ्या प्रमाणात आरक्षणावर अनधिकृत बांधकाम झाल्याने सार्वजनिक कार्यक्रमासाठी मैदाना किंवा बगीचा उपलब्ध नाही. भाईंदर पूर्व व पश्चिम येथील नागरीकांचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम भाईंदर पूर्व चौपाटीवर गेल्या अनेक वर्षापासून होत आहे. मा. स्थायी समितीने चौपाटीवर खाजगी, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना बंदीचा ठराव पारित केला होता. त्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्तांनी लेखी पत्राच्या माध्यमातून कळविले होते की, जोपर्यंत मा. महासभेचा निर्णय होत नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारच्या कार्यक्रमांना बंदी राहणार नाही व तसेच मा. स्थायी समितीने चौपाटीचे भाडे १००/- रु. ठरविले होते. तरीही महासभेची परवानगी न घेता ५०००/- रु. भाडे आकारले हे बेकायदेशीर आहे. तसेच प्रशासनाने समाजाचे मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम रामलिला, दशहरा मेला, आंतराष्ट्रीय संतांचे प्रवचन व इतर कार्यक्रमांना परवानगी नाकारून सभागृहाचा अपमान केलेला आहे. मा. स्थायी समितीचा ठराव क्रं. ९, दिनांक ०४/०५/२०११ चा ठरावही मा. महासभा रद्द करत आहे.

सदर चौपाटीवर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी टाकण्यात आलेली बंदी त्वरीत उठविण्यात यावी व यापुढे चौपाटीचे भाडे १०००/- रु. प्रतिदिन व ५०००/- रु. अनामत रक्कम आकारणे व सर्व सार्वजनिक व धार्मिक कार्यक्रमास आजपासून परवानगी द्यावी असा मी ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाहीत.

**मा. महापौर :-**

श्री. मदन सिंह यांच्या ठरावाच्या बाजूने ४१ आणि विरोधामध्ये २८ मते आहेत. त्यामुळे श्री. मदन सिंह यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८७ :-**

भाईंदर (पूर्व) चौपाटी भाड्याने न देणेकरीता निर्णय घेणे बाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्व धर्माचे लोक रहात असून सर्व धर्माचे सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम सार्वजनिक किंवा महानगरपालिकेच्या जागेवर शांततापूर्वक होत असतात. भाईंदर पूर्व व पश्चिमेमध्ये मोठ्या प्रमाणात आरक्षणावर अनधिकृत बांधकाम झाल्याने सार्वजनिक कार्यक्रमासाठी मैदाना किंवा बगीचा उपलब्ध नाही. भाईंदर पूर्व व पश्चिम येथील नागरीकांचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम भाईंदर पूर्व चौपाटीवर गेल्या अनेक वर्षापासून होत आहे.

मा. स्थायी समितीने चौपाटीवर खाजगी, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना बंदीचा ठराव पारित केला होता. त्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्तांनी लेखी पत्राच्या माध्यमातून कळविले होते की, जोपर्यंत मा. महासभेचा निर्णय होत नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारच्या कार्यक्रमांना बंदी राहणार नाही व तसेच मा. स्थायी समितीने चौपाटीचे भाडे १००/- रु. ठरविले होते. तरीही महासभेची परवानगी न घेता ५०००/- रु. भाडे आकारले हे बेकायदेशीर आहे. तसेच प्रशासनाने समाजाचे मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम रामलिला, दशहरा मेला, आंतराष्ट्रीय संतांचे प्रवचन व इतर कार्यक्रमांना परवानगी नाकारुन सभागृहाचा अपमान केलेला आहे. मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ९, दिनांक ०४/०५/२०११ चा ठरावही मा. महासभा रद्द करत आहे.

सदर चौपाटीवर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी टाकण्यात आलेली बंदी त्वरीत उठविण्यात यावी व यापुढे चौपाटीचे भाडे १०००/- रु. प्रतिदिन व ५०००/- रु. अनामत रक्कम आकारणे व सर्व सार्वजनिक व धार्मिक कार्यक्रमास आजपासून परवानगी द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदक :- श्रीम. नर्मदा वैती

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | पाटील उमाताई शाम | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | नलावडे दिनेश दगडू | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | सुनिता कैलास पाटील | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सावळे निर्मला बाबुराव | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | सुनिता शशिकांत भोईर | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ११ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १२ | प्रकाश पांडुरंग ठाकुर | १२ | सपार उमा विश्वनाथ | |
| १३ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १३ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १४ | राजेंद्र भंवरलाल जैन | १४ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १५ | शर्मा भगवती तुगनचंद | १५ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | शफीक अहमद सादत खान | |
| १७ | चक्रे वंदना रामदास | १७ | प्रमोद जयराम सामंत | |
| १८ | माळी हेमा रविंद्र | १८ | मर्लिन मर्विन डिसा. | |
| १९ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १९ | विजया हेमचंद्र वैती | |
| २० | अनिता जयवंत पाटील | २० | ठाकुर कल्पना हरीहर | |
| २१ | टेरी पॉल परेरा | २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २२ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २३ | वर्षा गिरधर भानुशाली | २३ | भट दिप्ती शेखर | |
| २४ | राजु यशवंत भोईर | २४ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २५ | जाधव मोहन महादेव | २५ | अनिल दिवाकर सावंत | |
| २६ | सिंह मदन उदितनारायण | २६ | शेख सलिम दाऊद | |
| २७ | म्हात्रे कल्पना महेश | २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २८ | पाटील शरद केशव | २८ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २९ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २९ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३० | बावीघर सिसिलीया विजय | | | |
| ३१ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३२ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३३ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३४ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३५ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३६ | पाटील अनंत रामचंद्र. | | | |
| ३७ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३८ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ४० | व्यास सुधा वासुदेव | | |
| ४१ | धनेश परशुराम पाटील | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८, शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात दिलेल्या सवलतीचा फेर विचार करणेबाबत. संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र. २६, दि. २०/०२/२००८

**प्रभात पाटील :-**

मागील मा. महासभा दि. २०/०२/२००८, प्रकरण क्र.२७, ठराव क्र.२६ अन्वये ज्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात सवलत दिली होती, त्यात संस्थांनी काही बाबींची पूर्तता करण्याचा उल्लेख केला होता. परंतु तसे होतांना दिसत नाही. त्यामुळे दिलेल्या बाबींची महानगरपालिकेने शहानिशा करावी. ज्या शैक्षणिक संस्था सदर बाबींमध्ये बसतात किंवा त्यांचे पालन करतात हयाची शहानिशा करावी व त्यांची सवलत कायम करण्यात यावी व इतरांची सवलत काढून टाकण्यांत यावी. तसेच ज्या शाळांना शासनाचे अनुदान आहे, त्या सर्व शाळांना मालमत्ता करात सवलत देण्यांत यावी.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

माझी त्यामध्ये एक सुचना आहे की, ज्या अनुदानीत शाळा आहेत, मा. आयुक्त साहेब, या भाईंदरमध्ये आमच्या फार जुन्या-जुन्या शाळा आहेत, ज्या अनुदानीत आहेत. पण गव्हर्नमेंटचे अनुदान तुटपुंजे आहे. तर आपल्यातर्फे, महानगरपालिकेच्या काही काही संस्थांमध्ये आहेत. जशी आमची भाईंदर सेकंडरी आहे, अभिनव आहे. महानगरपालिकेचे सातवी पासूनचे विद्यार्थी त्यामध्ये जातात. तर त्यांच्याकरीता आपण थोडी वेगळी सवलत द्यावी अशी मी तुम्हाला सुचना करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, १० % सुटचा हा जो विषय निघाला त्यामध्ये श्री. शरद पाटील यांचा मा. महासभेत जेव्हा प्रश्न होता. त्यावेळेच्या मा. आयुक्तांनी क्लीअर सांगितले होते की, ज्या-ज्या शाळांना आपण रिबेट देतो आहे. त्यांची यादी आम्ही खाली दर्शनी भागामध्ये लावू. आणि यामध्ये १० % कोटा आहे. महापालिकेला संपर्क करा. पण आजपर्यंत ती यादी लागलेली नाही. म्हणून प्रशासन पण दुर्लक्ष करते, नागरीकांना त्यांची माहिती नाही. म्हणून आज जे रिबेट घेतात त्यांची यादी आणि १० % रिझर्व्हेशन, ज्यांना ॲडमिशन मिळत नाही त्यांनी महापालिकेत संपर्क करावा अशी पाटी दर्शनी भागात लावावी अशी माझी या ठरावामध्ये सुचना आहे.

**मा, महापौर :-**

सुचनांसह ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, आपण म्हटले आहे की, बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये कुठल्याही प्रकारची अशी तरतुद नाही. मी यासाठी खुलासा करतो की, उद्या आपण ठराव विखंडीत करायला पाठवता कामा नये. आपण जर मुंबई प्रांतिक अधिनियम कलम ९९ मध्ये संपूर्ण अधिकार महापालिकेचा आहे की, कोणत्या दरात किती पैसे घ्यावे. दुसरे, त्याचप्रमाणे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे परिशिष्ट ५ (अ) प्रमाणे नगरपरिषदेने घेतलेले निर्णय महानगरपालिकेला अमलात आणता येतील. म्हणजे एखादी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये तरतुद नसेल तरीही परिशिष्ट ५ (अ) प्रमाणे त्याच्यामध्ये कंटीन्युटी करता येते. म्हणजे एखादा नगरपरिषदेच्या काळातील काही निर्णय असेल तर महापालिकेला कंटीन्युटी करता येते. मग त्या हिशोबाने जो ठराव झालेला आहे, तो नियमाप्रमाणे झालेला आहे. बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये ते असले नसले तरी काही फरक पडत नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, हा जो अनुदानाचा विषय आलेला आहे, काही शाळांना, संस्थांना सरकारी अनुदान मिळते. पण आपण काही खाजगी शाळांना देखील टॅक्समध्ये सवलत दिलेली आहे. ठरावामध्ये नमुद आहे की, ॲडमिशनमध्ये २० % सवलत मिळावी. २० % ॲडमिशन मिळतांना आपल्याला कुठल्या खाजगी शाळेमध्ये असे नमुद नाही की, आपल्याला कोणाला ॲडमिशन मिळालेले आहे. मा. महापौर साहेब, हे २० % अनुदान ज्या शाळांना मिळते त्याच्यामध्ये ॲडमिशनमध्ये सवलत मिळावी म्हणून आपल्याकडे महानगरपालिकेमार्फत त्या ठिकाणी ॲडमिशन मिळावे. त्यावेळेला

आपल्याला माहिती पडेल की, आपल्याला किती प्रमाणामध्ये ह्या खाजगी शाळांमधून ॲडमिशन मिळते. ठरावामध्ये नमुद केले तरी चालेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

२० % नाही, १० % आहे.

**अनिल सावंत :-**

२०% आहे. ठराव बघा. मा. महापौर साहेब हा जो आपण २०/०२/२००८ ला ठराव केला आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी काही संस्थांना टॅक्स रिबेट दिले. ठराव करताना आपला उद्देश चांगला होता. पण मला असे वाटते की, ज्यावेळी हे टॅक्स रिबेट त्यांना देण्यात आले. त्यावेळी ते नियम पाळतात की, नाही याची कोणतीही माहिती या अधिकाऱ्यांनी घेतली नाही आणि सरसकट त्यांना अनुदान दिलेले आहे. ज्यांना आपण देतो त्या शाळांची लिस्ट माझ्या समोर आहे. त्यांना २० % ॲडमिशन काय, ते एक ॲडमिशन करत नाहीत. कोणी नगरसेवकांनी सांगितले किंवा महापालिकेने सांगितले. डोनेशन घेण्यात येऊ नये ही आपली कंडीशन होती. पण या ज्या शाळा आहेत, सर्व शाळा, सेंट झेवियर्स आहे, दालमिया आहे, सरदार पटेल आहे, या शाळा डोनेशन घेतात. तरी सुध्दा आपण त्यांना टॅक्स रिबेट देतो. म्हणजे या ठरावाची अंमलबजावणी व्यवस्थित झालेली नाही. तर ती कडक अंमलबजावणी करा. जर चुकीचे अनुदान दिलेले असेल तर त्यांचे अनुदान ठरावाच्या अनुषंगाने बंद करा. आणि श्री. मिलन पाटील साहेबांनी सुचना मांडलेली आहे की, अनुदानीत शाळांना टॅक्स रिबेट द्या. खरोखरच त्यांना द्या, कारण त्यांची शाळा चालवायची परिस्थिती नाही. आणि त्या ठिकाणी गोरगरिब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मा. आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, ज्या शाळांना हे टॅक्स रिबेट दिलेले आहे, आपल्या ठरावाच्या अनुषंगाने काय क्रायटेरिया लावला त्यांची चौकशी करा, आणि ज्यांना चुकीचे दिलेले असेल, त्यांच्याकडून रिटर्न घ्या.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, ती यादी नक्की लागेल का ? दोन आयुक्त इकडून निघून गेले त्यावेळेला लावली नाही,

**प्रकरण क्र. ८८ :-**

शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात दिलेल्या सवलतीचा फेर विचार करणेबाबत. संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र. २६, दि. २०/०२/२००८.

**ठराव क्र. ९२ :-**

मागील मा. महासभा दि. २०/०२/२००८, प्रकरण क्र.२७, ठराव क्र.२६ अन्वये ज्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात सवलत दिली होती, त्यात संस्थांनी काही बाबींची पूर्तता करण्याचा उल्लेख केला होता. परंतु तसे होतांना दिसत नाही. त्यामुळे दिलेल्या बाबींची महानगरपालिकेने शहानिशा करावी. ज्या शैक्षणिक संस्था सदर बाबींमध्ये बसतात किंवा त्यांचे पालन करतात हयाची शहानिशा करावी व त्यांची सवलत कायम करण्यात यावी व इतरांची सवलत काढून टाकण्यांत यावी. तसेच ज्या शाळांना शासनाचे अनुदान आहे, त्या सर्व शाळांना मालमत्ता करात सवलत देण्यांत यावी.

**सुचक :- श्रीम. प्रभात.पाटील** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

ज्या अनुदानीत शाळा आहेत, मा. आयुक्त साहेब, या भाईदरमध्ये आमच्या फार जुन्या-जुन्या शाळा आहेत, ज्या अनुदानीत आहेत. पण गव्हर्नमेंटचे अनुदान तुटपुंजे आहे. तर आपल्यातर्फे, महानगरपालिकेच्या काही काही संस्थांमध्ये आहेत. जशी आमची भाईंदर सैकंडरी आहे, अभिनव आहे. महानगरपालिकेचे सातवी पासूनचे विद्यार्थी त्यांमध्ये जातात. तर त्यांच्याकरीता आपण थोडी वेगळी सवलत द्यावी अशी मी तुम्हाला सुचना करतो.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

आज ज्या शाळा रिबेट घेतात त्यांची यादी आणि १० % रिझर्व्हेशन, ज्यांना ॲडमिशन मिळत नाही त्यांनी महापालिकेत संपर्क करावा अशी पाटी दर्शनी भागात लावावी अशी माझी या ठरावामध्ये सुचना आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८९, माजी सैनिकांना मालमत्ता करात दिलेल्या सवलतीचा फेर विचार करणेबाबत. संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र. १६, दि. ३०/०७/२०१०

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीस त्यांच्या मालमत्ता करात माफीची सवलत देणेबाबत मा. महासभा ठराव क्र.२६, दि.३०/०७/२०१० अन्वये निर्णय घेणेत आला.

देशासाठी लढणाऱ्या, देशांच्या सीमा सुरक्षित ठेवणाऱ्या, पर्यायाने समस्त नागरिकांचे जिवीत सुरक्षित ठेवणाऱ्या या वीरांना अभिवादन करीत त्यांना दिलेली मालमत्ता करातील सवलत कायम करण्यात यावी, असा मी ठराव मांडीत आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८९ :-**

प्रकरण क्र. ८९, माजी सैनिकांना मालमत्ता करात दिलेल्या सवलतीचा फेर विचार करणेबाबत. संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र. २६, दि. ३०/०७/२०१०

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीस त्यांच्या मालमत्ता करात माफीची सवलत देणेबाबत मा. महासभा ठराव क्र.२६, दि.३०/०७/२०१० अन्वये निर्णय घेणेत आला.

देशासाठी लढणाऱ्या, देशांच्या सीमा सुरक्षित ठेवणाऱ्या, पर्यायाने समस्त नागरिकांचे जिवीत सुरक्षित ठेवणाऱ्या या वीरांना अभिवादन करीत त्यांना दिलेली मालमत्ता करातील सवलत कायम करण्यात यावी, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९०, मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील जनहित याचिका क्र. १९६/२००१ मधील आदेशानुसार स्थानिक संस्थेच्या क्षेत्रातील रस्त्यावरील गरीब / बेघर लोकांना रात्री पुरता निवारा उपलब्ध करुन देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. महासभेपूढे माहितीस्तव सादर करणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, हा जो प्रस्ताव आणलेला आहे, मला माहिती आहे की, स्वत: मा. आयुक्त साहेब, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरुन त्यांनी भाईंदरच्या सर्व समाजमंदिर, शाळांमध्ये जाऊन फिरुन आणि व्यवस्था कशी करता येईल याच्यावर एकदम बारकाईने लक्ष घालून ते कार्य केलेले आहे. आज दोन ठिकाणी सुरु झालेले आहेत, त्याबद्दल प्रथम मा. आयुक्तांचे अभिनंदन करतो, अशा गरजु लोकांना अजून काही व्यवस्था करता येईल, अशा सर्व महापालिका आपल्याला सहकार्य करतील.

**प्रभात पाटील :-**

प्रकरण क्र. ९० मध्ये एक सुचना आहे की, श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी मा. आयुक्तांचे अभिनंदन केले आहे. आम्ही न्यायालयाचा आदर राखतो आणि बेघरांना किंवा गरिबांना जर इथे सोयी सवलती मिळत असतील तर चांगली गोष्ट आहे. परंतु, माझी एक सुचना आहे की, आपण आता जिथे रात्र निवारा चालू केले आहेत, कुठेतरी होणे गरजेचे आहे. परंतु, ज्या ठिकाणी आपण प्रस्तावित केलेले आहेत. आजूबाजूचे लोकेशन पाहिले तर एका ठिकाणी आपण शाळेच्याच वर, आपल्या प्रभाग कार्यालयाच्या वर जागा दिली आहे. जिथे शाळासुध्दा भरते. जिथे आजुबाजुला रहिवासी क्षेत्र आहे. वेस्टमध्ये आपण निवारा केलेला आहे तिथे आपले अग्निशमन केंद्र आहे. आपल्या मोलाच्या वस्तू आहेत. मी म्हणणार नाही की, सगळे गरिब चोर आहेत किंवा लबाड आहेत, लफंगे आहेत. आज आपल्याला सर्वोच्च न्यायालयाचा मान राखून हे सगळे करणे गरजेचे आहे. परंतु, माझी आपल्याला विनंती आहे की, भविष्यामध्ये जर आपले कुठे आरक्षण असेल किंवा इतर ठिकाणी आपल्या महापालिकेच्या जागा असतील तर तिथे त्यांची कायमस्वरुपी अशी निवाऱ्याची सोय करण्यात यावी. आज आपण करतो ही सुरुवात आहे. आणि भविष्यामध्ये त्यांची कायमस्वरुपी तरतुद करण्यात यावी अशी माझी विनंती आहे की, ज्याच्यामुळे त्या शाळेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि पर्यायाने आजुबाजुच्या नागरिकांचे स्वास्थ बिघडणार नाही याची आपण काळजी घेऊ.

प्रकरण क्र. ९० :-

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील जनहित याचिका क्र. १९६/२००१ मधील आदेशानुसार स्थानिक संस्थेच्या क्षेत्रातील रस्त्यावरील गरीब / बेघर लोकांना रात्री पुरता निवारा उपलब्ध करुन देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. महासभेपूढे माहितीस्तव सादर करणे.

ठराव क्र. ९४ :-

रस्त्यावरील गरीब / बेघर लोकांना रात्रीपुरता निवास उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच रस्त्यावरील मुलांना शिक्षण देण्यासाठी शाळेची जागा उपलब्ध करुन देण्यासाठी, पिपल्स युनियन फॉर सिव्हिल फॉर सिव्हिल लिबर्टीज यांनी भारत सरकार विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय सदर विषयाबाबत परिस्थितीजन्य अहवाल सादर करण्याकामी कमिशनर यांची नियुक्ती केली आहे. मा. सर्वोच्या न्यायालयाच्या शिफारशीनुसार पाचा लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात प्रत्येक १ लाख जनसंख्येमागे १ या प्रमाणात नाईट शेल्टर / रात्रनिवारा बांधावयाचे आहेत, जेणेकरुन रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांना रात्रीच्या कालावधीत थंडी, वाऱ्यापासून संरक्षण होईल, त्यानुसार मिरा भाईंदर शहरात एकूण ०२ रात्र निवारे बांधण्यात आले आहेत. याबाबत मा. प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २०१०/प्र.क्र.४५/नवि-२०, दि. १४ जुलै २०११ अन्वये रात्र निवारे कार्यान्वित करणे व त्यांचे संचलन व देखभाल विषयी मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत, सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या जागेनुसार खालील ठिकाणी नाईट शेल्टर / रात्र निवारे सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व व्यवस्था केली आहे.

१) भाईंदर (प.) अग्निशमन इमारत (पहिला मजला) पलंग संख्या ३० (स्त्रियांसाठी)
२) भाईंदर (पू.) प्रभाग समिती क्र.२ इमारत (पहिला मजला) पलंग संख्या ४५ (पुरुषांसाठी)

सदर रात्र निवाऱ्याचे संचलन व देखभाल करण्याकरीता अशासकिय संस्था / सामाजिक संस्थांची निवड करण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करुन अनुभवी संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते, त्यानुसार खालील संस्थांनी अर्ज सादर केले होते.

१) मे. निर्मराज आदिवासी महिला बालविकास सेवाभावी संस्था
२) नवजीत कम्युनिटी हेल्थ सेंटर
३) गुरुकृपा विकास संस्था
४) समर्थकृपा सामाजिक संस्था
५) अन्नपूर्णा महिला मंडळ

वरील संस्थांमधून खालीलप्रमाणे संस्थांची निवड करण्यात आली असून त्यांना संचलन व देखभालीची जबाबदारी देण्यात आली आहे.

१) भाईंदर (प.) अग्निशमन इमारत मधील रात्रनिवारा - निर्मराज आदिवासी महिला बालविकास सेवाभावी संस्था
२) भाईंदर (पू.) प्रभाग समिती क्र.२ इमारतीमधील रात्रनिवारा - गुरुकृपा विकास संस्था

रात्रनिवाऱ्यामध्ये पुरविण्यात येणाऱ्या चहा, कॉफी, नास्ता व इतर जेवणांचे व सुविधांचे खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| | |
|---|---|
| चहा (१५० मी.मी.) | रु. ५.०० |
| कॉफी (१५० मी.मी.) | रु. ८.०० |
| पोहे २०० ग्रॅम | रु. १२.०० |
| उपमा २०० ग्रॅम | रु. १२.०० |
| थाळी (२ चपात्या, २मूठ भात, डाळ, १ भाजी, लोणचे) | रु. २५.०० |
| उशी | रु. २.०० |
| चादर | रु. २.०० |
| १ बादली गरम पाणी | रु. ५.०० |

वरील प्रमाणे कार्यवाही मा. सर्वोच्च न्यायालय व शासन निर्णयानुसार करुन रात्रनिवारे सुरू करण्यास शहरात इतर ठिकाणी रात्रनिवारे / नाईट शेल्टर बांधण्याकरीता जागा उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करण्यास व केलेल्या सव कार्यवाहीस, खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

परंतु आज आपण जेथे हे रात्रनिवारे चालू करीत आहोत त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे भविष्य हयामुळे बिघडू नये आणि आसपासच्या नागरिकांच्या राहणीमानात, सामाजिक स्वास्थ्यात बिघाड होऊ नये तसेच ही दोन्ही ठिकाणे महानगरपालिकेची मालमत्ता असल्याने त्याची देखभाल व सुरक्षा हयाचे भान ठेवणे हे देखील आपले कर्तव्य असल्याने

हया गरीब बेघर लोकांची (भरवस्ती शाळा कार्यालये वगळून) आरक्षित भूखंड शोधून एकत्रितपणे सोय करावी अशी सूचना देखील इथे मांडीत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २४३ तरण तलावाच्या आरक्षणाखाली जागा भुसंपादन करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

प्रकरण क्र. ९१, मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २४३ तरण तलावाच्या आरक्षणाखाली जागा भुसंपादन करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. गोषवाऱ्याप्रमाणे सदरची जागा भुसंपादन करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. २४३ तरण तलाव या आरक्षणाखालील जागेचे एकूण क्षेत्र ५२५३.०० चौ. मी. आहे त्यापैकी आजपर्यंत फक्त जवळ जवळ २५०.०० चौ.मी. जागा हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे सदर जागा महानगरपालिकेस भुसंपादन करण्यासाठी जवळ जवळ २ वर्षे इतका कालावधी जाईल याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सदर जागा भुसंपादन करण्यासाठी सन २०११ च्या शासन दरानुसार अंदाजे ८ कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्यानंतर सदर आरक्षण विकसीत करण्याकरीता सन २०११ च्या बाजार भावानुसार अंदाजीत ५ कोटी रु. इतका खर्च अपेक्षित आहे. हा सर्व खर्च आजच्या दरानुसार आहे. तरी सदर जागा भुसंपादीत करण्यासाठी जर २ ते ४ वर्षे लागली तर हा खर्च दुप्पटी पेक्षा जास्त वाढेल याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याचप्रमाणे जवळजवळ १४ कोटी रु. ची तरतुद महानगरपालिकेत सदर आरक्षण विकसीत करण्यासाठी आहे का ?

त्यापेक्षा सदर आरक्षण जमीन मालक / अधिकारपत्रधारकांनी स्वतः विकसीत केले तर महानगरपालिकेचा एकही पैसा खर्च न होता शहरातील रहिवाशीयांसाठी स्वास्थ व हिता योग्य आहे असे तरण तलाव निर्माण होईल. म्हणून सदर आरक्षण क्र. २४३ तरण तलावाची जागा भुसंपादन करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्याचा प्रस्ताव फेटाळून सदर आरक्षण क्र. २४३ तरण तलाव हे आरक्षण जमिन मालक अधिकारपत्रधारकांना विकसीत करण्यासाठी व त्यामध्ये तरण तलावासह क्लब हाऊस बांधणेस परवानगी देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने आरक्षण क्षेत्राच्या १ चटईक्षेत्र व वाढीव चटईक्षेत्र जमीन धारकास मिळण्याबाबत व महानगरपालिकेकडील रक्कम खर्च न होत आरक्षण विकसीत होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस व त्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देणेबाबत ही महासभा मंजुरी देणेबाबतचा ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, सदरचा जो विषय आहे, समावेशक आरक्षणाखाली आरक्षण विकसीत करण्याबाबत आपल्या डी.सी. रुलमध्ये प्रोव्हीजन नाही. आणि आज जो प्रस्ताव आलेला आहे, विकसित किती करायचे, खर्च किती आहे हा नंतरचा भाग आहे. फक्त पालिकेने ती जागा संपादीत करावी एवढाच हा विषय मर्यादित आहे. आणि त्या खर्चाला फक्त आपण आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी देत आहोत. श्री. नरेंद्र मेहता यांनी जे सांगितले की, तीन-चार वर्षे लागतील. मला वाटत नाही की, ती जागा संपादीत करायला एवढा कालावधी लागेल. जर मा. महासभेने आज मंजुरी दिली, तर लगेच कारवाई होऊन ती जागा संपादीत होऊ शकते. आणि जागा संपादीत झाल्यानंतर मा. खासदार आहेत, मा. आमदार आहेत, नगरसेवक, मा. महापौर, मा. उपमहापौर आहेत. त्यांनी जर आपला फंड दिला, तर हा तरणतलाव या शहरासाठी एक भुषण ठरेल. वसई - विरार महानगरपालिका नुकतीच स्थापन झालेली आहे. त्यांचा तरण तलाव आज नागरिकांसाठी खुला झालेला आहे. यापूर्वी समावेशक आरक्षणाखाली जेवढी आरक्षणे विकसीत झालेली आहेत. त्याची काय परिस्थिती आहे आणि नागरिकांना त्याचा किती फायदा होतो हे शहरातील लोकांच्या समोर आहे, त्याचा काही फायदा होत नाही. बी.ओ.टी. हे टोटली फेल आहे. हे मा. मुख्यमंत्र्यांनी सुध्दा सांगितलेले

आहे. आज मॅक्सस मॉल आपण बी.ओ.टी. वर दिला. त्या ग्राऊंडमध्ये खेळायला आज कोण जाते ? तिथे कोणाला प्रवेशसुध्दा नाही. जर हे आरक्षण पालिकेने विकसीत केले तर शहरासाठी एक भुषण ठरेल. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, आमच्या मा. सभागृह नेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्या ठरावाला अनुमोदन द्या आणि हे आरक्षण पालिकेने ताब्यात घ्यावे. नंतर कसे विकसीत करायचे, काय विकसीत करायचे, फंड कुठुन आणायचा हा पालिकेजवळ मा. महासभेपुढे विषय येणारच आहे. त्यामुळे आता फक्त जागा संपादीत करायला या सभागृहाने अनुमोदन द्यावे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदरने मागच्या काळात साधारण सोळा गार्डन, प्लेग्राऊंडचे उद्‌घाटन केले. भूमीपूजन केले आहे. जवळ-जवळ पाच ते सहा करोड रुपये आपण त्याच्यावर खर्च केले. त्या जागेवर जेवढी बांधकामे आहेत, ती अर्धवट आहेत. गेल्या दोन वर्षापासून तिकडे काही होत नाही. जागेवर अतिक्रमण होत चालले आहे. महापालिकेची जागा आहे. ते आपण विकसीत करु देत नाही. ताब्यात आलेले आहे ते आपण विकसीत करत नाही. आणि दुसरी जागा भुसंपादन. आतापर्यंत इतिहास आहे, मिरा भाईंदर महानगरपालिकेने किती जागा भुसंपादन केली ? भुसंपादन एवढे सोपे नाही आणि बजेटमध्ये तरतुद पाहिजे. आता हे बोलतात की, भुसंपादनाला आर्थिक व प्रशासकीय मान्यता म्हणजे ती जागा उद्या घ्या म्हणून सांगितले तर आपल्याकडे पैसे आहेत का? मी उद्याचेच बोलतो. दुसरे आरक्षण विकसीत करणार. उदाहरण मी सांगतो, उमराव हॉस्पीटल. हेही शहरातील एक आरक्षण होते. मा. महासभेला वाटले की, ते चांगले बांधले, तर त्याच्यामध्ये लोकांना सोयी होतील. म्हणून आपण ती २५ % ची कंडीशन काढली. म्हणजे ते शहराच्या हिताचे, गरज आहे म्हणून. म्हणजे मा. महासभेने गरजेचा विचार केला. स्विमींग पुल एखाद्या विकासकाने केले तर लवकर तयार होईल आणि लोकांना उपयोगी पडेल. तर साहेब, हे जे भुसंपादन करणार आहात, ज्या जागा ऑलरेडी ताब्यात आहेत, त्या पहिल्या विकसीत करा. त्याच्यावर अतिक्रमण होत चाललेले आहे. त्याला डेव्हलप करा. आणि हे स्वीमींग पुल बांधायला, गरज नाही तो तरण तलावच पाहिजे. प्लेग्राऊंडमध्ये बांधता येईल, गार्डनमध्ये बांधता येईल, ते कुठेही बांधता येईल. त्यात ती दहा करोड रुपयांची जागा घ्यायची, दहा करोड खर्च करायचे, दोन वर्षे थांबायचे.

**स्नेहा पांडे :-**

बी.ओ.टी. का क्या सक्सेस रिझल्ट लगता है मेरे को समझ में नही आता है।

**अनिल सावंत :-**

आपका ठराव बी.ओ.टी. का है।

**नरेंद्र मेहता :-**

उमराव हॉस्पीटलच्या पध्दतीचा आहे. बी.ओ.टी. वर नाही. लोकांना सेवा लवकरात लवकर .......

**स्नेहा पांडे :-**

पहला जो आरक्षण है उसको डेव्हलप किया जाए उसके बाद दुसरा लिया जाए।

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, उमराव हॉस्पीटलचं जे उदा. सन्मा. नरेंद्र मेहतानी दिलेल आहे. तिथे पालिकेला प्रसुतीगृह निर्माण करायचे होते. परंतु, आर्थिक परिस्थीतीमुळे आहे तेच रुग्णालय चालवणं आपल्याला कठीण आहे करण्यात येणारा तरण तलाव पालिकेने विकसीत केला तर त्याला एकदाचं खर्च आहे. शहराची स्वतःची मालमत्ता होईल स्वतःचा तरण तलाव निर्माण होईल त्याला कमर्शिअल बेस देता येईल, त्याच्यामध्ये दुकान काढता येतील त्याच्यातून उत्पन्न वाढेल. शहराला त्याप्रकारे काय तरी वस्तु देऊ शकु अशी भुमिका आपण घेतली पाहिजे. मधल्या काळामध्ये तत्कालीन मा. आयुक्तांनी खाजगी तत्वावर ग्राऊंड वगैरे विकसीत करायला आणले होते. ह्याच महासभेने त्याला फेटाळले होतं कारण ते तसे करता येत नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उमराव हॉस्पीटल को जो २५ टक्का एफ.एस.आय. दिया। उसके बनने के बाद उमराव हॉस्पीटल से भाईंदर के जनता को क्या मिला। उसका सर्व्हे देने की कृपा करे। जो ४० टक्के का रिर्झव्हेशन दिया था उसमे आज तक कितना लिया एक पेशन्ट, दो पेशन्ट था ४० टक्का कितना था।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

२५ टक्का था।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

४० टक्का रिर्झव्हेशन था। २० टक्का गव्हर्नमेंट एम्प्लॉई १० टक्का कमिशनर पॉवर अँन्ड १० टक्का इकोनॉमिक विकर सेक्शन उसमे से कितना यूज किया। जो हमने दिया उसका फायदा हमे मिलता है क्या?

**अनिल सावंत :-**

ती माहिती घ्या तो विषय वेगळा आहे. मला एक कळत नाही की, हा विषय प्रशासनानी आणलेला आहे तर सन्मा. नरेंद्र मेहता विकासकांची एवढी बाजू का घेतात. ते आरक्षण आता ताब्यात येणारच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

उमराव हॉस्पीटलचा विषय मी आणलेला तेव्हा कोणी बोललेच नाही. विषय असा आहे की, शहरात लवकरात लवकर सुविधा उपलब्ध व्हावी. त्याचा एक मार्ग आहे. बाजू घ्यायचा प्रश्नच नाही. सचिव साहेब, आम्ही ठराव मांडलेला आहे. मतदान घ्या विषय संपवा.

**नगरसचिव :-**

प्रकरण ९१ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील अनुमोदन सन्मा एस.ए. खान दुसरा ठराव सुचक सन्मा. नरेंद्र मेहता अनुमोदक सन्मा. ओमप्रकाश गारोडीया. दुसरा ठराव मतदानास टाकतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. २४३ तरण तलाव या आरक्षणाखालील जागेचे एकूण क्षेत्र ५२५३.०० चौ. मी. आहे त्यापैकी आजपर्यंत फक्त जवळ जवळ २५०.०० चौ.मी. जागा हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे सदर जागा महानगरपालिकेस भुसंपादन करण्यासाठी जवळ जवळ २ वर्षे इतका कालावधी जाईल याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सदर जागा भुसंपादन करण्यासाठी सन २०११ च्या शासन दरानुसार अंदाजे ८ कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्यानंतर सदर आरक्षण विकसीत करण्याकरीता सन २०११ च्या बाजार भावानुसार अंदाजीत ५ कोटी रु. इतका खर्च अपेक्षित आहे. हा सर्व खर्च आजच्या दरानुसार आहे. तरी सदर जागा भुसंपादीत करण्यासाठी जर २ ते ४ वर्षे लागली तर हा खर्च दुप्पटी पेक्षा जास्त वाढेल याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याचप्रमाणे जवळजवळ १४ कोटी रु. ची तरतुद महानगरपालिकेत सदर आरक्षण विकसीत करण्यासाठी आहे का ?

त्यापेक्षा सदर आरक्षण जमीन मालक / अधिकारपत्रधारकांनी स्वतः विकसीत केले तर महानगरपालिकेचा एकही पैसा खर्च न होता शहरातील रहिवाशीयांसाठी स्वास्थ व हिता योग्य आहे असे तरण तलाव निर्माण होईल म्हणून सदर आरक्षण क्र. २४३ तरण तलावाची जागा भुसंपादन करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्याचा प्रस्ताव फेटाळून सदर आरक्षण क्र. २४३ तरण तलाव हे आरक्षण जमिन मालक अधिकारपत्रधारकांना विकसीत करण्यासाठी व त्यामध्ये तरण तलावासह क्लब हाऊस बांधणेस परवानगी देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने आरक्षण क्षेत्राच्या १ चटईक्षेत्र व वाढीव चटईक्षेत्र जमीन धारकास मिळण्याबाबत व महानगरपालिकेकडील रक्कम खर्च न होत आरक्षण विकसीत होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस व त्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देणेबाबत ही महासभा मंजुरी देणेबाबतचा ठराव मांडत आहे. सन्मा. नरेंद्र मेहता ह्याच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक सन्मा. प्रभात पाटील ह्यांचा ठरावाचे वाचन करतो. प्रकरण क्र. ९१, मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २४३ तरण तलावाच्या आरक्षणाखाली जागा भुसंपादन करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. गोषवाऱ्याप्रमाणे सदरची जागा भुसंपादन करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर घ्यायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहता ह्यांनी जो ठराव मांडलेला त्याच्या बाजूने ३९ मत आहेत. आणि विरोधात २७ आहेत. सन्मा. नरेंद्र मेहता ह्याचा ठराव बहुमताने पास झालेला आहे.

**प्रकरण क्र. ९१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २४३ तरण तलावाच्या आरक्षणाखाली जागा भुसंपादन करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. २४३ तरण तलाव या आरक्षणाखालील जागेचे एकूण क्षेत्र ५२५३.०० चौ. मी. आहे त्यापैकी आजपर्यंत फक्त जवळ जवळ २५०.०० चौ.मी. जागा हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे सदर जागा महानगरपालिकेस भुसंपादन करण्यासाठी जवळ जवळ २ वर्षे इतका कालावधी जाईल याची शक्यता नाकारता येत नाही, त्याचप्रमाणे सदर जागा भुसंपादन करण्यासाठी सन २०११ च्या शासन दरानुसार अंदाजे ८ कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्यानंतर सदर आरक्षण विकसीत करण्याकरीता सन २०११ च्या बाजार भावानुसार अंदाजीत ५ कोटी रु. इतका खर्च अपेक्षित आहे, हा सर्व खर्च आजच्या दरानुसार आहे. तरी सदर जागा भुसंपादीत करण्यासाठी जर २ ते ४ वर्षे लागली तर हा खर्च दुप्पटी पेक्षा जास्त वाढेल याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याचप्रमाणे जवळजवळ १४ कोटी रु. ची तरतुद महानगरपालिकेत सदर आरक्षण विकसीत करण्यासाठी आहे का ?

त्यापेक्षा सदर आरक्षण जमीन मालक / अधिकारपत्रधारकांनी स्वतः विकसीत केले तर महानगरपालिकेचा एकही पैसा खर्च न होता शहरातील रहिवाशीयांसाठी स्वास्थ व हिता योग्य आहे असे तरण तलाव निर्माण होईल. म्हणून सदर आरक्षण क्र. २४३ तरण तलावाची जागा भुसंपादन करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्याचा प्रस्ताव फेटाळून सदर आरक्षण क्र. २४३ तरण तलाव हे आरक्षण जमिन मालक अधिकारपत्रधारकांना विकसीत करण्यासाठी व त्यामध्ये तरण तलावासह क्लब हाऊस बांधणेस परवानगी देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने आरक्षण क्षेत्राच्या १ चटईक्षेत्र व वाढीव चटईक्षेत्र जमीन धारकास मिळण्याबाबत व महानगरपालिकेकडील रक्कम खर्च न होत आरक्षण विकसीत होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस व त्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देणेबाबत ही महासभा मंजुरी देणेबाबतचा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र एल. मेहता                अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | पाटील उमाताई शाम | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | नलावडे दिनेश दगडू | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | सपार उमा विश्वनाथ | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १३ | राजेंद्र भंवरलाल जैन | १३ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | शफीक अहमद सादत खान | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | प्रमोद जयराम सामंत | |
| १६ | चक्रे वंदना रामदास | १६ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १७ | माळी हेमा रविंद्र | १७ | विजया हेमचंद्र वैती | |
| १८ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १८ | ठाकुर कल्पना हरीहर | |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २० | टेरी पॉल परेरा | २० | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २१ | भट दिप्ती शेखर | |
| २२ | वर्षा गिरधर भानुशाली | २२ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | अनिल दिवाकर सावंत | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | २४ | शेख सलिम दाऊद | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | २५ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २६ | पाटील शरद केशव | २६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २७ | नयना गजानन म्हात्रे | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३० | पांडे स्नेहा शैलेश | | | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३७ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३८ | व्यास सुधा वासुदेव | | | |
| ३९ | धनेश परशुराम पाटील | | | |

ठराव बहुमताने मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.९२, मिरारोड (शांतीनगर सेक्टर ११) येथे मनोरंजन केंद्र इमारत बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर गृहसंकुलामधील सेक्टर १ व ११ च्या मर्यादित जा.क्र. मनपा/नर/२६००/२००५-०६, दि.२७/०१/२००६ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यांत आलेली असून या परवानगी प्रमाणे सेक्टर ११ मधील संदर्भिय अहवालान्वये प्रस्तावित इमारतीच्या ठिकाणची आर.जी. चे क्षेत्र जवळपास ३१००.०० चौ.मी. असून या जागेमध्ये उंच पाण्याची टाकी तसेच दोन Underground Sump विद्यमान आहेत.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. २२ (g)(ii) प्रमाणे १०००.०० चौ.मी. पेक्षा जास्तीच्या क्षेत्राच्या आर.जी. च्या जागेमध्ये १५% च्या मर्यादित (तळमजला १०% व पहिला मजला ५% प्रमाणे) व ८.० मी. उंचीपर्यंत जिम्नॅशियम, क्लब हाऊस व इतर खेळाच्या व करमणुकीच्या प्रकारासाठीचे बांधकाम विना गणना चटईक्षेत्राप्रमाणे अनुज्ञेय करण्याची तरतुद आहे.

संदर्भिय अहवाल सोबत केलेल्या नकाशे एकूण १६०.५० चौ.मी. क्षेत्रासाठी प्रस्तावित केलेले आहेत. सबब प्रस्तावित केलेले बांधकाम नकाशाचे बांधकाम क्षेत्र आर.जी. च्या १५% क्षेत्राचा मर्यादित आहेत.

सदर क्षेत्राचे तळ व एक मजल्याचे बांधकामासाठी रु. २८.०० लक्ष एवढा खर्च अपक्षित असून सन २०११-१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात कम्युनिटी सेंटर या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास व आर.जी. मध्ये काम करण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या इतर तिन प्रभाग क्षेत्रात अश्या जागा उपलब्ध झाल्यास तेथेही अशी मनोरंजन केंद्रे उभारण्यात यावीत. असा मी ठराव मांडीत आहे.

**एस.ए.खान :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्रमांक २२ (१) नुसार खुल्या जागेचे क्षेत्र (आर.जी.) भुखंड १००१ ते २५०० चौ.मी. पर्यंत १५ टक्के २५०१ ते १०००० चौ.मी. पर्यंत २० टक्के १०००० चौ.मी. वरील २५ टक्के प्रमाणे सोडण्यात येते. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम २२ (जी) नुसार अशा खुल्या जागेत (आरजी) १५ टक्के काही विशिष्ट हेतुसाठी बांधकाम अनुज्ञेय आहे. उपरोक्त बाब आरक्षण नसून रेखांकनात सोशवयाची खुली जागा (आरजी) आहे व सदर खुली जागा विकासकांने भरणी करुन तसेच पुरेशी झाडे लावून विकसीत करावयाची आहेत. तसे न केल्यास बांधकाम परवानगीतील अटीनुसार त्यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांतर्गत कारवाई करता येते. सहाय्यक नगररचनाकार जा.न.मनपा/नर/२९७२/२०११-१२, दि. १६/१२/२०११ अन्वये महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रातील गृहसंकुलामधील आरजीच्या जागा ताब्यात घेतल्यास त्या विकसीत करणे, त्यांची देखभाल दुरुस्ती करणे तसेच संरक्षण करणे महापालिकेस फारच खर्चिक होणार असून त्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे असे महापालिकेने स्पष्ट कळविले आहे. प्रकरण क्रमांक ९२, मिरारोड, शांतीनगर सेक्टर ११ येथे मनोरंजन केंद्र इमारत बांधणे प्रस्तावित केलेले क्षेत्र आरजी (खुली जागा) असून त्या महापालिका ताब्यात घेतले नाही. सदरची जागा त्या संकुलनातील रहिवाश्यांना किंवा रहिवाशी संघटनेला हस्तांतरण करणे विकासकाला बंधनकारक आहे.

मिरा भाईंदर शहरात मनोरंजन केंद्र बांधणे आवश्यक आहे. प्रस्तावित मनोरंजन केंद्र हा छोटा आहे, व शहराच्या एका बाजुला होणार आहे. म्हणून मनोरंजन केंद्र हा मिरा भाईंदर शहराच्या मधोमध (Center Point) ला बांधणे गरजेचे आहे. म्हणून शांतिनगर येथे मनोरंजन केंद्र बांधणेचे प्रस्ताव ही सभा रद्द करते व मनोरंजन केंद्र हा आरक्षण क्र. १२२ मध्ये बांधावे जेणे कारणे मिरा भाईंदरच्या सर्व रहिवाश्यांना उपयोगी होईल. ही सभा आरक्षण क्र. १२२ मध्ये मनोरंजन केंद्र बांधण्यासाठी आवश्यक असल्यास मुळ आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आमच्या सभागृह नेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्यामध्ये प्रशासनाने प्रभाग क्र.४ मध्ये मनोरंजन केंद्र बांधावे असा प्रस्ताव दिलेला होता. आमची अशी सुचना आहे की चारही प्रभागामध्ये चार मनोरंजन केंद्रे असावी. पांडे मॅडमनी सांगितले की १२२ नंबर आरक्षण विकसीत करा. अनधिकृत झोपडपट्ट्या बऱ्याच आहेत अतिक्रमण आहे. आता सुद्धा आपण तोच विषय घेतो जो होणार नाही. १२२ नंबर आरक्षणामध्ये ते मनोरंजन केंद्र बनवावे असा त्यांचा प्रस्ताव आहे, त्याच्यामध्ये १२२ नंबर आरक्षण आहे ते सामाजिक वनीकरणासाठी आरक्षित आहे. त्याच्यासाठी मायनर मॉडीफिकेशन करा, सजेशन, ऑब्जेक्शन मागवा. दॅट इज अ टाईम कंन्झुमिंग जॉब. मिरारोड मध्ये जी जागा दिलेली आहे. मिरारोड हे संकुल त्याचे सीसी वगैरे देताना आर.जी. सर्व विकासकांनी डेव्हलप केलेल्या होत्या. त्यानंतर गेल्या २० वर्षामध्ये तेथील रहिवाशाजवळून त्यावर देखभाल करणे किंवा खर्च करणे ही आर्थिक अट त्या

रहिवाशांमध्ये नव्हती. त्यामुळे आर.जी. ची परिस्थीती अशी आहे काही ठिकाणी गार्डन आहेत पण व्यवस्थित नाहीत. ही जी जागा दाखवली आहे तो ओपन प्लॉट होता. सुरुवातीला त्या लोकांनी त्या ठिकाणी गार्डन वगैरे केले होते पण ती मेंन्टेन न झाल्यामुळे ती जागा तशीच आहे. मिरारोड शहराची लोकसंख्या साडेचार ते पाच लाख आहे. त्यासाठी ती मध्यवर्ती जागा आहे त्याठिकाणी एक मनोरंजन केंद्र बनवावे. प्रभाग क्रमांक तीन मध्ये कम्युनिटी सेंटर आपल्याला हॅन्ड ओव्हर होणार आहे. प्रभाग क्र.२ मध्ये नवघरला एक कम्युनिटी सेंटर प्रस्तावित आहे ते सुद्धा होणार आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये अशी जागा शोधावी की ज्याचा फायदा शहरातील सर्व रहिवाश्यांना उपभोग घेता येईल. सन्मा. नरेंद्र मेहतानी सांगितलं की १२२ मध्ये मनोरंजन केंद्र बांधावे तर ते कधी होणारच नाही ही आजची वस्तुस्थिती आहे. लवकरात लवकर चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टीने आम्ही हा प्रस्ताव दिलेला आहे सभागृहाने ह्याचा विचार करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, प्रशासनाने २००७ ते आतापर्यंत आर.जी. जागेबद्दल वेगवेगळे प्रस्ताव आणले आहेत की महापालिकेने जागा डेव्हलपमेंट करावी. विकासक डेव्हलप करीत नाही अतिक्रमण होते त्यावेळेला कोणी लक्ष दिले नाही मी आपल्याला एक महिन्यापूर्वी पत्र दिले होते. ह्या जागेबद्दल असं करा आपण पत्र दिले नाही. आर.जी. जागा ताब्यात घेण्याचे महापालिकेच्या औचित्य नाही, खर्च नाही आणि प्रशासन असा विषय आणून सभागृहाची दिशाभूल करतात. एका बाजूला सन्मा. नगरसेवक पत्र देतात की ही जागा ताब्यात घेऊ शकत नाही खर्चाची बाब आहे आणि एका बाजूला तुम्ही हा विषय आणता. म्हणून शहरामध्ये एक वेगळा मेसेज जातो की खरोखरच सत्ताधाऱ्यांना मनोरंजन केंद्र नको का? ह्या विरोधाना नको आहे का? मनोरंजन केंद्र असले पाहिजे अशी आमची मागणी आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की असा गोषवारा देताना किमान शहरामध्ये असे वातावरण निर्माण होणार की सभागृहाने मनोरंजनाला विरोध केला आहे. म्हणून आम्हाला मनोरंजन केंद्र बांधायच आहे.

***अनिल सावंत :-***

विरोध केलेला नाही विरोध केला तर ठामपणे सांगा ना की विरोध करतो म्हणून.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. मुख्यमंत्री आपले आहेत तर तुम्ही एका महिन्यात आणू शकता.

**एस.ए. खान :-**

आमची चारही प्रभागामध्ये मागणी आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण ९२ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील अनुमोदन सन्मा. एस.ए.खान दुसरा ठराव सुचक सन्मा. नरेंद्र मेहता अनुमोदन सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल अनुक्रमे दुसरा ठराव मतास टाकतो. विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्रमांक २२ (१) नुसार खुल्या जागेचे क्षेत्र (आर.जी.) भुखंड १००१ ते २५०० चौ.मी. पर्यंत १५ टक्के. २५०१ ते १०००० चौ.मी. पर्यंत २० टक्के १०००० चौ.मी. वरील २५ टक्के प्रमाणे सोडण्यात येते. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम २२ (जी) नुसार अशा खुल्या जागेत (आरजी) १५ टक्के काही विशिष्ट हेतुसाठी बांधकाम अनुज्ञेय आहे. उपरोक्त बाब आरक्षण नसून रेखांकनात सोशवयाची खुली जागा (आरजी) आहे व सदर खुली जागा विकासकांने भरणी करुन तसेच पुरेशी झाडे लावून विकसीत करावयाची आहेत. तसे न केल्यास बांधकाम परवानगीतील अटीनुसार त्यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांतर्गत कारवाई करता येते. सहाय्यक नगररचनाकार जा.नं.मनपा/नर/२९७२/२०११-१२, दि. १६/१२/२०११ अन्वये महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रातील गृहसंकुलामधील आरजीच्या जागा ताब्यात घेतल्यास त्या विकसीत करणे, त्यांची देखभाल दुरुस्ती करणे तसेच संरक्षण करणे महापालिकेस फारच खर्चिक होणार असून त्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे असे महापालिकेने स्पष्ट कळविले आहे. प्रकरण क्रमांक ९२, मिरारोड, शांतीनगर सेक्टर ११ येथे मनोरंजन केंद्र इमारत बांधणे प्रस्तावित केलेले क्षेत्र आरजी (खुली जागा) असून त्या महापालिका ताब्यात घेतले नाही. सदरची जागा त्या संकुलनातील रहिवाश्यांना किंवा रहिवाशी संघटनेला हस्तांतरण करणे विकासकाला बंधनकारक आहे.

मिरा भाईंदर शहरात मनोरंजन केंद्र बांधणे आवश्यक आहे. प्रस्तावित मनोरंजन केंद्र हा छोटा आहे व शहराच्या एका बाजुला होणार आहे. म्हणून मनोरंजन केंद्र हा मिरा भाईंदर शहराच्या मधोमध (Center Point) ला बांधणे गरजेचे आहे. म्हणून शांतिनगर येथे मनोरंजन केंद्र बांधणेचे प्रस्ताव ही सभा रद्द करते व मनोरंजन केंद्र हा आरक्षण क्र. १२२ मध्ये बांधावे जेणे कारणे मिरा भाईंदरच्या सर्व रहिवाश्यांना उपयोगी होईल. ही सभा आरक्षण क्र. १२२ मध्ये मनोरंजन केंद्र बांधण्यासाठी आवश्यक असल्यास मुळ आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. आता मी सन्मा. श्रीम. प्रभात पाटील ह्यांच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर गृहसंकुलामधील सेक्टर १ व ११ च्या मर्यादित जा.क्र. मनपा/नर/२६००/२००५-०६, दि.२७/०१/२००६ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यांत आलेली असून या परवानगी प्रमाणे सेक्टर ११ मधील संदर्भिय अहवालान्वये प्रस्तावित इमारतीच्या ठिकाणची आर.जी. चे क्षेत्र जवळपास ३१००.०० चौ.मी. असून या जागेमध्ये उंच पाण्याची टाकी तसेच दोन Underground Sump विद्यमान आहेत.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. २२ (g)(ii) प्रमाणे १०००.०० चौ.मी. पेक्षा जास्तीच्या क्षेत्राच्या आर.जी. च्या जागेमध्ये १५% च्या मर्यादित (तळमजला १०% व पहिला मजला ५% प्रमाणे) व ८.० मी. उंचीपर्यंत जिम्नॅशियम, क्लब हाऊस व इतर खेळाच्या व करमणुकीच्या प्रकारासाठीचे बांधकाम विना गणना चटईक्षेत्राप्रमाणे अनुज्ञेय करण्याची तरतुद आहे.

संदर्भिय अहवाल सोबत केलेल्या नकाशे एकूण १६०.५० चौ.मी. क्षेत्रासाठी प्रस्तावित केलेले आहेत. सबब प्रस्तावित केलेले बांधकाम नकाशाचे बांधकाम क्षेत्र आर.जी. च्या १५% क्षेत्राचा मर्यादित आहेत.

सदर क्षेत्राचे तळ व एक मजल्याचे बांधकामासाठी रु. २८.०० लक्ष एवढा खर्च अपक्षित असून सन २०११-१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात कम्युनिटी सेंटर या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास व आर.जी. मध्ये काम करण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या इतर तिन प्रभाग क्षेत्रात अश्या जागा उपलब्ध झाल्यास तेथेही अशी मनोरंजन केंद्रे उभारण्यात यावीत. असा मी ठराव मांडीत आहे. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहता ह्याच्या बाजूने ३९ मत आहे आणि विरोधात २७ आहेत. सन्मा. नरेंद्र मेहता, ह्याचा ठराव बहुमताने पास करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९२ :-**

मिरारोड (शांतीनगर सेक्टर ११) येथे मनोरंजन केंद्र इमारत बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ९६ :-**

*विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्रमांक २२ (१) नुसार खुल्या जागेचे क्षेत्र (आर.जी.) भुखंड १००१ ते* २५०० चौ.मी. पर्यंत १५ टक्के २५०१ ते १०००० चौ.मी. पर्यंत २० टक्के १०००० चौ.मी. वरील २५ टक्के प्रमाणे सोडण्यात येते. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम २२ (जी) नुसार अशा खुल्या जागेत (आरजी) १५ टक्के काही विशिष्ट हेतुसाठी बांधकाम अनुज्ञेय आहे. उपरोक्त बाब आरक्षण नसून रेखांकनात सौशवयाची खुली जागा (आरजी) आहे व सदर खुली जागा विकासकांने भरणी करुन तसेच पुरेशी झाडे लावून विकसीत करावयाची आहेत. तसे न केल्यास बांधकाम परवानगीतील अटीनुसार त्यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांतर्गत कारवाई करता येते. सहाय्यक नगररचनाकार जा.न.मनपा/नर/२९७२/२०११-१२, दि. १६/१२/२०११ अन्वये महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रातील गृहसंकुलामधील आरजीच्या जागा ताब्यात घेतल्यास त्या विकसीत करणे, त्याची देखभाल दुरुस्ती करणे तसेच संरक्षण करणे महापालिकेस फारच खर्चिक होणार असून त्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे असे महापालिकेने स्पष्ट कळविले आहे. प्रकरण क्रमांक ९२, मिरारोड, शांतीनगर सेक्टर ११ येथे मनोरंजन केंद्र इमारत बांधणे प्रस्तावित केलेले क्षेत्र आरजी (खुली जागा) असून त्या महापालिका ताब्यात घेतले नाही. सदरची जागा त्या संकुलनातील रहिवाश्यांना किंवा रहिवाशी संघटनेला हस्तांतरण करणे विकासकाला बंधनकारक आहे.

मिरा भाईंदर शहरात मनोरंजन केंद्र बांधणे आवश्यक आहे. प्रस्तावित मनोरंजन केंद्र हा छोटा आहे व शहराच्या एका बाजुला होणार आहे. म्हणून मनोरंजन केंद्र हा मिरा भाईंदर शहराच्या मधोमध (Center Point) ला *बांधणे गरजेचे आहे. म्हणून शांतिनगर येथे मनोरंजन केंद्र बांधणेचे प्रस्ताव ही सभा रद्द करते व मनोरंजन केंद्र हा* आरक्षण क्र. १२२ मध्ये बांधावे जेणे कारणे मिरा भाईंदरच्या सर्व रहिवाश्यांना उपयोगी होईल. ही सभा आरक्षण क्र. १२२ मध्ये मनोरंजन केंद्र बांधण्यासाठी आवश्यक असल्यास मुळ आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र एल. मेहता** **अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | नलावडे दिनेश दगडू | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | सुनिता कैलास पाटील | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | सपार उमा विश्वनाथ | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| ११ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | ११ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | मुंज वासुदेव भास्कर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | राजेंद्र भंवरलाल जैन | १३ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | शफीक अहमद सादत खान | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | प्रमोद जयराम सामंत | |
| १६ | चक्रे वंदना रामदास | १६ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १७ | माळी हेमा रविंद्र | १७ | विजया हेमचंद्र वैती | |
| १८ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १८ | ठाकुर कल्पना हरीहर | |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २० | टेरी पॉल परेरा | २० | भट दिप्ती शेखर | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २१ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २२ | वर्षा गिरधर भानुशाली | २२ | अनिल दिवाकर सावंत | |
| २३ | राजु यशवंत भोईर | २३ | शेख सलिम दाऊद | |
| २४ | जाधव मोहन महादेव | २४ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २५ | सिंह मदन उदितनारायण | २५ | पुरोहित मधुसूदन मनोहरलाल | |
| २६ | म्हात्रे कल्पना महेश | २६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २७ | पाटील शरद केशव | २७ | मिलन वसंत म्हात्रे | |
| २८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | | |
| २९ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३२ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३३ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३४ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३५ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३६ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३७ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३९ | व्यास सुधा वासुदेव | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३, परवाना शुल्क फेरबदल करणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसाय / उद्योगधंदे चालू असून या आस्थापनांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८, दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजूर केलेले आहेत.

इतर महानगरपालिकांच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना दर जास्त असल्याने व्यावसायधारक परवाना घेण्यास टाळाटाळ करत असतात, त्याकरीता यापूर्वी पारीत झालेल्या दरामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे क्षेत्रफळानुसार दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | आस्थापनाचे क्षेत्रफळ | दर |
|---|---|---|
| १. | २५० चौ. फुटापर्यंत | ३००/- |
| २. | २५१-५०० चौ. फुटापर्यंत | ६००/- |
| ३. | ५००-१००० चौ. फुटापर्यंत | १२००/- |
| ४. | १०००-२५०० चौ. फुटापर्यंत | २२००/- |
| ५. | २५००-५००० चौ. फुटापर्यंत | ४५००/- |
| ६. | ५०००-१०००० चौ. फुटापर्यंत | ९०००/- |
| ७. | १०००१-पुढे | १२०००/- |

तसेच यापूर्वी आपण ऑर्केस्ट्रा, बार अँड रेस्टॉरेंट आणि लॉजिंग-बोर्डिंग यांचे दर जे निश्चित केले आहेत ते कायम ठेवण्यात यावेत.

वरीलप्रमाणे शहरातील विविध प्रकारच्या सर्व आस्थापनाधारकांकडून नविन परवाना व परवाना नुतनीकरणाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका परवाना शुल्क फेरबदल करुन घेणेच्या धोरणात्मक निर्णयास ही सभा मंजूरी देत आहे.

**एस.ए. खान :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसास / उद्योग धंदे चालू असून या आस्थापनांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. परवाना शुल्क वसुली कामी अभिकर्ता न नेमता महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करावी.

परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजुर केलेले आहेत. इतर महानगरपालिकेच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना दर जास्त असल्याने व्यवसायधारक परवाना घेण्यास टाळाटाळ करत असतात. त्याकरीता यापूर्वी पारीत झालेल्या दरामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे क्षेत्रफळानुसार दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | आस्थापनाचे क्षेत्रफळ | दर (रु.) |
|---|---|---|
| १ | २५० चौ. फुटा पर्यंत | २५०/- |
| २ | २५१-५०० चौ. फुटा पर्यंत | ५००/- |
| ३ | ५०१-१००० चौ. फुटा पर्यंत | १०००/- |
| ४ | १००१-२५०० चौ. फुटा पर्यंत | २०००/- |
| ५ | २५०१-५००० चौ. फुटा पर्यंत | ४०००/- |
| ६ | ५००१-१०००० चौ. फुटा पर्यंत | ६०००/- |
| ७ | १०००१- चौ. फुटा पर्यंत | ८०००/- |

**सुचना :-**

अ) मोकळया खाजगी जागेत जे व्यवसाय करतात त्यासाठी रु.१०००/- प्रति वर्ष याप्रमाणे परवाना फी आकारण्यात यावी.

ब) निवासासह वाणिज्य वापर करत असल्यास वाणिज्य जागेच्या क्षेत्रफळानुसार परवाना फी आकारण्यात यावी.

क) ज्या व्यवसाय धारकांचे व्यवसायासह इतर ठिकाणी महानगरपालिका हद्दीत गोडाऊन असेल अशा व्यवसाय धारकांनी सदर व्यवसायास परवाना घेतेवेळी अर्जात नमुद केलेल्या गोडाऊनला परवाना फी आकारु नये.

ड) ह्यापूर्वी व्यवसायधारकांनी घेतलेल्या परवानाचे नुतनीकरण करताना वरील सुधारीत दराने थकित रक्कम वसुली करावी.

वरील प्रमाणे महसुली उत्पन्नाच्या दृष्टीने कमीत कमी कागदपत्रे करारनामा/भाडे करारनामा, टॅक्स पावती, जागेचा पुरावा यापैकी कोणतेही कागदपत्र घेण्यात यावेत. शहरातील विविध सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांकडून नविन परवाना व परवाना नुतनीकरण एक वर्ष किंवा किमान तीन वर्षापर्यंत देण्यात यावा. वरील सुचनांसह परवाना शुल्क फेरबदल करुन घेण्याच्या धोरणात्मक निर्णयास ही सभा मंजुरी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. उपमहापौर साहेब, आमचा जो ठराव आहे. त्याच्यात आम्ही प्रशासनाने जे दर दिलेले आहेत तेच दर कायम ठेवले आहेत. तुम्ही थोडे कमी केले आहेत. त्याला आमची हरकत नाही. ते ठिक आहेत आम्ही वेगळा ठराव मांडत नाही. परंतु, बार आणि रेस्टॉरंट लॉजिंग बोर्डींग आणि ऑर्केस्ट्राचे हॉटेल बार आणि रेस्टॉरंट म्हणजे जिकडे लिकर विकली जाते आणि लेडीज ऑर्केस्ट्रा बार रेस्टॉरेंट आणि लॉजिंग बोर्डींग ह्या तीनमध्ये जर ह्याप्रमाणे दर केले तर एखादा मेडीकल स्टोर्स आणि बार आणि रेस्टॉरंट ह्याचे दर सेम राहणार आहेत. एखादे जर ५०० ते १००० sq.ft. चं मेडीकल असेल आणि तेवढच १००० sq.ft. चं बार आणि रेस्टॉरंट असेल तर त्यांना रेट सेम राहणार आहेत आम्ही आमच्या ठरावामध्ये अशी सुचना केली होती त्या आस्थापनेचे दर जे आपण ठराव केले होते त्याप्रमाणेच राहू द्यावे अणि इतर जे दर आहेत ते इतर आस्थापनाला लागु व्हावे ती जर सुचना तुम्ही अॅड करत असाल तर आम्ही ठराव मांडत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. अनिल सांवत आज तुम्हाला मेडिकल स्टोर्सची आठवण आली.

नगरसचिव :-

प्रकरण क्र.९३ करीता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील अनुमोदन सन्मा. एस.ए. खान दुसरा ठराव सुचक सन्मा. भगवती शर्मा अनुमोदन सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल अनुक्रमे दुसरा ठराव मतदानांस टाकतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसांस / उद्योग धंदे चालू असून या आस्थापनांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. परवाना शुल्क वसुली कामी अभिकर्ता न नेमता महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करावी.

परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजुर केलेले आहेत. इतर महानगरपालिकेच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना दर जास्त असल्याने व्यवसायधारक परवाना घेण्यास टाळाटाळ करत असतात. त्याकरीता यापूर्वी पारीत झालेल्या दरामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे क्षेत्रफळानुसार दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | आस्थापनाचे क्षेत्रफळ | दर (रु.) |
|---|---|---|
| १ | २५० चौ. फुटा पर्यंत | २५०/- |
| २ | २५१-५०० चौ. फुटा पर्यंत | ५००/- |
| ३ | ५०१-१००० चौ. फुटा पर्यंत | १०००/- |
| ४ | १००१-२५०० चौ. फुटा पर्यंत | २०००/- |
| ५ | २५०१-५००० चौ. फुटा पर्यंत | ४०००/- |
| ६ | ५००१-१०००० चौ. फुटा पर्यंत | ६०००/- |
| ७ | १०००१- चौ. फुटा पर्यंत | ८०००/- |

सुचना :-

अ) मोकळया खाजगी जागेत जे व्यवसाय करतात त्यासाठी रु.१०००/- प्रति वर्ष याप्रमाणे परवाना फी आकारण्यात यावी.

ब) निवासासह वाणिज्य वापर करत असल्यास वाणिज्य जागेच्या क्षेत्रफळानुसार परवाना फी आकारण्यात यावी.

क) ज्या व्यवसाय धारकांचे व्यवसायासह इतर ठिकाणी महानगरपालिका हद्दीत गोडाऊन असेल अशा व्यवसाय धारकांनी सदर व्यवसायास परवाना घेतेवेळी अर्जात नमुद केलेल्या गोडाऊनला परवाना फी आकारु नये.

ड) ह्यापूर्वी व्यवसायधारकांनी घेतलेल्या परवानाचे नुतनीकरण करताना वरील सुधारीत दराने थकित रक्कम वसुली करावी.

वरील प्रमाणे महसुली उत्पन्नाच्या दृष्टीने कमीत कमी कागदपत्रे करारनामा/भाडे करारनामा, टॅक्स पावती, जागेचा पुरावा यापैकी कोणतेही कागदपत्र घेण्यात यावेत. शहरातील विविध सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांकडून नविन परवाना व परवाना नुतनीकरण एक वर्ष किंवा किमान तीन वर्षापर्यंत देण्यात यावा. वरील सुचनांसह परवाना शुल्क फेरबदल करुन घेण्याच्या धोरणात्मक निर्णयास ही सभा मंजुरी देत आहे. भगवती शर्मा ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक सन्मा. प्रभात पाटील ह्याच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसाय / उद्योगधंदे चालू असून या आस्थापनांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८, दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजूर केलेले आहेत.

इतर महानगरपालिकांच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना दर जास्त असल्याने व्यावसायधारक परवाना घेण्यास टाळाटाळ करत असतात, त्याकरीता यापूर्वी पारीत झालेल्या दरामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे क्षेत्रफळानुसार दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | आस्थापनाचे क्षेत्रफळ | दर |
|---|---|---|
| १. | २५० चौ. फुटापर्यंत | ३००/- |
| २. | २५१-५०० चौ. फुटापर्यंत | ६००/- |
| ३. | ५००-१००० चौ. फुटापर्यंत | १२००/- |
| ४. | १०००-२५०० चौ. फुटापर्यंत | २२००/- |
| ५. | २५००-५००० चौ. फुटापर्यंत | ४५००/- |
| ६. | ५०००-१०००० चौ. फुटापर्यंत | ९०००/- |
| ७. | १०००१-पुढे | १२०००/- |

तसेच यापूर्वी आपण ऑर्केस्ट्रा, बार अँड रेस्टॉरंट आणि लॉजिंग-बोर्डिंग यांचे दर जे निश्चित केले आहेत ते कायम ठेवण्यात यावेत.

वरीलप्रमाणे शहरातील विविध प्रकारच्या सर्व आस्थापनाधारकांकडून नविन परवाना व परवाना नुतनीकरणाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका परवाना शुल्क फेरबदल करुन घेणेच्या धोरणात्मक निर्णयास ही सभा मंजूरी देत आहे. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

भगवती शर्मा ह्यांनी जो ठराव मांडला आहे त्यांच्या बाजूने ३९ मत आहेत विरोधात २६ आहेत सन्मा. भगवती शर्मा ह्यांचा ठराव बहुमताने पास झालेला आहे.

**प्रकरण क्र. ९३ :-**

परवाना शुल्क फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. ९७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसास / उद्योग धंदे चालू असून या आस्थापनांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. परवाना शुल्क वसुली कामी अभिकर्ता न नेमता महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करावी.

परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजुर केलेले आहेत. इतर महानगरपालिकेच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना दर जास्त असल्याने व्यवसायधारक परवाना घेण्यास टाळाटाळ करत असतात. त्याकरीता यापूर्वी पारीत झालेल्या दरामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे क्षेत्रफळानुसार दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | आस्थापनाचे क्षेत्रफळ | दर (रु.) |
|---|---|---|
| १ | २५० चौ. फुटा पर्यंत | २५०/- |
| २ | २५१-५०० चौ. फुटा पर्यंत | ५००/- |
| ३ | ५०१-१००० चौ. फुटा पर्यंत | १०००/- |
| ४ | १००१-२५०० चौ. फुटा पर्यंत | २०००/- |
| ५ | २५०१-५००० चौ. फुटा पर्यंत | ४०००/- |
| ६ | ५००१-१०००० चौ. फुटा पर्यंत | ६०००/- |
| ७ | १०००१- चौ. फुटा पर्यंत | ८०००/- |

सुचना :-

अ) मोकळया खाजगी जागेत जे व्यवसाय करतात त्यासाठी रु.१०००/- प्रति वर्ष याप्रमाणे परवाना फी आकारण्यात यावी.

ब) निवासासह वाणिज्य वापर करत असल्यास वाणिज्य जागेच्या क्षेत्रफळानुसार परवाना फी आकारण्यात यावी.

क) ज्या व्यवसाय धारकांचे व्यवसायासह इतर ठिकाणी महानगरपालिका हद्दीत गोडाऊन असेल अशा व्यवसाय धारकांनी सदर व्यवसायास परवाना घेतेवेळी अर्जात नमुद केलेल्या गोडाऊनला परवाना फी आकारु नये.

ड) ह्यापूर्वी व्यवसायधारकांनी घेतलेल्या परवानाचे नुतनीकरण करताना वरील सुधारील दराने थकित रक्कम वसुली करावी.

वरील प्रमाणे महसुली उत्पन्नाच्या दृष्टीने कमीत कमी कागदपत्रे करारनामा/भाडे करारनामा, टॅक्स पावती, जागेचा पुरावा यापैकी कोणतेही कागदपत्र घेण्यात यावेत. शहरातील विविध सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांकडून नविन परवाना व परवाना नुतनीकरण एक वर्ष किंवा किमान तीन वर्षापर्यंत देण्यात यावा. वरील सुचनांसह परवाना शुल्क फेरबदल करुन घेण्याच्या धोरणात्मक निर्णयास ही सभा मंजुरी देत आहे.

**सूचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | नलावडे दिनेश दगडू | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | सुनिता कैलास पाटील | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | सपार उमा विश्वनाथ | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| ११ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | ११ | श्रीम. मुंजारी कांचन शेखर | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | मुंज वासुदेव भास्कर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | राजेंद्र भंवरलाल जैन | १३ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | शफीक अहमद सादत खान | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | प्रमोद जयराम सामंत | |
| १६ | चक्रे वंदना रामदास | १६ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १७ | माळी हेमा रविंद्र | १७ | विजया हेमचंद्र वैती | |
| १८ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १८ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | भट दिप्ती शेखर | |
| २० | टेरी पॉल परेरा | २० | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २१ | अनिल दिवाकर सावंत | |
| २२ | वर्षा गिरधर भानुशाली | २२ | शेख सलिम दाऊद | |
| २३ | राजु यशवंत भोईर | २३ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २४ | जाधव मोहन महादेव | २४ | पुरोहित मधुसूदन मनोहरलाल | |
| २५ | सिंह मदन उदितनारायण | २५ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २६ | म्हात्रे कल्पना महेश | २६ | मिलन वसंत म्हात्रे | |
| २७ | पाटील शरद केशव | | | |
| २८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | | |
| २९ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३२ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३३ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३४ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३५ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३६ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३७ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३९ | व्यास सुधा वासुदेव | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

*प्रकरण क्र. १४, शहर स्वच्छता आराखडा (C.S.P.)*

**प्रभात पाटील :-**

केंद्र शासनाचा राष्ट्रीय स्वच्छता धोरणा अंतर्गत महाराष्ट्रातील १९ महानगरपालिकांना शहर स्वच्छता आराखडा तयार करावयाचा आहे. त्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेचा समावेश आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने तयार केलेला **"शहर स्वच्छता प्रारुप आराखडा"** यापूर्वीच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्यामार्फत राज्य व केंद्र शासनास सादर केलेला आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार प्रारुप शहर स्वच्छता आराखड्यात योग्य ते बदल करुन **"सुधारीत शहर स्वच्छता आराखडा"** राज्य शासनास सादर करावयाचा आहे.

शहर स्वच्छता आराखड्यात खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

१) महापालिका क्षेत्रात उघड्यावर शौचास बसण्याची प्रथा बंद करणे.
२) मल निसारण व्यवस्था
३) पाणीपुरवठा व्यवस्था
४) घनकचरा व्यवस्थापन
५) पावसाळी पाण्याचा निचरा
६) पर्यावरण

महापालिकेच्या **"शहर स्वच्छता आराखडा"** एकूण रु. ५९५.९३ कोटीचा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहर स्वच्छता आराखड्यास दरवर्षी शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या दरवर्षीच्या हिस्स्याची रक्कम, अंदाजपत्रकात तरतुद करण्यास व **"सुधारीत शहर स्वच्छता आराखडा"** मा. महासभा आर्थिक प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**अनिल सावंत :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

*मा. आयुक्त साहेब, शहर स्वच्छता आराखड्याकरिता हा विषय आला होता. त्यावेळी आपल्या आरोग्य* खात्याकडून आम्हाला पत्र आले आहे की, आपली सुचना किंवा आपले काय म्हणण असेल तर सांगा तर त्यांनी एक पुस्तिका पाठवली होती. त्या पुस्तिकेमध्ये आपली दुरुस्ती सुचवून ते आम्हाला कळवणार त्या पद्धतीने मी सुचविलेले आहे. ती ह्या आराखड्यामध्ये मंजूर करताना ती सुचना घेतली की नाही त्याचा कुठे उल्लेख नाही ह्याबाबत अधिकाऱ्याने क्लेरिफिकेशन दिले तर बरे होईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मुद्दा क्र.१ शी निगडीत बोलतो. महापालिका क्षेत्रात उघड्यावर शौचास बसण्यास प्रथा बंद करणे. मा. आयुक्त साहेब, माझ्या माहितीनूसार गेल्या दोन तीन वर्षापासून आपल्या कॉर्पोरेशनचे जे सॅनिटरी इन्स्पेक्टर आहेत एस.आय. उघड्यावरती ज्या व्यक्ती शौचालयास बसायच्या त्यांना काहीतरी एक दोनशे रुपये दंड करायचे तर ह्यामध्ये महापालिका क्षेत्रात उघड्यावर शौचास बसण्यास प्रथा बंद करणे आणि त्यांना जो नियमानूसार त्यावेळेला जो दंड करायचे त्या दंडाचा आपण ह्याच्यात उल्लेख केलेला नाही त्याचा गोषवाऱ्यामध्ये बदल करा कारण त्यांना वैधानिक अधिकारच राहणार नाही हा ठराव पास होईल परंतु दंडाबद्दल एकही अवाक्षर नसणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, ते बायलॉज मध्ये आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यात घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महानगरपालिकेचा हिस्सा काय असणार त्याच्यामध्ये सुचना करा.

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना आहे. हा आपला ड्राफ्ट झाला. बंद करणार म्हणजे नेमके काय करणार. माझी एवढीच सुचना आहे की, दंड हा शब्द घालावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठीक आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, जो गोषवारा दिया है, उसमे फंड लिखा है। उसमे लाख करोड ऐसा कुछ लिखा नही है। आय.इ.सी. लिखा है। कूछ समझता नही है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

करोड में लिखा है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आय.इ.सी. लिखा है, उसमें क्या करने वाले है। उनकी जानकारी दो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इन्फॉरमेशन, एज्यूकेशन ॲन्ड कम्यूनिकेशन.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

क्या करनेवाले है, कैसे करनेवाले है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याचे बूक आहे ते देतो.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो फैसला करने का है वह हम लोग कैसे करेंगे। आप पहले छोटी बूक सबको दे दो। कूछ स्टडी नहीं आपने इतना बडा बूक दे दिया हम लोग सजेशन कैसे लेंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही *आम्हाला* पत्र पाठवले. १०-१२-१० ची आमची सुचना आपल्याकडे गेली. आपण सुचना घेतली नाही घेतली त्याचा उल्लेख टिप्पणीमध्ये नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुचना घेतली. हा फक्त प्रारुप आराखडा मोठा आहे. हा फक्त महानगरपालिकेचा काही हिस्सा ठेवण्यासाठी महासभेची मंजुरी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता तुम्ही नियमाप्रमाणे १० % हिस्सा बोलले तर किती रक्कम होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

६० कोटी होतील पाच वर्षासाठी ठेवायचे आहेत. म्हणजे वर्षाला १२ कोटी ठेवायचे आहेत. महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून १२ कोटी ठेवायचे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ६० कोटीची मंजुरी ह्या सभागृहात आमच्याकडून घेता आणि एका वर्षापूर्वी दिलेल्या पत्रात तुम्ही उल्लेख केला ७ दिवसात माहिती दया. आम्ही सात दिवसात तुम्हाला माहिती दिली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मोठा ड्राफ्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सर्व नगरसेवकाकडून एक ड्राफ्ट तयार करुन सगळयांच्या सहया घेतल्या होत्या. ते झाल्या नंतर एल.एस.जी.डी. कडून कमीटी आली होती. केळकर साहेब त्याच्यात होते. काही सुचना त्यावेळेला आम्ही केल्या. कम्पलायन्स रिपोर्ट कूठे आहे ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फायनल ड्राफ्ट शासनाकडे पाठवलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

फायनल नाही आम्हाला कच्चा ड्राफ्ट तरी दया.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

देतो साहेब.

**डॉ, राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहेब, आपने जो इतना बडा बूक दिया है, इसके पहले आपकी अगर प्रशासकीय कारवाई हुई होगी। आपने निर्णय लिया होगा उसका हर नगरसेवक को सर्क्यूलर जारी करे। उसकी जानकारी दो और बादमें यह प्रस्ताव महासभा मे लाओ।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

शासनने मुदत दिया है। शासनसे फंड मिलनेवाला है। मुदत देने का नही इसके लिए विषय लाया है।

**डॉ, राजेंद्र जैन :-**

मिलनेवाला है। हम लोग स्टडी नही किया तो हम काम कैसे करेंगे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

उस टाईम बताया था, सिटी सर्वेक्षण प्लान में उस टाईम मा. महापौर के अध्यक्षने मिटींग लिया था। आपको जानकारी देता हूँ।

**डॉ, राजेंद्र जैन :-**

प्रस्ताव को इस महासभा में छोड दिजिए। पूरा सर्क्यूलर जो आपने जारी किया है, वो जारी किजिए बाद में महासभा में लाओ।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब हे शासनाला अर्जंट पाठवायचे आहे. शासनाचे आपल्याला पैसे येणार आहेत. त्याच्यासाठी आपण अडवू शकत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आमच्याकडे हे बुकलेट पाठवले. आम्ही सर्व सही करुन तुम्हाला पाठवले. आज त्याच्यामध्ये काय निर्णय घेतला ते आम्हाला माहित पडायला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माहिती देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सात दिवसात तुम्ही मागवला. सात दिवसानंतर तुम्ही विचारात घेता की नाही. एवढा मोठा विषय महासभेमध्ये घेता तुमची सुचना घेतली आहे. तुमच्या प्रभागामध्ये तुम्ही सांगितले आहे की हया आराखडयामध्ये घेतले आहे. कूठे उल्लेख नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याची माहिती तुम्हाला देतो. हे फक्त महानगरपालिकेमध्ये आपला हिस्सा ठेवण्यासाठी हे आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब सिटी सेनिटेशन प्लान म्हणजे जे पूर्ण शहर आहे त्याची स्वच्छता, पाणी पुरवठा, साफसफाई, शौचालय ह्या सगळयाची व्यवस्था असली पाहिजे. असा सिटी सिनिटेशन प्लान आम्ही तयार केला आहे. हे आजच्या दिवशी फार बेसिक स्वरुपाचा प्लान आहे. त्याच्यात डिटेल्स अजून आम्ही घेतले नाही. आता शासनाकडे प्रारुप मंजुरीसाठी पाठवतो. तिथून मंजुरी मिळाली की आम्ही सांगितल आहे की हे पाच वर्षाचा प्लान आहे. म्हणजे हे दोन वर्षात संपणार

नाही. त्यासाठी वेळेवर काय गरज पडणार आहे त्याच्यात आपल्या सुचनेचा देखील समावेश करु म्हणजे हे शेवटच नसणार त्याच्यात पूढे सुध्दा काय चेंजेस असतील ते आम्ही करु. काही सुचना असतील तर त्यांचा आम्ही समावेश करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचे एवढेच म्हणणे होते की आम्हाला ह्याची माहिती तरी द्यायला पाहिजे होती, की तुमचे पत्र मिळाले आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही ह्याचे बुकलेट तयार केले आहे. ह्यासाठी कन्सल्टंट नेमले होते. जे आज इथे उपस्थित आहेत. ते आपल्याला दोन मिनिटात ह्याच्यात काय डिटेल्स आहेत ते सांगतील. ह्याच्यात पाच घटक आहेत.

**श्री. अजित कूडे :-**

मा. महापौर, मा. आयुक्त आणि सर्व सदस्य शहर स्वच्छता आराखडा जो आहे. केंद्र सरकारचे जे राष्ट्रीय स्वच्छता धोरण होते त्याच्या अनुषंगाने राज्य सरकारला १९ महापालिकेचा शहर स्वच्छता आराखडा तयार करण्याचे सांगण्यात आले होते. त्याच्यात आपल्या महापालिकेचा समावेश होता. महाराष्ट्रात ज्या १९ महापालिका आहेत. त्याच्यात मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा समावेश होता. आणि लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती होती. आणि गेल्या वर्षभर आपल काम चालू होते. आपण वॉर्ड लेवलवर आणि प्रभाग समिती लेवलवर आपल्या संपूर्ण शहराची माहिती एकत्रीत केली त्या माहितीचे विश्लेषण केले आणि त्या विश्लेषणानंतर आपण एक झिरो ड्राफ्ट किंवा प्रारुप आराखडा, दिल्लीला सादर केला. दिल्लीला तो सबमिट झाल्यानंतर राज्य शासनाच्या प्रिन्सीपल सेक्रेटरीकडे आपला फर्स्ट ड्राफ्ट सादर झाला आणि त्यांनी ज्या सुचना केल्या आहेत त्या सुचनांची सुधारीत आवृत्ती आपल्याला दोन पान देण्यात आली आहेत. ते ह्या संपूर्ण शहर स्वच्छता आराखडयाचा गोषवारा आहे. ह्याच्यामध्ये पाच महत्वाचे मुद्दे म्हणजे संपूर्ण शहर उघडयावर शौचास जाण्याची प्रथा बंद करणे, पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण, पावसाळी पाण्याचा निचरा असे पाच मुद्दे घेऊन आपण संपूर्ण शहराची माहिती गोळा करुन त्याच विश्लेषण केल आहे. आणि पूढील पाच वर्षात आपल्याला एकूण ५९५ कोटी एवढया निधीची आवश्यकता आहे. आणि आता जो आपण वित्तीय आकृतीबंध प्रस्तावित केला आहे. त्याच्यात १० % वाटा महापालिकेचा आहे. त्याच्यात ६० कोटी रुपये पुढील पाच वर्षात महापालिकेला उभे करायचे आहेत. म्हणजे दरवर्षी ती रक्कम १२ कोटी एवढी येते. असा हा प्रस्ताव आपल्याला प्रिन्सिपल सेक्रेटरी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन ह्याच्याकडे सादर करायचा आहे. परंतु तो सादर करण्यापूर्वी महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी हा प्रस्ताव आज इथे सादर करण्यात आलेला आहे. ह्या संपूर्ण शहर स्वच्छता आराखडयाचे आपण पुस्तक तयार केलेले आहे. ते अजूनही ड्राफ्ट स्टेजमध्ये आहे. ते फायनल झाले नाही. जेव्हा ह्याला राज्य सरकार मंजुरी देईल तेव्हा हे फायनल होईल आणि हे फायनल झाल्यानंतर ह्याच्या प्रति आपण सगळयांना देणार आहोत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, त्यांनी ह्या ठिकाणी चांगली माहिती दिलेली आहे. परंतु जेव्हा शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली तेव्हा सन्मा. सदस्यांनी ज्या-ज्या सुचना केल्या आहेत त्या सर्व सुचनांचा ह्याच्यात समावेश करा. एवढेच आमच म्हणणे आहे, आपण जे आम्हाला पाठवले आहे प्रत्येक वॉर्डमध्ये काय-काय उपाययोजना करायची आहे तुम्ही सजेशन द्या, आम्ही सजेशन दिल्यानंतर त्याच उत्तरही आम्हाला प्रशासनाकडून मिळाले नाही म्हणून सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली,

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब त्या ड्राफ्टला मान्यतेची आवश्यकता नाही का ?

**मा. आयुक्त :-**

एक धोरणात्मक निर्णय पाहिजे की आम्ही १० % साठी तयार आहोत किंवा नाही. जो ५९५ कोटीचा ड्राफ्ट तयार केला आहे त्याचात जो १० % आपला वाटा आहे. त्यासाठी आपली तयारी आहे किंवा नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तो एक भाग झाला परंतु हा जो मुळ आराखडा तयार केला आहे.

**मा. आयुक्त :-**

आराखडयामध्ये अजून डिटेल माहिती घेतलेली नाही. ह्याच्यामध्ये मोठा घटक आहे पाणी पूरवठयाचा. आमची सूर्या धरणाची योजना आहे त्याचा हिस्सा ह्याच्यामध्ये समाविष्ठ आहे. तसेच स्टॉम वॉटर ड्रेनेज ती सुध्दा ह्याच्यामध्ये समाविष्ठ आहे. हे सगळ मिळून ५९५ कोटी झालेले आहेत,

**नरेंद्र मेहता :-**

मी रक्कम बद्दल बोलत नाही. जो तुम्ही ड्राफ्ट तयार केलेला आहे. त्याला मान्यता......

**मा. आयुक्त :-**

मान्यतेसाठीच पूटअप केलेल आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तो ड्राफ्ट भेटलाच नाही ना.

**मा. आयुक्त :-**

प्रारुप ड्राफ्ट आहे.

**नरेंद्र मेहता :-**

प्रारुप असू द्या. माझे म्हणणे एवढेच आहे की, ड्राफ्टला मान्यतेची आवश्यकता नसेल तर तुम्ही तुमच्या स्तरावर त्याला मान्य करा आणि पाठवा. एखाद्या बॉडीची मान्यता तुम्ही दिलच नाही तर मान्य काय करायच. आता जी मान्यता दिली ती आर्थिक, प्रशासकीय जे काय लागणार आहे त्याला दिली परंतु जो मुळ ड्राफ्ट तयार केलेला आहे त्याला बॉडीच्या मान्यतेची आवश्यकता वाटत नाही का?

**अजित कुडे :-**

साहेब ड्राफ्टमध्ये जी आकडेवारी किंवा जी माहिती दिली आहे. त्या माहितीचाच गोषवारा म्हणजे आपल्याकडे जी दोन पान आली आहेत त्या दोन पानामध्ये हा संपूर्ण आराखडा समाविष्ठ करण्याचा प्रयत्न केला आहे की तो वाचण्यासाठी आणि समजण्यासाठी सुटसुटीत व्हावा. पहिल्या पानावर लिहील आहे ओ.डी.एम. आणि इथे लिहील आहे साल २०१२-१३ तर ओपन डेफिनेशन फ्री करण्यासाठी साल २०१२-१३ मध्ये काय-काय ॲक्टिव्हीटीज करणार ? तर आय.ए.सी करणार, गूड मॉर्निंग स्कॉड करणार आणि एन.जी.ओ. आणि सी.बी.ओ ची मदत घेऊन नविन टॉयलेट बांधणार. त्याला एकूण किती खर्च येणार त्याची आकडेवारी दिली आहे. त्याला चार कोटी खर्च येणार अस प्रत्येकी एलिमेन्टचे इयरवाईज ब्रेकअप दिले आहे आणि ही सगळी टोटल ५९५ कशी होते ते दिल. ह्या सगळयाचे बॅक कॅल्क्यूलेशन आहे ते ह्या ड्राफ्टमध्ये आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परंतु त्याच्यामध्ये आमच्या नगरसेवकांनी ज्या सुचना दिल्या आहेत त्याचा समावेश कूठे आहे. आता तुम्ही इकडे सी.बी.ओ. बोलता एन.जी.ओ. बोलता पण लोकप्रतिनिधी कूठेच बोलत नाही.

**अजित कूडे :-**

साहेब आपण त्यांची मदत ........

**मिलन म्हात्रे :-**

मदत नाही. आम्ही तुम्हाला मदत नाही करणार. सुचना पाहिजे. माझ्याकडे एखादी चांगली घनकचरा व्यवस्थापन कायद्या अंतर्गत ..........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हे फक्त आकड्याचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पानपट्टे साहेब, त्यांनी सांगितल की ह्याच्यात दिले आहे. २०१२ मध्ये मी केलेली सुचना आहे. माझे एकटयाचे नाव सोडा. संपूर्ण नगरसेवकाकडून आणि लोकप्रतिनिधीकडून आलेल्या सुचना एक तरी आहे का दाखवा. तुम्ही तर एकीकडे एन.जी.ओ. बोलता एकीकडे सी.बी.ओ. बोलता तर आमच्या नगरसेवकांचा काय अधिकार नाही. माझ्या वॉर्डमध्ये काय करायच ते बाहेरची संस्था येऊन ठरवणार आणि ते तुम्ही ऐकणार? आम्ही पाच पाच वर्ष इकडे काय करतो. मी बोलतो त्या मुदयावर बोला. एखाद्या बाहेरच्या संस्थेने सांगायचं का की, मिलन म्हात्रेच्या वॉर्डमध्ये काय पाहिजे मी ११ वर्षे तिकडचा कॉर्पोरेटर आहे, तुमच्या प्रत्येक कार्यामध्ये आम्ही मदत करतो. सुचना दिलेल्या आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो ना साहेब, ह्यापूर्वी बैठक झाली कार्यविवरणाची अंमलबजावणी गटाची बैठक झाली, या संदर्भात सर्व गटनेत्याची बैठक झाली. त्या सुचना आमच्याकडे आहेत. हे फक्त पैसे मंजूरीसाठी आहे ते आल्यानंतर तुमच्या सुचना घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

हा ड्राफ्ट बनवता लोकप्रतिनिधीच्या सुचनावर होणारा खर्च तो आहे का? साहेब, आम्ही बजेट बनवले आहे.

**डॉ, राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहेब, आपका चार साल मे पहला टर्म है। सफाई के लिए ऑफ अँन्ड लोड गंदगी, प्लास्टिक थैलीचा, फिलींग्ज, रोड साईड कचरा अभी इंडस्ट्री पे बोला यह सब बाते सिटी सर्व्हेक्षणों मे आ गयी। हमारी जो शिकायते थी आपको बजेट का फंड आ गया आपने तयार भी किया आप हमसे छुपाके क्यो करते हो हमको बताओ। हमारा सजेशन ले लो आपका खर्चा पांच करोड हो सकता है उसमे सात करोड हो उसपे डिस्कशन करना चाहीए।

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आणखी एक सुचना आहे. आपल्या शहराला भौगोलिक रित्या बाजूला डोंगर आहेत. भविष्यात जर तुम्हाला एखादे धरण किंवा एखादा पाझर तलाव काही बनवायचे झाले, एखाद्या नगरसेवकांनी दिलं आमच्या मॅडम आहेत सन्मा. ज्योत्स्ना हसनाळे त्यांचा तुम्ही ह्याच्यात उल्लेखच केला नाही. परिपूर्ण ड्राफ्ट करा आणि घेऊन या.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ह्या ड्राफ्टमध्ये मॅन्युअल डिटेल्स नाहीत ह्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात किती पैसे लागणार ते आहे. २०१२-१३ मध्ये गुडमॉर्निंग स्कॉडला एक कोटी दिले आहेत असा उल्लेख आहे. त्यांच्यात काय काम ॲक्टीविटी

करायच्या त्याचा उल्लेख नाही ते आम्ही मंजूर झाल्यावर करणार आहोत. तेव्हा आपली सुचना असेल तर आम्ही घेऊ. त्या सुचनांचा समावेश करु.

**मा. महापौर :-**

हा ठराव सुचनेसह घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. ९४ :-**

शहर स्वच्छता आराखडा (C.S.P.)

**ठराव क्र. ९८ :-**

केंद्र शासनाचा राष्ट्रीय स्वच्छता धोरणा अंतर्गत महाराष्ट्रातील १९ महानगरपालिकांना शहर स्वच्छता आराखडा तयार करावयाचा आहे. त्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेचा समावेश आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने तयार केलेला **"शहर स्वच्छता प्रारुप आराखडा"** यापूर्वीच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्यामार्फत राज्य व केंद्र शासनास सादर केलेला आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार प्रारुप शहर स्वच्छता आराखड्यात योग्य ते बदल करुन **"सुधारीत शहर स्वच्छता आराखडा"** राज्य शासनास सादर करावयाचा आहे.

शहर स्वच्छता आराखड्यात खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

१) महापालिका क्षेत्रात उघड्यावर शौचास बसण्याची प्रथा बंद करणे.
२) मल:निसारण व्यवस्था
३) पाणीपुरवठा व्यवस्था
४) घनकचरा व्यवस्थापन
५) पावसाळी पाण्याचा निचरा
६) पर्यावरण

महापालिकेच्या **"शहर स्वच्छता आराखडा"** एकूण रु. ५९५.९३ कोटीचा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहर स्वच्छता आराखड्यास दरवर्षी शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या दरवर्षीच्या हिस्स्याची रक्कम, अंदाजपत्रकात तरतुद करण्यास व **"सुधारीत शहर स्वच्छता आराखडा"** मा. महासभा आर्थिक, प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.९५, "घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ९५ :-**

"घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. ९९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या

उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, "सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणेबाबतचे उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणेबाबतचे उपविधी २०१०" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केली असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ९६ :-**

"सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणेबाबतचे उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणेबाबतचे उपविधी २०१०" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केली असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९७, "फेरीवाला परवाना व बैठक परवानगी उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "फेरीवाला परवाना व बैठक परवानगी उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ९७ :-**

"फेरीवाला परवाना व बैठक परवानगी उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "फेरीवाला परवाना व बैठक परवानगी उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९८, "जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ९८ :-**

"जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१०" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन उपविधी २०१०" तयार करण्यात आली आहे. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतीसाठी प्रसिध्द केले असता सदर उपविधीबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११ व कारखान्यांचे नियमन नियम २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी व नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने सदर उपविधी व नियमांमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११ व कारखान्यांचे नियमन नियम २०११" या मसुद्यांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन सदरची उपविधी व नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ९९ :-**

"अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११ व कारखान्यांचे नियमन नियम २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी व नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने सदर उपविधी व नियमांमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी "अधिनियमाच्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी जागा वापरणे उपविधी २०११ व कारखान्यांचे नियमन नियम २०११" या मसुद्यांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन सदरची उपविधी व नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १००, "महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे विनियम २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "महानगरपालिकेच्या जागेतुन काढुन टाकणे विनिमय २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर नियमांबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर नियमांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १०० :-**

"महानगरपालिकेच्या जागेतून काढून टाकणे विनियम २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "महानगरपालिकेच्या जागेतुन काढुन टाकणे विनिमय २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर नियमांबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर नियमांस हि सभा

अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१, "कुत्र्यांवरील कर विषयक प्रारुप नियम उपविधी २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "कुत्र्यांवरील कर विषयक नियम २०११" तयार करण्यात आले आहेत सदर नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर नियमांबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर नियमांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन सदरचे नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मदन उदित नारायण सिंह :-**

गोषवाऱ्यात,तुम्ही दिलेलं आहे की, वार्षिक १२०० रुपये आपल्या महासभेत ठरले होते की, वार्षिक १०० रु. ते चुकीचे टाईप झालेले आहे. १०० रु. ऐवजी १२०० रु. झाले आहे त्याला १०० करा. प्रोसिडींग काढा वार्षिक १०० रुपये ठरले होते. मा. आयुक्त साहेब, इसमे कोई फायदा नही कमा रहा है। सुधारणा होईल का?

**अनिल सावंत :-**

नाही होणार आता.

**मदन उदित नारायण सिंह :-**

यह कोई धंदा नही है। इसमे कुछ फायदा नही है।

**संभाजी पानपट्टे (मां. उपायुक्त) :-**

मागच्या प्रोसिडींग बघतो.

**मदन उदित नारायण सिंह :-**

तोपर्यंत विषय पेंडींग ठेवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पेंडींग कशाला ठेवायचा १२०० असेल तर पाठवतो.

(सभागृहात गोंधळ)

**मदन उदित नारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, मुंबई महानगरपालिकेका साल का १०० रुपया है। घर का टॅक्स १२०० रुपये नही आता है।

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, जो कुंत्रा पाळतो त्याला महिन्याचा ५,००० रुपये खर्च असतो मग तो पालिकेला १०० रुपये भरु शकत नाही का?

**मदन उदित नारायण सिंह :-**

भरु शकत नाही. कुत्ते को पालना एक सेवा है कोई बिजनेस नही है।

**जुबेर इनामदार :-**

हा उपविधीचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

सर्व उपविधी मंजूर करण्यात येत आहे.

**मदन उदित नारायण सिंह :-**

दादा, मुंबई महानगरपालिकेत वार्षिक १०० रुपये आहेत.

**जुबेर इनामदार :-**

शहरामध्ये तरण तलाव नको कुत्र्याचे पैसे कमी करायला निघाले आहेत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

१०० रुपये महिने का डिसाईड किया था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बरोबर आहे.

**मदन उदित नारायण सिंह :-**

१०० वार्षिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

उपविधीला ठराव होऊ शकतो का? शासनाकडे पाठविण्याकरीता अंतिम मंजूरी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही परत मागवतो. आम्हाला अजून वाचायचं आहे. १२०० रुपये कोण भरेल का?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, १०० रुपये कशाला घेता. पाळीव प्राण्यावर दया करा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या शहरामध्ये किती लोकांनी कुत्रे पाळले आहेत त्याचा रेकॉर्ड आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सर्व्हे करुन करणार.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सर्व्हे करणार केलेला नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुमच्या शहरामध्ये काही लोकांकडे पाळीव कुत्रे नाहीत तर तुमच्या बजेटवर खुप मोठा परिणाम होई अशातला भाग नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नाही होणार.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

दुसरी गोष्ट अशी की, जी लोक कुत्रे पाळतात ते संरक्षणासाठी पाळतात. घराच्या संरक्षणासाठी पाळता त्याच्यात जर अवाढव्य रेट लावला तर कुत्रे कसे पाळतील. सन्मा. अनिल सावंत म्हणतात की त्यांना ५,००० रुप खर्च येतो. ते काय मटन खातात का? ते डाळभात खात नाहीत. सभागृह नेत्याकडे कुत्रे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

उपमहापौर साहेब, आपल्याला माहित आहे की, इथे फक्त विरोध करायचा म्हणून ते करतात.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण कुत्र्यांना निर्बिजिकरणाचे इंजेक्शन द्यायला प्रचंड खर्च केला आहे, तर ते ही सक्सेस झालेले नाही.

**शरद पाटील :-**

पानपट्टे साहेब, आपण मोकाट कुत्र्यावर एवढा खर्च करतो आणि आम्ही जे पाळतो त्याच्यासाठी तुम्ही एव पैसे घेता.

**प्रभात पाटील :-**

हा मुद्दा अतिशय गंभीर आहे. जे कुत्रे शहरामध्ये मोकाट फिरतात. रस्त्यावर कचरा करतात. रोगर पसरवतात लोकांना चावतात त्याच्या नसबंदीवर आपण खर्च करतो त्याच्यासाठी स्पेशल दवाखाना काढला आहे. त्यां आपण फुकट पोसतो आणि जे घरी कुत्रे पाळतात त्यांचा खर्च ते करतात त्यांना आपण हा दर लावलेला आहे.

**आसिफ शेख :-**

सर्व सभागृहाची भावना तिव्र झाली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मा. उपमहापौरांनी खुप चांगली सुचना केली. मेनका गांधीचा आदर्श ठेवा आणि जे घरी कुत्रे पाळतात त्यां अनुदान द्या,

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, हे जे उपविधी आहेत ते आपण शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठवणार शासनाकडू मंजूरी आल्यानंतर उपविधी लागु होणार की महासभेनंतर उपविधी लागु होणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सर्व उपविधी शासनाकडुन मंजूर झाल्यानंतर इम्प्लीमेंट करणार १५८ नूसार अनुवाहित केलेले कोणतीः उपविधी जोपर्यंत शासन राज्यशासन कायम करणार नाही तोपर्यंत कायदेशीर असणार नाही शासन मंजूर झाल्यानंतर

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०१ :-**

"कुत्र्यांवरील कर विषयक प्रारुप नियम उपविधी २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "कुत्र्यांवरील कर विषयक नियम २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर नियम दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द केले असता सदर नियमांबाबत कोणत्याही हरकती अथवा सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर नियमांस हि सभा अंतिम मंजुरी देत असुन सदरचे नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२, "मिरा भाईंदर महानगरपालिका (परवानाधारक सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, रचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपीक व नळ कारागीर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे) या संबंधी उपविधी २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "मिरा-भाईंदर महानगरपालिका परवानाधारक सर्वेक्षक, वास्तु शास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, संरचना संकल्प-चित्रकार, बांधकाम लिपिक व नळकारागिर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे या संबंधी उपविधी २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदर उपविधीमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**मा. महापौर :-**

मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र.१०२ :-**

"मिरा भाईंदर महानगरपालिका (परवानाधारक सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, रचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपीक व नळ कारागीर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे) या संबंधी उपविधी २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने "मिरा-भाईंदर महानगरपालिका परवानाधारक सर्वेक्षक, वास्तु शास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता, संरचना संकल्प-चित्रकार, बांधकाम लिपिक व नळकारागिर यांची अर्हता व अनुभव निश्चित करणे व परवाना देणे या संबंधी उपविधी २०११" तयार करण्यात आले आहेत. सदर उपविधी दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदर उपविधीमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी सदरच्या उपविधी मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०३, दहिसर चेकनाका येथे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत मुख्य हायवेवर अतिरिक्त कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतलगत मुंबई महानगरपालिका हद्दीत असलेल्या कल्वर्ट मधून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून पाणी येऊन सृष्टी जाफरी खाडीत जातो. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून महाविष्णू मंदीर जवळील नाल्यात येणारे पाणी दहीसर चेकनाका येथील नाल्यात वळविल्यास पंजाब फाऊंडी, मिरागाव येथील नाल्यावरचा ताण कमी होईल. तथापी हायवेवर दहीसर चेकनाका येथील कल्वर्ट शेजारी अतिरिक्त कल्वर्ट बांधावे लागेल. सदर कल्वर्ट बांधण्याकरिता रु. ८२,१३,९५०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कल्वर्ट बांधण्यास मुंबई महानगरपालिकेची परवानगी मिळालेली आहे. सदर कल्वर्ट मधून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून येणारे पावसाचे पाणी वाहून राजू इंडस्ट्रीयल इस्टेटच्या नाल्यातून पुढे जाफरीकडे जाऊन मिळतो. सदर खर्चाकरीता तरतूद उपलब्ध असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**राजेश म्हात्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, हा जो आपण नाला बांधतो साधारण एक करोडची किंमत आहे. मुंबई महापालिकेकडून त्याच आर्थिक परवानगी घेतली आहे का? आपण मुंबईच्या हद्दीत नाला बांधतो आणि त्याची परवानगी आहे का? दुसरे म्हणजे ती जागा माझ्या माहितीप्रमाणे जो हायवे आहे तो एमएमआरडी कडे आहे. देखभाल दुरुस्ती त्यांच्याकडुन होते आणि आपलं मिरा भाईंदर एमएमआरडीए मध्ये येते. ही मागणी आपण त्याच्याकडे केली असती तर पूर्ण झाली नसती का? आपले करोडो रुपये वाचले असते कारण एमएमआरडीए चा भाग आहे त्यांनाच वाचले असते कारण एमएमआरडीए चा भाग आहे त्यांनाच करायचा आहे. मिरा भाईंदर शहर एम.एम.आर.डी.चा भाग आहे. मुंबईच्या हद्दीत मिरा भाईंदर चे महानगरपालिकेचे पैसे खर्च करता येतील का? ह्याचा खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. १०३ :-**

दहिसर चेकनाका येथे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत मुख्य हायवेवर अतिरिक्त कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतलगत मुंबई महानगरपालिका हद्दीत असलेल्या कल्वर्ट मधून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून पाणी येऊन सृष्टी जाफरी खाडीत जातो. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून महाविष्णू मंदीर जवळील नाल्यात येणारे पाणी दहीसर चेकनाका येथील नाल्यात वळविल्यास पंजाब फाऊंडी, मिरागाव येथील नाल्यावरचा ताण कमी होईल. तथापी हायवेवर दहीसर चेकनाका येथील कल्वर्ट शेजारी अतिरिक्त कल्वर्ट बांधावे लागेल. सदर कल्वर्ट बांधण्याकरिता रु. ८२,१३,९५०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कल्वर्ट बांधण्यास मुंबई महानगरपालिकेची परवानगी मिळालेली आहे. सदर कल्वर्ट मधून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून येणारे पावसाचे पाणी वाहून राजू इंडस्ट्रीयल इस्टेटच्या नाल्यातून पुढे जाफरीकडे जाऊन मिळतो. सदर खर्चाकरीता तरतूद उपलब्ध असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. राजेश म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०४, छत्रपती शिवाजी महाराज महामार्गावर पंजाब फाऊंड्री (झंकार कंपनी) येथे वाढीव कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महनगरपालिका हद्दीतील मिरागावठण, महाजनवाडी या भागातून पावसाचे पाणी कच्च्या नाल्यामार्फत रा.म.क्र. ०८ येथून मुंशी कंपाऊंड कृष्णस्थळ मार्गे काशिमिरा रोडवरील झंकार उघाडी येथून पुढे खाडीकडे वाहते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, डोंगराळ भागातील पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात मुंशी कंपाऊंड व कृष्णस्थळ येथील सखल भागात साचून दरवर्षी येथे नागरीकांना पुरजन्य परिस्थीती व मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. या भागातील मोकळ्या जागेत मातीभराव झालेला असून कच्चे नाले कमी रुंदीचे आहेत. सदर ठिकाणी पावसाळ्यात साचणारे पावसाचे पाणी सहज निचरा होणे करिता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाऊंड्री

येथील कल्वर्टची कमी असलेली क्षमता वाढवणे आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी अतिरिक्त कल्वर्ट बांधणे आवश्यक आहे.

वरील कामाकरीता रु. ७३,२५,३००/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर अंदाजपत्रकात प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सलिम शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदर महनगरपालिका हद्दीतील मिरागावठण, महाजनवाडी या भागातून पावसाचे पाणी कच्च्या नाल्यामार्फत रा.म.क्र. ०८ येथून मुंशी कंपाऊंड कृष्णस्थळ मार्गे काशिमिरा रोडवरील झंकार उघाडी येथून पुढे खाडीकडे वाहते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, डोंगराळ भागातील पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात मुंशी कंपाऊंड व कृष्णस्थळ येथील सखल भागात साचून दरवर्षी येथे नागरीकांना पुरजन्य परिस्थीती व मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. या भागातील मोकळ्या जागेत मातीभराव झालेला असून कच्चे नाले कमी रुंदीचे आहेत. सदर ठिकाणी पावसाळ्यात साचणारे पावसाचे पाणी सहज निचरा होणे करिता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाऊंड्री येथील कल्वर्टची कमी असलेली क्षमता वाढवणे आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी अतिरिक्त कल्वर्ट बांधणे आवश्यक आहे.

वरील कामाकरीता रु. ७३,२५,३००/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर अंदाजपत्रकात प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**वंदना चक्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, मागच्या प्रश्नाचं उत्तर आपण दिलेले नाही ह्या प्रश्नाचं तरी उत्तर द्यावे. मा. महापौर साहेब, हा जो नाला आणलेला आहे तो प्रशासना तर्फे आणलेला आहे की, मा. महापौरांतर्फे आणलेला आहे. दोन महिन्याअगोदर हाच विषय महापालिकेत आला होता त्यावेळी आपण सर्वांनी त्याला विरोध केला.

**मा. महापौर :-**

कुठला विषय

**नरेंद्र मेहता :-**

हाच विषय हा विषय महासभेत तिसऱ्यांदा येतो पहिल्यांदा आम्ही जेव्हा आणला होता तेव्हा आपण एक ठराव पारित केला. दिपक खांबित ह्यांना निलंबीत करावं त्यानंतर सन्मा. प्रशांत पालांडे ह्यांनी हा विषय दुसऱ्यांदा आणला त्यावेळी आपण विरोध केला आता नक्की काय करायचे काय दाखवायचे शहराला.....

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. प्रशांत पालांडेनी "ज" चा प्रस्ताव आणला होता.

**प्रभात पाटील :-**

प्रशासनाचा विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचं असं मत आहे का की, प्रशासन जे बोलते ते बरोबर आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्हाला तो कल्वर्ट बांधायचा नाही का?

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला बांधायचा आहे.

**अनिल सावंत :-**

तुमचा कल्वर्टला विरोध नाही ना?

**शरद पाटील :-**

चोर आणि वर शिरजोर तुम्ही हा विषय दोनदा फेटाळला.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. प्रशांत पालांडेनी आणलेला "ज" चा प्रस्ताव होता. त्याला आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी देता आली नसती.

**शरद पाटील :-**

दिपक खांबितना तुम्ही निलंबीत करणार होते ना?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आता प्रशासनाकडून रितसर विषय आलेला आहे. आपले धोरण ठरवले का ?

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला धोरण चांगले माहित आहे आणि कायदेही चांगले माहित आहे. आम्हाला सांगायची आवश्यकता नाही. आम्हाला फक्त एवढच बघायचे आहे की, ह्या नाल्याचा विषय आणताना काँग्रेसने आज कोणत्या अधिकाऱ्यास बलिदान दिल ते फक्त वाचून दाखवा. सचिव साहेब कुठल्या अधिकाऱ्याला निलंबीत केले. ज्या दिवशी आम्ही विषय आणला त्यावेळेला तुम्ही अधिकाऱ्याला निलंबित केलेले हा विषय वेगळा आहे. खांबित साहेब तुमच्याकडे दीड करोडची तरतुद आहे का ?

**दिपक खांबित :-**

आहे. तरततुद शिल्लक तरतुदीमध्ये सगळे विषय दिले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, काँग्रेस पक्षानी जो ठराव मांडला आहे त्याच्यात कुठल्या अधिकाऱ्याला निलंबीत केल ते सांगा.

**अनिल सावंत :-**

निलंबीत कशाला करायचे आहे?

**मा. महापौर :-**

कोणाला निलंबीत केले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आमचा ठराव मान्य करा.

**जुबेर इनामदार :-**

दोन्ही ठराव आहेत दोन्ही मान्य आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

एकच ठराव होणार. सुचक मी आहे अनुमोदन हे आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

प्रशांत पालांडेनी जो ठराव मांडला आहे तो मान्य करा त्यांची सुचना त्या ठरावात समाविष्ठ करा. आमची हरकत नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, सभागृह नेत्यांनी ठराव मांडलेला आहे. आर्थिक प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. जो ठराव ग्राह्य मानण्यात येईल त्यांच्या विरोधात ठराव मांडायला सांगा आणि मग मतदान घ्या. सेम ठरावावर मतदान होणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

दोन ठराव आलेले आहेत. तुम्ही मतदान घ्या किंवा प्रशांत पालांडेनी जो ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये त्यांचा समावेश केला तर आमची हरकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आमचा ठराव मान्य करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब पहिला ठराव कोणी मांडला. सभागृह नेत्यांनी पहिला ठराव मांडलेला आहे. दोन्ही ठराव सारखे आहेत. विरोधात ठराव करायचा असेल तर ठराव मतदानाला जाईल. एक सारख्या विषयाचा ठराव कसा करता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांची सुचना असेल तर घ्या नाहीतर मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

दोन्ही ठराव सेम आहेत.

**वंदना चक्रे :-**

अनुमोदन मी देणार. माझ्या वॉर्डाचा मोठा प्रश्न आहे. जास्त पाणी माझ्या वॉर्डात भरते. सन्मा. प्रशांत पालांडेनी दिल मी अनुमोदन दिल जर सन्मा. प्रभाताई पाटील देत असतील तर अनुमोदन मी देते. नाहीतर मी होऊ देणार नाही.

**आसिफ शेख :-**

नियमाप्रमाणे मतदान घ्या विषय संपवा.

**नगरसचिव :-**

प्रकरण १०४ करीता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील अनुमोदन सन्मा. सलिम शेख, दुसरा ठराव सुचक सन्मा. प्रशांत पालांडे अनुमोदन सन्मा. वंदना चक्रे अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सन्मा. प्रशांत पालांडे ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, समान ठराव असल्यावर मतदान होते का ?

**चंद्रकांत मोदी :-**

मतदान कायदे में बैठता हैं क्या?

**प्रभात पाटील :-**

सचिव साहेब, दोन ठराव आलेले आहेत. दोन्ही ठराव सेम आहेत. मा. महापौरांनी ठराव मंजुर केलेला आहे. त्याचे रेकॉर्ड झाले आहे. ह्यापुढे जर ह्याच्यामध्यें काय कायदेशीर अडचण निर्माण झाली तर सचिव म्हणून तुम्हाला जबाबदार धरण्यात येईल.

**नगरसचिव :-**

सभागृहाचा निर्णय अंतिम राहील. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

हा ठराव सर्व मताने मंजुर करण्यात आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव कोणाचा घेतला.

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत पालांडे यांचा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रभात पाटील :-**

आम्ही आमच्या मनाचा मोठेपणा दाखवला.

**प्रकरण क्र. १०४**

छत्रपती शिवाजी महाराज महामार्गावर पंजाब फाऊंड्री (झंकार कंपनी) येथे वाढीव कल्वर्ट बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १०८ :-**

मिरा भाईंदर महनगरपालिका हद्दीतील मिरागावठण, महाजनवाडी या भागातून पावसाचे पाणी कच्च्या नाल्यामार्फत रा.म.क्र. ०८ येथून मुंशी कंपाऊंड कृष्णस्थळ मार्गे काशिमिरा रोडवरील झंकार उघाडी येथून पुढे खाडीकडे वाहते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, डोंगराळ भागातील पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात मुंशी कंपाऊंड व कृष्णस्थळ येथील सखल भागात साचून दरवर्षी येथे नागरीकांना पुरजन्य परिस्थीती व मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. या भागातील मोकळ्या जागेत मातीभराव झालेला असून कच्चे नाले कमी रुंदीचे आहेत. सदर ठिकाणी पावसाळ्यात साचणारे पावसाचे पाणी सहज निचरा होणे करिता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाऊंड्री येथील कल्वर्टची कमी असलेली क्षमता वाढवणे आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी अतिरिक्त कल्वर्ट बांधणे आवश्यक आहे.

वरील कामाकरीता रु. ७३,२५,३००/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर अंदाजपत्रकांत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत पालांडे** **अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०५, सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचे दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. – मिरा भाईंदर महानगरपालिकेतील भरत्या प्रकरणे दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत.

**मा, महापौर :-**

१०५ प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे ते घेता येत नाही,

**नरेंद्र मेहता :-**

तो टाऊन पार्कचा विषय होता. धनेगावे साहेबांनी स्पष्ट भाषेत उल्लेख केलेला आहे की, कुठलाही स्थगितीचा आदेश नाही. कुठल्याही प्रकारचे कन्टेन्ट त्यात होत नाही. आजचा विषय जरा समजून घ्या. जे न्यायप्रविष्ठ आहे त्याच्यात मा. आयुक्तांनी १८ लोकांना नोटिस दिले आहे. किंवा त्या लोकांना कामावरुन काढण्यात आले त्या लोकाबद्दल बोलत नाही. कारण तो माझा विषयच नाही. जो कोर्टाचा निर्णय होईल तो आम्हाला मान्य आहे. कोर्टाचा आम्ही सन्मान करतो. आता त्याबद्दल बोलत नाही, म्हणून न्यायप्रविष्ठाचा संबध राहीला नाही. माझा असा विषय आहे की, ज्या अधिकाऱ्याने एवढी मोठी चूक केली आणि मा. आयुक्त त्याची शहानिशा करतात ज्यावेळेला एक एक चूक आपल्याला सापडते, ज्या वेळेला सभागृहाकडे तो विषय आला. आणि सभागृहाची दिशाभूल त्याच्याकडून मंजुर करुन घेतले आहे, त्यामध्ये त्या अधिकाऱ्याने आपल्याला देखील दोषी ठरवलं आहे. तर कुठल्या प्रकारे ती बेकायदेशीर

नेमणूक केली. मा. आयुक्तांनी जी माहिती घेतली त्याच्यात बरीच बोगस कागदपत्र सापडले. ज्यावेळी सभा चालू होती त्यावेळी आम्ही बोललो की ह्यामध्ये सर्व बोगस आहे. सन्मा. शानू गोहील आणि सन्मा. प्रेमनाथ पाटील होते त्यांनी सांगितल की पटना जिंदाबाद. पटना युनिर्व्हसिटीने महापालिकेत त्या केसमध्ये एफिडेव्हीट दाखल केले. हे सगळे कागदपत्र बोगस आहेत. माझा विषय असा आहे की, ज्या अधिकाऱ्याने महासभेची फसवणूक करुन आपल्याकडून मान्य करुन घेतले आणि आता आपल्याला कोर्टात धावायला लागते. चूका त्यांनी करायच्या आणि भोगायचे आम्ही मा. आयुक्तांनी १८ लोकांना नोटीस दिली आहे. उपमहापौर साहेब ह्या नोटीसा आपण फक्त बोगस कागदपत्र सबमिट केले त्यांना काढले. ज्यावेळेला इन्टरव्ह्यू झाला त्यावेळेला ह्याच्यापेक्षाही सक्षम उमेदवार आपल्याकडे आले होते. त्यांना कुठल्याही प्रकारचा न्याय मिळाला नाही. ज्या अधिकाऱ्याने आपल्यासमोर मांडले त्यांची आपण कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता त्यांना आपण मान्य केले. त्या जेवढ्या भरत्या झाल्या आहेत त्या एकदम ट्रान्सफरन्सी रित्या झाल्या नाहीत. मा. आयुक्ताकडे कदाचीत ही पूर्ण माहिती नसणार त्यासाठी मी ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हा जो विषय आहे हा, माझ्या जनहित याचिकेमुळे ९६ पोस्ट मंजुर झाल्या, गर्व्हमेंट सहा वर्ष करत नव्हती. त्यानंतर त्या मंजुर होऊन आल्या. मा. आयुक्त साहेब तुम्हाला त्याच्या पूर्वीची पार्श्वभूमी माहित नसेल. ज्या ज्या वेळेला इन्टरव्ह्यू झाले तुम्ही ते कॉल ऑल ओव्हर महाराष्ट्रातन मागवले त्याचे जं लिफाफे आले त्या लिफाफ्याचे रिस्क्रुटीनाईज करा. मी तुम्हा सगळयांना सांगतो की माझा एकही माणूस तिकडे लावला नाही. कोणाला रेकमेन्डेशन केलेल नाही ९२-९६ ज्या पोस्ट भरल्या आहेत त्याच्यात माझा एकही माणूस नाही. प्रत्येक वेळेला तुमच्या उप आयुक्त त्या वेळचे तत्कालिन आयुक्त ह्या लोकांना आम्ही सांगत गेलो. मंत्रालयापासूनचा पत्रव्यवहार आहे. पण संपूर्ण तक्रारी नजरेआड केल्या गेल्या. तुमच्या सेवाशर्ति नियमामध्ये ज्या तरतुदी आहेत की, एखाद्या विभागाचे इन्टरव्ह्यू असेल त्यावेळेला त्या विभागाचा प्रमुख म्हणजे जे डिप्लोमा डिग्री होल्डर आहेत त्यांना त्याच्यातले ज्ञान आहे. अशा अधिकाऱ्याला त्या पेरेन्टस् डिपार्टमेंटचा जो सुप्रिम आहे त्याला त्या इन्टरव्ह्यूमध्ये सहभागी करुन घेतले पाहीजे त्यावेळच्या आयुक्तांनी व्यक्तीगत आकस ठेवून त्या अधिकाऱ्याला हेतू पूरस्पर लांब ठेवले आणि मनाला वाटेल तशी सगळी भरती केलेली आहे. आता तो २० चा खेळ झाला आहे बाकीचे अजून बाकी आहेत. ते कुठे सूटतात सगळ आमच्या हातात आहे. आम्ही फक्त बघतो वेट ॲन्ड वॉच प्रशासन काय करते. ही नूसती जिंगल भरती नाही. फायर ब्रिगेडमध्ये महिला कर्मचारी कुठून आल्या. ते क्लार्क भरले आहेत त्याची मा. आयुक्तांनी चौकशी केली पाहिजे. संपूर्ण पोस्टमध्ये महिलाच्या पोस्ट कुठेही दिल्या नाहीत त्या पोस्ट ह्यांनी निर्माण केल्या आणि त्या दोन महिला घुसवल्या आहेत. ही गंभीर बाब आहे. एखादा जो खरोखर सक्षम आहे त्याच्यामध्ये तो पात्र आहे. अशा माणसाला डेलीब्रेटली तुम्ही किकाउट केले. आयुक्तांचे कितीतरी नातेवाईक आहेत. आणि आम्ही केले की, आम्हाला सांगणार मंत्रालयातून मंत्र्याचे फोन येतात कोणाचे येतात. सगळे आयुक्ताचे अधिकारी आहेत. कोणच्या नातलगांची सोय झाली म्हणून आम्ही लढलो नाही तर ह्या शहराला सक्षम अधिकारी, कर्मचारी आणि सुजाण माणस पाहिजेत म्हणून आम्ही केस लढलो. आणि त्या पोस्ट आम्ही मंजुर करुन आणल्या आहेत. त्याचा चूथळा प्रशासनाने कला. प्रत्येक वेळेला इन्टरव्ह्यू असू दे प्रॅक्टीकल असू दे त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स बघा. जे ड्रायव्हर भरती केले त्यांनी एक आठवड्यामध्ये अख्खी गाडी पलटी करुन टाकली असती. एकदा रिलायन्सचा पोल रिव्हर्स मध्ये ठोकून शॉट सर्कीट झाले असते. तीन ॲक्सीडेंट झाले. दादा आपण ह्या रस्त्यावरुन चालतो उद्या त्या अन मॅच्यूअर्ड ड्रायव्हरनी आपली गाडी उडवली तर काय कराल ? हा साधा विषय नाही ह्या शहरामध्ये जी भरती झाली उद्या तेच कर्मचारी त्यांना ज्ञान नसल्या कारणाने मेले. आता ठाण्याला अपघात झाला तर सहाजण मेले, बोरिवलीला चार जण मेले. कर्मचारी ज्या वेळेला भरतात त्यावेळेला त्या डिपार्टमेंटचा प्रमुख पहिला जिम्मेदार पकडला जातो. इकडून सुरुवात होते की ह्याची भरती झाली तेव्हा तो कर्मचारी आपला अधिकारी त्यावेळेला त्या भरती प्रक्रियेमध्ये होता का ? उपायुक्त आज आहेत तर उद्या नाहीत. शिवमुर्ती नाईक गेले. ज्यावेळेला प्रॅक्टीकल आणि टेक्नीकल बाब येते. ज्यावेळेला त्याच प्रॅक्टीकल झाल त्यावेळेला हॉर्स पाईप म्हणजे काय ते माहित नाही आणि ते सरळ सांगतात की आम्ही एवढे दिले आणि आम्ही आलो. एखादा वरिष्ठ गेला तर कोणी उठुन उभा राहत नाही. नविन भरती झालेल्या लोकांना एवढा माज आहे आम्ही बघतो. आणि सरळ ड्रायव्हर बोलतो की आम्हाला गाडी चालवता येत नाही जा. साहेब माझी नम्र विनंती की आता जे काही तुमचे चालले आहे. त्याच्यात मी कधी डिस्टर्ब केले नाही, पत्र टाकले नाही. अगोदर भरपूर तक्रारी केल्या आहेत. माझ्याकडे पूर्ण फाईल आहे. अगदी पेपर सहीत. संपूर्ण प्रकरण रिस्क्रुटीनाईज करा. मेहरबानी करुन पुढे कोर्ट मॅटर झाले नाही पाहिजेत. प्रशासनाचा त्याच्यातच वेळ जातो. एवढ करुन सुध्दा दीड-दोन वर्षात काहीच मिळाले नाही. अन मॅच्यूअर्ड कर्मचारी आपल्याकडे जमा झाले आहेत, आणि आपण त्यांना पोसतो. एकतर भिवंडी कॉर्पोरेशनमध्ये बडतर्फ केलेला कर्मचारी आपल्याकडे घेतला आहे. त्याची पण तक्रार आहे. सगळया तक्रारी मागवून घ्या. एखाद्या वेळेस आस्थापनाने काही तक्रारी तुमच्याकडून लपवल्या असतील. तुमच्या पर्यंत काही वस्तू गेल्या नसतील. तुम्ही प्रकरण ए टू झेड चेक करा. म्हणजे पूढे सारखे सारखे त्रास होणार नाही. दोन महिला कर्मचारी कोण आहेत त्याचा शोध घ्या. मग मी माझी तक्रार आणून दाखवतो.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, माझा जो विषय होता तो वेळे अभावी घेता आला नाही. सर्वप्रथम मी तुमचे मनापासून आभार मानतो. कारण काही महिने ह्याचा आम्ही पाठपुरावा करत होतो. जर तुम्ही ह्या महानगरपालिकेत आला नसता तर ह्या प्रश्नाला वाच्यता फुटली नसती. सन्मा. नरेंद्र मेहता म्हणाले की त्यांनी बोगस कागदपत्र जोडली होती मी ते

सुधारु इच्छितो का त्याच्याकडे जी कागदपत्रे होती ती त्यांनी निवड समितीपुढे ठेवली होती ती योग्य आहेत किंवा नाहीत ते चेक करण्याचे काम निवडसमितीचे होते. महाराष्ट्र शासनाचे स्पष्ट आदेश होते महाराष्ट्र राज्याच्या अग्निशमन संचालकांचे स्पष्ट आदेश होते आणि ते आदेश धाब्यावर बसवून ही मंडळी निवडली गेली होती. त्या २० जणांची जर मूळ गावाची यादी बघीतली तर त्याच्यातले १२ ते १३ जण एकाच गावचे होते. आमच म्हणणे असे आहे की, मिरा भाईंदर मध्ये लायक माणस सापडली नाहीत का ? हा माझा प्रश्न होता आणि पूढच्या वेळी चर्चेला येईल त्यावेळी मी चर्चा करेन.

**प्रकाश दूबोले :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. नरेंद्र मेहतानी जो दोषी अधिकाऱ्यांचा विषय आणला आहे. नोकर भरती ही आस्थापना विभागातून होते. गेल्या अनेक वर्षापासून आस्थापना विभागात तेच अधिकारी तेच कर्मचारी, निवड समितीवर सुध्दा तेच. आणि जर आस्थापना विभागाने त्या अधिकाऱ्याची बदली केली तर तो त्याच्या एकदम जवळचा विश्वासू माणूस त्या ठिकाणी त्या पदासाठी जरी तो क्लास टू नसला तरी त्याला तात्पूरते प्रमोशन देऊन त्या पदावर घेऊन त्याची सोय केली जाते. मिरा भाईंदर महानगरपालिकेत तीन-चार वर्षा अगोदर १७० सफाई कामगाराची भरती मोठ्या प्रमाणात काढली होती. त्यासाठी शासनाचे अधिकारी, पालिकेचे अधिकारी असे सहा गट तयार केले होते आणि प्रत्येक गटामध्ये सहा सहा अधिकारी ठेवले. त्याच्यात सेवायोजना कार्यालयाचा अधिकारी होता. प्रकल्प अधिकारी होते हे सगळे अधिकारी असताना त्याची निवड समितीने १७० कर्मचाऱ्यांची यादी तयार केली. आणि ती फायनल यादी करताना त्याच्यावर अनेक तक्रारी झाल्या त्यामध्ये शासनाने ऑब्जेक्शन घेतल्यामुळे ती नोकरभरती थांबली. त्या नोकरभरतीच्या वेळेला ४ ते ५ हजार अर्ज आले होते. त्यामध्ये प्रत्येकांचे ५० रु. डि.डि. घेतले. त्याची फायनल यादी तयार केली. परंतु ती यादी कधी डिक्लेर झाली नाही. त्या लोकांना आपण कळवले सुध्दा नाही की ही नोकरभरती रद्द झाली आहे. त्यांचे पैसेही परत केलेले नाही. त्यानंतर मिरा भाईदर शहरामध्ये शांतीनगर पाणीपुरवठा योजना घेतली. मिरा-भाईंदर शहरात हस्तांतर करुन महापालिकेस त्यामध्ये शांतीस्टारकडे एकूण किती कर्मचारी कामाला होते आणि त्याठिकाणी कूठल्या पदावर काम करत होते आणि त्यांना आपण कूठल्या पदावर सामावून घेतल, त्या मुलांच वय किती, त्याच शिक्षण किती, ती मूल इथे कधीपासून राहतात त्या कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही. त्यानंतर प्रत्येक आयुक्त, उपायुक्त, संबंधीत अधिकारी, काही नगरसेवकाचे नातेवाईक घेऊन ६९ लोकाची भरती केली. आज मिरा भाईंदर पालिकेची बदनामी मंत्रालय कोर्टात होत आहे. महापालिका झाल्यानंतर अधिकाऱ्याना प्रमोशन देण्याचा विषय आला. २००५ ला सेवाशर्तीने मंजुर करण्यात आली. शासनाने जे प्रारुप नियम दिले होते ते नियम सोडून स्थानिक अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी सर्व नगरसेवकांनी अंगावर जबाबदारी घेऊन ठराव मंजूर केला. परंतु त्या नियमावलीला मंजुरी आली नाही. शासनाकडून ते परत पाठवले त्याला अधीन राहून प्रमोशन दिल्यानंतर काही अधिकाऱ्यांना डिमोशन मिळाले त्यामुळे ह्या मिरा-भाईंदर शहराची सर्वत्र बदनामी होत आहे. त्या ३३ लोकांना प्रमोशन देताना जे ३-४ लोक योग्य होते त्यांना प्रमोशन दिले नाही. ते कर्मचारी नाराज आहेत. ते योग्य प्रकारे काम करत नाही. त्या कर्मचाऱ्याकडे नगरसेवक कामासाठी गेले तर ते सांगतात नाही त्यांना प्रमोशन देतात आणि सर्व जबाबदारी आमच्यावर देतात. आमच्याकडून काम करुन घेतात असे आम्हाला त्यांच्याकडून ऐकावे लागते. कारण की ते ज्येष्ठ असताना देखील त्यांना डावलल आणि सोयीनुसार आपआपल्या माणसांना प्रमोशन दिले त्यामुळे त्यांना डिमोशन घ्यावे लागले. अशा प्रकारे अन्याय झालेला आहे. मा. आयुक्त साहेब चांगले आलेले आहेत त्यांनी ह्या गोष्टीचा नोकरभरती जी आहे आणि जी समिती होती त्या समितीत कोण अधिकारी आहे त्याचे नातेवाईक तीन भरत्यामध्ये कसे भरले गेले ह्या सर्व गोष्टीची शहानिशा करावी आणि संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करावी. हा जो सन्मा. नरेंद्र मेहताचा प्रस्ताव आहे त्याला आमचा पाठिंबा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब ह्याच्यात न्यायप्रविष्ठ असे दिले आहे पण माझ्या माहितीनुसार ही सभागृहाला दिलेली माहिती आहे. ह्या संपूर्ण प्रकरणामध्ये ठाण्याच्या लेबर कोर्टाने त्याच पहिले म्हणणे फेटाळले. त्यानंतर हायकोर्टामध्ये अपिल झाले. हायकोर्टाच्या ज्या इंटरीयम ऑर्डर झाल्या आहेत, त्याचा ह्याच्यात कुठेही उल्लेख नाही. फिल इन द ब्लँक न्यायप्रविष्ठ आहे. जर लेबर कोर्टाचा स्पष्ट आदेश आला असेल तर तो लेबर कोर्टाचा आदेश असे उल्लेखीत पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब मागच्या सभेत आपण दोनदा निर्णय घेतला की, समाज विकास अधिकारी त्याची सुध्दा कागदपत्रे सापडत नाही. आपण दोनदा निर्णय घेतला की, ती चूकीची माहिती सादर केली आहे. त्यांनी जी परिक्षा दिली त्याच्यात ती नापास झालेली. त्यांना त्वरीत रिलीव्ह करावे कोणी करत नाही. काय करायला तिला पाठीशी घालायचे त्यानंतर पी.आर.ओ. पासून, उप आयुक्त, ऑडीटर सगळयावर गुन्हे दाखल झाले. त्याच्यामुळे महापालिकेची बदनामी होते. शहरात असे वाटते की लोकप्रतिनिधी देखील त्याच्यात समाविष्ट आहेत. पण ९० % लोकप्रतिनिधींना माहित नसते म्हणून ते त्याला मान्यता देतात. नंतर त्यांनाही बदनामी सहन करावी लागते. आमच त्याच्यात काही देणघेण नसते ज्या अधिकाऱ्याने अशी चूकीची माहिती महासभेपुढे सादर करुन आमची मान्यता घेतली आणि सभागृहाची फसवणूक केली किंवा सभागृहाचा अपमान केला त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. मा. आयुक्त साहेब अशा अधिकाऱ्याना इकडे ठेवायचे आणि त्याच्याकडून काम करवून घ्यायचं म्हणजे आम्हाला वाटते की ते आम्हाला दुसऱ्या खड्डयात टाकतील. माझ निवेदन आहे की ह्या ठरावाच्या माध्यमातून त्याच्यावर कडक कारवाई

करणार. मी ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात सन २०११ मध्ये वैद्यकिय कर्मचारी व अग्निशमन विभागात अधिकारी व कर्मचारी अशा भरत्या (New Appointment) करण्यात आलेल्या आहेत व तसेच मोठ्या प्रमाणात पदोन्नत्या देण्यात आलेल्या आहेत.

वरील सर्व नेमणूका, भरत्या व पदोन्नत्या बेकायदेशीररीत्या करण्यात आलेल्या आहेत. शासनाचे नियम व उमेदवारीसाठी वर्तमान पत्रात काढलेली जाहिरातीचे पालन केले गेले नाही. मा. महासभेपुढे खोटी माहिती सादर करुन मा. महासभेचा अपमान केला आहे. मा. आयुक्तांनी सर्व भरत्या व पदोन्नत्यांची संपूर्ण चौकशी करुन माहिती द्यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावाला माझे अनूमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब ह्याच्यावर खुलासा केला तर बर होईल. आणि कुठल्या स्टेजला चौकशी करणार त्यासाठी ठराव केला का, तुम्ही त्याला रिलीव्ह करत नाही त्याच कारण काय आहे. मा. महापौर साहेबांनी स्वतः सांगितल आहे. मला १०० % माहित नाही परंतु आपल्या ऑडीटर साहेबाची नातेवाईक अशी मला माहिती भेटली. परंतु १०० % सांगू शकत नाही. ती चौकशी करा. ते त्या कमिटीमध्ये आहे. समाज विकास अधिकारी जी अपॉइन्ट केली आहे ती ऑडिटर साहेबांची नातेवाईक असे मला माहित पडले आहे अशी मला माहिती मिळाली आहे. मी गॅरेन्टेड सांगत नाही म्हणजे उद्या आरोप करता कामा नये. ती चौकशी करा त्यांना रिलीव्ह करा. नाही करणार त्याच कारण काय ?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

बोगस डॉक्युमेंट की बात चल रही है तो यह १७१ पोस्ट की बात थी। काशिगाव में बीएसयूपी के अंदर चार हजार लोगों को मकान देने की बात है। वहाँ पर तीन अलग अलग समिती, एक निगरानी समिती बनी है। मैं कल वहाँ पर देखने गया था, सिर्फ डॉक्यूमेंट कलेक्ट किए गये है। डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन उसके अंदर नहीं है। और बाद में चार हजार केस इसके अंदर निकलेगा। तो डॉक्युमेंट व्हेरीफीकेशन का काम उस योजना में अभी से होना चाहिए। व्हेरीफिकेशन ॲट सोर्स, रेशन कार्ड का है, तो रेशन कार्ड के डिपार्टमेंट से होना चाहिए।

**प्रभात पाटील :-**

एक धक्कादायक बाबत कालच आपल्या अधिकाऱ्याच्या तोंडून आली की ज्या समाज विकास अधिकारी आहेत त्यांना स्वतंत्र केबिन आहे त्यांना स्टाफ आहे. परंतु परवाना विभागात काम करणाऱ्या मॅडम आहेत त्या वर्षानुवर्षे काम करतात. वसुली होत नाही म्हणून आपण त्यांच्या नावाने बोंबाबोब करतो. त्यांच्याकडे कम्प्यूटर नाही किंवा कम्प्यूटर ऑपरेटर नाही किंवा त्यांच्याकडे स्टाफ नाही. म्हणून आपल्याला परवानाचा विषय आणावा लागतो. ज्यांच्यासाठी मा. महापौरांनी निर्देश दिले की, त्यांना कमी करा. त्यांना आपण केबिन देतो, त्यांना स्टाफ देतो. आणि वर्षानुवर्षे ज्या मॅडम महापालिकेचे काम करतात त्यांच्याकडे स्टाफ नाही. कालच अधिकाऱ्याने माहिती दिली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, केंद्र शासनाकडून जी अपंगासाठी तीन टक्क्याची जी तरतुद आहे त्याच्यात ७० लाखाचा प्रस्ताव तुमच्याकडे विचाराधीन आहे. म्हणजे ७० लाख जे अपंग निधीतून वापरायचे आहेत, आपल्याकडे प्रस्ताव पाठवला आहे. आपल्याकडे फाईल पडली आहे. मा. आयुक्त साहेब बघत नाही असे सांगितले गेले आहे. आम्हाला खरे कारण माहिती नाही. तीन टक्क्याची जी राखीव निधी आहे.

**मा. आयुक्त :-**

अग्निशमन भरतीबाबत जे विषय मांडले आहेत त्याच्याबाबत आम्ही ज्याच्यावर कारवाई प्रस्थापित केली आहे ती सगळी लोक कोर्टात गेली आहेत, त्याचे असे म्हणणं आहे की, कारवाई चूकीची झाली आहे. त्यांची कागदपत्र बरोबर आहेत. त्यांना आम्ही चुकीने काढले आहे. ते सगळ घेऊन कोर्टात गेले आहेत. आणि या विषयामध्ये पूर्ण अहवाल मी शासनाकडे पाठवतो आहे. समाज विकास अधिकाऱ्याबद्दल तक्रार प्राप्त झालेली आहे. त्यांची आम्ही चौकशी करतो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझा विषय असा होता की, आता आपण एक निर्णय घेतलेला आहे. साधा अधिकारी १० वी पास आणि १२ वी पास त्याच्यातल अंतर कळत नाही. आयदर त्यांनी चूकीचा निर्णय घेतला किंवा आपण चूकीचा निर्णय घेतला आहे. मग ते महापालिकेने का सहन कराव. भविष्यात ह्याला जबाबदार कोण राहणार आहे ? सॅलरी परत येणार आहे का ? पून्हा ॲडव्हटाईज काढायला लागेल, कमिटी अपॉइंट करायला लागेल, त्याच्यासाठी लाखो रुपये खर्च करायला लागतील ते कोण भरुन देणार ?

**मा. आयुक्त :-**

दोषीवर कारवाई होणारच.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, माझ तेच मत आहे की, ह्याशिवाय अतिरिक्त चौकशी झाली नाही. ज्या १५०-२०० भरत्या केल्या त्याची पूर्ण चौकशी केली असेल असा आम्हाला विश्वास आहे. ग्रॅज्युएट दोन्ही आहेत परंतु इन्टरव्ह्यमध्ये मी पास झालो परंतु त्यावेळी नोकरी ह्यांना भेटली आहे. ट्रान्सफरन्सी राहिली नाही. ज्याला अधिकार नाही त्याला जास्त मार्क त्यांनी दिलेले आहेत. चूकीची उत्तर दिलेली आहेत ज्यांनी बरोबर उत्तर दिलेली आहेत त्यांचे देखील पेपर मागवा. किती उमेदवार

आले, कोणाला किती मार्क मिळाले. म्हणजे मुद्दामहून ह्याच उत्तर बरोबर आहे. तरी कमी मार्क द्यायचे माझे चूकीच आहे तरी त्यांना जास्त मार्क द्यायचे. त्यासाठी पूर्ण चौकशी केल्याशिवाय साहेब ह्याच उत्तर आपल्याला भेटणार नाही. आपण ह्याला गांभिर्याने घ्यावे आणि आपलेच अधिकारी घेतले तर ते तुम्हाला परत दाखवणार की हे सगळ बरोबर आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सभागृहाच एकच मत आहे की ह्याची शहानिशा झाली पाहिजे. कायदेशीर ह्याच्यात ज्या चूका झाल्या आहेत त्याच्यात सुधारणा झाली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, ठराव मंजुर झाला का ? सन्मा. नरेंद्र मेहतानी चांगला विषय आणला होता. त्यांनी "ज" चा प्रस्ताव दिलेला आहे. जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमानूसार कारवाई करण्यात यावी असा त्याचा प्रस्ताव होता. आणि ठरावामध्ये ते म्हणतात की माहिती गोळा करण्यात यावी. मग ह्याच्यामध्ये काय घडल की ज्या अधिकाऱ्यावर कारवाई करायची होती त्याच्याविषयी माहिती मागवतात.

**नरेंद्र मेहता :-**

मी आता ठराव मांडतो कारण मला कोणाला बळी पाडायच नाही किंवा कोणाला ठेवायच नाही.

**अनिल सावंत :-**

विषय ठरावामध्ये बदलला कसा ? अगोदर माहिती घ्यायला पाहिजे होती.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. अनिल सावंतजी ज्या अधिकाऱ्याने खोट केले तो अधिकारी राहणार नाही.

**प्रकरण क्र. १०५ :-**

सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचे दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेतील भरत्या प्रकरणे दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत.

**ठराव क्र. १०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात सन २०११ मध्ये वैद्यकिय कर्मचारी व अग्निशमन विभागात अधिकारी व कर्मचारी अशा भरत्या (New Appointment) करण्यात आलेल्या आहेत व तसेच मोठ्या प्रमाणात पदोन्नत्या देण्यात आलेल्या आहेत.

वरील सर्व नेमणूका, भरत्या व पदोन्नत्या बेकायदेशीररीत्या करण्यात आलेल्या आहेत. शासनाचे नियम व उमेदवारीसाठी वर्तमान पत्रात काढलेली जाहिरातीचे पालन केले गेले नाही. मा. महासभेपुढे खोटी माहिती सादर करुन मा. महासभेचा अपमान केला आहे. मा. आयुक्तांनी सर्व भरत्या व पदोन्नत्यांची संपूर्ण चौकशी करुन माहिती द्यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०६, सन्मा. सदस्या ओमप्रकाश अग्रवाल यांचे दिनांक २६/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. – मिरारोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय चालू करणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे मिरा रोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय बांधले आहे. सदर रुग्णालयाची इमारत बांधून सुमारे ३ वर्षे झाली आहेत. तसेच सदर रुग्णालय एक वर्षापूर्वी सुरु करण्यात आले आहे. परंतु ५० खाटांच्या रुग्णालयात अजुनही रुग्ण ॲडमीट न करता केवळ ओ.पी.डी. चालवली जाते. सदर रुग्णालयासाठी ऑपरेशन थिएटर, लेबर रुम, एक्स-रे मशीन, सोनोग्राफी मशीन, डायलिसिस मशीन इत्यादी लाखो रुपयांची उपकरणे खरेदी केलेली आहेत. परंतु अद्याप एकही सुविधा सुरु करण्यात न आल्याने सदरची सर्व उपकरणे धुळ खात पडलेली असल्याने सदरची उपकरणे खराब होण्याची व गंजल्या जाण्याची शक्यता आहे. तसेच अशा परिस्थितीत सदरची उपकरणे भंगारमध्ये काढण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

सदर रुग्णालयासाठी मा. महासभेने वाढीव पदे मंजूर केली आहेत. परंतु अजुनही सदर पदांवर नेमणुका झालेल्या नाहीत. सदर रुग्णालयासाठी नेमण्यात आलेले तज्ञ डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचा-यांच्या वेतनापोटी महानगरपालिकेस वार्षिक १ कोटी रुपयांचा खर्च सोसावा लागत आहे. तरीही नागरिकांना वैद्यकीय सुविधा मात्र मिळत नाहीत. सदर रुग्णालयास मा.महासभा दि. २०/९/२०११ तहकुब सभा दि .२०/०८/२०११ अन्वये पदनिर्मितीचा

प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत वैद्यकीय अधिकारी-२, अधिपरिचारिका-१६, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर-२ सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे करीता महासभेने मंजुरी दिली. त्या ही गोष्टीला आज पुर्ण ३ महिने झाले आहेत. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. तरी महासभा दि. २०/९/२०११ व तहकुब सभा दि. २०/८/२०११ ठराव क्र. ५४ अन्वये कारवाही करणे व स्थायी समिती सभा दि. ३१/०१/२०१० ठराव क्रमांक ४३ टेंभा हॉस्पिटल करीता नेमण्यात आलेल्या हॉस्पिटल कंसल्टन्ट प्रमाणे इंदिरा गांधी रुग्णालयसाठी एक स्वतंत्र हेल्थ कंसल्टन्ट कडून हॉस्पिटल अंतर्गत फर्निचर लेआऊट व त्या संबंधी कामे हॉस्पिटलसाठी लागणारी मशिनचे स्पेसिफीकेशन तयार करणे व हॉस्पिटल कर्मचारी प्रशिक्षित करणे कामी अनुभवी अशा हॉस्पिटल कंसल्टन्टची नेमणुक करणे गरजेचे आहे. तरी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय एक स्वतंत्र मेडीकल कन्सल्टंट कडून Flexibility अहवाल बनविण्यास हॉस्पिटल कंसल्टन्ट नेमणेकरीता ५ लाखांची तरतूद करण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

हेल्थ कन्सल्टन म्हणजे काय?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

आम्हाला माहित नाही हा आमचा प्रस्ताव नाही अशी डेफिनेशन नाही.

**एस.ए.खान :-**

कन्सल्टींग करुन हे हॉस्पीटल बांधल आहे ना? थोडफार राहीले असेल तर मा. आयुक्त साहेब खुलासा करतील.

**जुबेर इनामदार :-**

प्रस्ताव पाठवला त्याच्यामध्ये फॅक्सीबीलीटी अहवाल बनवण्यास.....

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब, सभागृहाला माहिती द्या की, हॉस्पीटलची खरी परिस्थीती काय आहे जो आपला विषय नाही त्या विषयावर कशाला बोलतात.

**अनिल सावंत :-**

डॉ. साहेब, हेल्थ केयर कन्सल्टन संस्था यह क्या है?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, टेंभा हॉस्पीटलचा स्थायी समिती मध्ये ठराव झालेला आहे त्याच्यामध्ये....

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

टेंडर मध्ये तुम्ही निर्णय घेऊ शकता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याच्यामध्ये हेल्थ कन्सल्टन्ट हा शब्द तुम्हीच वापरला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

टेंभा हॉस्पीटल जो आहे त्याचा समावेश बी.ओ.टी वर करुन घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मी ठराव मांडणार आहे. मा. महापौर साहेब, मिरारोड हॉस्पीटलचा विषय आलेला आहे. मा. माजी आमदार मुझफ्फर हुसैन ह्यांच्या आमदार निधीतून हे हॉस्पीटल बनलं. आमदाराच्या निधीतून महापालिकेचा फंड त्याठिकाणी लागला. उपमहापौर साहेबांनी उल्लेख केला. मा. गणेश नाईक साहेबांनी त्या ठिकाणी फंड लावला त्यानंतर फैजल खान राज्यमंत्री जे आहेत त्यांनी सुद्धा फंड लावला.

**वंदना चक्रे :-**

फौजीया खान राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आहेत ते सुद्धा सांगा. मागच्या वेळेला सांगितले नव्हते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापालिकेचे किती पैसे लागले ते सुद्धा सांगा.

**अनिल सावंत :-**

गणेश नाईक साहेबांनी आमदार फंड लावला. मोरबे धरणाला आमदार फंड हवा होता त्याठिकाणी नाईक साहेब लावू शकत नव्हते. तिथे माजी आ. मुझफ्फर हूसैन साहेबांनी आपला आमदार फंड दिला त्याच्या बदल्यात त्यांनी हॉस्पीटलला आमदार फंड दिला.

**शरद पाटील :-**

तसं आमदारांच लेखी पत्र आहे का? खोटं बोलू नका.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

मीरारोडच्या नगरसेवकांनी लक्षात घ्यावं की, ही वास्तु मीरारोडला आहे. भाईंदरचे नगरसेवक प्रस्ताव आणतात की हॉस्पीटल प्रायव्हेटायझेशन करुन टाका बीओटी वर द्या आज लोकांना जी सोय मिळते. मिरा रोड येथे महानगरपालिकेतर्फे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड येथे बांधण्यात आलेले आहे. या रुग्णालयामध्ये ओ.पी.डी. मायनर ऑपरेशन, सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथोलॉजी, ई.सी.जी. या सेवा चालू झालेल्या आहेत. ओ.पी.डी. मध्ये १०० ते १२० रुग्ण दररोज सेवा घेत आहेत. प्रशासनाने गर्भवती माता नोंदणी व डायलेसीस लवकरात लवकर सुरु करावी, हे हॉस्पीटल व्यवस्थितरित्या चालविले जात आहे. तरी यासाठी एका स्वतंत्र मेडिकल कन्सलन्टंटची गरज नाही, असा मी ठराव मांडीत आहे. हा आमचा ठराव आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, आपने जब चार्ज लिया था। तब मै इसी विषय के बारे मे आपके पास आया था। मीरारोड हॉस्पीटल के उपर महिने मे कम से कम १५ लाख रुपये खर्चा कर रहे है। और हम जो पेशंट देख रहे वह एक जनरल ओपीडी होती है उसमे हम ७० पेशंट देखते है। उतना ही काम वहाँपे हो रहा है। यह जो हॉस्पीटल फंड है जैसे हम लेट कर रहे है वैसे हम लॉस मे जा रहे है। वहाँ पे इतने डॉक्टर आए, सर्जन आए उनका सॅलरी वेस्ट जा रहा है। सर्जन का काम ओपीडी चलाने का नही। वहाँ पे कुछ काम नही है। डिलीव्हरी का काम होता नही है। इन्स्ट्रुमेंट वेस्ट पडे है। जो काम हुआ है वह बेकायदेशीर तरीके से हुआ है। बेसिक स्ट्रक्चर करके इन्स्ट्रुमेंट मंगाना चाहिए। सब कुछ हो चुका है। अब भी नही संभल रहा है। बाकायदा कन्सल्टंट करके उसको प्रायव्हेट तरीकेसे ले वही अच्छा है।

**अनिल सावंत :-**

यही तो मै कहना चाहता हूँ म्यूनिसिपाल्टी को नही देने का प्रायव्हेट डॉक्टर को बेच देने का।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

इसके उपर कितना खर्चा हुआ है यह आप देखिए।

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्या प्रशासनांनी भाईंदरच्या डॉक्टरांना अर्ज पाठवला. तुम्ही काय सेवा देऊ शकता का? त्यांनी अर्जाचे उत्तर दिलं आम्ही सेवा देऊ शकतो तरी आपल्या लोकांनी त्याची सेवा घेतली नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मी स्वतः तिथे पाहणी केली आहे. त्या हॉस्पीटलमध्ये स्टाफ नाही. लाखो रुपयांचे इन्स्ट्रुमेंट तिथे धुळ खात पडले आहे. ते खराब होतील तर तुम्ही तिकडे कन्सल्टन्ट नेमा आणि त्याची पाहणी करा.

**अनिल सावंत :-**

ह्यांचे मा. आमदार एक रुपयाचा फंड ह्या शहरासाठी देऊ शकत नाही. मा. आमदारांनी महापालिकेने आणि इतर आमदारांनी जे हॉस्पीटल बांधले आहे ते सुद्धा प्रायव्हेट डॉक्टरांना विकून टाकायचं ही ह्यांची पॉलिसी आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सावंत साहब, यह जनता का फंड है।

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, सावंत साहेबांना माहित नसेल की ज्या मतदार संघात मा. आमदार निवडून येतात त्य मतदार संघाचा फंड द्यावा लागतो. फंड बाहेर देता येत नाही.

**रामनारायण दुबे :-**

मा. महापौर साहेब, मीरारोड का जो हॉस्पीटल छः साल से बना है वह मेरे वॉर्ड मे है। वहाँ पर शवागृह से शुरुवात हूआ। बिना उद्घाटन किए शवागृह शुरु किया। उसका भविष्य क्या होगा। यह लोग आमदार फंड की बात करते है। आमदार फंड कहाँ से आता है।

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०६ करीता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदन सन्मा. आसिफ शेख दुसरा ठराव सुचक सन्मा. अनिल सावंत अनुमोदन सन्मा. जुबेर इनामदार अनुक्रमे दुसरा ठराव मतास टाकतो. मिरा रोड येथे महानगरपालिकेतर्फे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड येथे बांधण्यात आलेले आहे. या रुग्णालयामध्ये ओ.पी.डी. मायनर ऑपरेशन, सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथोलॉजी, ई.सी.जी. या सेवा चालू झालेल्या आहेत. ओ.पी.डी. मध्ये १०० ते १२० रुग्ण दररोज सेवा घेत आहेत. प्रशासनाने गर्भवती माता नोंदणी व डायलेसीस लवकरात लवकर सुरु करावी, हे हॉस्पीटल व्यवस्थितरित्या चालविले जात आहे. तरी यासाठी एका स्वतंत्र मेडिकल कन्सलन्टंटची गरज नाही, असा मी ठराव मांडीत आहे. सुचक सन्मा. अनिल सावंत ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहे, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. आता मी पहिला ठराव मतदानास टाकतो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे मिरा रोड येथे ५० खाटांचे

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय बांधले आहे. सदर रुग्णालयाची इमारत बांधून सुमारे ३ वर्षे झाली आहेत. तसेच सदर रुग्णालय एक वर्षापूर्वी सुरु करण्यात आले आहे. परंतु ५० खाटांच्या रुग्णालयात अजुनही रुग्ण ॲडमीट न करता केवळ ओ.पी.डी. चालवली जाते. सदर रुग्णालयासाठी ऑपरेशन थिएटर, लेबर रुम, एक्स-रे मशीन, सोनोग्राफी मशीन, डायलिसिस मशीन इत्यादी लाखो रुपयांची उपकरणे खरेदी केलेली आहेत. परंतु अद्याप एकही सुविधा सुरु करण्यात न आल्याने सदरची सर्व उपकरणे धुळ खात पडलेली असल्याने सदरची उपकरणे खराब होण्याची व गंजल्या जाण्याची शक्यता आहे. तसेच अशा परिस्थितीत सदरची उपकरणे भंगारमध्ये काढण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

सदर रुग्णालयासाठी मा. महासभेने वाढीव पदे मंजूर केली आहेत. परंतु अजुनही सदर पदांवर नेमणुका झालेल्या नाहीत. सदर रुग्णालयासाठी नेमण्यात आलेले तज्ञ डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचा-यांच्या वेतनापोटी महानगरपालिकेस वार्षिक १ कोटी रुपयांचा खर्च सोसावा लागत आहे. तरीही नागरिकांना वैद्यकीय सुविधा मात्र मिळत नाहीत. सदर रुग्णालयास मा.महासभा दि. २०/९/२०११ तहकुब सभा दि .२०/०८/२०११ अन्वये पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत वैद्यकीय अधिकारी-२, अधिपरिचारिका-१६, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर-२ सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे करीता महासभेने मंजुरी दिली. त्या ही गोष्टीला आज पुर्ण ३ महिने झाले आहेत. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. तरी महासभा दि. २०/९/२०११ व तहकुब सभा दि. २०/८/२०११ ठराव क्र. ५४ अन्वये कारवाही करणे व स्थायी समिती सभा दि. ३१/०१/२०१० ठराव क्रमांक ४३ टेंभा हॉस्पिटल करीता नेमण्यात आलेल्या हॉस्पिटल कंसल्टन्ट प्रमाणे इंदिरा गांधी रुग्णालयसाठी एक स्वतंत्र हेल्थ कंसल्टन्ट कडून हॉस्पिटल अंतर्गत फर्निचर लेआऊट व त्या संबंधी कामे हॉस्पिटलसाठी लागणारी मशिनचे स्पेसिफीकेशन तयार करणे व हॉस्पिटल कर्मचारी प्रशिक्षित करणे कामी अनुभवी अशा हॉस्पिटल कंसल्टन्टची नेमणुक करणे गरजेचे आहे. तरी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय एक स्वतंत्र मेडीकल कन्सल्टंट कडून Flexibility अहवाल बनविण्यास हॉस्पिटल कंसल्टन्ट नेमणेकरीता ५ लाखांची तरतूद करण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे. सुचक सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदक आसिफ शेख ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांच्या बाजूने ३८ आणि विरोधात २३ मत पडली आहेत. सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा प्रस्ताव बहुमताने पास झालेला आहे.

**प्रकरण क्र. १०६ :-**

सन्मा. सदस्या ओमप्रकाश अग्रवाल यांचे दिनांक २६/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव, -- मिरारोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय चालू करणेबाबत.

**ठराव क्र. ११० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे मिरा रोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय बांधले आहे. सदर रुग्णालयाची इमारत बांधून सुमारे ३ वर्षे झाली आहेत. तसेच सदर रुग्णालय एक वर्षापूर्वी सुरु करण्यात आले आहे. परंतु ५० खाटांच्या रुग्णालयात अजुनही रुग्ण ॲडमीट न करता केवळ ओ.पी.डी. चालवली जाते. सदर रुग्णालयासाठी ऑपरेशन थिएटर, लेबर रुम, एक्स-रे मशीन, सोनोग्राफी मशीन, डायलिसिस मशीन इत्यादी लाखो रुपयांची उपकरणे खरेदी केलेली आहेत. परंतु अद्याप एकही सुविधा सुरु करण्यात न आल्याने सदरची सर्व उपकरणे धुळ खात पडलेली असल्याने सदरची उपकरणे खराब होण्याची व गंजल्या जाण्याची शक्यता आहे. तसेच अशा परिस्थितीत सदरची उपकरणे भंगारमध्ये काढण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

सदर रुग्णालयासाठी मा. महासभेने वाढीव पदे मंजूर केली आहेत, परंतु अजुनही सदर पदांवर नेमणुका झालेल्या नाहीत. सदर रुग्णालयासाठी नेमण्यात आलेले तज्ञ डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचा-यांच्या वेतनापोटी महानगरपालिकेस वार्षिक १ कोटी रुपयांचा खर्च सोसावा लागत आहे. तरीही नागरिकांना वैद्यकीय सुविधा मात्र मिळत नाहीत. सदर रुग्णालयास मा.महासभा दि. २०/९/२०११ तहकुब सभा दि .२०/०८/२०११ अन्वये पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत वैद्यकीय अधिकारी-२, अधिपरिचारिका-१६, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर-२ सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे करीता महासभेने मंजुरी दिली. त्या ही गोष्टीला आज पुर्ण ३ महिने झाले आहेत. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. तरी महासभा दि. २०/९/२०११ व तहकुब सभा दि. २०/८/२०११ ठराव क्र. ५४ अन्वये कारवाही करणे व स्थायी समिती सभा दि. ३१/०१/२०१० ठराव क्रमांक ४३ टेंभा हॉस्पिटल करीता नेमण्यात आलेल्या हॉस्पिटल कंसल्टन्ट प्रमाणे इंदिरा गांधी रुग्णालयसाठी एक स्वतंत्र हेल्थ कंसल्टन्ट कडून हॉस्पिटल अंतर्गत फर्निचर लेआऊट व त्या संबंधी कामे हॉस्पिटलसाठी लागणारी मशिनचे स्पेसिफीकेशन तयार करणे व हॉस्पिटल कर्मचारी प्रशिक्षित करणे कामी अनुभवी अशा हॉस्पिटल कंसल्टन्टची नेमणुक करणे गरजेचे आहे. तरी भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय एक स्वतंत्र मेडीकल कन्सल्टंट कडून Flexibility अहवाल बनविण्यास हॉस्पिटल कंसल्टन्ट नेमणेकरीता ५ लाखांची तरतूद करण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री.ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- डॉ. आसिफ शेख**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | पाटील उमाताई शाम | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | नलावडे दिनेश दगडू | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | सपार उमा विश्वनाथ | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १२ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १२ | पुजारी कांचन शेखर | |
| १३ | राजेंद्र भंवरलाल जैन | १३ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १४ | शर्मा भगवती तुगनचंद | १४ | शफीक अहमद सादत खान | |
| १५ | चक्रे वंदना रामदास | १५ | प्रमोद जयराम सामंत | |
| १६ | माळी हेमा रविंद्र | १६ | मर्लिन मर्विन डिसा | |
| १७ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १७ | विजया हेमचंद्र वैती | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | टेरी पॉल परेरा | १९ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २० | मेहता नरेंद्र लालचंद्र | २० | भट दिप्ती शेखर | |
| २१ | वर्षा गिरधर भानुशाली | २१ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २२ | राजु यशवंत भोईर | २२ | अनिल दिवाकर सावंत | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | पुरोहित मधुसूदन मनोहरलाल | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | | | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | | | |
| २६ | पाटील शरद केशव | | | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | | | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३० | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३७ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३८ | धनेश परशुराम पाटील | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, एक शोकप्रस्ताव आहे. खारीगांव येथील रहिवासी किशोर पाटील ह्यांचे वयाच्या ३६ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने बुधवारी दि.२८/१२/२०११ रोजी निधन झाले तसेच आपल्या महापालिकेचे इंजिनिअर निशांत जाधव ह्यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. आत्म्यास शांती मिळण्यासाठी एक मिनिट स्तब्ध उभे रहावे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, काल भाईंदर वेस्टला जैन मंदीराचे ट्रस्टी राजुभाई शहा ह्यांचेही निधन झाले आहे. त्याचेही शोकप्रस्तावामध्ये समावेश करण्यात यावा.

**नगरसचिव :-**

दोन मिनिट जागेवर उभे राहून मृतात्म्यास श्रद्धांजली वाहायची आहे.

**दुःखवटा ठराव क्र. १११ :-**

खारीगांव येथील रहिवासी किशोर पाटील ह्यांचे वयाच्या ३६ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने बुधवारी दि.२८/१२/२०११ रोजी निधन झाले तसेच आपल्या महापालिकेचे इंजिनिअर निशांत जाधव ह्यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच भाईंदर वेस्टचे जैन मंदीराचे ट्रस्टी राजुभाई शहा ह्यांचेही निधन झाले आहे. त्यांचाही शोकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्री. शशिकांत भोईर अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**आसिफ शेख :-**

सर्व नागरीकांना आणि कर्मचाऱ्यांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा धन्यवाद।

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी कर्मचारी ह्यांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. आजची सभा संपली असे जाहीर करतो. धन्यवाद।

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ५.०० वाजता.**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा

दि. ३१/०३/२०१२

रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ३१/०३/२०१२**

आज शनिवार दि. ३१/०३/२०१२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ११ दि. १९/०३/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | म्हात्रे कल्पना महेश | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २२) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २३) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २४) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २६) | फ्रॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४२) | नरेंद्र मेहता | गटनेता |

| | | |
|---|---|---|
| ४३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४८) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ५०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५१) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५२) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५३) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५४) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५५) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५७) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५८) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५९) | ठाकूर कल्प... हरिहर | सदस्या |
| ६०) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६१) | मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६२) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६३) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६४) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६५) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६७) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६८) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६९) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ७०) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७१) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७३) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७५) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ७६) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | हंसुकुमार पांडे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| २) | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | सदस्या |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सदस्य |
| ४) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ६) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**प्र.सचिव:-**

कृपया सर्वांनी राष्ट्रीय गीत "वंदे मातरम" साठी जागेवर उभे राहायचे आहे.
(वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने सभेला सुरुवात करण्यात आली )

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा शनिवार, दि. ३१/०३/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ११, दि. १९/०३/२०१२ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्रं. १२८, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५३, ठराव क्र.१२९) मी मा. स्थायी समिती सभापती यांनी सन २०१२-१३ चे अंदाज पत्रक मा. महापौरांना सादर करण्यासाठी व्यासपीठावर आमंत्रित करीत आहे.

**एस.एस.पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

मा. आयुक्त साहेब, वैयक्तिक रजेवर आहेत.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९, शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५४, ठराव क्र.१३०) प्रकरण क्र. १३०, परिवहन सेवेचे सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५५, ठराव क्र.१३१) मा. सभापतींनी निवेदन करण्यास मी आमंत्रित करतो.

(मा. सभापती, स्थायी समिती यांनी निवेदनाचे वाचन केले.)

**नरेंद्र मेहता:-**

मा. महापौर साहेब, आजच्या सभेत सर्वप्रथम जी मागची तहकुब सभा होती, त्याबद्दल आपण माहिती दिली तर व्यवस्थित या सभेचा, कारण आजचा जो विषय आहे, तो आर्थिक विषय आहे. आपल्याला आर्थिक निणय घ्यायचे आहेत. बजेटचा विषय आहे. फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभा ही तहकुब झाली होती. त्यामध्ये अनेक आर्थिक प्रश्न आहेत ती सभा आत्तापर्यंत झालेली नाही. ती सभा ३१ मार्चच्या अगोदर झाली असती तर आपल्या पुढचे बजेटचे कामकाज आपल्याला व्यवस्थित करता आले असते हे बजेट कुठेतरी कॉन्ट्रेटीक होणार नाही आम्ही मा. आयुक्तांना आणि सचिवांना वारंवार विनंती केली की, ३१ मार्चच्या अगोदर आपण तहकुब सभा लावली तर पुढचे काम आपल्याला व्यवस्थित पार पाडता येईल. मा. महापौर साहेबांना आज विनंती आहे की, आज जरी विशेष सभा असली तरीही सभागृहात आपण त्या तहकुब सभेची वेळ निश्चित करावी अशी मी विनंती करतो.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, ही बजेटची विशेष महासभा आहे. आणि फक्त बजेटवरच चर्चा व्हावी. इतर विषय या सभेमध्ये घेता येणार नाही.

**एस.ए.खानः-**

मा. महापौर साहेब, बजेटबद्दल सभा लावलेली आहे आणि आज शेवटचा दिवस आहे. अर्थसंकल्पाबद्दल जे काही बोलायचे असेल ते तुम्ही बोला.

**नरेंद्र मेहताः-**

मा. महापौर साहेब, माझा म्हणण्याचा उद्देश होता की, आपण आर्थिक निर्णय आज घेणार आहोत. आणि हे पण आर्थिक विषय आहेत.

**प्रभात पाटील :-**

माझी विनंती आहे की, ह्या बजेटवर चर्चा होऊ दया. ठराव होऊ दया. त्यांच्या प्रश्नाचे उत्तर नंतर दया. पहिला हा विषय आहे. त्यामुळे हा विषय होऊन जाऊ दया.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

प्रकरण क्र. १२९ च्या ठरावाचे वाचन केले.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, तुम्हाला विषय घेता येणार नाही. ठराव वाचन केले का? आपण मा. महापौरांना दिला का? निर्णय झाला का?

(सभागृहात गोंधळ)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण वाचलेले होते. त्याच्यावर त्यांनी ठराव वाचलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी वाचला आहे. तुमच्याकडे ठराव घेऊन तुम्ही वाचन करुन मा. महापौरांना दयायला पाहिजे.

**प्र. नगरसचिव :-**

माझ्याकडे वाचन करण्याची काय आवश्यकता आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कोणी सांगितले वाचन करायला नको?

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, आम्ही उभे आहोत. त्या विषयावर तुम्ही आम्हाला काही बोलू देणार नाही का?

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

१२८ ते जितके विषय आहेत, आम्हालापण बोलायचे आहे. आम्हालापण संधी दया.

**डॉ. आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आजची ही बजेटची मा. महासभा आपण लावलेली आहे. या मा. महासभेमध्ये प्रकरण क्र. १२८ वन-बाय-वन झाले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख जे बोलतात की, बजेटचे १२८ विषय पूर्ण वाचून झाले पाहिजे. त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे. मा. स्थायी समितीमध्ये याच्या निवडुन दिलेल्या मा. सभापतींनी चर्चा करु दिली नाही.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आजची सभा ही बजेटची विशेष सभा आहे. या सभेचे कामकाज सभा कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. ही मा. महासभा आहे. ही स्टँडींग कमिटी नाही. स्टँडींग कमिटी म्हणजे परफेक्टली अंडरस्टँडींग कमिटी असते.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. आसिफ शेख :-**

स्टँडींग कमिटीमध्ये काय झाले ते मा. महासभेमध्ये बोलण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार नाही. तुम्ही सदस्य आहात.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. आसिफ शेख :-**

मा. स्थायी समितीमध्ये चर्चा झालेली आहे. आता मा. महासभेमध्ये चर्चा करु दया. मला या ठिकाणी एवढे म्हणायचे आहे की, सन्मा. सभागृह नेता यांनी प्रकरण क्र. १२८ चे जे वाचन या ठिकाणी केलेले आहे, त्यावर अनुमोदन दिले आणि मा. महापौरांनी मान्यता दिली नाही. तर एक एक विषय होऊ दया. एकत्र मान्यता दयायची प्रथा नाही. तुम्हाला एवढी घाई कशाला आहे. विस्तृत चर्चा होऊ दया. आणि टप्प्याटप्प्याने चला.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, ठरावावर आपला निर्णय दया. त्यांना ठराव करायचा असेल तर ते करतील.

**आसिफ शेख :-**

सचिव साहेब, सभा कामकाज नियम सांगा.

**अनिल सावंत :-**

सन्मा. महापौर साहेब, मा. विरोधी पक्षनेत्यांनी अपशब्द वापरुन मा. स्थायी समितीचा अपमान केलेला आहे. सर्व स्टँडींग कमिटीचे सदस्य त्यांचा निषेध करतात. त्यांनी माफी मागावी, नाहीतर आम्ही सभा चालू देणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मर्लिन डिसा :-**

Dr. Asif Shaikh, I would like to ask you, what is the meaning of understanding?

**बर्नट डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, मी अंडरस्टँडींगचे सांगतो. स्टँडींगमध्ये आम्ही पण आहोत.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, लक्ष दया. यांच्या ठरावानंतर आम्हाला पण ठराव करायचा आहे.

**मा. महापौर :-**

पहिल्या प्रकरणापासून सुरुवात करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५३, ठराव क्र.१२९)

**प्रभात पाटील :-**

ठरावाचे वाचन केले.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आमची एक छोटी सुचना आहे. या बजेटमध्ये गार्डन विकसीत करण्यासाठी ७ करोड ७५ लाखाची तरतुद आहे. आणि सुभाषचंद्र मैदानाला फक्त पाच ते दहा लाख रुपये आहेत. तर आमची विनंती आहे की, सुभाषचंद्र मैदानाला त्यातले ५० लाख रुपये आपण वर्ग करा. आणि ७ करोड २५ लाख गार्डनसाठी ठेवा. कारण सुभाषचंद्र मैदान याच्यात आपण कुठल्याही प्रकारची डेव्हलपमेंट केली नाही. आपल्याकडे कुठल्याही प्रकारची शिल्लक नाही. पाच लाख रुपयांमध्ये विकसीत काय, आपण पाणी सुध्दा मारु शकत नाही. सचिव साहेब, माझी ठरावामध्ये सुचना घ्या की, नवीन गार्डन विकसीतला ७.७५ आहेत. त्यामधुन ५० लाख रुपये सुभाषचंद्र मैदानाला करावे आणि हे ७.२५ करावे.

**प्र. नगरसचिव :-**

सुचना लेखी दया.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ५० लाखसुध्दा कमी पडतील. कारण आता एरिया वाढत चाललेला आहे.

**शरद पाटील :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

त्याच्यामध्ये लाल माती टाकायची आहे. भाईंदरमध्ये ते फक्त एकच खेळाचे मैदान आहे. तुम्ही स्वतःपा बघितले की, तिकडे ईस्टमधून नवघर, खारीगाव, सर्व मुले क्रिकेट खेळायला तिकडे येतात. त्याकरिता कमीत कमी ५० पूर्ण होणार नाही. ७५ लाख किंवा एक करोड घ्या.

**मा. महापौर :-**

सुचनेसह ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०११/२०१२ सुधारित व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रक विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०११/१२ चे सुधारीत व सन २०१२/१३ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

आकडे लाखात

| तपशिल | 2011/12 (सुधारित अंदाज) | 2012/13 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 153.60 | 251.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 471.40 | 1035.00 |
| एकूण खर्च | 624.00 | 1285.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**चंद्रकांत मोदी :-**

सुचनासहीत ठराव मांडने के बाद फिरसे ठराव थोडा होता है?

**शरद पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे आणि माझी त्याच्यात एक सुचना आहे. वृक्षप्राधिकरण गार्डन / उद्यान विकसीत करीता ७७५ एवजी ६८० करण्यात यावे व सुभाषचंद्र बोस मैदान याची १०० लक्ष तरतुद करण्यात यावी.

**रामनारायण दुबे :-**

मेरा अनुमोदन है।

**मिलन पाटील :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चॅप्टर २ चा जो कलम आहे, त्यानुसार कुठलाही बदल , मा. स्थायी समितीने जे अर्थसंकल्प सादर केलेले आहे, त्याच्यामध्ये कुठल्याही आकडयाचा बदल करायचा अधिकार कोणालाही नाही.

**मिलन पाटील:-**

मा. महासभा ही सुप्रीम आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, हे मी बोलत नाही,

**मिलन पाटील :-**

त्यांना जर अधिकार होता तर त्यांनी बजेट आणयचेच नव्हते.

**जुबेर इनामदार :-**

विधी विभागाचे अधिकारी इकडे बसलेले आहेत, त्यांचा अभिप्राय घ्यावा . मी वाचून दाखवतो. चॅप्टर-२ चा ल. अर्थात मा. महासभेमध्ये फक्त त्या विषयावर चर्चा होऊ शकते. तुम्ही विषयावर भाषण करू शकता. आकडयांमध्ये बदल करू शकत नाही.

**मिलन पाटील :-**

श्री. जुबेर इनामदार साहेब, तुमची पहिली टर्म आहे आणि मा. महापौराना मराठीतून लागते हे तुम्ही लक्षात घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही विधी विभागाचा अभिप्राय घ्या.

**मिलन पाटील :-**

तुम्ही जाणूनबुजून मा. महापौराची दिशाभूल करता.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही मा. महापौरांना विचारा की, समजले की, नाही?

**मा. महापौरः-**

मला या ठिकाणी सर्व काही समजते.

**मिलन पाटील :-**

त्यांनी सुचनेसह मंजुर केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मंजुर केलेले नाही. दोन ठराव झाले आहेत. मतदान घ्यावे लागेल.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, यांना बी.पी.एम.सी. ॲक्ट १०१ वाचायला सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, पाच वर्ष या सभागृहामध्ये मा. महासभेमध्ये यांनी बजेटमध्ये प्रत्येक वेळी सुधारणा केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. स्थायी समितीमध्ये चर्चा करू दिली नाही. मा. स्थायी समितीला अधिकार होता. प्रत्येक विषयावर चर्चा होऊ शकत होती. सन्मा. स्थायी समिती सभापती यांनी या विषयावर चर्चा करू दिली नाही. मा. महासभेमध्ये त्याचे आकडे बदलण्याचे अधिकार नाही. त्याच्यावर फक्त चर्चा होऊ शकते. त्याच्यावर सर्व सन्मा. सदस्य भाषण करू शकतात; त्याच्या आकडयामध्ये बदल करू शकत नाही. कुठल्याही खर्च किंवा जमा बाजूमध्ये बदल करता येत नाही. मा. महासभेमध्ये तुम्ही सभा कामकाज बघितले नाही असा याचा अर्थ झाला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मगासपासुन मी परवानगी मागतो आहे. सभागृहाने थोडे शांत राहिले तर जरा बरे होईल. कारण मागच्या वेळेची बजेटची मिटींग दोन मिनिटांत संपलेली होती आता नऊशे कोडचे बजेट आहे. सदर बजेट हे ॲन्टी चेंबर बजेट आहे असे मी म्हणतो कारण आम्ही जेव्हा स्टँडींगला होतो, तुम्ही सुध्दा माझ्याबरोबर होते.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

आत्तापर्यंतच्या आपल्या महापालिकेच्या इतिहासामध्ये कधीही ॲन्टी चेंबरमध्ये बजेट पास झाले नाही. आम्ही स्वतः सदस्य असताना दहा-दहा, बारा-बारा, पंधरा-पंधरा दिवस दहा-दहा, बारा-बारा, तास मॅरेथॉन बैठका घेऊन आम्ही सविस्तर बजेट मांडले.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ग्रामपंचायती पासून पार्लमेंटच्या सदस्यांपर्यंत प्रत्येक सभागृहाच्या स्टँडींग कमिटी, कुठे कॅबिनेट मिनिस्ट्री वगैरे सगळे असते. आपल्यामध्ये बरेचसे नगरसेवक सिनिअर आहेत. आत्ता मला सांगा, कॅबिनेटची मिटींग झाल्यांनतर कॅबिनेट जे फायनलाईज डिसीजन घेते, ते तुमच्या दोन्ही हाऊसमध्ये भरते आणि त्याच्यानंतर फाईनलाईज निर्णय होतो. एक लक्षात घ्या, आत्ता यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले ते कळीचे मुद्दे आहेत, वाद होतील, आपल्याला काय दिवसभर आम्हालातरी वेळ नाही. गेल्या दहा वर्षात ज्या दहा जनरल बॉडी मिटींग झाल्या, त्या अवैध होत्या का? तुम्ही आमच्या सुचना घ्या. आम्ही स्टँडींगमध्ये नाही.

**मा. महापौर :-**

मैं आपके साथ है।

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र.६१ वर माझी सुचना आहे. जरा कॅफोने क्लीअर केले तर बरे होईल. मला फायर ब्रिगेडने हे पत्र दिले आहे आणि याच्यामध्ये २० कोटी ९७ लाख बाकी दाखवली आहे आणि तुमच्या बजेटच्या पान क्र.६१ वर ९ करोड ७९ लाख ही अमाऊंट आहे. आत्ता हे खरे आहे की, हे खरे आहे ते मला सांगा.

**डॉ. आसिफ शेख :-**

प्रकरण क्र.१२८ सुरु आहे आणि प्रकरण क्र. १२८ वर दोन ठराव आलेले आहे नियमाप्रमाणे मतदान घ्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, मी मांडलेल्या विषयावर मला अभिप्राय पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, विषय झालेला आहे. मतदानाला टाका.

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. सदस्यांची जी सुचना आहे. ती सुचना ठरावामध्ये समाविष्ट करुन मंजुर केले तर मतदानाची वगैरे गरज नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, मी जी माहिती इथे सभागृहाला दिलेली आहे त्याच्यावर तुम्ही मला अभिप्राय द्यावा त्यांनी ठराव मांडला त्याच्यामध्ये मा. स्थायी समितीने सुचविलेले आकडे त्यांनी बदलले त्याच्यावर मतदान होऊ शकत नाही. चुकीच्या ठरावाला मतदान कसे करणार? किंवा त्यांनी ते मान्य करावे की, मा. स्थायी समितीने जे केले ते आकडे आम्हाला मंजुर आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मग आपण सर्वांनी जाऊया. मा. स्थायी समितीने केल्याप्रमाणे कामकाज करा. इकडे बसायची काय गरज आहे. साहेब, आपण विषय आणला आहे, तो निर्णयासाठी आणला आहे.

**मा. महापौर :-**

सुचनेसह ठराव मंजुर केलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आम्ही जेव्हा ठराव मांडला तेव्हा सन्मा. माजी महापौर यांनी दोन वेळा सुचना मांडली. आत्ता ते म्हणत असतील की, मी शब्द मागे घेतो हरकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्या सुचनेला कोणी अनुमोदनच दिले नाही.

**डॉ. आसिफ शेख :-**

आपण जो निर्णय दिलेला आहे, तो अयोग्य निर्णय आहे दोन ठराव आलेले आहेत. नियमाप्रमाणे आपण मतदान घ्या.

**प्रभात पाटील :-**

ते काही म्हणत असतील त्यांची सुचना आम्हाला मान्य होती मला असे वाटते की, तुम्ही सुध्दा वरुन तेच बोललात की, सुचनेसह ठराव मंजुर हरकत नाही.

**डॉ. आसिफ शेख :-**

सभागृहात तुम्हाला असे करता येणार नाही.

**प्रभात पाटील :-**

तरी तुम्हाला पुढे जाऊन सांगते की, मी मागच्या मा. महासभेतसुध्दा बोललेले, आपला मोठा पक्ष आहे, आपला सिनिअर पक्ष आहे, आपले मन मोठे आहे. त्यांच्या सुचनेसह ठरावाला आम्ही अनुमोदन देतो आमचा ठराव पटलावर आला नाही तरी हरकत नाही पण तो जो ठराव झाला आहे, सेम-टू-सेम आहे. त्यांची सुचनासुध्दा आम्हाला मान्य आहे. त्याच्यामुळे मतदान न घेता तोच ठराव पारित करावा अशी आपणांस विनंती आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

आम्हाला विनंती अमान्य आहे. आम्ही दोन ठराव केलेले आहेत. आम्ही मतदानाची मागणी करतो तुम्ही मतदान घ्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, विधी विभागाला त्यांचा अभिप्राय द्यायला सांगा

**प्रभात पाटील :-**

आम्ही त्या ठरावाचे समर्थन करतो आहे. आमच्या ठरावाचे काय करायचे हा आमचा अधिकार आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

आम्ही आमचा ठराव मागे घेणार नाही मतदान घ्या.

**जुबेर इनामदार :-**

सभा कामकाज नियम आमच्या हिशोबाने चालत नाही. केंद्र शासन, राज्य शासनाने त्याचे नियम ठरवलेले आहेत. नियमाप्रमाणे चालली पाहिजे त्यांनी जो ठराव मांडलेला आहे तो बसतच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्यांचे म्हणणे आहे की, दोन्ही ठराव एक आहेत. ज्यावेळी मा. सभागृह नेत्यांनी ठराव मांडला. त्यामध्ये मी सुचना मांडली त्या सुचनेची रक्कम वेगळी होती आणि त्याला कोणी ही अनुमोदन दिलेले नाही. अनुमोदन दिल्याशिवाय सुचना घेता येत नाही. श्री. आसिफ शेख यांनी जो ठराव मांडला, त्यामध्ये श्री. शरद पाटील यांनी सुचना मांडलेली आहे. ती एक करोडची आहे म्हणजे दोन्ही ठरावात बदल आहेत. हि एक करोड आहे इकडे पन्नास लाख होते मग दोन्ही ठराव आपल्याकडे वेगळे आलेले आहेत. दोन्ही ठराव एकसारखे नाहीत म्हणुन आपल्याला मतदान घेणे गरजेचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मुळ ठराव एकच आहे. सुचना त्यांच्या दोन झाल्या आहेत बदल त्यांच्या सुचनेमध्ये आहेत ठरावात बदल नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावात पक्ष चालत नाही व्यक्तीगत सदस्यांची भुमिका चालते.

**भगवती शर्मा :-**

आम्ही ठराव केलेला आहे. ज्यांना ज्या ठरावामध्ये सुचना करायची आहे ती करा आम्ही मान्य करणार की नाही तो आमचा अधिकार आहे. तुम्ही मतदानाला टाका. आमचा ठराव श्री. आसिफ शेख यांनी केलेला आहे, त्याचे अनुमोदन श्री. शरद पाटील यांनी केले आहे आणि सुचनेचे अनुमोदन श्री. मिलन पाटील यांनी केले आहे तो आमचा ठराव आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे आणि त्यांनी सांगितले की, विधी विभागाने त्याचा खुलासा करावा जर अशा पध्दतीचा विषय कंजस्टेड होत असेल तर खरोखरच खुलासा करावा.

**राजेंद्र जैन :-**

श्री. जुबेर इनामदार साहबने जो मुद्दा उपस्थित किया वो विषय प्रशासन अपना निर्णय लेगा की, उसपर फेरबदल हो सकता है की नही। लेकीन मा. महासभा का अधिकार है, चर्चा करके मतदान करे मानना नही मानना विधी संगत काम होगा तो प्रशासन प्राप्त करेगा मतदान का अधिकार मा. महासभा का है।

**जुबेर इनामदार :-**

आप कुछ भी गलत ठराव करेंगे, नियमबाह्य ठराव करेंगे तो होता है क्या?

**भगवती शर्मा :-**

नियमाच्या विरुध्द तुम्ही ठराव केलेला आहे तो आत्ता विखंडीत झाला आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, विधी विभाग की राय जो भी हो यह स्पष्ट किजीए की, हम मतदान कर सकते है की नही?

**जुबेर इनामदार :-**

विधी मॅडम, आपण त्या विषयाचा खुलासा करावा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मॅडम, आप जो भी राय देंगे, वो उस विषय पर देंगे। हमारा मानना है की, हम अगर मा. महासभा मे किसी बात के उपर अपना पक्ष रखकर मतदान की मांग करते है। उस विषय पर हम मतदान कर सकते है की नही कर सकते यह हमे चाहीए।

**जयंत पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांना मी विनंती करतो, आपल्या सर्वांना कल्पना आहे की, या शहराचे प्रथम नागरीक आपले सर्वांचे लाडके मा. महापौर साहेबांची तब्येत बरी नसल्यामुळे आणि ते कालच हॉस्पीटलमधुन घरी आलेले आहेत आणि हा अर्थसंकल्प वर्षातुन एकदा करावा लागतो या शहराचे बरे वाईट करणे या अर्थसंकल्पामध्ये आहे तेव्हा कुठल्याही छोट्या-छोट्या गोष्टीवर एखादा ईगो पॉईंट करुन असेच असेल, असाच नियम आहे मी या महापालिकेमध्ये आणि माझ्यासोबत अनेक नगरसेवक जे आहेत ते चार-चार टर्ममध्ये आहेत आणि चारही टर्ममध्ये चार गुणिले पाच, म्हणजे वीस वेळा अर्थसंकल्प आलेला आहे त्यामध्ये अशा तऱ्हेचे प्रकरण कधीही आलेले नाही आणि माझ्या माहितीप्रमाणे श्री. जुबेर इनामदार गेली चार वर्षे चार अर्थसंकल्प झाले तेव्हासुध्दा हा प्रश्न आपण कधी काढला नाही आणि तो जर तसा असता तर शासनाने कधीच आपल्याला विरोध केला असता या सभागृहातील फक्त सोळा सदस्य हे मा. स्थायी समितीमध्ये असतात म्हणजे बाकीच्या उर्वरीत सदस्यांना काही चर्चा करण्याचा अधिकार नाही काही बदल करण्याचा अधिकार नाही असा नियम होऊ शकत नाही मी हे माझे मत सांगतो या पुस्तकात काय आहे ते मला माहिती नाही प्रत्येकाला अधिकार आहे आणि आपण असे चर्चेद्वारे केलेले आहे तर आपल्याला विनंती आहे की आपण सर्वांनी शांततेने, सभागृहातील कुठलाही ठराव हा बहुमताने पास होतो हा नियम आहे यात कोणालाही बदल करता येणार नाही. सभागृहात कोणत्या गटाचे किंवा कोणत्या पक्षाचे बहुमत आहे त्याच्यावर तो निर्णय होऊन जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

बीपीएमसी ॲक्ट मध्ये पुर्णपणे या बजेटच्या मिटींगला एवढे महत्व आहे की, त्या मिटींगमध्ये इतर कुठलेही कामकाज करायचे नाही फक्त बजेट त्याकरीता त्यांनी खुलासा करण्यापेक्षा सचिवांनी लवकर खुलासा करुन मार्ग मोकळा करावा विषय संपला.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. उपमहापौर साहेबांनी सांगितले की, मा. महापौर साहेबांची तब्येत खराब आहे आणि अशा परिस्थितीमध्ये आपल्याला हे कामकाज व्यवस्थित पार पाडायचे आहे दोन मिटींगमध्ये विधी विभागाने त्यांचा खुलासा करावा. पुढच्या कामाला सुरुवात करावी.

**सई वडके :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, मा. नगरसेवक श्री. जुबेर इनामदार साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यांनी अनुसुची ड मधील प्रकरण क्र.२ महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज त्याच्यामध्ये त्यांनी नियम "ल" वाचलेला आहे. त्याच्यामध्ये स्टँडींग कमिटीने एखाद्या कराचे दर ठरवले असतील किंवा ट्रान्सपोर्ट कमिटीने एखादे फेअर किंवा चार्जेस ठरवले असतील तर ते मा. महासभेला सेक्शन १०० प्रमाणे फायनल ॲडॉप्शनसाठी जातील तो बदल करण्याचे अधिकार स्पेसिफाईड नोटीस दिल्याशिवाय करता येणार नाही जर मा. महासभेला कराच्या दरामध्ये, बदल करायचा असेल तर...

**जुबेर इनामदार :-**

मॅडम नो प्रोपोसिशन इन्व्हॉल्वींग एनी चेंजेस इन टॅक्सेस झाले. त्याच्यानंतर इन्क्रीज ऑर डिक्रीज इन एनी आयटम ऑफ एक्सपेन्डीचर इन अ बजेट एस्टीमेट शॅल बी मेड ऑर डिफ्युज ॲट एनी मिटींग ॲट विच सच बजेट एस्टीमेट इज अंडर कंसिडरेशन.

**सई वडके :-**

तुम्हाला ते कंन्टीन्युएशनमध्ये वाचायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

मी कंन्टीन्युएशनमध्येच वाचतो आहे मा. स्थायी समितीने सुचविलेली कुठलीही करवाढ, ट्रान्सपोर्ट कमिटीची कुठलीही दरवाढ किंवा कुठलाही खर्च किंवा जमेच्या बाजुमध्ये कुठलाही बदल करण्याचा अधिकार कुठल्याही सभेला नाही तुम्ही हे परत परत वाचा याच्यात तुम्ही अभिप्राय देता तो रेकॉर्डींगमध्ये जातो आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

मॅडमनी निर्णय दिलेला आहे. त्याच्यामध्ये कोणतीही करवाढ नाही. दरवाढ असेल तरच तो नियम लागू होतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. साहेब, १०१ मध्ये वाचा. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात वाढ करता येईल किंवा अतिरिक्त अनुदान मंजुर करता येईल. सगळे शिफ्ट करता येते.

**जुबेर इनामदार :-**

मा. स्थायी समितीने तुमचे बजेट सादर केले. या विषयावर शासनाचा अभिप्राय घ्यावा.

**डॉ. आसिफ शेख :-**

सभागृहाचे कामकाज हे नियमाप्रमाणे चालले पाहिजे. दोन ठराव आलेले आहेत. तुम्ही मतदान घ्या. आमचा ठराव बेकायदेशीर असेल तर तुम्ही विखंडीत करायला पाठवा, त्यावर शासन निर्णय येईल.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, मी जो विषय इथे मांडलेला आहे. त्याकरीता शासनाकडे हा विषय पाठवा आणि त्यांचा अभिप्राय घ्यावा. कुठल्याही बदलावर माझा विरोध नोंदवून घ्या. आज या सभागृहामध्ये जे काही ठराव होतील त्याच्यामध्ये कुठलाही बदल असेल तर माझा विरोध आहे. तो विरोध तुम्ही नोंदवून घ्या.

**प्रभात पाटील :-**

मी मगाशीपण बोलले की, दोन्ही ठराव एक आहेत. आमचे मन मोठे आहे. आमच्या ठरावाचे काय करायचे ते आम्ही ठरवणार, आमचा ठराव तुम्ही पटलावर घेऊ नका असे मी मगाशीही बोलले. आमचा ठराव ॲज इट इज राहू दया. तुमचा ठराव तुम्ही मंजुर करुन घ्या. मतदान घ्यायची गरज नाही. आम्ही मागे घेतो.

**मा. महापौर :-**

सुचक डॉ. आसिफ शेख आणि अनुमोदन शरद पाटील यांनी मांडलेला ठराव सुचनेसह मंजुर करण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, मा. स्थायी समितीने सुचविलेल्या अर्थसंकल्पामध्ये कुठलाही बदल असेल तर त्या बद्दलाला माझा विरोध आहे. तुम्ही नोंदवून घ्या.

**प्रकरण क्र. १२८ :-**

वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५३, ठराव क्र.१२९)

**ठराव क्र. १२५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०११/२०१२ सुधारित व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रक विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०११/१२ चे सुधारीत व सन २०१२/१३ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**आकडे लाखात**

| तपशिल | 2011/12 (सुधारित अंदाज) | 2012/13 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 153.60 | 251.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 471.40 | 1035.00 |
| एकूण खर्च | 624.00 | 1285.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**सुचक :- डॉ. आसिफ शेख** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शरद पाटील व अनुमोदक श्री. मिलन पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

वृक्षप्राधिकरण गार्डन / उद्यान विकसीत करीता ७७५ ऐवजी ६८० करण्यात यावे व सुभाषचंद्र बोस मैदान याची १०० लक्ष तरतुद करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९, शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५४, ठराव क्र.१३०)

(श्रीम. प्रभात पाटील यांनी प्रकरण क्र. १२९ च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, शिक्षण अधिकारी आहेत का? मा. आयुक्तांनी टॅक्सच्या इन्कमची साठ करोड रुपये तरतुद केली होती. त्यावेळी शिक्षण कराचे उत्पन्न हे तीनशे अडतीस लक्ष होते. पण ज्यावेळी मा. स्थायी समितीने तीन करोड रुपये टॅक्समध्ये वाढ केली, तर त्या रेशोमध्ये शिक्षण करही वाढायला पाहिजे. ते इकडे फिगरमध्ये का आले नाही त्याचा मला खुलासा करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या प्रपोर्शनेटमध्ये करुन घेतो.

**नरेंद्र मेहता :-**

प्रपोर्शनेट केल्यानंतर उत्पन्न वाढेल. आत्ता ते वाढलेले उत्पन्न तुम्ही जे "अ" अंदाजपत्रकाकडून हस्तांतरण करुन घेणार आहात, त्यामध्ये तेवढी रक्कम कमी करणार का? मग हे बजेट करताना तेवढे दिसत नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फायनल करते वेळी करु.

**नरेंद्र मेहता :-**

इन्कम वाढेल. मग ते पैसे कुठे जाणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हा अंदाज आहे.

**अनिल सावंत :-**

स्टँडींगमध्ये बघितले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

स्टँडींगच्या नंतर यांची चुक झाली. मा. आयुक्तांनी टॅक्सचे प्रोव्हीजन साठ करोड रुपये केले होते. ते स्टँडींगने त्रेसष्ट केले. तर शिक्षण करपण त्या प्रपोर्शनेटमध्ये वाढायला पाहिजे. आपण जो फिगर इकडे दिला आहे तो सेम दिला आहे. म्हणजे मा. आयुक्तांनी साठ वर ३.३८ दिला. आत्ताही ३.३८ आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, हे अंदाजित आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आपण इकडे बजेट मान्य करायला आलेलो आहे. अंदाज घ्यायला आणि दयायला आलेलो नाही. मा. स्थायी समितीने ६३ करोडचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे ही फिगर वाढली पाहिजे. ही फिगर वाढली तर मुळ बजेटमधून जी हस्तांतरण करायची, ती रक्कम कमी होईल. मला फक्त फिगर दया की, इन्कम किती वाढणार आहे. आम्ही तशी सुचना मांडतो.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०११/२०१२ सुधारित व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत चर्चा करून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०११/१२ चे सुधारीत व सन २०१२/१३ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आकडे लाखात**

| तपशिल | 2011/12 (सुधारित अंदाज) | 2012/13 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1207.48 | 1396.59 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 525.48 | 611.49 |
| एकूण खर्च | 1732.96 | 2008.08 |

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पाणी पुरवठा, अग्निशमन कर, सिव्हरेज टॅक्स सगळीकडे चुकीची फीगर आहे. स्टँडींगने काय सहज केले का? बदल करायला नको? पूर्ण बजेटवर तो इफेक्ट येणार आहे. स्टँडींगने ते मान्य केले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी ते मा. महासभेपुढे बदल करुन सुचवायचे असते.

**अनिल सावंत :-**

तुमचा मुद्दा बरोबर आहे. स्टँडींगमध्ये जर हेडवाइज चर्चा झाली असती तर हा मुद्दा निकालात निघाला असता.

**नरेंद्र मेहता :-**

स्टँडींगने मान्य केल्यानंतर ज्यावेळी मा. महासभेला सादर केले त्यावेळी ती फिगर दुरुस्त करुन दयायला पाहिजे. टॅक्समध्ये रक्कम वाढवली, मग ही रक्कम वाढवून दयायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

स्टँडींगमध्ये ज्यावेळी प्रॉपर्टी टॅक्स ६३ करोड केला, त्या प्रपोर्शनेटने सर्व टॅक्स वाढायला पाहिजे होते. आत्ता याच्यावर एक काम करा, प्रपोर्शनेटली त्यांना वाढवून घ्यायला सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या प्रपोर्शनेटमध्ये सर्व टॅक्स वाढवून घेतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांनी जो ठराव मांडला त्यामध्ये सुचना देतो. शिक्षण समितीमध्ये टॅक्सचे उत्पन्न कमी दाखवले आहे. जी वाढ होईल ती मुळ बजेटमध्ये हस्तांतरीत करण्यात यावी.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद बेलवटे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. बाकी सर्व ठिकाणी त्याचा इफेक्ट दिलेला होता. पान क्र. २४ वर शासनाचा करसुध्दा आपण वाढवलेला आहे. परंतु बजेट स्वतंत्र असल्यामुळे त्याच्यामध्ये १५ लाखाची वाढ आहे. त्याच्याकडून टायपिंगमध्ये घेतले गेलेले नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या निदर्शनास एक आणू इच्छितो. या शिक्षण अधिकाऱ्यांना विचारा, आपल्या महानगरपालिकेतील सातवीची जवळ-जवळ तीनशे-साडे तीनशे मुले होतात. आमच्या भाईंदर सेकंडरीमध्ये एवढी मुले

सामावून घेण्याकरीता कॅपेसिटी नाही. आमच्याकडे फक्त तीन वर्ग आहेत. याच्या पुढील जी मुले आहेत, त्यांची यांनी काही प्रोव्हीजन केली आहे की, नाही? नंतर ती मुले कुठे जातील? आपण त्यांना पैशाचे प्रोव्हीजन करुन देतो. पण याची पुढील कार्यवाही केली आहे का? त्याचा पुढील अंदाज आखलेला आहे का? आपण पुढील वर्ग करणार की, नाही? शिक्षण अधिकारी तुम्हाला पत्र आलेले आहे का? मग तुम्ही त्याचे काय प्रोव्हीजन केले आहे? तुम्हाला निधी वाढवून दिलेला आहे.

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. आम्ही सर्वे करुन शिक्षण मंडळामध्ये ठेवून त्याप्रमाणे कुठे शाळांची आवश्यकता आहे तसा शाळा उघडण्याचा निर्णय शिक्षण मंडळामध्ये घेऊन कळवतो.

**मिलन पाटील :-**

ही मुले शिक्षणापासून वंचित राहिली नाही पाहिजेत.

**शिक्षण अधिकारी :-**

आम्ही तसा सर्वे करुन प्रत्येक शाळेमधून अमाऊन्ट घेतलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

मी अगोदरच सांगितलेले की, आमचे मन मोठे आहे. ठराव मांडला. तुम्हाला जो मेजोरिटीने आहे तो पास करा. आम्हाला तो ठराव मतदानावर टाकायचा नाही. मी अगोदरच सांगितले आहे.

**मा. महापौर :-**

श्री. आसिफ शेख यांनी मांडलेला ठराव सुचनेसह मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२९ :-**

*शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास* मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५४, ठराव क्र.१३०)

**ठराव क्र. १२६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०११/२०१२ सुधारित व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०११/१२ चे सुधारीत व सन २०१२/१३ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आकडे लाखात**

| तपशिल | 2011/12 (सुधारित अंदाज) | 2012/13 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1207.48 | 1396.59 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 525.48 | 611.49 |
| एकूण खर्च | 1732.96 | 2008.08 |

**सुचक :- डॉ. आसिफ शेख अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

शिक्षण समितीमध्ये टॅक्सचे उत्पन्न कमी दाखवले आहे. जी वाढ होईल ती मुळ बजेटमध्ये हस्तांतरीत करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रं. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३०, परिवहन सेवेचे सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५५, ठराव क्र.१३१)

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, पान क्र. ०६ वर पी.पी.पी. ठेकेदाराकडून येणारी रक्कम २९० लक्ष, या २०१० मध्ये महापालिकेला परत दयायची होती. मागच्या वेळी याच ठेकेदारामुळे आपला बजेट गडबड झाला होता. ती रक्कम गेल्या दोन वर्षापासून अजूनपर्यंत का वसूल करण्यात आलेली नाही? ती रक्कम कोणती आहे तीही आपल्याला माहिती देतो की, आपल्याला परिवहन बसेस हव्या होत्या. आपल्या ठेकेदाराची नियुक्ती झाली नव्हती. त्यावेळी स्टँडींगमध्ये आपण एक निर्णय घेतला की, जोपर्यंत ठेकेदार अपॉईंट होत नाही तोपर्यंत स्टँडींगमधून तात्पुरती मुळ बजेटमधून त्या

ठेकेदाराचा जो काही भाग आहे तो महापालिकेने भरावा. ठेकेदार अपॉइन्ट झाल्यानंतर ते पैसे त्याच्याकडून परत घेण्यात यावे. २०१० ला किंवा २०११ ला आपण हा ठेका दिला. ते पैसे अजूनपर्यंत परत आले नाहीत. मागच्या वर्षी पाच करोड होते. यावर्षी तीन करोड आहेत. साहेब आपण एम.एम.आर.डी.ए. यांना त्यांना जे बँक इंटरेस्ट देतो आहे ते जरी धरले तर कमीत कमी पन्नास ते साठ लाख रुपये याचा इंटरेस्ट झाला. सावंत साहेबांनी उत्तर दयावे. हे पैसे अजून कधी येणार तेही माहिती नाही. ठेकेदार कधीही बस बंद करुन जातो.

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेला पहिल्या टप्प्यात ५० बसेस मंजुर झाल्या होत्या. त्या बसेसची कॉस्ट अकरा कोटी होती. त्यापैकी बॉडी बिल्डींग आणि चेसीससाठी नऊ करोड अठयाऐंशी लाख रुपये खर्च होता. त्यापैकी ५०% रक्कम, ४.९४ करोड एवढी रक्कम या पी.पी.पी. ठेकेदाराकडून घ्यायची होती आणि तेवढीच रक्कम केंद्र शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात प्राप्त होणार होती. ज्यावेळेस २००९ मध्ये या बसेससाठी कार्यादेश दिला त्यानंतर टाटाकडून या चेसिस खरेदी केल्या, त्याचे पेमेंट न झाल्यामुळे त्यांनी सहा महिने आपल्याला चेसीस दिल्या नव्हत्या. त्यामळे जून २०१० मध्ये मा. स्थायी समितीने ठराव केला.

**नरेंद्र मेहता :-**

श्री. सावंत साहेब, कां दिले, कशासाठी तो माझा प्रश्नच नाही. ठेकेदार अपॉइन्ट केला त्यावेळी पैसे परत का घेतले नाही ते सांगा.

**दिपक सावंत :-**

संपूर्ण बसेसचे जे पैसे आहेत ते केंद्र शासनाकडून अजूनपर्यंत प्राप्त झालेले नाहीत. केंद्र शासनाकडून आपल्याला अजून ५०% रक्कमच प्राप्त झाली होती. नंतर २५% अशी ७५% रक्कम मंजुर झाली होती. अजून सर्व रक्कम आपल्याकडे यायची आहे. आणि दुसरी गोष्ट, ही जी रक्कम आहे ती केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जो ट्रान्सपोर्ट फंड आहे त्यामध्ये आम्ही ठेवलेली आहे. ती कुठेही गेलेली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

विषय डायवर्ट होतो आहे. माझे म्हणणे असे आहे की, स्टँडींग कमिटीने ठेकेदाराच्या वतीने पाच करोड रुपये भरलेले होते. ती रक्कम आपल्याला १००% परत आली का? मला सांगा २०१० ला तुम्ही ते पैसे दिले ते अजून आले नाहीत. मागच्या वर्षी पाच करोड होते. म्हणजे जवळ जवळ त्यांनी आठ महिने पैसे भरले नाहीत. पाच करोडचे व्याज आपण पाच लाख मोजले तरी ते ४० लाख, या वर्षीचे व्याज मोजले तर ते ५० लाख, म्हणजे ९० लाख रुपये इंटरेस्ट आपण एम.एम.आर.डी.ए.ला, जे.एन.एन.यु. आर.एमला भरतो आहे. आणि आपले पैसे तो वापरतो. आपण स्टँडींगच्या ठरावामध्ये बघा. तात्पुरता, जोपर्यंत ठेकेदार नियुक्त होत नाही. तो नियुक्त झाला की, त्याच्याकडून ५०% शेअर घ्यायचा आहे. तुम्ही त्यावेळी काय केले? केंद्र शासनाला पैसे गेले. ठेकेदाराला फुकटमध्ये बस दिली. एक रुपया घेतला नाही. ठिक आहे घेतला नाही तो जाऊ दया. पण मागच्या वेळी चर्चा झाली तेव्हा आपण सांगितले की, ते पैसे येणार आहेत. आज अजून एक वर्ष गेले. आपले व्याजामध्ये ९० लाख रुपये गेले. आपण लोनवर इंटरेस्ट भरायचे आणि त्यांनी आपले पैसे वापरायचे? एखादया सामान्य नागरिकांनी हाऊस टॅक्स भरला नाही तर तुम्ही नोटीस फी, दंड सर्व लावता. आणि हा माणूस चार-पाच करोड रुपये वापरतो. त्याला काहीच नाही. मा. महापौर साहेब, रक्कम मोठी आहे. आपण काढले तर एक करोडच्या आंजुबाजूला त्याचे व्याज होते. आपले ऑडीटर मागे आहेत. यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी चुक केलेली आहे. पैसे घेतल्याशिवाय त्याला ठेका दिला. त्यांच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे. आयदर त्या ठेकेदाराने महापालिकेला ते पैसे भरले पाहिजेत. आपण एम.एम.आर.डी.ए. ला व्याज भरतो. इत्तर बँकांचे लोन आहे, तिकडे व्याज भरतो. पाणी पुरवठ्याचे व्याज भरतो आणि त्याने आपले पैसे वापरावे. पहिली गोष्ट, तुम्ही दिलेच कसे? दिले तर ठिक आहे, पैसे परत घ्यायचे नाही का? आणि अजूनही पैसे भरत नाही. कदाचित ३१ मार्चला भरले असते तर इकडे बिल दाखवले असते आणि व्याज बुडले असते. काय निर्णय व्हायला पाहिजे. हे पैसे देताना श्री. दिनेश नलावडे सभापती होते. त्यावेळी ते पैसे बेकायदेशीर कसे काय दिले?

**मा. महापौर :-**

जो जबाबदार असेल त्यांनी ते पैसे भरावे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण पैसे भरायचे आणि त्यांनी आपले पैसे विदाऊट व्याज वापरायचे का?

**दिपक खांबित :-**

या विषयी मी थोडासा खुलासा करु इच्छितो की, जी प्रोजेक्ट कॉस्ट होती त्याच्यामध्ये चेसीस आणि बॉडी बिल्डींगचा खर्च ९ करोड ८८ लाख रुपये होता. केंद्र शासनाने आपल्याला बसेस फक्त मंजूर केल्या होत्या. पण कोणताही निधी दिलेला नव्हता. फक्त पहिल्या फेजमध्ये त्यांनी २५ टक्के म्हणजे ९६ लाख मंजूर केले होते आणि आपल्याकडे पैसे नव्हते. सहा महिने चेसीस आल्या नव्हत्या. त्यामुळे आपण ठराव केला. ठेकेदाराच्या वाट्याची जी ५० टक्के रक्कम ४.९४ करोड होती ते १०० टक्के त्यांनी भरलेले आहेत. केंद्र शासनाकडून जे अनुदान यायचे आहे ते अजूनपर्यंत आलेले नाही. ते आल्यानंतर आपण रिपे करणार.

**नरेंद्र मेहता :-**

श्री. सावंत साहेब, याच्यामध्ये तुम्ही दुसरी चुक काय केली ते मी तुम्हांला सांगतो. ज्यावेळी मा. स्थायी समिती सभापतींनी विषय आणला, त्यावेळी आपण सांगितले की, केंद्रांचे पैसे आलेले आहेत. ठेकेदाराचे पैसे नाहीत म्हणून आपण पाच करोड देऊन ते चेसीस घ्यावे. खरे म्हणजे त्यावेळी केंद्राचे पण पैसे आले नव्हते. मा. स्थायी समितीची किंवा मा. महासभेची मान्यता न घेता कुठलीही तरतुद नसताना डायरेक्ट दहा करोड रुपये दिले गेले. पण सेवा होती म्हणून आम्ही तो आरोप केला नाही. आपल्याला काही बोललो नाही. तुम्ही त्यावेळी दहा करोडचा पूर्ण गैरव्यवहार केला होता. तेही जाऊ द्या. आमचा प्रश्न एवढाच आहे की, ठेकेदाराने महापालिलिकेला जे पैसे परत द्यायचे आहेत, त्यांना आपण नियमाप्रमाणे ठेका दिला. त्यांनी ठेका स्विकारला. त्यांनी बसेस ताब्यात घेतल्या. चालवायला सुरुवात केली. आमचे पैसे द्यायला नको का? माझा एवढाच प्रश्न आहे. बाकी याच्यात इलिगलीटी दुनियाभरची आहेत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

श्री. सावंत साहब, एक बार यह जो ५० बसेस आयी और इसके लिए मैने पिछली मा. महासभा मे बोला था की, काम हम खुद नही कर सकते क्या? इसके लिए कन्सल्टंट क्यों जरुरी है? कंन्सल्टंट को ४० लाख रुपया दिया गया है। यहॉ पर जवाब दिया गया था की, कन्सल्टंट के बिना प्रोजेक्ट पास नही होगा, पैसा नही आएगा। जब पैसा पुरा नही आया तो कन्सल्टंट को पैसा क्यों दिया? २३ लाख तो हम दे चुके थे आगे और देने का है। तो फिर कन्सल्टंट को पैसा क्यों दिया? प्रोजेक्ट पुरा हुआ नही तो पहले पैसा क्यों दिया?

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, याठिकाणी माजी सभापतींचा नावानिशी उल्लेख केला. ते पण माजी महापौर होते. तुमच्या कारकिर्दीमध्ये काय घडले. त्यावेळेला सगळे सभागृह होते. स्टॅन्डींगमध्ये त्यावेळेला १६ सदस्य होते ते पाच करोड कोणी भरले, कशासाठी भरले याची तुम्हाला माहिती असेल. त्यावेळेला ५० टक्के सेंट्रल गव्हर्नमेंट, ५० टक्के स्टेट गव्हर्नमेंट. आपला जो वाटा होता तो आपल्याला भरायचा होता. आपल्याकडे कॉन्ट्रॅक्टवाल्यांकडे पैसे नव्हते. आपण त्यांना भरायला सांगितले. म्हणून आपण ते पाच करोड..............

**नरेंद्र मेहता :-**

असे नव्हते. ठेकेदार अपॉईंट झाला नव्हता म्हणून आपल्याला बजेटची आवश्यकता होती. ठेकेदाराचे पैसे नव्हते म्हणून आपण दिले का?

**दिनेश नलावडे :-**

ते पैसे परत आले. मग आत्ता तुम्हाला त्याच्यामध्ये काय पाहिजे?

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, विषय डायव्हर्ट होत आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, ठेकेदाराने महापालिकेचे पाच करोड रुपये गेल्या दोन वर्षापासून वापरतो आहे. त्यावर व्याज असले पाहिजे. आयदर त्या अधिकाऱ्याने ते वसुल केले नाहीत त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. काहीतरी व्हायला पाहिजे. तुम्हाला वाटत असेल की, व्याज नको. मग आपण नागरीकांकडून व्याज का घेतो? आपण ज्यावेळी लोन घेतो. त्याला आपण व्याज भरतो. मग तुम्हाला वाटते की, ठेकेदाराकडून घ्यायचे नाही. माझ्याकडे पैसे देणार नाही. मा. महापौर साहेब, याच्यावर आपण निर्णय द्यावा.

**जुबेर इनामदार :-**

श्री. दिपक सावंत साहेब, ठेकेदाराकडून घ्यायचे आहेत की, योजनेचे पैसे आहेत? तुम्ही परत एकदा परत खुलासा करा.

**दिपक सावंत :-**

अनुदान येणे बाकी आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्याचा खुलासा करा. तसे उत्तर द्या. अनुदान बाकी असेल तर ठेकेदाराकडून पैसे कसे घेणार? आणि तुम्ही याच्या हेडमध्ये कसे टाकले? याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख करत जा.

**मा. महापौर :-**

श्री. दिपक सावंत , तुम्ही स्पष्ट खुलासा करा नाहीतर आपल्याला जबाब द्यायला लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना जबाब द्यायलाच लागेल. ही ईज रिस्पॉन्सीबल.

**दिपक सावंत :-**

या ठिकाणी मी खुलासा करु इच्छितो की, केंद्र शासनाची जी ५० बसेस खरेदीसाठी योजना होती. त्याची टोटल कॉस्ट ९ करोड ८८ लाख होती.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, दिशाभूल करु नका. ठेकेदाराला दिलेले पैसे परत आले का तेवढेच सांगा?

**दिपक सावंत :-**

ठेकेदाराच्या हिश्याचा जो ५० टक्के वाटा होता तो ४.९४ करोड त्यांनी भरलेला आहे. केंद्र शासनाकडून जे अनुदान प्राप्त व्हायचे होते. प्रथमतः त्यांनी फक्त २५ टक्के रक्कम ९६ लाख रुपये मंजूर केली होती. तेवढेच प्राप्त झाले होते आणि दुसरी इन्स्टॉलमेंट १ करोड ६० लाखाची आहे. त्याची प्रोसेस चालु आहे. केंद्र शासनाकडून

आपल्याला अजून पैसे यायचे आहेत. आता ज्या नवीन बसेस मंजूर केलेल्या आहेत, त्याची टोटल कॉस्ट ५ करोड ८० लाख आहे. त्याचे ५० टक्के म्हणजे २.९० करोड त्या २० बसेससाठी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

हा तुमचा खुलासा बरोबर झाला.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही आता बोलले की, या ज्या येणाऱ्या बसेस आहेत त्यासाठी ठेकेदार आपल्याला पैसे देणार आहे. देन ईट मे बी टेक्नीकल राईट. आत्ता राहिला दुसरा प्रश्न. जे.एन.एन.यु.आर.एम. कडून येण्याची ५.३९ ची प्रोव्हीजन केलेली आहे. म्हणजे ते सहा करोड तिकडून येणार आणि तीन करोड हे देणार. मग उरलेले तीन करोड आपण काय करणार? कोणाला द्यायचे?

**दिपक सावंत :-**

याच्यामध्ये ५.३९ ची जी प्रोव्हीजन केलेली आहे. त्याच्यामध्ये १.२५ केंद्र शासनाकडून येणे बाकी आहे. १.२५ राज्य शासनाकडून येणे बाकी आहे. उर्वरीत जी रक्कम आहे ती परत २० ज्या ॲडीशनल बसेस आहेत, त्यांची रक्कम आहे, असे टोटल ५.३९ खर्च आपण दाखवलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

याच्यामध्ये शिल्लक बाकी राहणार आहे ना?

**दिपक सावंत :-**

शिल्लक बाकी राहणार.

**नरेंद्र मेहता :-**

मग ते पैसे कुठे वर्ग करणार?

**दिपक सावंत :-**

केंद्र शासनाने आपल्याला त्यावेळी सुचना केली होती की, तुम्ही या योजनेत सहभागी होताना महापालिकेचा परिवहन निधी तयार करा आणि ते कम्पलसरी आहे म्हणून आपण परिवहन निधी चालू केलेला आहे. त्या परिवहन निधीमध्ये ठेवणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग आता थोडक्यात, तुम्हाला स्टॅन्डीगने जे काही पैसे दिले होते, ते तुम्ही आत्ता परत देणार नाही आणि हे पैस परिवहन निधीमध्ये.........

**दिपक सावंत :-**

परिवहन निधी सेपरेट राहणार.

**नरेंद्र मेहता :-** ,

अल्टीमेटली जे तात्पुरते घेतलेले ते पैसे स्टॅन्डीगला देणार नाही?

**दिपक सावंत :-**

आपण परिवहन निधीमध्ये ठेवणार.

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्हांला सुधारणा करावी लागेल. तुम्हाला स्टॅन्डीगने जे तात्पुरते दिले होते ते तुम्ही आता कायमस्वरुपी जमा केले आहेत. ते तिकडे वर्ग करा. तिकडे लोन म्हणून ती रक्कम उभी आहे. तुम्हाला तेवढी रक्कम अनुदान म्हणून परिवहन मध्ये घ्यावी लागेल.

**दिपक सावंत :-**

ठिक आहे घेतो.

**डॉ. आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०११/२०१२ सुधारित व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत चर्चा करून महापालिकेने परिवहन उपक्रमास बस खेरदी करीता दिलेले अनुदान केंद्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार परिवहन उपक्रमाच्या "परिवहन राखीव निधी" मध्ये अंतर्भुत करण्यात यावी. मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०११/२०१२ चे सुधारीत व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2011/12 (सुधारित अंदाज) | 2012/13 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" एकुण जमा | 957.82 | 1054.00 |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" एकुण खर्च | 872.25 | 1047.00 |
| अखेरची शिल्लक | 85.07 | 7.00 |

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव दुरुस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३० :-**

परिवहन सेवेचे सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५५, ठराव क्र.१३१)

**ठराव क्र. १२७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०११/२०१२ सुधारित व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत चर्चा करून महापालिकेने परिवहन उपक्रमास बस खेरदी करीता दिलेले अनुदान केंद्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार परिवहन उपक्रमाच्या "परिवहन राखीव निधी" मध्ये अंतर्भुत करण्यात यावी. मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०११/२०१२ चे सुधारीत व सन २०१२/२०१३ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2011/12 (सुधारित अंदाज) | 2012/13 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" एकूण जमा | 957.82 | 1054.00 |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" एकूण खर्च | 872.25 | 1047.00 |
| अखेरची शिल्लक | 85.07 | 7.00 |

**सुचक :- डॉ. आसिफ शेख** **अनुमोदक :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३१, सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५६, ठराव क्र.१३२ )

**नरेंद्र मेहता :-**

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

**उत्पन्न बाजु** **रक्कम रु. लक्षात**

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| १६ | २ | मोकळ्या जागेवरील कर, | | ८०० | ९०० |
| २३ | ६ | मोबाईल सेवा, फायबर व टॉवर भाडे | | १०० | २०० |

**खर्च बाजु** **रक्कम रु. लक्षात**

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | ११/६ | इंडस्ट्रीयल मधील रस्ते/ गटारे सुधारणा | इंडस्ट्रीयल मधील रस्ते/ गटारे सुधारणा व नविन बांधणे. | २०० | ३०० |
| ३९ | २२ | "अग्नीशमन अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | | ९७९ | २५० |
| ४२ | ब/१अ | घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट | उत्तन प्रकल्प घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट | | |
| ४५ | २ | डी.पी. रोड/ मिरारोड रेल्वे समांतर | निरंक | २०० | निरंक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३९ | | क अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | | - | २०० |
| ४४ | ६ | नविन रस्ते बांधणे | | १५०० | १८०० |
| ४४ | ७ | नविन गटर / नाले बांधणे | | १५०० | १८०० |
| ४६ | ६ | सिग्नल सी.सी.टी.व्ही. बसविणे | | ७५ | १०४ |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "क" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- | -- | -- |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | ८ | वितरण व्यवस्था / किरकोळ खरेदी / दुरुस्ती | — | ४०० | २०० |
| ५३ | २४ | नविन हेड | नविन पाणीपुरवठा योजना | निरंक | ४०० |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अग्नीशमन" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| १०७ | ७ | आग सुरक्षा निधी | | ९७९ | २५० |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | १ | साधन सामग्री व भांडारे यांची खरेदी | | १०० | ६५ |
| ६३ | ३ | अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर | | १५० | १०० |
| ६३ | ५ | आग सुरक्षा निधी | | ६४४ | निरंक |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अंध व अपंग " मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६६ | १ | अंध व अपंग उपाय योजनाकरीता मनपाकडुन हस्तांतरण | अंध व अपंग उपाय योजनाकरीता / मतिमंद शाळा अनुदान | | |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६७ | १ | अंध व अपंग उपाय योजनाकरीता मनपाकडुन हस्तांतरण | अंध व अपंग उपाय योजनाकरीता / मतिमंद शाळा अनुदान | | |

सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकांस या ठरावात सुचविलेल्या सुचना, सुधारणा व बदल सहितच्या अंदाजपत्रकांस मा. महासभा मान्यता देत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

माझी एक सुचना आहे.

**प्रशांत पालांडे :-**

माझी एक सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभा ही तहकुब असल्याने त्या त्या सभेचे विषयपत्रिकेवरील आर्थिक विषयाची मंजुरी प्रलंबित असल्याने फेब्रुवारी २०१२ ची तहकुब सभेतील आर्थिक विषय २०११-१२ .......

**अनिल सावंत :-**

ठरावाला मंजुरी देतात त्या नंतर वाचा. ठराव तर होऊ दया.

**चंद्रकांत मोदी :-**

बजेट का मिटींग है।

**प्रशांत पालांडे :-**

सुचना आहे.

**मा. महापौर :-**

वाचू दे चालेल.

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची फेब्रुवारी २०१२ ची मा. माहसभा हि तहकुब असल्याने त्या सभेचे विषयपत्रिकेवरील आर्थिक विषयाची मंजुरी प्रलंबित असल्याने फेब्रुवारी २०१२ ची तहकुब सभेतील आर्थिक विषयाची २०११-१२ चे अंदाजपत्रकाची फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभा विषयाची शिल्लक रक्कमेची तरतुद २०१२-१३ "अ" अंदाजपत्रकातील उत्पन्न बाजुत तरतुद करण्यात यावी व २०१२-१३ च्या "अ" अंदाजपत्रकातील फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभेतील विषयातील आर्थिक तरतुद खर्च बाजुत समाविष्ट करण्यात यावी.

तसेच अग्निशमन अंदाजपत्रकातील अग्निशमन निधी (Fire Protection Nidhi) २०११-१२ चे "अ" मुळ अंदाजपत्रकातुन अग्नीशमन अंदाजपत्रक २०१२-१३ मध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे किंवा उत्पन्नाप्रमाणे हस्तांतरण करण्यात यावे अशी सुचना मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब ह्याच्यावर सन्मा. नरेंद्र मेहतांनी बऱ्याच सुचना केल्या आहेत. परंतु हे जे बजेट आपण केलेले आहे त्याच्यामध्ये बऱ्याच सुचना ह्या जमा आणि खर्चाच्या आहेत आता ह्या सगळया सुचनांचा समावेश केल्या...,.....

**मा. महापौर :-**

त्या सुचना सगळया अधांतरी आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

इतर लेखाशिर्षकाखाली वर्षभरात शिल्लक राहणारी रक्कम व तसेच चुका, दुरुस्ती किंवा सभागृहाच्या बदलप्रमाणे उत्पन्न वाढेल ते नविन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत वर्ग करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सर्व सुचना समाविष्ठ केल्या तर आज हे बजेट पूर्ण होऊच शकत नाही, प्रत्येक दोन पानानंतर एक एक सुचना आहे. कोटी कोटी रकमाच्या आहेत. काही कमी केल्या आहेत काही वाढवल्या आहेत ह्या बजेटचा ताळमेळ आपले लेखापरिक्षक बसले आहेत त्यांनी सांगावे. आपण जेव्हा जमा बाजूच्या गोष्टी करतो त्याच्यानंतर खर्च आणि खर्च झाल्यानंतर जमा हे आपण सगळे करत असतो. त्यांनी ज्या सुचना केल्या त्याच्यामध्ये ह्या लेखाशिर्षातून ही रक्कम कमी करावी मग जमामध्ये ती ॲड केली पाहिजे त्याचे विश्लेषण दिले आहे. ह्याच्यात एवढया सुचना आहेत की, ही मिटींग आज होऊच शकत नाही. त्या सुचना मेक-अप करुन शेवटची फिगर मिटींग संपताना दयायची आहे. आणि फायरच्या मॅटरमध्ये असे आहे २००५ ला जो कायदा बनला त्याची जी होणारी जमा-रक्कम कुठेही टच करायची व्यवस्था त्याच्या कायदयामध्ये तरतुद आहे असे असताना गेल्या २-३ वर्षाचे दाखवलेच नाही, २० कोटीची जी रक्कम आली पाहिजे ती रक्कम गेली कुठे फक्त पावणे नऊ कोटीची रक्कम दाखवली आहे. ही जी तफावत आहे ती सुधरवायची कोणी तो कायदा आहे. स्पेशल अकाऊन्ट आहे. आणि त्या अकाऊन्ट मध्ये तुम्हाला पैसे जमा दाखवायचे आहेत. अधिकाऱ्यांना विचारा. हे बजेट चुकीचे बनले आहे. दहा करोडचा इकडेच फटका बसतो आहे.

**प्रभात पाटील :-**

त्याच्या मताशी मी सहमत आहे आणि ह्याच्यामध्ये ज्या सुधारणा झाल्या त्या कुठून कुठे गेल्या कुठे खर्च जाणार त्याचा ताळमेळ कधी बसणार आणि मूळ बजेट आमच्यासमोर कधी येणार. ह्या एवढया सुचना केल्या गेल्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, पाच पैसे इकडे-तिकडे होत नाही. ताळमेळ करुन आम्ही दिलेले आहे. तरी सचिवांनी वाचून घ्या.

**प्रभात पाटील :-**

ह्याचा अर्थ हे सगळे आज फेल आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना ह्या सुचनामध्ये अदला बदल करता येणार नाही.

**प्रभात पाटील :-**

ह्या बजेटला कोणताही अर्थ राहत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पूर्वी पानव्हाईज बजेट मांडले जायचे आणि त्या पेजव्हाइज बजेट नुसार जे फिगर असेल ते पेन्सील ने क्लियर केले जायचे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, स्टॅन्डिंग कमिटीने बजेट केले. स्टॅन्डिंग कमिटीचे सभापती आहेत. बीजेपीचे आहेत जिल्हाध्यक्ष आहेत. माजी महापौर त्यांनी स्टॅन्डिंग कमिटीचे जे बजेट केले त्याची पूर्ण वाट लावली. ह्या फिगर ज्या चेंज केल्या त्याचे जस्टिफिकेशन काय.

**भगवती शर्मा :-**

फिगर सेम आहेत पूर्ण अभ्यास करुन केलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

१०० एम.एल.डी. पाण्याचे होर्डिंग्ज जे लावले त्याची आम्ही तरतुद केली. सन्मा. हंसु कुमार त्यांना इंडस्ट्रीसाठी आम्ही तरतुद करुन दिली.

**प्रभात पाटील :-**

ह्याची परत सभा लावा.

(सभागृहात गोंधळ)

**हंसूकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, १२३ कोटी एल.बी.टी. आता है ५ % इंडस्ट्रीज को कमसे कम देना चाहिए।

**नरेंद्र मेहता :-**

झीरो था।

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब यह सब हो रहा है, इसको जिम्मेदार कौन?

**जुबेर इनामदार :-**

जिम्मेदारी आपकी है।

**नरेंद्र मेहता :-**

असे चालते का?

**मा. महापौर :-**

चालणाऱ्यांना सर्व चालते. चालवायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

ह्या सगळयाचा अभ्यास करा. तोपर्यंत सभा तहकुब ठेवा. हे सगळे बदल आजच करुन दया तोपर्यंत बजेट मंजुर होणार नाही. तुम्ही मा. आयुक्ताचे मत विचारा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी बरेच बदल केलेले आहेत.

**भगवती शर्मा :-**

ठराव व्यवस्थित केलेला आहे. ठरावामध्ये काही चूक नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही ठराव व्यवस्थित केलेला आहे का?

**भगवती शर्मा :-**

हो सुचनासह व्यवस्थित केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सुचना का केली कारण आता जो पैशामध्ये फरक आला त्याच्यासाठी सुचना करायला नको. सभागृह नेत्यांनी आता सांगितले कुठेही ताळमेळ करायला नको म्हणून तो ताळमेळ करण्यासाठी सुचना मांडली.

**प्रभात पाटील :-**

मा. आयुक्तांचे मत घ्या.

**जुबेर इनामदार :-**

आकडयामध्ये बदल करायचा आपला अधिकार नाही. खर्च आणि जमेच्या बाजूमध्ये मा. महापौर साहेब, तरीही त्यांनी पान क्र. ४५ वर एक सुचना केली आहे. मिरारोडमध्ये डी.पी. रस्ता तयार होतो आहे. त्या रहिवाशांनी वीस वर्ष वाट बघीतली आहे. तिथे रस्ता नाही, नाला नाही त्याचे काम सुरु आहे ६०% काम पूर्ण झालेले आहे त्याची तरतुद हटवायचे काम ह्यांनी केले आहे. ह्यांना लोकांचा विकास नको आहे.

**नरेंद्र मेहता :-**

डी.पी. रोडला दहाच्या ऐवजी आम्ही अठरा करोड केले.

**भगवती शर्मा :-**

रस्ता, इंडस्ट्री, गटार सगळीकडे वाढ केलेली आहे. विकासाकरीता वाढ केलेली आहे.

**जुंबेर इनामदार :-**

तिकडे काम चालू होते तिथे वेगळी तरतुद केली होती का? ती परत तशीच ठेवावी लागेल.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

इस बजेटसे शहर का विकास होगा और जनता खुश होगी।

**जुंबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, स्थायी समितीने सुचवलेले अर्थसंकल्प त्याच्यामध्ये कुठलाही बदल करता येत नाही.

**भगवती शर्मा :-**

बजेटमध्ये तुम्ही महासभेचा एक कॉलम टाकलेला आहे. अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्ताचे अंदाज, स्थायी समितीचे अंदाज, मा. महासभा कुठल्या नियमाप्रमाणे टाकले त्याला विरोध आहे.

**जुंबेर इनामदार :-**

ते तुम्ही टाकले. प्रत्येक वर्षी प्रशासनाची भुमिका राहिली आहे. कामकाजाची तशी पध्दत ठेवली पण तसा नियम नाही.

**भगवती शर्मा :-**

अभ्यास करुन बोला. बार-बार चुकी करता.

**जुंबेर इनामदार :-**

चुकीचे नाही त्याला कुठे तरी थांबवावे लागेल.

**मा. महापौर :-**

ह्या ठिकाणी ठराव झालेले आहेत. सुचना फेटाळण्यात येत आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्याला सुचना फेटाळण्याचा अधिकार नाही असे होत नाही.

**भगवती शर्मा :-**

असे तुम्ही करु शकत नाही. आम्ही ठराव सुचनेसह केल्या आहेत. तुम्ही कुठल्या नियमाप्रमाणे सुचना फेटाळता.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

तुम्ही आमचे मत घ्या. आमचे बहुमत आहे. आमच्या सुचना ठरावामध्ये आहेत तुम्ही कसे फेटाळू शकतात, मतदानाला टाका. तुम्हाला फेटाळायचा काही अधिकार नाही. नियमाप्रमाणे बघा हे तुमचे घरगुती नाही. आता आमचे मतदान घ्या. हे तुम्हाला सांगतात आणि तुम्ही सुचना फेटाळता हे काय चालले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

शब्द मागे घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

साहब ऐसा नही चलता है। सदन नियम के हिसाब से चलेगा। आपकी मनमानी नहीं चलेगी।

**जुंबेर इनामदार :-**

स्थायी समितीने सुचवलेल्या अर्थसंकल्पामध्ये बदल करता येत नाही हाच नियम आहे.

**संजय पांगे :-**

सभागृहाची दिशाभूल करु नका.

**प्रभात पाटील :-**

त्यांच्या ठरावाला विरोध नाही. आम्हाला एवढेच बोलायचे आहे की, ह्याच्यामध्ये सन्मा. नरेंद्र मेहतानी ज्या सुचना केल्या, जे बदल केले. ह्यांची मुळ कॉपी आल्याशिवाय, काय बदल केले हे समजल्याशिवाय ह्याला मान्यता देणार का? मा. आयुक्तांचे मत घ्या. ह्याच्यामध्ये बदल केले आहेत.

**भगवती शर्मा :-**

नियमाप्रमाणे बदल केले आहेत. बॅलेन्सिंग करुन आम्ही केलेले आहे. त्याच्यात काही वाढ नाही.

**जुंबेर इनामदार :-**

नियमाप्रमाणे बदल होत नाही.

**प्रभात पाटील :-**

आमचा विरोध नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मतदान हमारा अधिकार है।

**हंसुकुमार पांडे :-**

नियमाप्रमाणे बदल होत नाही.

**संभाजी पानपट्टे :-**

जमा आणि खर्चाच्या फिगरला मंजुरी लागते.

**भगवती शर्मा :-**

मुळ फिगर आम्ही ठरावामध्ये दिलेली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

ह्याच्यामध्ये चेंजेस करुन देणार की नाही?

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समितीने सुचवलेल्या अर्थसंकल्पाच्या आकडयामध्ये जमा आणि खर्चाच्या बाजूमध्ये कुठेही बदल करता येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

हमने फिगर टॅली करके दिया है। इस फिगर में...........

**प्रभात पाटील :-**

तुम्ही फिगर दिली नाही.

**भगवती शर्मा :-**

मुळ ठरावामध्ये बघा. फिगर दिलेली आहे. ठराव वाचा.

**प्र. नगरसचिव :-**

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| १६ | २ | मोकळ्या जागेवरील कर | | ८०० | ९०० |
| २३ | ६ | मोबाईल सेवा, फायबर व टॉवर भाडे | | १०० | ३०० |

खर्च बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | ११/६ | इंडस्ट्रीयल मधील रस्ते/ गटारे सुधारणा | इंडस्ट्रीयल मधील रस्ते/ गटारे सुधारणा व नविन बांधणे | २०० | ३०० |
| ३९ | २२ | "अग्नीशमन अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | | ९७९ | २५० |
| ४२ | ब/१अ | घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट | उत्तन प्रकल्प घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट | | |
| ४५ | २ | डी.पी. रोड/ मिरारोड रेल्वे समांतर | निरंक | २०० | निरंक |
| ३९ | | क अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | | - | २०० |
| ४४ | ६ | नविन रस्ते बांधणे | | १५०० | १८०० |
| ४४ | ७ | नविन गटर / नाले बांधणे | | १५०० | १८०० |
| ४६ | ६ | सिग्नल सी.सी.टी.व्ही. बसविणे | | ७५ | १०४ |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "क" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- | -- | -- |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | ८ | वितरण व्यवस्था / किरकोळ खरेदी / दुरुस्ती | -- | ४०० | २०० |
| ५३ | २४ | नविन हेड | नविन पाणीपुरवठा योजना | निरंक | ४०० |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अग्नीशमन" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| १०७ | ७ | आग सुरक्षा निधी | | ९७९ | २५० |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | १ | साधन सामग्री व भांडारे यांची खरेदी | | १०० | ६५ |
| ६३ | ३ | अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर | | १५० | १०० |
| ६३ | ५ | आग सुरक्षा निधी | | ६४४ | निरंक |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अंध व अपंग " मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६६ | १ | अंध व अपंग उपाय योजनाकरीता मनपाकडुन हस्तांतरण | अंध व अपंग उपाय योजनाकरीता / मतिमंद शाळा अनुदान | | |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६७ | १ | अंध व अपंग उपाय योजनाकरीता मनपाकडुन हस्तांतरण | अंध व अपंग उपाय योजनाकरीता / मतिमंद शाळा अनुदान | | |

सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकांस या ठरावात सुचविलेल्या सुचना, सुधारणा व बदल सहितच्या अंदाजपत्रकांस मा. महासभा मान्यता देत आहे. या ठरावामध्ये श्री. (प्रशांत पालांडे ह्यांनी सुचना मांडली ती खालीलप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेची फेब्रुवारी २०१२ ची मा. माहसभा हि तहकुब असल्याने त्या सभेचे विषयपत्रिकेवरील आर्थिक विषयाची मंजुरी प्रलंबित असल्याने फेब्रुवारी २०१२ ची तहकुब सभेतील आर्थिक विषयाची २०११-१२ चे अंदाजपत्रकाची फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभा विषयाची शिल्लक रक्कमेची तरतुद २०१२-१३ "अ" अंदाजपत्रकातील उत्पन्न बाजुत तरतुद करण्यात यावी व २०१२-१३ च्या "अ" अंदाजपत्रकातील फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभेतील विषयातील आर्थिक तरतुद खर्च बाजुत समाविष्ट करण्यात यावी.

तसेच अग्निशमन अंदाजपत्रकातील अग्निशमन निधी (Fire Protection Nidhi) २०११-१२ चे "अ" मुळ अंदाजपत्रकातुन अग्नीशमन अंदाजपत्रक २०१२-१३ मध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे किंवा उत्पन्नाप्रमाणे हस्तांतरण करण्यात यावे अशी सुचना मांडत आहे. तसेच सदर ठरावामध्ये श्री. भगवती शर्मा ह्यांनी सुचना मांडली, इतर लेखाशिर्षकाखाली वर्षभरात शिल्लक राहणारी रक्कम व तसेच चुका, दुरुस्ती किंवा सभागृहाच्या बदलप्रमाणे उत्पन्न वाढेल ते नविन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत वर्ग करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे.

**मा. महापौर :-**

सुचनेमध्ये जे आकडे दिलेले आहेत. त्या आकडयांचा आणि अंदाज मेळ सारखा करुन आजचे बजेट मी मंजुर करत आहे.

प्रकरण क्र. १३१ :-

सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १५/०३/२०१२ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५६, ठराव क्र.१३२)

ठराव क्र. १२८ :-

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| १६ | २ | मोकळ्या जागेवरील कर | | ८०० | ९०० |
| २३ | ६ | मोबाईल सेवा, फायबर व टॉवर भाडे | | १०० | २०० |

खर्च बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | ११/६ | इंडस्ट्रीयल मधील रस्ते/ गटारे सुधारणा | इंडस्ट्रीयल मधील रस्ते/ गटारे सुधारणा व नविन बांधणे | २०० | ३०० |
| ३९ | २२ | "अग्नीशमन अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | | ९७९ | २५० |
| ४२ | ब/१अ | घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट | उत्तन प्रकल्प घनकचरा प्रक्रिया विल्हेवाट | | |
| ४५ | २ | डी.पी. रोड/ मिरारोड रेल्वे समांतर | निरंक | २०० | निरंक |
| ३९ | | क अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | | - | २०० |
| ४४ | ६ | नविन रस्ते बांधणे | | १५०० | १८०० |
| ४४ | ७ | नविन गटर / नाले बांधणे | | १५०० | १८०० |
| ४६ | ६ | सिग्नल सी.सी.टी.व्ही. बसविणे | | ७५ | १०४ |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "क" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- | -- | -- |

खर्च बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | ८ | वितरण व्यवस्था / किरकोळ खरेदी / दुरुस्ती | -- | ४०० | २०० |
| ५३ | २४ | नविन हेड | नविन पाणीपुरवठा योजना | निरंक | ४०० |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अग्नीशमन" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| १०७ | ७ | आग सुरक्षा निधी | | ९७९ | २५० |

खर्च बाजु — रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | १ | साधन सामग्री व भांडारे यांची खरेदी | | १०० | ६५ |
| ६३ | ३ | अग्निशमन इमारत बांधकाम / फर्निचर | | १५० | १०० |
| ६३ | ५ | आग सुरक्षा निधी | | ६४४ | निरंक |

मा. स्थायी समितीने सादर केलेले मुळ अंदाजपत्रकातील सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अंध व अपंग " मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

उत्पन्न बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा.महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६६ | १ | अंध व अपंग उपाय योजनाकरीता मनपाकडुन हस्तांतरण | अंध व अपंग उपाय योजनाकरीता / मतिमंद शाळा अनुदान | | |

खर्च बाजु रक्कम रु. लक्षात

| पान क्र. | अनु क्र. | Account Head | नावात बदल | मा. स्थायी समिती | मा. महासभा |
|---|---|---|---|---|---|
| ६७ | १ | अंध व अपंग उपाय योजनाकरीता मनपाकडुन हस्तांतरण | अंध व अपंग उपाय योजनाकरीता / मतिमंद शाळा अनुदान | | |

सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रकांस या ठरावात सुचविलेल्या सुचना, सुधारणा व बदल सहितच्या अंदाजपत्रकांस मा. महासभा मान्यता देत आहे.

सुचक श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रशांत पालांडे व अनुमोदक श्री. अनंत पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची फेब्रुवारी २०१२ ची मा. माहसभा हि तहकुब असल्याने त्या सभेचे विषयपत्रिकेवरील आर्थिक विषयाची मंजुरी प्रलंबित असल्याने फेब्रुवारी २०१२ ची तहकुब सभेतील आर्थिक विषयाची २०११-१२ चे अंदाजपत्रकाची फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभा विषयाची शिल्लक रक्कमेची तरतुद २०१२-१३ "अ" अंदाजपत्रकातील उत्पन्न बाजुत तरतुद करण्यात यावी व २०१२-१३ च्या "अ" अंदाजपत्रकातील फेब्रुवारी २०१२ ची मा. महासभेतील विषयातील आर्थिक तरतुद खर्च बाजुत समाविष्ट करण्यात यावी.

तसेच अग्निशमन अंदाजपत्रकातील अग्निशमन निधी (Fire Protection Nidhi) २०११-१२ चे "अ" मुळ अंदाजपत्रकातुन अग्नीशमन अंदाजपत्रक २०१२-१३ मध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे किंवा उत्पन्नाप्रमाणे हस्तांतरण करण्यात यावे अशी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. भगवती शर्मा व अनुमोदक श्री. मिलन पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

इतर लेखाशिर्षकाखाली वर्षभरात शिल्लक राहणारी रक्कम व तसेच चुका, दुरुस्ती किंवा सभागृहाच्या बदलप्रमाणे उत्पन्न वाढेल ते नविन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत वर्ग करण्यात यावी अशी सुचना मी मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.१७ वाजता.**

-Sd-
सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ७ /१२/२०१२

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ०७ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध वस्तुंचे, मालमत्तेचे संरक्षणार्थ "सुरक्षा रक्षक" पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत...

महानगरपालिका विविध विभागात सुरक्षा रक्षक मनुष्यबळ सेवा नियुक्त करावे लागतात. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | आवश्यक सुरक्षा रक्षक |
|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन | ३४ |
| २. | जकात विभाग | ५४ |
| ३. | बांधकाम/अति./होमगार्ड विभाग | ६२ |
| ४. | पाणी पुरवठा | ५७ |
| ५. | आरोग्य विभाग | ८ |
| ६. | वन विभाग | ५८ |
| ७. | वैद्यकिय विभाग | १४ |
| ८. | प्राथमिक शिक्षण (बालवाडी) | ४० |
| ९. | स्मशान भुमी | २८ |
| १०. | नगर भवन | ६ |
| | **एकुण** | **३६१** |

या व्यतिरिक्त प्रासंगिक अल्प कालावधीसाठी किंवा मर्यादित कालावधीसाठी आवश्यकतेनुसार विविध विभागात उपक्रम तथा कार्यक्रमासाठी सुरक्षारक्षक नेमले जातात.

सुरक्षा रक्षक मनुष्यबळ सेवा नियुक्तीसाठी सर्वसाधारणपणे मासिक रक्कम रु. ५०.०० ते ५५.०० लाख खर्च होतो.

सुरक्षा रक्षक मनुष्यबळ सेवा प्राप्त करुन घेण्याकामी यापुर्वी महानगरपालिकेने मागविण्यात आलेल्या निविदा मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २६, दि. १७/०७/२००९ अन्वये दोन वर्षे कालावधीसाठी मंजुर करण्यात आलेली आहे, आणि सदर मंजुर निविदाधारकास त्यानंतर वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सबब आता नव्याने निविदा मागविणे अपरिहार्य आहे. तथापि शासनाच्या गृह विभागाच्या शासन निर्णय क्र. एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, मंत्रालय, मुंबई-३२, दि. ०८ नोव्हेंबर २००६, अन्वये सुरक्षा रक्षकाच्या सेवा सुरक्षारक्षक मंडळामार्फत प्राप्त करुन घेण्याचे निदेश देण्यात आलेले आहे. परंतु सुरक्षारक्षक मंडळाकडून आवश्यक त्या प्रकारातील आवश्यकतेनुसार पुरेसे सुरक्षारक्षक उपलब्ध करुन दिले जात नाही, असा पुर्वानुभव आहे. किंवा जे सुरक्षारक्षक उपलब्ध करुन दिले जातात त्यांचे किमान दर तुलनात्मक दृष्ट्या जास्त असतात.

अशा परिस्थितीत सुरक्षारक्षक सेवा पुरवठाकामी स्पर्धात्मक निविदा दरपत्रके मागवुन व तसेच सुरक्षारक्षक मंडळाकडून दर मागवुन तुलनात्मक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या कमी व वाजवी दरानुसार सुरक्षारक्षक सेवा प्राप्त करुन घेणे प्रशासकीय व आर्थिक दृष्टीने व्यवहारार्थ व उचित ठरेल.

तरी **अ)** सन २०१२-१३ या वर्षातील उर्वरित कालावधीसाठी व त्यानंतर किमान दोन वर्षे म्हणजे माहे मार्च-२०१५ पर्यंत किंवा सदरहू कामी नव्याने निविदा मागवून अभिकर्ता नियुक्त करेपर्यंतच्या कालावधीसाठी निविदा मागविणे, व **ब)** नविन निविदा मागवुन मंजूर व नव्याने कार्यादेश देईपर्यंत मा. स्थायी समिती ठराव क्र. २६, दि. १७/०७/२००९ अन्वये मंजूर निविदा धारकास मुदत वाढ देणे, प्रयोजनासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव आणि तसचे तरतुद पूर्नविलोकन प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेस सादर करणेत येत आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Aastapana Vibhag\Suraksha Rakshak\GOSHWARA-Suraksha Rakshak.doc

સોંપ્ય દિ. ૨૨/૧૧/૦૨

બેક સાંજે, ૪.૩૦ વા.

૨૨/૧૧/૦૨

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ०८ )** भाईंदर (प.) नियोजित टेंभा हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास मंजुरी मिळणे कामी मा.उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा.उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुशंगाने मा. महासभा दि. १६/४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम पूर्ण होत आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सध्याची महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकिय भार पडेल

सदर हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविल्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करुन मंजूरी घ्यावी लागणार असल्याने धोरण निश्चित होऊन Civil Application मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यास मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PSB/DK/11-12/ MG 5

प्राप्त पि. ०८।१२।१७

६.१२.२०१८

(१)

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ०१/१२/२०१२**

**//गोषवारा//**

**प्रकरण क्र.: (०९) "मिरा-भाईंदर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियम २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत केल्या जाण-या विविध कामासंदर्भात तयार करण्यात आलेल्या विविध उपविधींच्या मसुद्यामध्ये मा. श्री. फ. ब. खान सो. यांनी सुचवलेल्या दुरुस्ती व फेरबदलानंतर खालील तक्त्यात नमुद उपविधी मसुदा दि. २०/०४/२०१० रोजीच्या मा. महासभेमध्ये नागरिकांच्या सुचना व हरकती मागविणेकरीता संमत करण्यात आला होता. त्याअनुषंगाने खालील तक्त्यात नमुद मसुदा उपविधी शासन राजपत्रात तसेच दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन नागरिकांच्या सुचना व हरकतींच्या अनुषंगाने आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | उपविधी | मा.महासभा दि.२०/०४/२०११ ठराव क्रमांक |
|---|---|---|
| १ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियम २०११** | ठराव क्र. ७ |

सबब सदरचे प्रारुप उपविधी मा. महासभेपुढे विचार विनिमयार्थ घेउुन मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबतच्या निर्णयार्थ सादर...

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

પ્રાપ્ત દિ. ૧૯૧૨૧૯

બેઠક દ્રુ. ૨.૨૫ લા.

[illegible]

૧૯૧૨૧૯

મહાલમાં ગોમવારી નોંધ રજીસ્ટર

અ.ક્ર. ૨૫

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# “मिरा भाईंदर महानगरपालिका (अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनिमय २०१०”

**१. संक्षिप्त नामाभिधान :-**

या विनियमांना “ मिरा भाईंदर महानगरपालिका (अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनिमय २०१०” असे संबोधण्यात येईल. )

अमलांत येण्याचे दिनांक - / /२०११ (महासभेच्या अंतिम मान्यतेनंतर)

**२. प्रवास व दैनिक भत्यांची अनुज्ञेयता :-**

महानगरपालिकेच्या कामासाठी केलेल्या प्रवासासाठी अनुज्ञेय प्रवासभत्ता व दैनिक भत्याचे नियमन खालील विनियमांप्रमाणे करण्यात येईल.

**<u>प्रवास भत्ता</u>**

**३. अधिकारी/ कर्मचाऱ्यांची वर्गवारी**

महानगरपालिकेच्या कामासाठी महानगरपालिका हद्दीबाहेर केलेल्या प्रवासासाठी दयावयाच्या प्रवासभत्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे असेल.

| **श्रेणी** | **ग्रेड वेतन (रुपये)** |
|---|---|
| प्रथम श्रेणी | रु.६६००/- व त्याहुन अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) |
| द्वितीय श्रेणी | रु.४४००/- व त्याहुन अधिक मात्र रु.६६००/- पेक्षा कमी |
| तृत्तीय श्रेणी | रु.४४००/- पेक्षा कमी |

तसेच श्रेणी निहाय ग्रेड वेतन हे शासनाने वेळोवेळी मंजुर केलेल्या सुधारीत वेतन आयोगानुसार गृहीत धरले जाईल.

**४. अ) रेल्वे प्रवास-अनुज्ञेयता**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कामासाठी रेल्वे प्रवास करावा लागल्यास पुढील प्रमाणे प्रवासाचे वर्ग अनुज्ञेय असतील

| **श्रेणी** | **अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन** | **प्रवास पात्रता-ऑर्डिनरी मेल, एक्सप्रेस, पॅसेजर ट्रेन आणि अन्य सुपर फास्ट ट्रेन्स** |
|---|---|---|
| प्रथम श्रेणी | अ) रु.८,९०० व त्याहुन अधिक आणि | वातानुकुलित प्रथम वर्ग/ वातानुकूलित २ स्तर शयन |

| | | |
|---|---|---|
| | उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)<br>ब) रु.६,६००/- व त्याहुन अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी | यान<br>द्वितीय वर्ग वातानुकूलित,२ स्तर शयन यान/प्रथम वर्ग / वातानुकूलित खुर्ची यान |
| द्वितीय | अ) रु.४,४००/- व त्याहुन अधिक मात्र रु.६६००/- पेक्षा कमी * | प्रथम वर्ग / वातानुकुलीत ३ स्तर शयनयान/ वातानुकुलीत खुर्ची यान/व्दितीय वर्ग शयनयान |
| तृतीय | अ) रु. ४,२००/- व त्यापेक्षा कमी | व्दितीय वर्ग शयनयान |

* **टिप** :- १) ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी, प्रवासाच्या सुरुवातीचे व शेवटचे ठिकाण अखंडितपणे व सर्वात जवळच्या मार्गाने जोडणाया कोणत्याही रेल्वेमध्ये त्यांना अनुज्ञेय ठरविण्यात आलेले वर्ग उपलब्ध नसल्यास वातानुकूलित २ स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

***टिप** :- २) ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी प्रथम वर्गाने, वातानुकूलित ३ स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील

* **टिप** :- ३) रेल्वेच्या प्रथम वर्गाने अथवा कोणत्याही वातानुकूलीत वर्गाने केलेल्या प्रवासाच्या प्रकरणी प्रवासभत्ता देयकात तिकिट क्रमांक, दिनांक इत्यादी तपशिल नमुद करणे आवश्य असेल.

**तक्ता अ-१**

| **अ.क्र** | **अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन** | **प्रवास पात्रता** | |
|---|---|---|---|
| | | राजधानी एक्सप्रेस | शताब्दी एक्सप्रेस |
| प्रथम श्रेणी | अ) रुपये ८,९००/- व त्याहुन अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणीश्रेणी + (HAG + श्रेणी)<br>ब) रुपये ६,६००/- व त्याहुन अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी | वातानुकूलित प्रथम वर्ग/ वातानुकूलित २ स्तर शयन यान<br>द्वितीय वर्ग वातानुकूलित २ स्तर शयनयान | एक्झिक्युटिव्ह क्लास<br>वातानुकूलीत खुर्ची यान |
| द्वितीय श्रेणी | रुपये ४,४००/- व त्याहुन अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी * | वातानुकूलीत खुर्ची यान | ------- |

- **टिप :- १)** या ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी/कर्मचारी वातानुकूलीत खुर्ची यान पुरविलेले नसल्यास वातानुकूलीत ३ स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

**टिप :- २)** जेव्हा भोजनाची व नाश्त्याची विनामुल्य सोय असलेल्या कोणत्याही गाडीने प्रवास केला जाईल तेव्हा प्रवास कालावधीचा ५०% दैनिक भत्ता अधिकारी/कर्मचार्यांच्या प्रवास भत्ता देयकातुन कमी केला जाईल.

**५. सार्वजनिक वाहनातुन खुष्कीच्या मार्गाने प्रवास :-**

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेल्या ग्रेड वेतन | प्रवास भत्त्याची पात्रता |
|---|---|---|
| १ | रु.६६००/- व त्याहुन अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी | वातानुकुलित बससहित कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| २ | रु.४४००/- व त्याहुन अधिक मात्र रु.६६००/- पेक्षा कमी | वातानुकूलित बसखेरीज इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| ३ | रु.४४००/- पेक्षा कमी | सर्वसाधारण सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे. |

**६. किलोमीटर भत्ता :-**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | ज्यावेळी अधिकारी/कर्मचारी मालकिच्या किंवा भाडयाच्या वाहनातुन महानगरपालिकेच्या कामकाजानिमित्त किंवा महानगरपालिकेच्या वतीने प्रवास करतील त्यावेळी शासनाचे त्या-त्या वेळी किलोमीटर प्रमाणे असलेल्या प्रचलीत दराने व वाहनचे प्रकारानुसार किलोमीटर |
|---|---|---|
| १ | रु. ६,६००/- व त्याहुन अधिक आणि उच्च प्रशासकिय श्रेणी + (HAG + श्रेणी) | |
| २ | ४,४००/- व त्याहुन अधिक मात्र रु. ६,६००/- पेक्षा कमी. | |
| ३ | रु. ४,४००/- पेक्षा कमी. | |

**७. सायकल भत्ता :-**

सायकल भत्त्याचा दर रु.६० प्रतिमाह इतका राहिल.

**८. दैनिक भत्ता :** - दैनिक भत्त्यासाठी महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी शासकिय विश्रामगृहात वास्तव्य केल्यास/ स्वतःच्या राहण्याची अन्य व्यवस्था केल्यास मंजुर करावयाचे दैनिक भत्त्याचे दर हे पुढीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील.

| अ.क्र | श्रेणी | वेतनमर्यादा | सर्वसाधारण दर | विशेष दर मुंबई, पुणे, नागपुर, | अनुसुचित दर आकाररणारा हॉटेलमधील वास्तव्यासाठीचा दैनिक भत्त्याचा दर |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | औरंगाबाद, नाशिक, अमरावती | | |
| | | | | | सर्व साधारण राज्य व राज्यबाहेरील क्र.५ मधील शहरे वगळून | विशेष दर रकांना क्र.५ मधील शहरे दिल्ली व इतर राज्यांची राजधानींची शहरे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | प्रथम श्रेण | अ) रु.८,९०० व त्याहुन अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)<br>ब) रु.६,६०० व त्याहुन अधिक मात्र रु.८,९०० पेक्षा कमी | टिप :- राज्य शासकीय अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना शासनाचे आदेशान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या सुधारीत ज्या दराने आणि ज्या अटीनुसार वास्तव्य केल्यास दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल तोच दर त्याच अटीसह महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यासाठी अनुज्ञेय असेल. | | | |
| | द्वितीय श्रेणी | अ) रु.५,४०० व त्याहुन अधिक मात्र रु.६,६०० पेक्षा कमी<br>ब) रु.४,४०० व त्याहुन अधिक मात्र रु.५,४०० पेक्षा कमी. | टिप वरीलप्रमाणे | | | |
| | तृतिय श्रेणी | अ) रु.४,४०० व रु.४३००<br>ब) रु.४,२०० पेक्षा कमी | टिप वरीलप्रमाणे | | | |

**९. विमान प्रवास**

आयुक्तांचे पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही अधिकायाला व कर्मचायाला विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. परंतु तातडीच्या प्रसंगी आयुक्तांची कार्यात्तर मंजुरी घेऊन विमान प्रवास व प्रवास भत्ता अनुज्ञेय असेल.

**१०. <u>न्यायालयात व विभागीय चौकशीत महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने साक्ष देण्यासाठी प्रवासभत्ता :</u>**

१) न्यायालय अथवा विभागीय चौकशीत महानगरपालिका प्रशासनाचे वतीने कर्मचायांस साक्षीदार म्हणुन बोलावण्यात आल्यास सेवेतील अथवा सेवानिवृत्त कर्मचायांस प्रवासभत्ता व दैनिक भत्ता वरील नियमांप्रमाणे देय असेल. मात्र न्यायालय अथवा विभागीय चौकशी करणाऱ्या चौकशी अधिकाऱ्याकडील त्याकामी हजर असल्याचे व त्यासाठी कोणताही खर्च

वा रक्कम अदा करण्यात आली नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

२) या प्रमाणपत्रासह कर्मचाऱ्याने तपशिल सादर केल्यावरच त्याला हा भत्ता मिळु शकेल.

**११. प्रवास व दैनिक भत्याचे मागणीसाठी मुदतः-**

१) या विनियमान्वये देय असणाया प्रवास व दैनिक भत्त्यासाठी योग्य तो तपशिल देऊन संबंधितांना मागणी सादर करावी लागेल.

२) प्रवास/कामाचा दिवस संपल्याच्या दिवसापासुन सहा कॅलेंडर महिन्यात अशी मागणी न केल्यास ती व्यपगत होईल.

३) महानगरपालिका हद्दीपासुन ८ कि.मी.पेक्षा अधिक अंतर ओलांडल्यावरच दैनिक भत्ता मिळण्याचा अधिकार प्राप्त होतो.

४) सार्वजनिक वाहनाने(रेल्वे,बस) प्रवास केला असल्यास निघताना व परत आल्यावर प्रत्येकी १ तास ग्रेस कालावधी मिळतो. विमान प्रवासासाठी याच्या दुप्पटग्रेस कालावधी देण्यात येईल. तसेच दैनिक भत्यासाठी हा ग्रेस कालावधी विचारात घेण्यात येईल.

५) दैनिक भत्ता जास्तीत जास्त ३० दिवसांसाठी पुर्ण दराने व त्यांनतरचे कालावधीसाठी ७५ % दराने दिला जाईल.

**१२.** हे विनियम लागू होण्यापूर्वी केलेल्या प्रवासाबद्दलची भत्त्यांची मागणी पूर्वी लागू असलेल्या नियमांप्रमाणे अंतिम केली जाईल.

**१३. पूरक भत्ते**

वेतनश्रेणीत वेतन घेणाया महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचायांना राज्य शासन कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाया प्रमाणात पुढील भत्ते देय असतील.

(अ) वेतनावरील महागाई भत्ता (D.A)

(ब) घरभाडे भत्ता (HRA)

(क) स्थानिक पुरक भत्ता (CLA)

(ड) वाहतुक भत्ता

(इ) व महाराष्ट्र शासन त्याचे अधिकारी कर्मचाऱ्यासाठी वेळोवेळी लागु करेल असे अन्य भत्ते.

**१४. इतर पुरक भत्ते :-**

(अ) **धुलाई भत्ता :-** महानगरपालिकेच्या ज्या कर्मचायांना (वाहनचालक, शिपाई, सफाई कामगार, अग्निशमन अधिकारी/कर्मचारी) गणवेश पुरविण्यात येतो त्यांना ते गणवेष स्वच्छ ठेवण्यासाठी रुपये तीस धुलाई भत्ता अदा केला जाईल. मात्र रजेच्या (नैमित्तीक रजा सोडुन) कालावधीसाठी हा भत्ता देय असणार नाही.

**टिप :-** महाराष्ट्र शासन घाणभत्ता त्याचे कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी जाहिर करील त्याप्रमाणे वाढविण्यात येईल.

**(ब) घाणकाम भत्ता :-** महानगरपालिकेत सफाई कामगार संवर्गातील ज्या कर्मचायांना शहर सफाईच्या कामात घाण साफ करण्याचे काम करावे लागते अशा कर्मचायांना दरमहा रुपये तीस घाणकाम भत्ता म्हणुन अदा केले जातील. मात्र रजेच्या (नैमित्तीक रजा सोडुन) कालावधीत हा भत्ता देय असणार नाही.

**टिप :-** महाराष्ट्र शासन घाणभत्ता त्याचे कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी जाहिर करील त्याप्रमाणे वाढविण्यात येईल.

**१५. अतिकालिक भत्ता :-**

अ) महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवा व वाहनचालक यांना Negotiable Instruments Act खाली सुट्या मिळत असल्या तरी काही विभागातील कामाच्या स्वरुपामुळे अशा सुट्ट्याउपभोगत येत नाहीत. अशा सुट्ट्यांचे दिवशी काम कराव्या लागणाया ज्या कर्मचायांचा तो दिवस साप्ताहिक सुट्टीचा नसेल त्यांना त्या दिवसाचे वेतन नेहमीच्या दराऐवजी दीडपट दराने देय असेल. हे आदेश फक्त नियमीत आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचायांना लागू असतील.

ब) वाहन चालक काहीवेळा कामकरताना अत्यावश्यक सेवेत किंवा अधिकारी/पदाधिकारी यांचे वाहनावरवाहन चालविण्याचे काम करतात. परंतु असे अतिकालीन काम हे नियमीत

कामकाजाच्या वेळेपेक्षा कमी वेळेचे असते. अश्यावेळी वाहन चालक यांना शासन निर्णय दि. ०९/०९/२०११ अन्वये निश्चित केलेल्या दराने वेळोवेळी शासनाच्या आदेशान्वये मंजुर होणाऱ्या दराने अतिकालीन भत्ता अनुज्ञेय राहील.

**टिप :** मात्र ज्या विभागात सार्वजनिक सुट्टिच्या दिवशी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास दुसऱ्या दिवशी सुट्टि देणे शक्य असल्यास सुट्टि देण्यात यावी. सुट्टि देता न आल्यास अतिकालीन भत्ता देय राहील.

**१६. वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती :-**

**अ)** महानगरपालिका कर्मचायांना शासन निर्णय क्र.एमएजी-१०९९/प्र.क्र.४०/आरोग्य-३, दिनांक २९ जुलै १९९९ व शासन निर्णय क्र.१०९९/प्र.क्र.२४०/९९/आरोग्य-३ दिनांक ३० ऑगस्ट १९९९ नुसार यापुर्वी आकस्मित उद् भवणाया आजारांवर तसेच गंभीर आजारावर औषधोपचार झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती / अग्रीम देण्याची तरतुद होती. ती बदं करुन यापुढे स्थायी कर्मचायांना प्रती वर्षी ठोक रु.२७००/- प्रमाणे देण्यात यावेत. सदर देण्यात येणाऱ्या रक्कमेमधुन परस्पर मेडिक्लेम योजना कर्मचायांनी स्वतःचे कुटुंबासह घ्यावयाची आहे. त्यामुळे या योजने व्यतिरिक्त महानगरपालिका वैद्यकिय खर्चापोटी कोणतीही रक्कम अग्रीम/प्रतिपुर्ती म्हणुन कर्मचायांना देणार नाही. मात्र शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९/०३/२००५ अंतर्गत परिशिष्ट - अ मधील भाग - २ मध्ये नमुद पाच गंभिर स्वरुपाच्या आजारांत खर्च काही वेळा जास्त येतो अशा वेळी मेडीक्लेम कंपनीकडुन क्लेमची रक्कम मिळाल्यावर उर्वरित खर्चाची रक्कम महानगरपालिका देईल.

**ब)** काही वेळा आजाराचे स्वरुप पाहता वैद्यकिय उपचार घेण्यासाठी शासकिय रुग्णालयात अधिकारी/कर्मचाऱ्यास दाखल व्हावे लागते, अशावेळी आजारावर उपचार करण्यासाठी मोठया प्रमाणावर खर्च येतो परंतु कर्मचाऱ्याची आर्थिक स्थिती खर्च करण्याइतपत नसते. शासकिय रुग्णालयांत मेडीक्लेमचे फायदे उपचार चालु असताना मिळत नाहीत. अशावेळी शासन निर्णयानुसार वेळोवेळी होणाऱ्या बदलाप्रमाणे वैद्यकिय खर्चापोटी शासकिय रुग्णालयाने दिलेल्या लेखी खर्चाच्या तशिलाप्रामणे अग्रिम रुग्णालयाचे नावे महानगरपालिका

देईल, परंतु सदरचे अग्रिम कर्मचाऱ्याने मेडीक्लेमची रक्कम मिळाल्यानंतर एक रक्कमी महानगरपालिकेत अग्रिम घेतल्यापासुन सहा महिन्याचे आत भरणा करणे आवश्यक आहे.

**१७. इंधन भत्ता / वाहन भत्ता**

कार्यक्षत्रात महानगरपालिकेच्या कामासाठी ज्या अधिकायांन व कर्मचायांना खूप फिरती करावी लागते अशा पर्यवेक्षिय पदावर कार्यरत कर्मचारी / अधिकारी व अभियंत्यांनी स्वतःचे वाहन त्याकामासाठी वापरल्यास व दरमहा किमान ठरविलेला प्रवास त्याकामी केल्यास आयुक्तांचे विशेष मान्यतेने खालील प्रमाणे वाहन भत्ता देय असेल.

**तक्ता ड**

| | मासिक सरासरी किलोमीटर | मोटर कार | | मोटार सायकट/ स्कुटर | मोपेड/लुना | सार्वजनिक वाहने |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | पेट्रोल | डिझेल | | | |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| अधिकारी/अभियंते सर्वेक्षक/सर्व्हेअर कर निरिक्षक व पर्यवेक्षीय अन्य पदे | २०१-३०० | ६०० | ४६० | २४० | १७० | १५० |
| | ३०१-४५० | ९०० | ६६० | ३६० | २१० | १९० |
| | ४५१-६०० | १३४० | १००० | ५४० | २५० | २३० |
| | ६०१ व त्याहुन अधिक | १६०० | १२०० | ६५० | ३५० | ३०० |

**टिप** : इंधन वाहन भत्ता दर हे वेळोवेळी शासनाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे लागु राहतील किंवा इंधनाचे दर हे नियमित वाढत असतात अशावेळी मा. स्थायी समिती सभेने दर निश्चित केले तर त्या दराप्रमाणे लागु राहतील.

**१८. वाहन सुविधा**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वाहन सुविधेसाठी पात्र अधिकारी | | महानगरपालिकेचे वाहन न घेतल्यास त्या ऐवजी स्वतःचे वाहन वापरल्यास, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यासाठी दरमहा मिळणारी ठोक रक्कम |
| अ) | वातानुकूलित वाहन सुविधेस पात्र अधिकारी | मा. आयुक्तांनी कामकाजाच्या दृष्टीने ठरविलेले अधिकार | वेळोवेळी मा.स्थायी समितीने ठरविलेली रक्कम |
| ब) | बिगर वातानुकुलित वाहन सुविधेसाठी पात्र अधिकारी | | |
| अ-१ | उपरोक्त अ मधील ज्यांच्या कर्तव्यात नियमित फिरतीचे काम आहे असे अधिकारी | | |
| अ-२ | उपरोक्त अ मधील ज्यांच्या कर्तव्यात नियमित फिरतीचे काम नाही ते अधिकारी | | |
| ब-१ | उपरोक्त ब मधील ज्यांच्या कर्तव्यात नियमित फिरतीचे काम आहे ते अधिकारी | | |
| ब-२ | उपरोक्त ब मधील ज्यांच्या कर्मव्यात नियमित फिरतीचे काम नाही ते अधिकारी | | |

१९. घरबांधणी अग्रीम/वाहन खरेदी अग्रीम शासनाच्या तरतुदीनुसार मंजुरी देण्याचे अधिकार आयुक्तांना असतील

२०. या विनिमांचा अर्थ लावण्यांचे व इतर कोणत्याही बाबतील विवाद उत्पन्न झाल्यास त्यावरील आयुक्तांचा निर्णय अंतिम असेल.

**२१. प्रशिक्षण /अभ्यास भत्ता :-**

महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचे करीता आयेजित केलेल्या वेगवेगळया प्रशिक्षण तथा अभ्यासक्रमास करावा लागणारा प्रवासाचा खर्च म्हणुन प्रत्यक्ष प्रवास खर्च भत्ता अनुज्ञेय राहील. तसेच प्रशिक्षण / अभ्यासाकरीता अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रत्यक्ष भरलेली फी / परीक्षा फी अनुज्ञेय राहील. तसेच उक्त प्रशिक्षण / अभ्यासक्रमाचे कालावधीत शहराबाहेर वास्तव्य करावे लागल्यास शासनाच्या नियामनुसार दैनिक भत्ता महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांनी अनुज्ञेय राहील.

**आयुक्त**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**स्वतःचे वाहन/खाजगी वाहन पालिकेच्या कामकाजासाठी वापरल्यास त्या प्रित्यर्थ मिळणाऱ्या प्रतिपुर्तीची मागणी व त्याबाबतचे प्रमाणपत्र.**

**जोडपत्र - अ**

खालील कालावधीसाठी, खाजगी वाहन कार्यालयीन कामासाठी वापरल्याबद्दल मिळणारी प्रतिपुर्ती मला देण्यात यावी.

| कालावधी | एकुण दिवस |
|---|---|

मी प्रमाणित करतो/करते की, अनुज्ञेय नसलेला १० दिवसांपेक्षा जास्त असलेला रजेचा कालावधी पदग्रहण अवधी, प्रतिनियुक्तीचा कालावधी, प्रशिक्षण कालावधी, सक्तीचा प्रतिक्षा कालावधी किंवा इतर कालावधी वरील कालावधीत समाविष्ट नाही.

वाहन क्रमांक -------------------- महापालिकेच्या कामासाठी वापरण्यास अनुमती प्राप्त झालेली आहे.

मी महानगरपालिकेच्या, वाहनाचा वापर करीत नाही.

दिनांक :-

अधिकाऱ्याची स्वाक्षरी-----------------

(नाव व पदनाम)

निवासी संपुर्ण पत्ता:-

प्रमाणित करण्यात येणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी

(नाव व पदनाम)

कार्यालयीन शिक्का

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा

## दि.०१/१२/२०१२

## गोषवारा

**प्रकरण क्र.१० :- पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यांत येणाऱ्या परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरात वाढ करणे बाबत.**

मिरा-भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रत्यक्ष बसेस ह्या दि.१५/०९/२००५ पासून भाडे तत्वावर खाजगी ठेकेदार मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा.प्रा.लि. यांचे मार्फत शहरांतर्गत व शहराबाहेरील बस मार्गावर सुरु करण्यांत आल्या तत्पुर्वी परिवहन उपक्रमाच्या बसेसमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवासी करीता तिकीट दर ठरवून मा. महासभा दि.२३/०८/२००५ रोजी तीस मान्यता देण्यात येऊन परिवहन सेवा सुरु करणेस मा. आर.टी.ए. त्यास शासनाची (प्रादेशिक परिवहन प्राधिकरण) यांची दि.१३/०९/२००५ रोजी मान्यता घेणेत येऊन दि.१५ सप्टेंबर २००५ रोजी पासून शहरवासियांच्या सेवेकरीता प्रत्यक्ष बसेस सेवा सुरु करणेत आली. प्रतिवर्ष उत्पन्न व खर्च यामधील तफावत वाढत जाणे, प्रत्यक्षात इंधन, वंगण स्पेअरपार्ट यांमधील प्रतिवर्षामध्ये नैसर्गिक भाव वाढ यांचा विचार करता परिवहन उपक्रमामधील प्रचलित तिकीट दरात वाढ करून सदरचा प्रस्तावास मा.आयुक्त सो., यांची दि.०४/०९/२००८ रोजी मान्यता घेऊन तो पुढील मान्यतेसाठी मा. परिवहन समिती सभा दि.१८/१०/२००८ रोजी ठराव क्र.१० अन्वये मंजूरी घेणेत येऊन पुढील मंजूरी करीता मा. महासभेपुढे सदर विषय घेणेत येऊन त्यास मा. महासभा दि.१९/११/२००८ रोजी ठराव क्र.६४ अन्वये मंजूरी देऊन त्यास अंतीम मान्यतेसाठी मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांनी त्यास दि.०५/०८/२०१० रोजी मान्यता दिलेली आहे. व सद्यः स्थितीत मा. परिवहन उपक्रमात पी.पी.पी. तत्वावर चालविणेत येणाऱ्या परिवहन च्या बसेसमध्ये हेच तिकीट दर अंमलात आहेत.

उपरोक्त तिकीट दराच्या परिस्थितीचा विचार करता प्रचलित तिकीट दर हे सन २००८ चे असून त्यानंतर अजुनपावेतो तिकीट दरात वाढ सुचविलेली अथवा प्रत्यक्ष अंमलात आणलेली नाही. सन २००८ ते आज माहे सप्टेबर २०११ या कालावधीमधील विचार करता इंधन, वंगण, स्पेअर पार्ट, इतर प्रशासकीय खर्च मेंटनन्स, प्रत्यक्ष बसेस किंमत संबंधित बाबीत वार्षिक नैसर्गिक वाढ झालेली आहे याचा परिणाम येणारे उत्पन्न व होणारे प्रत्यक्षात खर्च यामधील तफावत दिसून येत आहे. डिझेल मधील वाढ पाहता मे. केस्ट्रेल इन्फ्रा.प्रा.लि. यांना माहे ऑक्टोबर २०१० पासून पी.पी.पी. तत्वावर ठेका हा पुढील दहा वर्षाच्या कालावधी करीता देणेत आलेला असून त्या वेळेस प्रति लिटर डिझेलचा दर हा रु. ४१.४१ हा होता व आज डिझेलच्या दराची प्रति लिटर रु.४५.३२ म्हणजेच एका वर्षात रु. ३.९१ इतकी वाढ फक्त डिझेलच्या प्रति लिटर मध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे मे. केस्ट्रेल इन्फ्रा.प्रा.लि. यांनी खालील प्रमाणे प्रवासी तिकीट दरात दरवाढीची मागणी केलेली आहे.

| अ. क्र. | अंतर कि.मी. | प्रचलित भाडे एम.बी.एम.टी | बी.ईएस.टी. | टी.एम.टी. दि.१६/६/११ पासून | एन.एम.एम.टी. दि.५/८/१० पासून | प्रस्तावित भाडे एम.बी.एम.टी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ०.२ | | ४.०० | रु.४.०० (अंतर ०-२ कि.मी.) | रु.५.०० (अंतर ०-२ कि.मी.) | रु.५.०० (अंतर ०-२ कि.मी.) |
| २ | ०.३ | ४.०० | ४.०० | रु.६.०० (अंतर २-४ कि.मी.) | रु.६.०० (अंतर २-४ कि.मी.) | रु.६.०० (अंतर २-४ कि.मी.) |
| ३ | ३.१-५.०० | ५.०० | ७.०० | रु.८.०० (अंतर ४-६ कि.मी.) | रु.७.०० (अंतर ४-६ कि.मी.) | रु.७.०० (अंतर ४-६ कि.मी.) |
| ४ | ५.१-७.० | ६.०० | ८.०० | रु.९.०० (अंतर ६-८ कि.मी.) | रु.९.०० (अंतर ६-८ कि.मी.) | रु.९.०० (अंतर ६-८ कि.मी.) |
| ५ | ७.१-९.० | ७.०० | १०.०० | रु.१०.०० (अंतर ८-१० कि.मी.) | रु.१०.०० (अंतर ८-१० कि.मी.) | रु.१०.०० (अंतर ८-१० कि.मी.) |
| ६ | ९.१-११.०० | ८.०० | १०.०० | रु.११.०० | रु.११.०० | रु.११.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (अंतर ११-१२ कि.मी.) | (अंतर १०-१२ कि.मी.) | (अंतर १०-१२ कि.मी.) |
| ७ | ११.१-१३.० | ९.०० | १२.०० | रु.१२.००<br>(अंतर १२-१४ कि.मी.) | रु.१२.००<br>(अंतर १२-१४ कि.मी.) | रु.१२.००<br>(अंतर १२-१४ कि.मी.) |
| ८ | १३.१-१५.०० | ११.०० | १२.०० | रु.१३.००<br>(अंतर १४-१६ कि.मी.) | रु.१३.००<br>(अंतर १४-१६ कि.मी.) | रु.१३.००<br>(अंतर १४-१६ कि.मी.) |
| ९ | १५.१-२०.० | १३.०० | १४.०० | रु.१३.००<br>(अंतर १६-१८ कि.मी.) | रु.१४.००<br>(अंतर १६-१८ कि.मी.) | रु.१४.००<br>(अंतर १६-१८ कि.मी.) |
| १० | २०.१-२५.० | १४.०० | १६.०० | रु.१४.००<br>(अंतर १८-२० कि.मी.) | रु.१५.००<br>(अंतर १८-२० कि.मी.) | रु.१५.००<br>(अंतर १८-२० कि.मी.) |
| ११ | २५.१-३०.० | १५.०० | १७.०० | रु.१४.००<br>(अंतर २०-२२ कि.मी.) | रु.१६.००<br>(अंतर २०-२२ कि.मी.) | रु.१६.००<br>(अंतर २०-२२ कि.मी.) |
| १२ | ३०.१-३५.० | १६.०० | १८.०० | रु.१६.००<br>(अंतर २२-२४ कि.मी.) | रु.१८.००<br>(अंतर २२-२४ कि.मी.) | रु.१८.००<br>(अंतर २२-२४ कि.मी.) |
| १३ | | | | रु.१७.००<br>(अंतर २४-१६ कि.मी.) | रु.१९.००<br>(अंतर २४-१६ कि.मी.) | रु.१९.००<br>(अंतर २४-१६ कि.मी.) |
| १४ | | | | रु.१८.००<br>(अंतर २६-२८ कि.मी.) | रु.२०.००<br>(अंतर २६-२८ कि.मी.) | रु.२०.००<br>(अंतर २६-२८ कि.मी.) |
| १५ | | | | रु.१९.००<br>(अंतर २८-३० कि.मी.) | रु.२१.००<br>(अंतर २८-३० कि.मी.) | रु.२१.००<br>(अंतर २८-३० कि.मी.) |
| १६ | | | | रु.१९.००<br>(अंतर ३०-३२ कि.मी.) | रु.२२.००<br>(अंतर ३०-३२ कि.मी.) | रु.२२.००<br>(अंतर ३०-३२ कि.मी.) |

उपरोक्त तुलनात्मक तक्ता पाहता मिरा-भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस करीता आकारण्यात येणारे प्रवासी तिकीट दर हे इतर संस्थेचे तुलनेत कमी आहेत. तरी उपरोक्त तक्त्यानुसार रकाना क्र. ०७ प्रमाणे प्रस्तावित तिकीट दरवाढीस मंजूरी मिळणेस विनंती आहे.

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

प्राप्त दि. २४।३।९२
वेळ स. ११.५० वा.

२४।३।९२

मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर क्र. ३ . पृ३

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. ०७ /१२/२०१२

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र ११** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत On line Booster पंप बसविण्याच्या कामास मान्यता मिळणे बाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत सर्वे नं. ७७७, सुदाम नगर, कमला पार्क व गोडदेव येथील संप व पंप हाऊस अद्याप पूर्ण झालेली नाही. सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत होते. सदरचे संप व पंप हाऊस पूर्ण न झाल्यामुळे वरील जलकुंभ गुरुत्ववाहिनीने भरण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठा ४५ ते ४७ तासांवर सद्यस्थितीत होत आहे. पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा On line Boosting पंप बसवून करणे शक्य आहे.

सदर काम भाईंदर (पुर्व) रेल्वे फाटक येथे On line Boosting पंप बसवून Latest Technology नुसार व सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा विचारात घेता वरील चार संपच्या ठिकाणी असलेल्या जलकुभांना रेल्वे फाटक येथून On line Boosting पंपीग मशिनरीद्वारे पाणी पुरवठा करता येईल. सदरचे बुस्टींग पंपाद्वारे पाणी पुरवठा केल्यास वरील चारही ठिकाणी पंपीग मशिनरी बसविण्याची आवश्यकता नाही. केवळ एकाच ठिकाणी On line Booster पंप लावून पंपीग करुन रेल्वे फाटक येथे मिळत असलेल्या पाण्याच्या दाब वाढवून वरील ठिकाणच्या इलेक्ट्रीक बिल तसेच निगा देखभाल व दुरुस्तीच्या खर्चात बचत होणार आहे. सदर पंप बसविल्यामुळे वरील भागातील पाणी पुरवठयात सुधारणा होणार असून पाणी पुरवठ्याचे तास कमी होणार आहेत.

सदर कामाकरिता <u>रु.४७०.०३</u> लक्ष एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले असून त्यास मजीप्राचे मुख्य अभियंता यांनी दि. २०/०३/२०१२ रोजी तांत्रिक अनुमती दिली आहे. तरी सदर कामास मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

E:\Rane\Goshwara\2011-12\Goshwara - 50 MLD - On line Booster Pump.doc

गोषवारा प्राप्त दि- १२/०४/२०१२

[signature] 12/04/2012

वेळ = ११:५५

महासभा गोषवारा नोंद रजिस्टर

अ.क्र. ०१/१२-१३

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १/१२/२०१२

## // सुधारीत गोषवारा //

**प्रकरण क्रमांक :- ( १२ ) कामांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | मिरारोड (पूर्व) येथील प्लिझंट पार्क ते एम.आय.डी.सी. उर्वरीत डीपी रस्ता तयार करणे व गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,९१,९६,८००/- |
| २. | भाईंदर (पू.) आकाश क्लासिक ते रामदेव पार्क ते राम नगर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजुर गटार बांधणे. व आकाशनिधी रामदेव पार्क गटार बांधणे | रू. २,८४,००,६५०/- |
| ३. | भाईंदर (पू.) इंद्रलोक येथील मनसा अपार्ट. ते श्रीराम टॉवर पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ५६,७२,४००/- |
| ४. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल येथील हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे. | रू. ९६,२६,०५०/- |
| ५. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल रस्त्यावरील हर्ष प्लाझा ते पूजा गार्डन पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ५२,४२,४५०/- |
| ६. | भाईंदर (पू.) कनकिया रोड येथील लक्ष्मी पार्क ते शालोम गार्डन इमारती पर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. | रू. ६२,१७,९००/- |
| ७. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रू. ६३,२६,९५०/- |
| ८. | उत्तन येथे नाला बांधणे (मार्केट शिफ्ट करण्यासाठी ) | रू. १,००,००,०००/- |
| ९. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) रस्ता तयार करणे. | रू. ९२,९४,७५०/- |
| १०. | प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळा ते काशिमिरा रस्त्यास जोडणारा १८ मी. रूंदीचा डि.पी. रस्ता तयार करणे. | रू. १,७५,७१,०००/- |
| ११. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते वासुदेव कॉम्प्लेक्स कडे जाणारा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे, गटारे बांधणे. | रु. १,०६,५४,८५०/- |
| १२. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता न्यू शुभम कॉम्प्लेक्स ते रामदेव पार्क पर्यंत क्रॉस रस्ता तयार करुन गटारे बांधणे. | रु. २,१२,४६,८५०/- |
| १३. | मिरारोड (पूर्व) सिध्दार्थ नगर ते एस.के.स्टोन कंपनी पर्यंत सी.सी. नाला बांधून स्लॅब टाकणे. | रू. १,१२,३०,२००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/12-13/DK/41

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

## // सुधारीत गोषवारा//

प्रकरण क्रमांक :- ( १३ ) निविदांना मान्यता देणे.

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन मेरी गोल्ड नं. २ ते बस स्टॉप नं. १५ पर्यंत नाला बांधणे.** | रु.४,२७,६६,२००/- |
| | १. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि. | १७.१ % जास्त दराने |
| | २. मे. जेकिन इंटरप्रायझेस | ९.१८ % कमी दराने |
| | ३. मे. जिनाग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १०.०० % जास्त दराने |
| | ४. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन | १५.९ % जास्त दराने |
| | **५. मे. ओमकार इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रक्टर्स** | **१६.२ % कमी दराने** |
| | ६. मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन | १४.५ % जास्त दराने |
| | ७. मे. यश इंटरप्रायझेस | ११.११ % जास्त दराने |
| २ | **मिरारोड महेश इंडस्ट्रीयल इस्टेट येथे नाला बांधणे.** | रु.२,४७,९०,३००/- |
| | १. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ९.१ % जास्त दराने |
| | **२. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **५.०० % कमी दराने** |
| | ३. मे. जिनाग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १८.०० % जास्त दराने |
| ३ | **काशीगाव पेट्रोल पंप (राष्ट्रीय महामार्ग) ते सिल्व्हर सरीता पाठीमागील आर.एन.ए. पर्यंतचा नाला बांधणे.** | रु. ६,७२,७५,४००/- |
| | १. मे. जेकिन इंटरप्रायझेस | ११.८% कमी दराने |
| | **२. मे. ओमकार इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रक्टर्स** | **१५.३% कमी दराने** |
| | ३. मे. शयोना कॉर्पोरेशन | १२.९६% जास्त दराने |
| ४ | **मिराधाम अमिश पार्क ते पंजाब फाऊंड्री पर्यंत नाला बांधणे.** | रु. ७,०२,९४,८००/- |
| | १. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि. | १५.३% जास्त दराने |
| | **२. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **११.६% कमी दराने** |
| | ३. मे. शयोना कॉर्पोरेशन | १४.००% जास्त दराने |
| ५ | **काशिमीरा येथे मांडवी पाडा गोठा (माशाचा पाडा) ते पेट्रोल पंप पर्यंत नाला बांधणे.** | रु. ६,५१,३७,७००/- |
| | १. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि. | ८.२८ % जास्त दराने |
| | **२. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **१२.०० % कमी दराने** |
| | ३. मे. शयोना कॉर्पोरेशन | १४.०० % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ६ | **मिरारोड (पूर्व) सरोगी अॅव्हेन्युर ते रोझ वुड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.** | रु. १,७७,६३,६००/- |
| | १. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १८.०० % जास्त दराने |
| | २. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १८.०० % जास्त दराने |
| | ३. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि. | १४.०० % जास्त दराने |
| | **४. मे. महेश्वर बिल्डर्स** | ९.९५ % जास्त दराने |
| | **(दरवाटाघाटी नंतर)** | **२.०० % कमी दराने** |
| | ५. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन | १५.५ % जास्त दराने |
| | ६. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन | १५.०० % जास्त दराने |
| | ७. मे. यश इंटरप्रायझेस | १०.११ % जास्त दराने |
| ७ | **मिरारोड (पूर्व) रश्मी प्राईम ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत नाला बांधणे.** | रु. २,७०,९८,१००/- |
| | १. मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन कंपनी | १२.०० % जास्त दराने |
| | २. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १६.०० % जास्त दराने |
| | ३. मे. जगदंबा कंन्स्ट्रक्शन | १५.०० % जास्त दराने |
| | **४. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.** | ९.०० % जास्त दराने |
| | **(दरवाटाघाटी नंतर)** | **२.०० % कमी दराने** |
| | ५. मे. महेश्वर बिल्डर्स | १६.९५ % जास्त दराने |
| | ६. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन | १५.१ % जास्त दराने |
| | ७. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन | १५.५ % जास्त दराने |
| | ८. मे. यश इंटरप्रायझेस | ११.११ % जास्त दराने |
| ८ | **मिरारोड सिनेमॅक्स ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.** | रु. २,८६,००,६००/- |
| | १. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ९.८१ % जास्त दराने |
| | **२. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.** | ९.०० % जास्त दराने |
| | **(दरवाटाघाटी नंतर)** | **२.०० % कमी दराने** |
| | ३. मे. महेश्वर बिल्डर्स | १७.९५ % जास्त दराने |
| | ४. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन | ९.८१ % जास्त दराने |
| | ५. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन | १४.५ % जास्त दराने |
| | ६. मे. यश इंटरप्रायझेस | १२.०० % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ९ | **रा.म.क्र. ८ वरील दिल्ली दरबार पासून पंजाब फाऊंड्री कडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं**<br>२. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. यश इंटरप्रायझेस<br>६. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु. ४,६९,३२,३००/-<br>**१५.३९ % कमी दराने**<br>१४.८८ % कमी दराने<br>११.९९ % कमी दराने<br>०९.१ % कमी दराने<br>०७.२ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०९.९९ % जास्त दराने<br>१२.०६ % जास्त दराने |
| १० | **रा.म.क्र. ८ वरील ग्रीन व्हिलेज येथील बस्त्याव डिसुजा वाडी ते वेस्टर्न पार्क सोसायटी ते दाचकुलपाडा रस्त्यालगत साई पॅलेस हॉटेल पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. एसबी इंटरप्रायजेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>५. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं<br>६. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>९. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>१०. मे. शयोना कॉर्पोरेशन | रु.७,४८,६४,२००/-<br>**१५.८८ %कमी दराने**<br>१५.०३ % कमी दराने<br>१४.११ %.कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०९.०० % जास्त दराने<br>०९.०८ % जास्त दराने |
| ११ | **मिरारोड (पूर्व) झंकार कंपनी पासून श्री एव्हेन्यू इमारत, रवि ग्रुप रोड पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>६. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु.२०,२१,७०,७००/-<br>**२१.६०% कमी दराने**<br>१३.०६% कमी दराने<br>११.०८% कमी दराने<br>१०.०८% कमी दराने<br>०५.०४% कमी दराने<br>०.५% कमी दराने<br>०४.९५ % जास्त दराने<br>०५.०४ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| १२ | **मिरारोड (पूर्व) हटकेश येथिल सॅटेलाईट पार्क पासून घोडबंदर सबस्टेशन उधाडी खाडीकडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | रु.१३,३१,४६,४५०/-<br>**१३.५% कमी दराने**<br>१०.१९% कमी दराने<br>०७.८६% कमी दराने<br>०७.२% कमी दराने<br>०.५% कमी दराने<br>०५.०४ % जास्त दराने<br>०७.०२ % जास्त दराने |
| १३ | **भाईंदर (प.) बेकरी गल्ली ते स्मशानभूमी रस्त्याकडे व ४५.०० मी. डी.पी. रस्ता ते सुभाषचंद्र बोस मैदान नाल्यापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. यश इंटरप्रायझेस<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | रु.८,७४,१०,७००/-<br>**१८.२% कमी दराने**<br>१४.००% कमी दराने<br>०९.०१% कमी दराने<br>०७.०२% कमी दराने<br>०३.०० % जास्त दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०७.९२ % जास्त दराने |
| १४ | **मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल सर्कल ते कार्पोरेशन बँक ते सेक्टर नं. ११ बिल्डीग नं. ३४ पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. महेश्वर बिल्डर्स<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. एम.ई. प्रोजेक्टस्<br>५. अॅक्युट डिझाईन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | रु. २,६६,७३,१००/-<br>**१७.१० % कमी दराने**<br>१४.७७ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०५.५८ % कमी दराने<br>०४.०५ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०७.११ % जास्त दराने |
| १५ | **मिरारोड (पूर्व) निलम पार्क ते प्रिमीयम अपार्टमेंट ते १०० फुट रेल्वे समांतर रस्ता पर्यंत आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>२. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>३. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | रु. ९०,८९,६००/-<br>**१६.४६ % कमी दराने**<br>०९.०१ % कमी दराने<br>०४.०५ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| १६ | **मिरारोड (पूर्व) सेव्हेन इलेव्हन शाळेमागील राज इन्क्लेव्ह पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे** | रु. ४,७७,९६,४००/- |
| | **१. मे. यश इंटरप्रायझेस** | **१८.११ % कमी दराने** |
| | २. मे. के.आर. कंस्ट्रक्शन | १६.०२ % कमी दराने |
| | ३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. | ०९.०१ % कमी दराने |
| | ४. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ०३.३३ % कमी दराने |
| | ५. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | ०८.०१ % जास्त दराने |
| १७ | **मिरारोड (पूर्व) गौरव इन्क्लेव्ह सर्कल ते मंगलनगर उघाडी पर्यंत दोन्ही बाजूस आर.सी.सी नाला बांधणे.** | **रु. १,९३,७६,२००/-** |
| | **१. मे. यश इंटरप्रायझेस** | **१६.११ % कमी दराने** |
| | २. मे. के.आर. कंस्ट्रक्शन | १४.०४ % कमी दराने |
| | ३. मे. एसबी इंटरप्रायजेस | १२.५१ % कमी दराने |
| | ४. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि. | ०९.०१ % कमी दराने |
| | ५. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ०३.३३ % कमी दराने |
| | ६. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | ०५.०५ % जास्त दराने |
| १८ | **भाईदर (प.) फ्लाय ओव्हर ते नाझरेथ उघाडी पर्यंत नाला बांधणे.** | रु. २७,२१,२६,६००/- |
| | **१. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **१८.६ % कमी दराने** |
| | २. मे. आर.के.मधानी ॲण्ड कं. | १६.२१ % कमी दराने |
| | ३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स | १४.४ % कमी दराने |
| | ४. मे. चिराग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १०.३५ % कमी दराने |
| | ५. मे. शायोना कॉर्पोरेशन | १०.०४ % कमी दराने |
| | ६. मे. आर ॲण्ड बी इंन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. | ७.०० % जास्त दराने |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराचे निविदा ह्या वाजवी आहेत. तरी अ.क्र.१ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची **१६.२ % कमी दराची** निविदा,अ.क्र.२ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस** यांची **५.०० % कमी दराची** निविदा, अ.क्र.३ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची **१५.३% कमी दराची** निविदा, अ.क्र.४ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस** यांची **११.६% कमी दराची**, अ.क्र.५ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस** यांची **१२.००% कमी दराची**, अ.क्र.६ च्या कामी **मे. महेश्वर बिल्डर्स** यांची दरवाटाघाटीनंतर **२.०० % कमी दराची** निविदा, अ.क्र.७ च्या कामी **मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.** यांची दरवाटाघाटीनंतर **२.०० % कमी दराची** निविदा, अ.क्र.८ च्या कामी **मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.** यांची दरवाटाघाटीनंतर **२.०० % कमी दराची** निविदा, अ.क्र.९ च्या कामी यांची दरवाटाघाटीनंतर **मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं १५.३९ % कमी दराची** निविदा, अ.क्र.१० च्या कामी **मे. एसबी इंटरप्रायजेस** यांची **१५.८८ % कमी दराची** निविदा,अ.क्र.११ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायजेस** यांची **२१.६०% कमी दराची** निविदा, अ.क्र.१२ च्या कामी **मे. के.आर. कंस्ट्रक्शन** यांची **१३.५% कमी**

**दराची**, अ.क्र.१३ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायजेस** यांची १८.२ **% कमी दराची** निविदा, अ.क्र.१४ च्या कामी **मे. के.आर. कंस्ट्रक्शन** यांची **१७.१० % कमी दराची** निविदा, अ.क्र.१५ च्या कामी **मे. महेश्वर बिल्डर्स** यांची **१६.४६ % कमी दराची** निविदा, अ.क्र.१६ च्या कामी मे. **यश इंटरप्रायझेस** यांची **१८.११.०० % कमी दराची** अ.क्र.१७ च्या कामी **मे. यश इंटरप्रायझेस** यांची **१६.११.०० % कमी दराची** निविदा, अ.क्र.१८ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस** यांची १८.६ **% कमी दराची** निविदा असून अ.क्र. १ ते १७ कामाच्या निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.१४ :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) कनाकिया जलकुंभ पासून रामदेव पार्क ते आयडीयल पार्क ते इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहिनी अंथरणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत..

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा-भाईंदर शहराची वाढ ही प्रामुख्याने भाईंदर (पुर्व) येथील मौजे गोडदेव, नवघर, गावांच्या हद्दीत झालेली आहे. सदर ठिकाणी प्रामुख्याने मोठी गृहसंकुले उभारण्यात आलेली आहेत. भाईंदर (पुर्व) येथील प्रभाग क्र ५१ हा प्रामुख्याने नव्याने विकसीत झालेला परिसर असून लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे अधिकच जास्त आहे. सदर परिसरातील नागरीकांना पाणी पुरवठा हा कनाकिया जलकुंभाव्दारे होत आहे. सदर परिसरात काही ठिकाणी पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरीक यांचेकडील तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. तसेच सदर परिसरात काही ठिकाणी महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिन्यासुद्‌धा अस्तित्वात नाही.

त्यानुसार सदर परिसराची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून कनाकिया जलकुंभापासुन इंद्रलोक, रामदेव पार्क, आडीयल पार्क, श्रीराम नगर, वागड नगर, कनाकिया पार्क परिसरात विविध व्यासाच्या जलवाहिनी अंथरल्यास परिसरातील पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकेल. तसेच नागरिकांना उदभवलेली कमी दाबाने व कमी प्रमाणात होणाऱ्या पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकते. सदर कामासाठी रु १,४०,०६,३००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात **"नविन जलवाहिनी टाकणे"** या लेखाशिर्षाअंतर्गत रु ६०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यत मिळणेकरीता मा. महासभेची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने**

मा. महासभा गोषवारा प्राप्त दि. २४/४/९२

24/4/92

वेळ दु. 03:30

मा. महासभा गोषवारा

रजिस्टर नोंद अ. क्रं. 03

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०१/१२/२०१२**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १५ )** :- कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची (क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या अहवालानुसार दुरुस्ती करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत डोंगरी संतुलन टाकी, चेना, वर्सोवा, गोडदेव, कमला पार्क, मोर्वा व उत्तन येथील उंच सलोह जलकुंभ १९८६ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण टप्पा-१ या योजने अंतर्गत बांधलेले आहेत. सदर जलकुंभ जुने झाले असून त्यांचे Structural Audit करुन मिळणेबाबत. IIT मुंबई यांना दि. १५/०२/२०१२ रोजी कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने IIT मुंबई यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १७/०२/२०१२ रोजी प्रत्यक्षात कार्यक्षेत्रावरती सर्व उंच सलोह जलकुंभांची व संतुलन टाकीची पाहणी केली दि. ०९/०३/२०१२ रोजी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरती RCC Structure च्या आवश्यत्या सर्व चाचण्या घेण्यात आल्या. सदर चाचणींच्या अनुषंगाने IIT मुंबई, यांनी अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालानुसार कमला पार्क येथील ESR Structurally सुरक्षित असून उघडे पडलेले Beam, Slab, Staircase व कंटेनर इत्यादी उपागांची दुरुस्ती IIT मुंबई ने नमुद केलेल्या सुचना नुसार करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत टाकीचे स्टील उघडे पडून गंजलेले आहे. त्यामुळे तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे अन्यथा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार सदर दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रकीय खर्च रु. ६१,४४,६६९/- एवढे येत असून सदर काम पाण्याची टाकी / इमारत बांधकाम या लेखाशिर्ष अंतर्गत रु. १५०.०० लक्ष तरतुद असून सदर तरतुदी अंतर्गत दुरुस्तीसाठी येणारा खर्च रु. ६१,४४,६६९/- ला मंजूरी मिळून दुरुस्ती करणेकामी मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने.**

JNNURM.PJP Trav.1

गोषवारा
दाखल
दि २३।०४।२२ रोजी
वेळ ५:२० वाजता

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद क्रं. ०२

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१ /१२ /२०११

## ।। गोषवारा।।

प्रकरण क्र. १६ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८ क नुसार "रस्ता कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम्. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १४८क नुसार रस्ता कर लावण्याची तरतुद असून तरतुदी नुसार "रस्ता कर" १०% पर्यत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. उक्त तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने रस्ता कर लागू केला नाही, हया बाबत लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदविलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने नविन रस्ते बनविणे, रस्ते दुरुस्ती देखभाल व डी.पी. रोड तयार करणेकामी मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे.

(आकडे लाखात)

| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|
| नविन रस्ते बांधकाम | ६२९.५४ | ५१२.०९ | ५२०.८८ | १२७२.९९ | ३९८.४१ |
| रस्ते दुरुस्ती | ६०२.८८ | ६६५.७४ | ८५४.०९ | ९२४.०४ | १३६४.९७ |
| डी. पी. रोड बांधकाम | ७४५.३३ | २६१.३८ | १८४७.३० | २०८०.७१ | ५३६.७४ |

उक्त खर्च पाहता मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असते. त्यातच १ एप्रिल २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. "जकात कर" बंद करुन "उपकर" लागू केल्याबाबतच्या १ सप्टेंबर २००८ ते १८ डीसेंबर २००८ य कालावधीतील अनुभव पाहता जकातीच्या ५०% एवढेच उत्पन्न महानगरपालिकेस मिळालेले आहे. अशा परिस्थीतीत "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्यानंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जकात कर बंद केल्याने होणारी उत्पन्नातील घट, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत प्रकल्पासाठी घ्यावयाच्या कर्जाची परतफेड, नविन रस्ते, डी. पी. रोड,

रस्ते दुरुस्ती यावर होणारा खर्च आदी विचारात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे अत्यावश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क मध्ये "रस्ता कर" लागू करण्याची तरतुद असून १०% पर्यत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार १०% रस्ता कर लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस अंदाजे रु. १३.०० कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल. तरी वरीलप्रमाणे "रस्ता कर" लागू करणेस मान्यतेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

कर निर्धारक व संकलक
मिरा-भाईदर महानगरपालिका

श्री प्र.क्र. २०१९२१९९
[signature] दि. १२-२००१.
२०१९२१९९

मा. मदार मा गोखिवादा नोंद रजिस्टर
अ.क्र. २९.

(१)

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२
## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. १८ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

शासनाचे दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रातील उक्त नमुद निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि. २२/१२/२०११, ठराव क्र. ६७ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु.५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु.३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु.११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास कार्योत्तर मंजुरी दिली आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी संख्या सन २०१०-११ | सन २०१०-११ या वर्षात कार्यरत कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले अनुदान | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रत्येकी रु. | एकुण रु. |
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४३७ | रु. ५८३०/- | ८३७७७१०/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग (सेवेनुसार) | १९८ | रु. ५८३०/- | ११४९४८१/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना, | ७२ | रु. ३६३०/- | ७२६०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ७८ | रु. ३६३०/- | २६८६२०/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ७ | रु. ११००/- | ७७००/- |
| | | | एकुण | ९८१०७७१/- |

वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण तरतुद रु. १.१३ लाख इतकी होती. त्या तरतुदीतून रु. ९८.११ लाख खर्च झालेला आहे.

(2)

सन २०११-१२ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- - |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १०.०००/- |
| ३) | श्रमजीवी, वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना | १२.०००/- |

त्याअनुषंगाने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेसाठी दि. ०७/११/२०१२ रोजी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप-महापौर व मा. आयुक्त सो., यांचे उपस्थितीत महानगरपालिकेतील सर्व पक्षीय गटनेते व महानगरपालिकेतील अधिकारी यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महानगरपालिकेतील स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना खालील प्रमाणे दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेत आला आहे.

सन २०१२-१३ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" 'फ' (१६) मध्ये रु. १२०.०० लाख आहे. व शिक्षण मंडळ (महसुली) सानुग्रह अनुदानापोटी रुपये तरतुद १५.०० लाख असुन महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या दि. ३१/०३/२०१२ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेली आहे, अशा प्रकारे कार्यरत कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदान रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मनपा वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील अधिकारी/कर्मचारी (स्थायी) | १४४८ | ७,८००/- | १,१२,९४,४००/- |
| २. | मनपा प्राथमिक शिक्षक कर्मचारी (स्थायी) | १९३ | ७,५००/- | १४,४७,५००/- |
| ३. | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५,०००/- | ३,८५,०००/- |
| ४. | बालवाडी शिक्षक (अस्थायी) | ०५ | ४,०००/- | २०,०००/- |
| ५. | आर. सी. एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५,०००/- | १,४५,०००/- |
| ६. | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४,०००/- | १,०८,०००/- |
| | | | **एकुण** | १,३३,९९,९००/- |

वरील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे सन २०११-१२ या वर्षात नियमीत कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानसाठी सन-२०१२-१३ च्या अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. १,३५,००,०००/- तरतुद आहे. त्यापैकी तरतुदीतून महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसह शिक्षकास व मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना एकुण रु. १,३३,९९,९००/- (अक्षरी रुपये एक कोटी तेहतीस लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र.) एवढ्या रकमेचे वाटप केलेले सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजुरी मिळणेस मान्यतेस्तव शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि. २९/११/८२

२९/११/८२

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** १८ :- मिरारोड (पूर्व) रामनगर व जांगीड इन्क्लेव्ह येथील ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेल्या इमारती मधील जागा वापराबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीतील ॲमिनिटी आपेन स्पेस या तरतुदीन्वये मिरारोड (पूर्व) रामनगर येथे व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह ह्या दोन इमारती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेल्या आहेत. रामनगर येथील इमारत तळ व दोन मजल्याची व जांगीड इन्क्लेव्ह येथील इमारत तळ व चार मजल्याची आहे. सदर इमारतीचा उपयोग सार्वजनिक वापरासाठी करावयाचा असून इमारतीमध्ये खालील वापर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**१) जांगीड इन्क्लेव्ह इमारत :**

तळमजला :- मुलांकरिता इनडोअर गेम

पहिला मजला :- लग्न व इतर कार्यक्रमांना भाड्याने देण्याकरिता

दुसरा मजला :- अभ्यासिका व वाचनालय

तिसरा व चौथा मजला :- महागरपालिका कामकाजासाठी राखीव

**२) रामनगर येथील इमारत :**

तळमजला :- १) वरीष्ठ नागरीकांसाठी योग व इतर कार्यक्रमाकरिता देणे.

दुसरा मजला :- लग्नकार्य व इतर कार्यक्रमांसाठी भाड्याने देणे.

वरील इमारतीत पहिल्या मजल्यावर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीमध्ये जागा कमी पडत असल्याने शिक्षण, परवाना, वाहन इ. विभाग स्थलांतरीत करण्यात येत आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे दुय्यम निबंधक कार्यालया करीता २०६५ चौ.फूट प्रति कार्यालय मानकानुसार दोन कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी नोंदणी उपमहा निरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे यांनी केली होती. सदर पत्रानुसार मा.महासभेपुढे प्रस्ताव ठेवला असता मा. महासभा दि.१/२/२०११ ठराव क्र. ८० अन्वये सदर कार्यालया करीता चालू बाजार भावानुसार ३ वर्षाचे आगाऊ भाडे घेऊन खालील ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली होती.

१) मिरारोड आरक्षण क्र. १८१ – २००० चौ.फूट

२) भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र. ०१ – ४००० चौ.फूट

(प्रभाग कार्यालय परिवहन कार्यालयात स्थलातरीत करुन)

सदर ठरावानुसार दि.४/२/२०११ रोजीच्या पत्रान्वये मा.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्राक उपनिंबंधक यांना चालु बाजारभावानुसार दोन कार्यालयाच्या जागेचे रु.६,१२,०००/- वार्षिक भाडे प्रमाणे तीन वर्षाचे भाडे भरण्यास व करारनामा करण्यास तयार असल्यास कळविण्या बाबत लेखी

कळविले असता सदर कार्यालयाने उत्तर दिले नाही. दरम्यान च्या काळात आरक्षण क्र. १८१ या जागेत रात्र निवारा कार्यान्वित करण्यात आले असून प्रभाग कार्यालय स्थलांतरीत न केल्याने तेथे जागा उपलब्ध नाही.

मा.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे यांनी ॲमिनिटी ओपन स्पेस मधील जागिंड इन्क्लेव्ह व रामनगर ॲमिनिटी हॉल ची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत (२०००.०० चौ फूट ची दोन कार्यालये) कळविले आहे.

सद्यस्थितीत रामनगर येथील तळ मजल्यावरील उर्वरीत जागेची मागणी सह दुय्यम निबंधक ठाणे क्र. १० व १२ व कार्यालयासाठी तसेच उपनिबंधक (सहकारी संस्था) यांनी केलेली आहे. सदर कार्यालयाना शासकिय दराने भाडे घेऊन जागा उपलब्ध करून देता येईल.

वरीलप्रमाणे संबंधितांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय होण्यास शिफारस आहे.

आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PWD/PC2/DK/2012-13/G 2

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. १९ :- मानधनावरील संगणक चालक /लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.....

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. त्यामुळे संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे. तद्नंतर मा. महासभा दि. २०/०३/२०१०, ठराव क्र. ६५ अन्वये मंजुरी दिल्यानुसार संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि. १८/०८/२०१० रोजी पाठविला होता. परंतु त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही.

मा.महासभा दि.२२/१२/२०१०, ठराव क्र.६८ नुसार महापालिकेत मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु.६५००/- तसेच लघुलेख यांना रु. ७५००/- प्रती महिना ठोक मानधनावर दि. ३०/११/२०१० पासून पुढे ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी दिलेली आहे. सदरची मुदतवाढ दि. ३०/१०/२०११ रोजी संपत आहे.

१) मा. महासभा दि. २९/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये संगणक चालक/लघुलेखक यांना दि. ०१/११/२०११ पासुन पूढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ दिलेली आहे. सदरची मुदत वाढ दि. ३०/०९/२०१२ रोजी संपत आहे.

२) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकची पदे मंजूर नाहीत, तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बाह्य मार्गाने संगणक चालकाचे काम करुन घेण्याचे निर्देश आहेत.

३) सद्यःस्थितीत संगणक चालक/लघुलेखक यांचा पदनिर्मिती प्रस्ताव शासनाजवळ प्रलंबीत असुन शासनाने महानगरपालिकेस दि. २३/०८/२०११ रोजीचे पत्रानुसार संगणक चालक व

लघुलेखक यांचे प्रस्तावावर कार्यवाही करणेकरीता महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ अंतीम करुन शासनास पाठविणे आवश्यक आहे असे कळविले आहे.

दि. १४/०९/२०१० च्या महासभेत महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ अन्वये हरकती सुचनांवर सुनावणी झाल्यावर अंतिम मंजुरीसाठी सभेपुढे मान्यतेस्तव सेवाशर्ती नियम ठेवले असता सदर विषय प्रथम गटनेत्याचे बैठकित चर्चा करुन मा. महासभेत घेणेबाबत तत्कालीन मा. महापौर सो., यांनी सुचना दिल्या. त्या नंतर गटनेत्याची मा. महापौर सो., यांनी दोन वेळा बैठका बोलविल्या. परंतु त्या बैठकित अंतिम निर्णय न झाल्यामुळे अद्याप महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यांना मा. महासभेची अंतिम मान्यता मिळालेली नाही. मा. महासभेची अंतिम मान्यता न मिळाल्यामुळे सेवाशर्ती नियम शासनास पाठविता आलेले नाहीत. मा. महासभेने सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यास मान्यता दिल्यानंतर शासनाचे दि. २३/०८/२०११ चे पत्रावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या विविध विभागात ८० संगणक चालक कार्यरत असुन ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ७०.०० लाख इतकी तरतूद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा आवाका पहाता संगणक चालक तसेच लघुलेखक यांना मुदतवाढ देणेबाबत मा. महासभेने निर्णय घेणे उचीत आहे.

आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्राप्त दि. २०/१०/२०१२

वेळ दु. ३.१५ वा.

२०/१०/१२

मा. महासभा दि. नोव्हेंबर

नोंद रजिस्टर क्र. ७४, दि. २०/१०/१२.

२०/१०/१२.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. ०१/१२/२०१२

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक** ( २० ) मिरा भाईदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय व नगरभवन या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**उपसूचना क्र.** ( )

सार्वजनिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करणेचे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार प्रथम टप्प्यात मिरा भाईदर महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, नगर भवन व भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड या सार्वजनिक इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करण्यात आले आहे. सदर इमारतींमध्ये आवश्यक असलेली अग्निशमन यंत्रणा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ मध्ये नमुद केलेली आहे.

सदर कामी कोटेशन मागविले असता प्राप्त कोटेशन मधील नमुद कामांपैकी अत्यावश्यकच कामे करुन घेणेकरिता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येत आहे.

| | मुख्य कार्यालय यंत्रणा बसविणे कामी | अंदाजित खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | Wet hydrant System | 35,00,000/- |
| २ | Sprinkler System | 30,00,000/- |
| | | **65,00,000/-** |
| | **भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड** | |
| १ | Wet hydrant System | 20,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **22,00,000/-** |
| | **नगरभवन** | |
| १ | Wet hydrant System | 30,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **32,00,000/-** |
| | Total | **1,19,00,000/-** |

उपरोक्त इमारतीमध्ये प्रस्तावित अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरीता एकुण रू. १,१९,००,०००/- येवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "आग सुरक्षा निधी" या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त तक्त्यात सुचविलेली अग्निशमन यंत्रणा त्या त्या इमारतीत उभारण्याकरीता महाराष्ट्र शासनाकडून लायसन्स प्राप्त लायसन्स अभिकरणाकडुन निविदा मागविणेकरिता ई - टेंडरिंग पध्दतीने जाहिर निविदा मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईदर महानगरपालिका

પ્રમાણિત. ૨૫/૧/૧૯

૧/૧૧/૧૯

મહાસભા ઠરાવ નંબર
૧૯૯૮ તા.૩.૦૯.

# मा. महासभा दि. ०१।१२।२०१२

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( २१ )** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मार्केट इमारतीमधील हद्दीतील गाळ्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दहा मार्केट इमारती असून सदर मार्केटमध्ये बसणाऱ्या मासळी विक्रेत्याकडून रू. ३००/- प्रति महीना व मटन विक्रेत्याकडून रू. ६००/- भाडे आकारण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि.३०/०६/२००६ ठराव क्र. ४१ अन्वये निर्णय झाला होता. त्यानुसार सर्व संबधिताना रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी बिले देण्यात आली होती. तथापी बऱ्याच विक्रेत्यांनी सदर भाडे भरलेले नव्हते. तसेच मासळी विक्रेत्याच्या संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने सदर दर आकारणी दिनांकापासून कमी करावे तसेच बाजाराच्या स्वच्छतेची, साफसफाईची हमी स्वत घेवु असे कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावावर विचार विनिमय करण्याकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० अन्वये सदर मासळी विक्रेत्याकडून कर आकारणी दिनांकापासून रू. २०/- प्रतिमाह बाजारशुल्क / भाडे आकारण्याबाबत निर्णय होउुन मागील सर्व बिले निर्लेखित करण्यास देखिल मान्यता देण्यात आली. सदर मार्केट इमारतीची साफसफाई संबधित विक्रेत्यांनी करून लाईट बिल, पाणीबिल सदर विक्रेत्यांनीच भरावयाची होती.

सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येउुन संबधित विक्रेत्यांना बिले देण्यात आली. तथापी रू. २०/- प्रतिमाह भाडे देखिल भरण्यात आलेले नसूनं पाणीबिल व वीज बिल देखिल विक्रेत्यांमार्फत न भरल्याने वीज पूरवठा खंडित करण्यात आला आहे. सर्व मार्केटची दुरावस्था झाल्याने सर्व मार्केट इमारती बाबतचा मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० रद्द करून सर्व मार्केट लिलावाद्वारे खाजगी ठेकेदाराकडे भाडे वसूलीसाठी देणे योग्य होईल. जेणेकरून विक्रेत्याकडून भाडे वसुल होऊन महानगरपालिकेस वीज बिल, पाणी बिल भरता येऊन आवश्यक दुरूस्त्या करून इमारती सुस्थितीत ठेवता येतील. तरी सदर प्रस्तावावर विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

સાફ દિ. ૧૧/૯/૧૨

૧૧/૯/૧૨

મહાસભા ઠરાવમાં નોંધ

રજીસ્ટર. અ.ક્ર. ૨

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०९/१२/२०१२

## // गोषवारा //

विषय : - मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR साठी कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्ताव मा. नगर विकास विभागास पाठविणेस मान्यता देणेबाबत.

प्रकरण क्र. २२

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास नियंत्रण नियमावली T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालील प्रमाणे मंजूर तरतूद केलेली आहे.

(१)

| ORIGINATING ZONE | RECEIVING ZONE |
|---|---|
| I | I |
| II | IV, V-A, VI-A |
| III | IV, VI-A |
| IV | IV, VI |
| V | IV, VI-A |
| V-A | V-A, VI-A |
| VI | VI-A, VI |
| VI-A | VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-B |
| VIII | VIII |

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सूचित केलेल्या खालीलप्रमाणेच्या तक्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये ORIGINATING ZONE व RECEIVING ZONE मध्ये फेरबदल करणेकरिता प्रकरण क्र. ५४, ठराव क्र. ५५, दि.११/०२/२०१० रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आहे.

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II-A | IV, II-B |
| II-B | II-B, IV |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |

उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर प्रस्तावास मा. महासभेने प्रकरण क्र. ४१, ठराव क्र. ४७, दि.२०/०८/२०१० रोजी फेरबदलास अंतिम मंजूरी दिलेली आहे.

तद्नंतर, सदरचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/३१५८/२०१०-११, दि.२९/११/२०१० अन्वये सादर केलेला आहे. सदर प्रकरणात सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील दि.१६/०३/२०११ रोजीच्या पत्रातील त्रुटींची पूर्तता करुन त्याबाबत महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/१५५/२०११-१२, दि.२१/०४/२०११ अन्वये कळविलेले आहे. तद्नंतर मा. शासनास महानगरपालिकेने पुनश्च पत्र क्र. मनपा/नर/१८५८/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या विनंतीपत्रानुसार महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर विकास योजनेत सेक्टर निहाय फेरबदलाबाबत मा. शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सेक्टर II चे II-A व II-B असे दोन भाग केलेले असून II-A हा पूर्णतः Congested असून ब-याच प्रमाणात आरक्षण आहे. तसेच II-B या सेक्टरमध्ये बरीच मोकळी जागा असल्यामुळे व त्या ठिकाणी II-A व II-B चा वापर होवू शकतो. त्यामुळे विकासाचा समतोल साधला जाईल, अशी महानगरपालिकेने कारणमिमांसा नमुद केलेली आहे. या सेक्टर II-A व II-B च्या मधील विभाजन हद्दीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. सेक्टर II-B चे उत्तर हद्दीलगत १८.०० मी. रुंद रस्त्याच्या उत्तरेकडील आणि ३०.०० मी. रुंद रस्ता यामधील मोकळी जागा सेक्टर II-A मध्ये सामाविष्ट केली आहे. सदर जमीन बहुतांशी मोकळी असल्यामुळे ती जागा II-A मधून वगळून सेक्टर II-B या रिसीव्हींग झोनमध्ये समाविष्ट केल्यास तेथे विकासाचा समतोल साधता येईल", याप्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या दि.१२/०९/२०११ रोजीच्या विनंतीपत्रानुसार मा.आ.श्री. गिल्बर्ट मेंन्डोन्सा यांनी मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग यांचेकडे प्रस्तावित फेरबदलाबाबत दि.१४/०९/२०११ रोजी पत्रव्यवहार केला असता, तद्अनुषंगाने मा. राज्यमंत्री यांनी दि.२२/०९/२०११ रोजी महानगरपालिकेचे मा. आयुक्त, संबंधीत अधिकारी व इतर अर्जदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त महानगरपालिकेस प्राप्त असुन इतिवृत्तात नमुद करणेत आले आहे कि,

**"अर्जदारांनी / विकासकांनी सादर केलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेचे मंजूर ठराव आणि याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतूदीनुसार प्रसिध्द सूचना यामध्ये समाविष्ट नसल्याने पुन्हा नव्याने प्रसिध्दीकरण करावे लागेल. सदर प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत नगररचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त करुन घेवून गुणवत्तेनुरुप पुढील कार्यवाही शासनामार्फत करण्यात येईल".**

याबाब आवश्यक ती कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात यावी, अशा सुचना मा. राजमंत्री, नगर विकास विभाग यांनी दिल्या आहेत.

तद्अनुषंगाने वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वय फेरबदलाचा प्रस्ताव कार्यवाही करण्यासाठी मा.महासभेच्या मंजुरीसाठी सादर करणेत येत आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर क्र. ४

प्राप्त दि. १२/११/१२

प्रशासन

(१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

## गोषवारा

प्रकरण क्र. : २३

विषय : इमारतीचे बांधकाम करतांना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी मंजूर करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मोठया प्रमाणावर नागरीकरण होत असून शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. सदर नागरीकरणामुळे निरनिराळे व्यवसाय, कंपन्या, छोटे मोठे उद्योगधंदे, मॉल्स, शाळा, व्यापारी, आस्थापने इत्यादी शहरात होत असून त्यासाठी मोठया प्रमाणावर बांधकामे शहरात अनेक ठिकाणी चालू आहेत. वाढत्या लोकसंख्येसाठीही अनेक गृहनिर्माण प्रकल्प शहरात येत असून त्यात दिवसेंदिवस वाढ होत जाणार आहे. सदर बांधकाम प्रकल्पावर काम करण्यासाठी मोठया प्रमाणावर राज्याच्या इतर भागांतून त्याच बरोबर देशातील इतर राज्यांतूनही बांधकाम मजूर येत आहेत. सदर बांधकामाच्या वेळी ठिक ठिकाणी पाण्याचे साठे निर्माण होतात. त्यामुळे डासांच्या वाढीसाठी पोषक परिस्थिती निर्माण होऊन डासांचे प्रमाण वाढते. त्याच बरोबर विविध भागांतील मजूर बांधकामासाठी येथे स्थलांतरित होत असल्याने हिवताप, डेंगी या सारख्या आजाराच्या जीवाणूंचाही प्रसार होतो. त्यामुळे सदर आजार मोठया प्रमाणावर उद्‌भवण्याचा धोका असतो.

सदर बांधकामाच्या अनुषंगाने आवश्यक ते डास प्रतिबंधक उपाय योजले नाहीत तर डासांच्या संख्येत प्रचंड वाढ होऊन हिवताप, डेंगी सारखे आजार स्थानिक जनतेत पसरुन जीवितहानी होण्याचा धोका आहे.

तरी सदर बांधकामाच्या ठिकाणी संबंधित बांधकाम व्यवसायिकांनी डास प्रतिबंधनासाठी योजावयाच्या उपाययोजना राबविणे अत्यावश्यक आहे. सदर उपाययोजनांची कडकपणे अंमलबजावणी करावयाची असल्यास सदर उपाययोजना राबविणे संबंधित व्यक्ती, संस्था, बांधकाम व्यावसायिक यांना कायद्याने बंधनकारक करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय किटानूजन्य आजार निर्मुलन कार्यक्रमानेही' डास प्रतिबंधनासाठी कायदेशीर उपाययोजना व त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतःच्या उपविधी तयार करुन त्यास शासनाची मंजूरी घेणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. सद्यस्थितीत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, दिल्ली, चंदीगड इ. मनपांचे उपविधी मंजूर असून त्याची कडकपणे अंमलबजावणी केली जाते. मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी पुढील प्रमाणे उपविधी प्रस्थावित करण्यात येत आहे.

"इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डास प्रतिबंधक उपाययोजना" :-

१. पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम व देखभाल :-

(अ) टाकीच्या मुख्य भागाची रचना :-

१. पाण्याच्या टाक्या या लोखंड,बीड,सिमेंट कॉंक्रिट किंवा तत्सम वस्तूंच्या योग्य त्या जाडीच्या व त्याचे छतावर एक माणसाचे वजन पेलवले जाईल अशा प्रकारे बनविलेली असावी.

२. पाण्याच्या टाकीच्या सर्व बाजू एकमेंकाशी व्यवस्थित सांधलेल्या असाव्यात की, ज्यामुळे त्यामध्ये कोणत्याही प्रकारची फ़ट राहणार नाही.

३. पाण्याच्या टाकीच्या वरील पृष्ठभागावर पाणी किंवा अन्य पदार्थ साचू नयेत अशाप्रकारे रचना असावी.

४. दंडगोलाकार टाक्यांची उंची ही २.२५ मी. (पायासहित) किंवा त्यापेक्षा कमी असावी.

५. २.२५ मी पेक्षा जास्त लांबीच्या / उंचीच्या दंडगोलाकार टाक्या या आडव्या ठेवण्यात याव्यात.

(ब) टाकीचे झाकण व त्याची मांडणी :-

१. टाकीच्या वरील भागावर वर्तुळाकार झाकण असावे.

२. सदर झाकण एकसंध असावे.

३. हे झाकण व टाकीचे वरचे भागात फ़ट नसावी. अशी फ़ट असल्यास ती लेडवुल, शिसे किंवा अशा प्रकारच्या मान्यताप्राप्त पदार्थांनी भरलेली असावी.

४. झाकणाची कडा व त्याखाली येणारी टाकीच्या तोंडाची कडा ही एकमेंकावर अशाप्रकारे बसली पाहिजे ज्यातील फ़ट १.५ मी पेक्षा कमी असावी.

५. वीट बांधकाम किंवा सिमेंट क्रॉकिटच्या टाक्यांच्या बाबतीत हे झाकण टाकीच्या वरच्या पातळी पेक्षा उंच व स्पष्टपणे दिसणारे असावे.

६. टाकीच्या झाकणावरील आडवी पट्टी ही झाकणाच्या जास्तीत जास्त जवळ असावी की ज्यामुळे झाकण पूर्णपणे बंद राहू शकेल.

७. टाकीचे झाकण नटबोल्ड किंवा कुलुप यांच्या सहाय्याने नेहमी बंद केलेले असावे.

८. जर पाण्याची टाकी ३ मी. पेक्षा लांब असेल तर अशा टाकीस वरीलप्रमाणे एक ज्यादा तोंड असावे ज्यायोगे टाकीच्या कुठल्याही भागातील पाण्याचा नमुना तपासणीसाठी घेता येईल.

९. टाकीमध्ये किंवा टाकीतुन बाहेर पाणी जाणा-या नलिका या टाकीशी अशाप्रकारे जोडलेल्या असाव्यात की त्यामध्ये कुठल्याही प्रकारची फ़ट राहता कामा नये.

१०. टाकीच्या ओव्हर फ्लो पाईपचे उघडे तोंड पितळे किंवा तांब्याच्या जाळीने बंद केलेले असावे. अशा जाळीच्या छिद्राचा आकार १.५ मी.मी. पेक्षा कमी व्यासाचा असावा. केव्हाही तपासणी करता येईल अशाप्रकारे ही जाळी बसवावी.

टाकीच्या तपासणीचे मार्ग :-

१. १.२ मी. पेक्षा जास्त उंचीच्या टाक्यांना पक्की व मजबूत लोखंडी शिडी असावी. शिडीची वरील बाजू टाकीच्या वरील भागास जोडलेली असून ते गोलाकार असावेत की, जेणेकरुन हात धरण्यासाठी त्याचा उपयोग करता येईल. शिडीचे तळाचे टोक हे सिमेंट कॉक्रीटमध्ये बसविलेले असावे.

२. २.५ मी. पेक्षा जास्त उंचीच्या शिडीला दोन्ही बाजूने आधार दिला असला पाहिजे ८ .मी पेक्षा जास्त उंचीच्या शिडीला दोन्ही बांजूनी, हात धरण्यासाठी पाईल असले पाहिजेत.

३. टाकीला जाणारी शिडी ही लाकडी असल्यास त्याचे ऊन किंवा पाऊस यापासून संरक्षण व्हावे याकरिता आच्छादन असले पाहिजे.

४. पाण्याची टाकी कोणत्याही आच्छादनाखाली किंवा आडोशाला असेल तर अशा ठिकाणी पुरेशी मोकळी जागा असावी की ज्यायोगे टाकीची तपासणी किंवा तत्सम कामे योग्य रित्या करता येतील.

५. इमारतीवरील किंवा उंच जागी असलेल्या पाण्याच्या टाक्यांच्या बाबतील तळापासून वरपर्यंत केवळ एकच सरळ शिडी न देता योग्य उंचीवर सिमेंट क्रॉकीटचे धक्के बांधावेत.

विशेष दक्षता :-

१. ज्या आडव्या बसविलेल्या दंडगोलाकार पाण्याच्या टाकीचा वरचा आच्छादनाचा भाग हा समपातळीत असेल तर त्यावर चौकोनी किंवा आयताकार आकाराचे प्लॅटफ़ार्म बांधून त्यास पाण्याच्या टाकीसाठी बनविलेले झाकण सहजगत्या व व्यवस्थित बसविण्याची सोय केलेली असावी. तसेच अशा प्रकारच्या प्लॅटफ़ार्मला टाकीस जोडलेली शिडी देखील व्यवस्थितपणे बसवावी.

२. ज्या दंडगोलाकार पाण्याच्या टाक्या उभ्या बनवल्या जातात व त्यांच्या वरचा पृष्ठभाग ही बर्हीगोल असतो अशा टाक्यांना देखील तपासणीसाठी बसविलेली शिडी व्यवस्थित असावी व त्या टिकाणी तपासणीसाठी समपातळीवर प्लॅटफ़ार्म असावा.

३. सर्व टाक्यांचे कव्हर व त्यांचे तपासणीचे छिद्र हे बाजारात सर्वसाधारणपणे सहजगत्या मिळणा-या आकारमानाचे व धातूचे बनविलेले असावे व त्यांचे कोणताही भाग हा बाजारात सहजगत्या उपलब्ध होईल असा असावा.

४. सर्वसाधारणपणे एच.पी.डी.सी. पध्दतीच्या टाक्या बसवाव्यात ज्यात वरचा पृष्ठभाग ही वाकण्याची शक्यता नसते तसेच त्यास झाकण व त्यासोबत असलेले कॉलर सहजगत्या बसणारी असावी व त्यावर तपासणीसाठी उभे राहिल्यास कोणत्याही प्रकारचा बाक किंवा खड्डा निर्माण होणार नाही अशी असावी.

पाण्याच्या टाकीत पाणी भरण्यासाठी करावयाच्या तरतुदी :-

१. जमिनीच्या किंवा जमिनीसाठी तयार केलेल्या पाण्याच्या टाक्याबाबत अशा पाण्याच्या टाक्यांच्या सर्वात वरचा आच्छादनाचा भाग हा जमिनीपासून किमान ४५ से.मी. उंचीवर असावा.

२. पंम्प रुम हे गली ट्रॅपव्दारे इमारतीची सांडपाणी वाहून नेणा-या गटाराला किंवा त्याच्या परिसरात पाणी झिरपून ते साचलेले राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सुचना :-

१. पाण्याच्या टाक्यांचे वर्णन, सुटे भाग व त्या बनविण्याचे बांधकाम साहित्य हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने मलेरिया निर्मुलनासाठी सुचविलेल्या व नियमानुसार असावे.

२. या दिलेल्या सुचनात जरुर वाटल्यास योग्य ते बदल वा सुधारणा करण्यात येतील व त्या सर्व संबंधितावर बंधनकारक राहतील.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बसविण्यात येणा-या पाणी साठवण्याच्या टाक्या, कारंजी, दगडी पध्दतीचे बगीचे, बगीच्यातील कृत्रिम रित्या तयार केलेले पाण्याचे धबधबे किंवा प्रवाह इ. याबाबतचे नियम व उपविधी :-**

१. कोणत्याही शोभिवंत स्वरुपाचे बांधकां ज्या ज्या मध्ये पाण्याचा प्रवाह किंवा साठवण होणार असेल अशा बगीच्यासाठीच्या पाण्याच्या टाक्या, पाण्याची कारंजी ज्या ठिकाणी शुध्द पाण्याची फ़वारणी/कारंजी असतील व ते पाणी हौदात व त्यानंतर छोट्या कालव्याच्या स्वरुपात इमारतींच्या आतल्या भागात किंवा कोणत्याही मजल्यावर किंवा इमारतींच्या गच्च्यावर बनविलेले असतील तर अशी बांधकामे ही अनुज्ञेय असणार नाहीत व

कोणाही नागरिकांने अशा स्वरुपाचे बांधकाम मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याची व नगर रचना विभागाच्या परवानगीशिवाय करु नये.

२. या पध्दतीने तयार केलेले शोभिवंत हौद, कारंजी किंवा तलाव हे त्या ठिकाणीच्या जमिनीच्या पातळीपेक्षा जास्त उंचीवर असावेत व ते इमारतीच्या सांडपाणी वाहून नेणा-या सांडपाण्याच्या चॅनलला अशा रितीने जोडण्यात यावेत की, त्यातील पाण्याचा पुर्णपणे निचरा झाला पाहिजे. तसेच या टाक्यांचे पाणी वाहून जाण्यासाठी तयार केलेले जोडणीचे मार्फ हेमहानगरपालिकेच्या सांडपाणी वाहून नेणा-या मार्गास जोडलेले असावेत.

३. ज्या ठिकाणी कारंजी किंवा कृत्रिम धबधबे बनविलेले असतील व पाणी तळातील हौदामधून किंवा पृष्ठभागातून पुन्हा पुन्हा वापरुन त्याचा उपयोग होत असेल अशी कारंजी किंवा धबधबा अशा त-हेने बनविलेले असतील की, जेव्हा पाण्याचा प्रवाह थांबवला जाईल तेव्हा कारंज्यातील वा धबधब्यातील सर्व पाणी हे तळाशी वाहून जाईल त्या व्यतिरिक्त कोठेही साचून राहणार नाही.

४. अशा प्रकारची कृत्रिम कारंजी व धबधबे यांचे उभे व आडवे असणारे पृष्ठभाग समतल व गुळगुळीत असावेत की,ज्यात सर्व बाजूंना सारख्या प्रमाणात पाणी वाहिल व कोणत्याही प्रकारे पाणी साचणार नाही किंवा थांबणार नाही. तसेच तळाचे पाणी काढून हौद व टाक्या रिकाम्या करताना या पृष्ठभागावर देखील कोठेही पाणी राहणार नाही अशी त्यांची रचना असावी.

५. वापरात असलेले पाणी साचलेले पाणी हे वाहून जाऊन ते डास विरहीत अशा जागेत साठविण्यासाठी या बांधकामात रचना असावी की, दिवसातून एकदा हे पाणी हौदातून काढून ते डास विरहीत करुन पुन्हा वापरण्याची नैसर्गिक बांधणी त्यात असावी. तसेच अशा प्रकारे डास नियंत्रित साठे हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने सुचविलेल्या ठराविक पध्दतीने बनविलेले असावेत. ज्यात महापालिकेने सुचविल्याप्रमाणे त्यातील झाकणे त्यास लागणारी कॉलर व बांधणी असावी. अशा झाकणात ती बंद केल्यावर कोणत्याही प्रकारे १.५ मी.मी. पेक्षा जास्त उंचीची फ़ट राहता कामा नये. किवा अशी कारंजे व धबधबे यातील पाणी पाण्याचा प्रवाह बंद करताच महापालिकेच्या गटारापर्यंत वाहून जाईल अशा त-हेची त्यांची बांधणी असावी.

६. खेळणी कारंजी व धबधबे यांचा प्रवाह अशा रितीने असावा की, पाण्याचा प्रवाह हा सुक्ष्म कणात तयार होऊन त्याचा हवेशी सतत संपर्क येऊन ते शुध्द होईल अशी खेळती कारंजी त्यात असावीत.

७. ज्या दिवशी अशा बांधकामाची पाहणी करण्यात येते त्या आठवड्याच्या एक दिवशी ही कारंज व धबधबे बंद असावेत.

८. अशा प्रकारच्या कृत्रिम कारंज्यात किंवा धबधब्याच्या बाधकांमाजवळ कोणत्याही प्रकारची वनस्पती लावू नयेत की, ज्यांच्या वाढीमुळे आठवड्याच्या एकदा करायच्या पाहणीत कोणताही अडथळा निर्माण होऊ शकतो.

९. अशा बांधकामाची साप्ताहिक पाहणी करण्यासाठी आवश्यक असलेली तपासणी फ़ी ही संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ म्हणून त्या व्यक्तीकडून प्रथम वसूल करण्यात येईल.

१०. अशा प्रकारची बांधकामे करण्यासाठी संबधितांनी स्वत: विहित नमुन्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे अर्ज करावयाचे आहेत. अशा बांधकांमासाठी इमारत बांधताना असणारे कंत्राटदार, ठेकेदार, वास्तूशिल्पकार, विकास करणारे एजंट यांनी केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा त्यांना अशा प्रकारची परवानगी देण्यात येणार नाहीत.

११. अशी बांधकामे करणा-या मालकांनी महानगरपालिकेस रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर ती व्यक्ती सर्व सुचनांचे व नियमाचे पालन करील असे प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे. अशा पध्दतीने दिलेल्या प्रतिज्ञापत्रकानुसार व दिलेल्या परवानगीनुसार केलेले बांधकाम हे काळजीपुर्वक स्वच्छ राखले गेले नाही तर अशा प्रकारे झालेली हेळसांड त्या मालकाच्या नजरेस लेखी स्वरुपात आणून महापालिका हे बांधकाम त्यानंतर केव्हांही काढून टाकील व जागा पूर्वीप्रमाणे करण्यात येईल. जेणे करुन तेथे डास निर्माण होणार नाहीत.

**पोहण्याच्या तलावाचे बांधकाम, डास होऊ नये यासाठी घ्यावयाची खबरदारी :-**

१. पोहण्याच्या तलावाचे बांधकाम हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखड्याबर हुकुन करण्यात यावे.

२. पोहण्याच्या तलावासाठी लागणा-या पाण्याचा उद्भव उदा. विहिरी, जलवाहिन्या किंवा पाणी साठवण टाक्या हा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडूनच मंजूर व प्रमाणित करुन घेतला पाहिजे.

३. पोहण्याच्या तलावाचा तळाचा पृष्ठभाग निसरडा असावा. तसेच त्यावरुन पाण्याची गळती होऊ नये या पृष्ठभागाला पाणी बाहेर काढण्याच्या दृष्टीने नियमित उतार असावा. तसेच कोणत्याही ठिकाणी अनियमितपणा असू नये तसेच तलावाच्या परिमितीच्या बाहेरील सुमारे ६० ते ९० से.मी रुंदीचा भाग निसरडा नसावा तसेच तलावापासून दुरच्या दिशेने उतार असलेला व नियमित जमिनीच्या कमीत कमी १५ से.मी उंच असावा ज्यायोगे बाहेरील पाणी तलावात जाणार नाही.

४. पोहण्याच्या तलावाचे पाणी काढून टाकण्यासाठी स्वतंत्र पंपाची व्यवस्था असावी तसेच या पंपाचे सांडपाणी तलावापेक्षा जास्त उंचीवर असलेल्या पाणी वाहून जाणा-या हौदात सोडण्यात येऊन पोहण्याच्या तलावातील

सर्वच्या सर्व पाणी काढून टाकले जाईल अशा पध्दतीने पंपाची बांधणी केलेली असावी. तसेच तलावाचे पाणी व सांडपाण्याचे गटार यातील पाणी केव्हाही एकमेकांत मिसळू देऊ नये.

५. जेव्हा जेव्हा पोहण्याच्या तलावात लगतच्या पाण्याच्या टाकीत किंवा पाणीन वाहून जावयाच्या चेंबरमध्ये किंवा अन्य जागेत डासांचा प्रार्दुभाग झाल्याचे आढळून येईल तेव्हा अशी सुचना मिळताच तलावातील पाणी टाक्यातील पाणी किंवा सांडपाणी वाहून नेणारे पाईप पुर्णपणे रिकामी व कोरडे राहतील व त्यात पाण्याचा थेंबही राहणार नाही. अशी व्यवस्था करण्यात यावी. व अशाप्रकारे कोरडे केलेले स्थान किमान ६ तास किंवा दिल्या गेलेल्या सुचनेच्या काळात कोरडे ठेवण्याची जबाबदारी संबधित मालकावर राहिल. तसेच जेव्हा जेव्हा या तलावाचे नियमित किंवा अकस्मात पाहणी करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाचे निरिक्षण अधिकारी येतील तेव्हा पोहण्यच्या तलावातील किंवा विहिरितील किंवा पाणी साठवावयाच्या टाकीतील अन्य कोणत्याही त्या ठिकाणच्या पाण्याचे नमुने त्यांना घ्यावयाचे झाल्यास असे नमुने त्यांना घेण्याची अनुज्ञा संबधित मालकाने दिली पाहिजे त्यास कोणतीही अडचण निर्माण करु नये.

६. पोहण्याच्या तलावातील पाणी दिवसातून ४ ते ६ वेळा बदलण्याची किंवा ते पाणी काढून दुस-या टाकीतून पुन्हा तलावात सोडण्याची प्रक्रिया करण्यात यावी. असे करताना पोहण्यच्या तलावातील पाणी सहजगत्या वाहणा-या पाईपमधून बाजूच्या चाळणीवजा टाकीतून किंवा जोराने वाहणारे पाणी बाजुच्या चाळणीवजा टाकीतून त्याचा दाब वाढवून पुन्हा सोडण्याची व्यवस्था करावी जेणेकरुन त्यात डासांचा प्रादुर्भाव होणार नाही.

७. तलावात पाणी सोडताना पाणी तलावात पडण्याचे वेळी त्यात ०.२ ते ०.५ पी.पी.एम. या प्रमाणाचा क्लोरीनचा फ़वारा त्यात सोडण्यात यावा तसेच पोहण्याचा तलावातून पाण्याचे अल्कलीचे प्रमाण ७.५० पी.एँच असावे. ज्यामुळे ते पाणी आंघोळीसाठीही देखील योग्य राहिल.

८. पोहण्याच्या तलावात पुन्हा वापरलेले पाणी सोडण्यासाठी जो पाईप बसविला असेल त्यातील पाण्याचा वेग ६० से.मी. ३/प्रति सेकंद किंवा २ फुट/प्रति सेकंद असावा जेव्हा अर्धा तलाव अशा पाण्याने भरेल तेव्हा उरलेला तलाव ताज्या पाण्याने भरावा. तसेच अशा पाईपाची बांधणी करताना त्यास योग्य असे वॉल्स , पाईपच्या जोडण्या असाव्यात ज्यामुळे कोठुनही पाणी गळणार नाही किंवा झिरपणार नाही. तसेच पोहण्याच्या तलावात पाणी पडताना अशा पाईपची उंची पाण्याच्या पातळीपासून किमान ६ फ़ुट उंच असेल अशा त-हेने तो पाईप असावा ज्यामुळे पाण्याचा हवेशी संपर्क येऊन त्यात डास अंडी घालू शकणार नाहीत. तसेच पोहण्याच्या तलावातील पाणी फ़वा-याने उडवण्याची प्रक्रिया किमान रोज ३ तास असावी व शक्यतो त्याची वेळ दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० अशी असावी. पोहण्याच्या तलावात प्रवेश करण्यापूर्वी स्वच्छ आंघोळ करावी व पाय स्वच्छ धुवावेत ज्यामुळे तलावातील पाणी प्रदुषित होणार नाही.

९. या नियमांत काही बाब किंवा प्रश्न निर्माण झाल्यास त्यात महापालिका आयुक्त यांनी दिलेला निर्णय हा अंतिम निर्णय समजण्यात येईल व पोहण्याच्या तलावाचे मालकावर तो निर्णय पुर्णपणे बंधनकारक राहिल.

१० पोहण्याच्या तलावालगत जीवनरक्षक आयुधे व साहित्य ठेवण्यात यावे व ते नेहमी वापरण्यास योग्य आहे याची सदैव खात्री करुन घेण्यात यावी.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने बांधण्यात येणा-या पुर्नचित इमारतीचे बांधकाम करताना डास न होण्यासाठी करावयाच्या कारवाईबाबत नियम :-**

१. ज्या ठिकाणी बांधकाम चालू आहे त्या ठिकाणी बांधकाम करणा-या जमीनमालकाने दर आठवड्यास त्याचे बांधकाम क्षेत्रालगत क्षेत्रात असणा-या पाण्याच्या टाक्या /पाण्याने हौद इ. पाण्याचे नमुने तपासून घेतले पाहिजेत व त्याचा तपासणी अहवाल ठेवला पाहिजे.

२. बांधकाम क्षेत्रात असणा-या पाणी साठवण्याच्या सर्व टाक्या व हौद हे आठवड्यातून एकदा स्वच्छ केले पाहिजेत व किमान ६ तास कोरडे राखले पाहिजेत.

३. बांधकाम क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे टाक्याचे ज्यादा पाणी वाहून नेणारे ओव्हर पाईप तसेच सेप्टीक टाक्या, संडास तपासणीचे सांडपाणी चेंबरला बसविलेले पाईप यांना डास प्रतिबंधक जाळ्या बसविलेल्या असाव्यात.

४. सर्व गच्च्यावरील पाणी साठवयाच्या टाक्या व उंचावरील पाणी साठववयाच्या टाक्या या नियमित स्वच्छ केल्या पाहिजेत व त्या स्वच्छ व डास निर्मुलनक्षम आहेत की नाही हे केव्हाही तपासता यावे यासाठी अशा टाक्यांना शिडी बसविलेली असावी.

५. सर्व पाण्याच्या टाक्यांना घट्ट अशी गोलाकार किंवा चौकोनी झाकणी योग्य प्रकारच्या साहित्याची बनवून कॉलरच्या सहाय्याने बसवावित जेणेकरुन टाकीत डास अंडी घालून डासांचा प्रादुर्भाव करणार नाहीत.

६. सर्व टाक्यांच्या ज्यादा पाणी वाहून नेणा-या पाईपना डास विरोधी जाळ्या बसवाव्यात.

७. बांधकाम क्षेत्रात टाकाऊ बांधकाम साहित्याचे ढीग रोजच्यारोज काढून सर्व जागा स्वच्छ ठेवावी व डास अंडी घालू नयेत यासाठी कोठेही कोणत्याही प्रकारचे खड्डे तयार होऊ देऊ नयेत.

८. दर आठवड्यास साचलेली गटारे स्वच्छ करुन व डबक्यात डास प्रतिबंधक औषध टाकून ते लगेचच बुजवावेत.

९. जर त्या क्षेत्रात मजूर राहत असतील तर धूरीकरण व डास प्रतिबधंक औषधाची फ़वारणी आठवड्यातून एकदा करावी.

**बांधकाम करताना भूखंडाचे क्षेत्र व लगतच्या रस्त्यावर व गटारांवर आरोग्याचे दृष्टीकोनातुन घ्यावयाची काळजी बांधकाम साहित्य जसे रेती, लोखंडी सळया, विटा व बांधकामाचे ढिगारे रस्त्यावर ठेवण्याबाबत निर्बंध :-**

अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९३ (१ब)अन्वये कोणाही इसमास अगर भूखंड धारकास महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकणे यासाठी रस्त्यांचा वापर करता येणार नाही.

ब) कोणत्याही व्यक्तीस इमारतीचे खराब झालेले बांधकाम साहित्य, विटांचे तुकडे , खडी इ. साहित्याचे ढीग रस्त्यावर किंवा लगतचे गटारात टाकून रस्ता किंवा गटार खराब करता येणार नाही.

क) अशा त-हेचे साहित्य महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय ठेवल्याचे आढळल्यास ते साहित्य कोणतिही लेखी सुचना न देता महापालिकेचा कोणताही अधिकारी उचलून नेईल. तसेच बिना परवाना साहित्य रस्त्यावर ठेवल्यास आढळल्यास किंवा रस्त्यालगतचे गटार असल्याचे आढळल्यास अशा बांधकाम करणा-या व्यक्तीस रु. १००० प्रति रोज याप्रमाणे दंड करण्यात येईल व अशा दंड भरण्याबाबत दिल्यावर तो दंड न भरल्यास व २४ तासांचे आत रस्त्यावरील बांधकाम साहित्य जप्त करण्यात येईल व खराब मालाचे ढिगारे न उचलल्यास त्या व्यक्तीस दिलेली बांधकाम परवानगी रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

**रस्त्यालगत महापालिकेचे गटार स्वच्छ ठेवण्यासाठी तसेच रस्त्यालगत गटार बांधण्यासाठी घ्यावयाची दक्षता :-**

१. जर बांधकाम करावयाच्या भूखंडालगतच महापालिकेचे गटार असेल तर अशा गटारालगत किमान १५ सें.मी. अंतर बांधकाम करावयाच्या जागेची कुंपणभिंत बांधण्यात यावी. त्यामुळे महापालिकेच्या गटारास कोणतेही नुकसान होणार नाही व ते स्वच्छ राहील.

२. बांधकाम करावयाच्या भूखंडालगत असे गटार नसेल तर बांधकाम करणा-या इसमाने महानगरपालिकेच्या परवानगीने महापालिका सुचवेल त्याप्रमाणे गटार बांधुन ते लगतच्या गटारास जोडले पाहिजे.

३. बांधकाम सुरु असल्याचे कालावधीत बांधकाम करणा-या व्यक्तीने असे गटार व लगतचा रस्ता कायम स्वच्छ ठेवून वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा रीतीने ठेवला पाहिजे.

४. बांधकाम चालू असताना महापालिकेच्या कोणत्याही अधिका-याने त्याचे असे निर्दशनास आले की, रस्त्यावर साहित्य ठेवून अडवलेला आहे व रस्त्यालगतचे गटार स्वच्छ नाही अशा वेळी महापालिकेच्या कोणत्याही अधिका-याने नोटीस दिल्यानंतर २४ तासांचे बांधकाम करणाराने रस्ता व गटार स्वच्छ करुन तसे कळविले पाहिजे अन्यथा त्या भूखंडास दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

**इमारत पूर्ण झाल्यावर भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी घ्यावयाची आरोग्यविषयक खबरदारी :-**

१. बांधकाम पूर्ण झाल्यावर भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करण्यापूर्वी बांधकाम करणाराने बांधलेल्या इमारतीतील बांधकाम साहित्याचे ढीग उचलून इमारत स्वच्छ केली पाहिजे. तसेच इमारतीच्या भूखंडातील व लगतच्या रस्त्यावरील व गटारातील कचरा व बाधकाम साहित्याचे ढीग उचलून रस्ता व गटार स्वच्छ केले पाहिजे व असे केल्याबद्दल महापालिकेच्या आरोग्य अधिका-यांचे प्रमाणपत्र मिळविल्याचे अर्जासोबत जोडले पाहिजे. इमारत बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम करणा-याने आपल्या भूखंडात महापालिकेच्या परवानगीनुसार सुचविलेली वृक्ष लागवड केली पाहिजे व भूखंड व परिसर स्वच्छ व सुंदर ठेवले पाहिजे. त्याबाबतचे प्रमाणपत्र त्या क्षेत्रातील विभाग अधिकारी यांचे कडून मिळवून भोगवटा प्रमाणपत्र घेण्याचे अर्जासोबत जोडले पाहिजे.

**बांधकाम पुर्ण झाल्यावर घ्यावयाची काळजी :-**

१. भोगवटा प्रमाणपत्र मिळवल्यानंतर इमारती वापरात आल्यानंतर भूखंडातील सर्व गटारे व घाणपाणी वाहून नेणारी भूमिगत गटारे स्वच्छ ठेवून ती महापालिकेच्या भुमिगत गटारास किंवा सेप्टीक टाकीस जोडली पाहिजेत. इमारतीमधील मलनिसा:रण महापालिकेच्या गटारास जोडणे बंधनकारक आहे.

२. अशा प्रकारची अंर्तगत गटारे व अंर्तगत भूमिगत गटारे अस्वच्छ दिसल्यास व त्यातून आरोग्यास अपायकारक असे घाणपाणी साचल्याचे दिसल्यास अशा इमारतीचे मालकास किंवा भोगवटादारास महापालिकेने नोटीस दिल्यापासून २४ तासांचे आत ती स्वच्छ केली पाहिजेत व तसे केल्याबाबत महापालिकेच्या आरोग्य अधिका-याचे प्रमाणपत्र घेऊन ते नोटीस देणा-या महापालिकेच्या अधिका-यास सादर केले पाहिजे.

(६)

**बांधकाम चालू असताना गटारे व रस्त्यावर बांधकामाचे साहित्य टाकणाऱ्यांवर कारवाई व डास निर्मूलन नियमांचे पालन याबाबत दंडात्मक व इतर कार्यवाही :-**

१. बांधकाम परवानगी घेण्यापूर्वी प्रत्येक बांधकाम करणा-या भूंखडाधारकाने भूखंडधारक किंवा त्यांनी नेमलेला बांधकाम कंत्राटदार महापालिकेच्या सार्वजनिक रस्तावर व गटारावर कोणत्याही त-हेचे टाकाऊ बांधकाम साहित्य किंवा वापरात यावयाचे बांधकाम साहित्य टाकणार नाही. याबाबतचे प्रतिज्ञापत्र लिहून दिले पाहिजे.

२. याच प्रतिज्ञापत्रासमवेत त्याने खालीलप्रमाणे अनामत रक्कम रस्त्यावर किंवा गटारावर बांधकाम साहित्य/टाकाऊ साहित्य काढण्याचे उपाय योजनेसाठी वृक्ष लागवड व डास निर्मूलन यासाठी खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. डास निर्मूलनासाठी रु. ४०/- प्रति चौ.मि. व रस्त्यावर सामान न टाकण्यासाठी प्रतिज्ञा पत्र घेताना रु. ४०/- प्रति.चौ.मि. या प्रमाणे रु. ८०/- प्र.चौ.मि. दराने अनामत रक्कम घ्यावी.

३. महापालिकेच्या असे नजरेस आले की, बांधकाम करणारांनी त्यांचे भूखंडासमोरील रस्त्यावर किंवा महापालिका गटारावर बांधकाम साहित्य ठेवले आहे तेव्हा अशा इसमास नोटीस दिल्यापासुन २४ तासांचे आत त्यांनी ते साहित्य उचलून नेले पाहिजे व रस्ता व गटारे स्वच्छ केले पाहिजेत. अन्यथा महापालिका ते उचलून नेईल व त्यासाठी ट्रकच्या प्रत्येक खेपेसाठी रु. २०००/- या प्रमाणे खर्च वसूल केला जाईल. अशा रीतीने वारंवार नोटीसा देऊन रस्त्यावरील किंवा गटारावरील साहित्य उचलण्यास त्याचे अनामत रक्कम संपुष्टात आल्यास त्याची बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल. त्यानंतर पुन्हा परवानगी घेईपर्यंत त्याचे बांधकाम अनधिकृत समजून त्यावर कारवाई करण्यात येईल. रस्त्यावर बांधाकाम साहित्य टाकल्याचे आढळल्यास भूखंडाचे क्षेत्रावर रु. २/- प्रति. चौ.मि. या दराने दंड करावा असा दंड कमीत कमी रु. २०००/- असावा.

४. ज्या बांधकाम करणारांनी रस्त्यावर किंवा गटारावर बांधकाम साहित्य न टाकता बांधकाम पूर्ण केले असेल त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्याची अनामत रक्कम परत मिळेल. इतरांचे बाबतीत रस्त्यावरील बांधकाम साहित्य उचलण्यासाठी झालेला खर्च वजा करुन त्याची रक्कम परत करण्यात येईल.

५. डास निर्मुलन नियमांचे पालन न झाल्यास प्रत्येक वेळी रु. ४/- प्रति.चौ.मि. याप्रमाणे किमान रु. ५००/- याप्रमाणे दंड करावा व असा दंडात्मक आकार त्या भूखंडावर डास प्रतिबंधक अळ्या व डास नष्ट होईपर्यंतच्या कालावधीसाठी आकारावे. जागेची पाहणी केल्यावर त्या ठिकाणी डासांची पैदास झाल्याचे निर्दशनास आल्याबरोबर नोटीस संबधित विभागाने देण्यात यावी.व त्याची प्रत आरोग्य अधिकारी व विभाग कार्यालय यांना द्यावी. विभागातील आरोग्य निरिक्षक यांनी रोजच्या रोज त्या भूखंडावर डास प्रतिबंधक फ़वारणी करावी व पुनश्च: भूखंड आरोग्यास सुरक्षित होईपर्यंत कार्यवाही करत राहावे व डास निर्मुलन प्रक्रिया पुर्ण झाल्यावर नगररचना विभागास कळवावे, तोपर्यंत दंडात्मक वर्गणी वसूल करावी.

६. जे बांधकाम करताना नियमांचे पालन करतील त्यांची अनामत रक्कम निश्चितच परत करण्यात येईल.

वरील प्रमाणे उपविधी चर्चा, विचारविनिमय, सुचना, हरकती, दुरुस्ती व मा. महासभा मंजुरीसाठी व मा. महासभा मंजुरीनंतर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेस सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

પ્રાપ્ત દિ. ૧૨/૧૧/૧૨

૧૨/૧૧/૧૨

મહાસભા ગોઠવાયાનું

રજીસ્ટર અ.ક્ર. ૦૯

(१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

## गोषवारा

प्रकरण क्र. : २४

विषय : **बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी सद्या ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. या आरोग्य केंद्रांमध्ये देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा सुविधांपैकी हिवताप रुग्णांचे निदान व उपचार ही एक महत्वाची सेवा आहे. हिवतापाबरोबर डेंग्यु, चिकनगुन्या हेही डासांमुळे उद्‌भवणारे गंभीर आजार आहेत. वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे मोठया प्रमाणात होत असलेली बांधकामे, सांडपाण्याचे नाले बांधण्याची कामे तसेच जीवनशैलीतील बदल, पाण्याचे अयोग्य नियोजन, चुकीच्या पद्‌धतीने पाणी साठवण्याच्या पद्‌धती इ. मुळे शहरामध्ये डासोत्पत्ती स्थाने प्रचंड प्रमाणावर वाढत आहेत. त्यामुळे हिवताप, डेंग्यु, चिकनगुन्या इ. आजार शहरामध्ये मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत. सदर आजारांवर नियंत्रण राखण्यासाठी सर्व ताप रूग्णांचे रक्त नमुने घेऊन त्यांना उपचार देणे आवश्यक असते. सद्यस्थितीत रक्तनमुने तपासणीसाठी सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत प्रयोगशाळा तंत्रज्ञांची मदत घेण्यात येते. तपासणीमध्ये दूषित रक्तनमुने आढळलेल्या रुग्णांना आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत 'समूळ उपचार' (Radical Treatment) देण्यात येतात.

त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रात देखील प्रसविकांमार्फत त्यांच्या गृह भेटीच्या वेळी ताप रुग्णांचे रक्तनमुने घेऊन त्यांना उपचार देण्यात येतात. परंतु, प्रसविकांना त्यांच्याकडे असलेल्या माता व बाल आरोग्य विषयक कामांमुळे संपूर्ण कार्यक्षेत्रातून अतिशय अल्प प्रमाणात रक्तनमुने गोळा करणे शक्य होते. परंतु, राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रम, नागरी हिवताप योजनेनुसार हिवताप प्रतिबंधक योजनांमध्ये डास व डासअळी नियंत्रण या व्यतिरिक्त प्रत्यक्ष लोकसंख्या सर्व्हेक्षण अत्यंत महत्वाचे आहे. याअंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन रुग्णांची विचारपूस करुन आवश्यकतेप्रमाणे ताप रुग्णांचे रक्तनमुने हिवताप निदानासाठी घेतात. तसेच सदर रक्तनमुने तात्काळ प्रयोगशाळेत पाठवून तपासणीचा अहवाल प्राप्त करून दूषित रक्तनमूने आलेल्या रुग्णांना समूळ उपचार देतात. यामुळे हिवताप रुग्णांना तात्काळ उपचार मिळतो. तसेच हिवताप प्रसार थांबविण्यासाठी सदर पध्दतीने केलेली कामे अत्यंत उपयोगी पडतात.

तरी उपरोक्त कामे करण्यासाठी 'बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी' (Multi Purpose Worker) आवश्यक आहेत. शासनपत्र अ.शा. पत्र क्र. तांत्रिक/कक्ष१०/साथरोग/१३०३३-३५/२०११ दि. ३०/०३/२०११, ११/०४/२०११ नुसार मिरा भाईदर महानगरपालिकेस २०,००० लोकसंख्येस १ या प्रमाणात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी किमान ५० आरोग्य कर्मचारी आवश्यक असल्याबाबत कळविले आहे. जनगणना २०११ नुसार मिरा भाईदर महानगरपालिकेची लोकसंख्या ८.१४ लक्ष आहे. त्यानुसार ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारीं आवश्यक आहेत. सदर कर्मचारी खालील कामे करतील :

- प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करून संशयित ताप रुग्णांचे रक्तनमुने घेणे.
- रक्तनमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणे.
- अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे समूळ उपचार देणे.
- जलद ताप सर्व्हेक्षण करणे
- कंटेनर सर्व्हेक्षण (डासअळी साठी पाणीसाठे तपासणे)

(२)

- कोरडा दिवस पाळणे
- औषध फवारणीचे पर्यवेक्षण करणे
- आरोग्य शिक्षण देणे
- अहवाल तयार करणे
- वेळोवेळी सोपविण्यात येणारी कामे करणे

शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी १० टक्के लोकसंख्येचे रक्तनमुने घेणे आवश्यक आहे. याबाबत कर्मचारी नसल्यामुळे हिवतापासाठी अल्प प्रमाणात रक्तनमुने गोळा करण्यात येतात. परंतु हिवताप नियंत्रणासाठी जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोहचून त्यांचे रक्तनमुने प्राप्त झाल्यास हिवताप नियंत्रण शक्य होणार आहे व यासाठी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. शासनाकडे स्थायी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार रु. ५,२००/- - २०,२००/- - २,४००/- वेतनश्रेणी लागू आहे. या वेतनश्रेणी नुसार स्थायी पदासाठी वेतन खर्च खालीलप्रमाणे अपेक्षित आहे :

| पद नाम | पद संख्या | वेतन श्रेणी | एकत्रित मासिक वेतन | एकत्रित वार्षिक वेतन खर्च |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | ५,२००-२०,२०० ग्रेड पे २,४०० | ६,२८,१२०/- | ७५,३७,४४०/- |

उपरोक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक सुरूवातीस तात्पूरत्या करारतत्वावर व रू. ७,०००/- ठोक मासिक मानधनावर केल्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| पद नाम | पद संख्या | ठोक मासिक मानधन | एकत्रित मासिक मानधन | एकत्रित वार्षिक मानधन |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | रु. ७,०००/- | २.८७ लक्ष | रू. ३४.४४ लक्ष |

तसेच सदर वेतन खर्च सार्वजनिक आरोग्य विभागात उपलब्ध असलेल्या 'आर. सी. एच. फेज-२ वेतन/इतर' या लेखाशिर्षामधील रु. ५२,००,०००./- या उपलब्ध तरतुदीतुन करता येऊ शकेल.

तरी अशा प्रकारे हिवताप नियंत्रणासाठी ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांच्या पदांचा प्रस्ताव शासनाकडे पदनिर्मितीसाठी पाठविणे व तोपर्यंत सदर पदे तात्पुरत्या करारतत्वावर व ठोक मानधनावर भरणे व त्यासाठी येणाऱ्या वेतन खर्चास मंजुरी देणे याबाबत विचारविनिमय करणे व धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सादर.

उप-आयुक्त (आ)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

E:\E\Dr. Pramodh Padwal\Dengu, Lipo & Chikungunia\Sadar\MPW.doc

महत्त्वाचा गोषवारा नोंद
रजिस्टर अ.क्र. ०५

प्राप्त दि. [illegible]
[illegible] स. १०.५०.वा.
[illegible]

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१/१२/२०१२

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (२५)**:- भाईंदर (पूर्व) आरक्षण क्रमांक २४६ (मैदान) विकसित करून मुलांना खेळण्यासाठी खुले करणेकरीता खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. २४६, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २०,००० चौ. मीटर एवढे असून टी.डी.आर तरतुदीच्या माध्यमातून सदर आरक्षणाची १४४८६.९८ चौ. मीटर एवढी जागा (७२.४३%) महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. सदर आरक्षणाचा विकास करून सदर भागातील रहिवाशी व मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. सदर आरक्षणास कुंपणभिंत बांधून मुरूम व लाल मातीचा भराव करावा लागणार आहे. त्याकरीता रू. ७२,९६,९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात बगीचे/वाहनतळ/मैदाने/क्रिडा संकुल/इनडोअर गेम विकसित या लेखाशिर्षाखाली १.०० कोटी एवढी तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PWD/PCII/12-13/DK/MG 1

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०१।१२।२०१२

(१)

// गोषवारा //

**प्रकरण क्र.२६ :- बगीचा/उद्यान आरक्षण क्र. ११७ व आरक्षण क्र. २२१ येथे Theme Park (Public Park) व खेळाचे मैदान विकसित करणेबाबत..**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ गोडदेव व आरक्षण क्र. २२१ हे बगीच्यासाठी आरक्षित असून सदर उद्यानाचे क्षेत्रफळ अंदाजित अनुक्रमे १८००० चौ.मी. व १९६७६ चौ.मी. आहे व ते विकसित करण्यासाठी अनुक्रमे मे. समा लॅन्डस्केप आर्किटेक्ट व मे. सराह कन्सल्टन्सी या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

आरक्षण क्र ११७ गोडदेव बगीचा/उद्यानासाठी आरक्षित असून बाजुला असलेल्या तलावाचेही सुशोभिकरण व रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे प्रस्तावित आहे.

**<u>आरक्षण क्र. ११७</u>** <u>(१८००० चौ.मी.)</u> थीम पार्क प्राचीन वास्तुशास्त्रातील पंचतत्त्वावर (पृथ्वी, पाणी, वायू, सुर्य आणि आकाश) आधारीत प्रत्येक तत्त्वाच्या घटकांचा त्यांचे स्थान, रंग लक्षात घेऊन त्यांचा पार्कच्या डिझाईनमध्ये समावेश करण्यात आला आहे. सर्वांसाठी आवश्यक गोष्टींची उदा. नागरिकांसाठी माहिती केंद्र, शैक्षणिक फिल्मस् दाखविण्यासाठी व छोट्या कार्यक्रमासाठी एक ॲम्पी थिएटर, खाण्याची छोटी दुकाने, स्वच्छता गृहे, गांडुळ खत प्रकल्प आणि सौरदिवे असणार आहेत. सदर थिम पार्क विकसित करणेकरिता अंदाजीत खर्च रुपये दोन कोटी येणार आहे.

**<u>आरक्षण क्र. २२१</u>**(१९६७६ चौ.मी.) या जागेस दक्षिण आणि पूर्व या दोन्ही बाजुने रस्ता आहे. त्यात बायो डायव्हर्सिटी पार्क, क्लब हाऊस, ॲम्पीथिएटर, नेट क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, स्केटींग व खेळण्याची साधने, जॉगिंग ट्रॅक आणि सायकलिंग ट्रॅक व लॉन, स्टॉल व कॅफे असेल. त्यासाठी अंदाजित खर्च रुपये दोन कोटी चाळीस लाख येणार आहे.

तसेच खेळाची मैदानेसुध्दा विकसित करणे आवश्यक आहे ज्याचा उपयोग लहान व तरुण मुले, खेळाडू, जेष्ठ नागरिक यांना होणार आहे. ताब्यात आलेली मैदाने.

| अ. क्र. | आरक्षण क्र. | मौजे | आरक्षणाचे नाव | एकुण क्षेत्र चौ.मी. | ताब्यात घेतलेले एकुण क्षेत्र चौ.मी. | भागशः ताब्यात आलेल्या जागेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ९६ | भाईंदर | खेळाचे मैदान | ६००० | ६००० | १००% |
| २. | १०९ | खारी | खेळाचे मैदान | १०४०० | ९३९७.७७ | ९०.३६% |
| ३. | ११९ | गोडदेव | खेळाचे मैदान | १६८०० | ११७८७.९८ | ७०.१७% |
| ४. | १२२ सी | खारी | खेळाचे मैदान | ३८००० | १६७१५.९८ | ४३.९९% |
| ५. | १७० | भाईंदर | खेळाचे मैदान | १२००० | ५५०२ | ४५.८५% |
| ६. | १७८ | भाईंदर | खेळाचे मैदान | ९००० | ५२६०.१२ | ५८.४५% |
| ७. | २४६ | गोडदेव | खेळाचे मैदान | २०००० | १४४८६.९८ | ७२.४३% |
| ८. | ३०० | नवघर | खेळाचे मैदान | २६६०० | २०७७५ | ७८.१०% |
| ९. | ३५५ | मिरा | खेळाचे मैदान | १९२०० | १७१६२.१६ | ८९.३९% |


वरीलपैकी आरक्षण क्र. १२२ सी व १७० ही मैदाने काही प्रमाणात विकसित करण्यात आलेली असुन इतर मैदाने विकसित करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कामी उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाच्या सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात रु.६,७५,००,०००/- (रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) एवढी तरतुद आहे. उपरोक्त प्रस्तावित बगीचा/उद्यानासाठी आरक्षित ठिकाणी थिम पार्क व खेळाची मैदाने विकसित करणेकामी मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

आयुक्त

मिरा-भाईंदर महानगरपालिका

(२)




## DRG TITLE.

PLAN SHOWING THE PLANE TABLE MEASURMENT OF
SURVEY NO- HISSA NO- AT.VILL- NAVGHAR
POST- BHAYANDAR TAH & DIST. THANE.

### AREA STATEMENT

| SURVEY NO | HISSA NO | C.T.S.NO | SQ.METERS | SQ. YARDS | SQ.FEET |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

### LEGEND :-


| | | |
|---|---|---|
| Survey no line | shown thus | |
| FIXED STONE | " | " |
| Forest Buruj | " | " |
| Gutter | " | " |
| Electric/Light Te.ph.pole | " | " |
| COCONUT TREE | " | " |
| TREES | " | " |
| EXISTING BUND | " | " |
| ROAD | " | " |
| FENCING | " | " |
| STRUCTURE'S | " | " |
| WELL | " | " |
| BOREWELL | | |
| C.Wall | | |
| Culvert | | |

SURVEYED BY-S.V.PALANDE
DRAWN BY - PRITI R. MHAPSEKAR
DRG NO :
DATE : 01/11/2012

N


SCALE-1:1000

M.B.RANE
(Surveyor)
15.GROUND FLOOR,
SAHAKAR JYOT,
BELOW T.D.C BANK
C.S.M.MARG
BHAYANDER WEST.
THANE 401 101
PHONE- 28196622



ROAD
91/9
91/10
91/12
91/13
89/6
POND
90/1
89/7
S.NO.89
90/2
214/6
214/7
214/8
214/9
214/10
214/11
214/13
GARDEN
117
S.NO.213
S.NO.213
15.0M

(8)




**DRG TITLE.**

PLAN SHOWING THE PLANE TABLE MEASURMENT OF SURVEY NO- HISSA NO- AT.VILL- POST- MIRA TAH & DIST. THANE.

**AREA STATEMENT**

| SURVEY NO | HISSA NO | C.T.S.NO | SQ.METRES | SQ. YARDS | SQ.FEET |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**LEGEND :-**

| | | | |
|---|---|---|---|
| Survey no line | shown thus | | |
| FIXED STONE | -"- | -"- | ⊗F ⊗F |
| Forest Buruj | -"- | -"- | |
| Gutter | -"- | -"- | |
| Electric/Light Te.ph.pole | -"- | -"- | |
| COCONUT TREE | -"- | -"- | |
| TREES | -"- | -"- | |
| EXISTING BUND | -"- | -"- | |
| ROAD | -"- | -"- | ROAD |
| FENCING | -"- | -"- | |
| STRUCTURE'S | -"- | -"- | |
| WELL | -"- | -"- | W |
| BOREWELL | | | BOREWELL |
| C.Wall | | | |
| Culvert | | | |


SURVEYED BY-S.V.PALANDE
DRAWN BY -PRITI R. MHAPSEKAR
DRG NO :
DATE : 01/11/2012

N

SCALE- 1:1000


M.B.RANE
(Surveyor)
15.GROUND FLOOR,
SAHAKAR JYOT,
BELOW T.D.C BANK
C.S.M.MARG
BHAYANDER WEST.
THANE 401 101
PHONE- 28196622

9



223/1
223/5
223/6
223/7
223/13
223/8
223/10
223/11
223/12
223/14
222/1
222/2
222/38
222/4
222/8
222/7
222/9
222/3A
222/5
222/10
222/11
222/12
222/6
GARDEN
221
222/13B
222/13A
222/14
222/15
222/12
SCHOOL
220
S.NO. 323
322/3
322/4
322/5
322/6
320/1
320/2
320/3
320/4
320/5
319/1
319/3
322/10
322/13
319/2
322/11
322/16
320/6
320/7
320/8
319/9
320/10
320/9
319/10
319/12
322/14
322/15
322/16
15
320/6
322/17
TEMPAL
320/14
COMM.CENTER
HIGH SCHOOL & PLAY GROUND
218
322/19
320/11
320/12
219
320/13
319\10
322/18
320/15
320\18
320\21
321/3
OPEN SPACE
321/4
320\17
320\20
320\16

પ્રાપ્ત ૧૬.૭૦/૧૧/૭૨
વેળા સ.૧૧.૦૦
૬/૦/૧૧/૭૨

મહાસભા ગોઝારા નોંધ
રજિસ્ટર અ.નુ.૦૮